> "*Kuch toh log kahenge, logon ka kaam hai kehna!* We must forget about what people will think and focus on what we want to share. Let out your feelings."
> — Eesha Rakhi

# *Congratulations to Dr. Prabhakar Varade, Department of Electronic Science*



# NEWLY ADDED AND BOOKS RECEIVED IN GRATIS DURING DECEMBER 2023

| Author | Title |
|---|---|
| SAXENA, SUSHIL KUMAR | THE WINGED FORM: AESTHETICAL ESSAYS ON |
| SHARMA, PREM LATA | SARANGADEVA AND HIS SANGEET RATNAKARA: |
| SANGEET NATAK AKADEMI | SANGEET NATAK: JOURNAL OF THE SANGEET |
| SANGEET NATAK AKADEMI | SANGEET NATAK: VOL.XLIV NO.3 2010 |
| SANGEET NATAK AKADEMI | SANGEET NATAK: VOL.XL, NO. 4, 2006 |
| SANGEET NATAK AKADEMI | SANGEET NATAK: NO.S 89-90, JULY-DECEMBER 1988 |
| SANGEET NATAK AKADEMI | SANGEET NATAK: JOURNAL OF THE SANGEET |
| SANGEET NATAK AKADEMI | SANGEET NATAK: VOL.LI, NO.S 1-4, 2017 |
| SANGEET NATAK AKADEMI | SANGEET NATAK: VOL.XLIII, NO.4, 2009 |
| DEVRUKHKAR, SANDHYA | VASANT-BAHAAR: VASANTRAO DESHPANDE: |
| SANGORAM, MUKUND / PAKNI- | KHYALIYA |
| DEODHAR, B.R. | THOR SANGEETKARANACHI PARAMPARA |
| RANADE, ASHOK D. | SANGEETVICHAR |
| BEEDKAR, SUCHETA | SANGEET SHASTRA-VIDNYAN BHAG 2 |
| BEEDKAR, SUCHETA | SANGEET SHASTRA-VIDNYAN BHAG 1 |
| DESHMUKH, MANGAL SHANKAR | KHANDMERU SWARPRASTAR SADHANA |
| PHATAK, KIRAN | BANDISH: HINDUSTANI ABHIJAT SANGITATIL |
| PHATAK, KIRAN | RAAG: SHASTRIYA SANGEETATIL RAAG YA SANKALPANEBADDAL VISTRUT VA SARVANGIN |
| PHATAK, KIRAN | KHYAAL-EK VICHAR |
| PHATAK, KIRAN | BHARATIYA SHASTRIYA SANGEET |
| BHATKHANDE, VISHNU NARAYAN | HINDUSTANI SANGEET PADDHATI BHAG 5 |
| BHATKHANDE, VISHNU NARAYAN | HINDUSTANI SANGEET PADDHATI BHAG 4 |
| BHATKHANDE, VISHNU NARAYAN | HINDUSTANI SANGEET PADDHATI BHAG 3 |
| BHATKHANDE, VISHNU NARAYAN | HINDUSTANI SANGEET PADDHATI BHAG 2 |
| BHATKHANDE, VISHNU NARAYAN | HINDUSTANI SANGEET PADDHATI BHAG 1 |
| TALWALKAR, SURESH | AAVARTAN |
| DATAR, SHAILA | DEVA GANDHARV |
| BAKRE, SADASHIV | DIN RANG: SURMAI JEEVAN GATHA |
| RANADE, ASHOK D. | HINDUSTANI SANGEET |
| ATHAVALE, V.R. | NAAD CHINTAN |
| MAINKAR, SUDHEER | SANGEET, KALA AANI SHIKSHAN |
| DESHPANDE, SATYASHEEL | GAAN GUNGAAN: EK SAANGITIK YATRA |
| DEODHAR, B.R. | THOR SANGEETKAR |
| PUNTAMBEKAR, ANURADHA. A. | SYSTEMS PROGRAMMING |
| KUNTE, KESHAVCHAITANYA | BHARATIYA DHARMASANGEET (भारतीय धर्मसंगीत) |

# *NEWLY ADDED AND BOOKS RECEIVED IN GRATIS DURING DECEMBER 2023*

| Author | Title |
|---|---|
| CHAVHAN ANNASAHEB | GADKOT गडकोट |
| SHENAI SANTOSH | SHIKSHAN AANI CHARITRYA SANVARDHAN |
| MODI NARENDRA | EXAM WARRIORS |
| SHETE MOHAN | HINDAVI SWARAJYA STHAPANA हिंदवी स्वराज्य स्थापना |
| SAVARKAR NIKHILESH | VACHE BARAVE KAVITVA वाचे बरवे कवित्व [ कविता संग्रह ] |
| BRAUN ROBERT D. | INTRODUCTION TO INSTRUMENTAL ANALYSIS |
| KAR ASHUTOSH | PHARMACEUTICAL DRUG ANALYSIS |
| GORDUS ADON A. | SCHAUMS OUTLINE OF THEORY & PROBLEMS OF |
| RAO B. M. | CHEMICAL CHARACHTERZATIONS OF MATERIALS |
| ORCHID MILTON / JAFFE H. | THE IMPORTANCE OF ANTIBONDING ORBITALS |
| KULKARNI M. G. | NUMERICAL PROBLEMS IN PHYSICAL CHEMISTRY |
| BROWN MICHAEL | PRACTICAL INORGANIC & ORGANIC PROBLEMS |
| CHRISTIAN GARY | ANALYTICAL CHEMISTRY |
| ARORA M. G. | STRUCTURE OF ATOM |
| CHAKRABARTY D. K. / | HETEROGENEOUS CATALYSIS |
| CONN ERIC E. / STUMPI P. | OUTLINE OF BIOCHEMISTRY |
| SCHRODINGER ERWIN | WHAT IS MATTER ? |
| SENGUPTA SUBRATA | BASIC STEREOCHEMISTRY OF ORGANIC MOLECULES |
| KUMAR PHANI N. | PRINCIPLES OF NANOTECHNOLOGY MATERIALS TOOLS & |
| RUSSINOFF S. E. | FORGING & FORMING METALS |
| FURNISS B. S. | VOGELS TEXT BOOK OF PRACTICAL ORGANIC CHEMISTRY |
| ADAMS ROGER | ORGANIC REACTIONS VOL - 2 |
| BRUICE PAULA Y. / PRA- | ESSENTIAL ORGANIC CHEMISTRY |
| LEVINE IRA N. | PHYSICAL CHEMISTRY |
| RAKSHIT P. C. | ELEMENTARY PHYSICAL CHEMISTRY |
| GLASSTONE SAMUEL | TEXTBOOK OF PHYSICAL CHEMISTRY |
| SAVUR G. R. | INORGANIC CHEMISTRY |
| KHOSLA B. D. | PRACTICAL PHYSICAL CHEMISTRY |
| ADAMS ROGER | ORGANIC REACTIONS VOL - IV |
| NUFFIELD SCIENCE | CHEMISTRY STUDENTS BOOK 1 TOPICS 1 TO 12 |
| NUFFIELD SCIENCE | CHEMISTRY STUDENTS BOOK 2 TOPICS 13 TO 19 |
| JAIN M. K. / SHARMA S. C. | MODERN ORGANIC CHEMISTRY |

# *NEWLY ADDED AND BOOKS RECEIVED IN GRATIS DURING DECEMBER 2023*

| Author | Title |
|---|---|
| FURNISS BRIAN S. | VOGELS TEXTBOOK OF PRACTICAL ORGANIC CHEMISTRY |
| BARROW GORDAN | PHYSICAL CHEMISTRY |
| SISKA PETER | UNIVERSITY CHEMISTRY |
| SYLVANUS SMITH J. | ADVANCED CHEMICAL CALCULATIONS |
| SVEHLA, G. | VOGEL'S QUALITATIVE INORGANIC ANALYSIS |
| BAHL, ARUN/ BAHL, B. S. | 5000 SOLVED PROBLEMS IN ORGANIC CHEMISTRY |
| CHEMICAL EDUCATION MATERIAL STUDY | CHEMISTRY: AN EXPERIMENTAL SCIENCE |
| ADAMS, ROGER/ BACHMANN, WERNER E. | ORGANIC REACTIONS VOLUME III |
| ARORA, M. G. | SOLID STATE CHEMISTRY |
| MADAN, R. L. | CHEMISTRY FOR DEGRR STUDENTS |
| BAHL, ARUN/ BAHL, B. S./ TULI, G. D. | ESSENTIALS OF PHYSICAL CHEMISTRY |
| CHAKRABARTY, D. K. | PHYSICAL CHEMISTRY |
| MUKHERJEE, K. S. | ORGANIC SPECTROSCOPY THROUGH SOLVED PROBLEMS |
| TYAGI, O. D./ YADAV, M. | TEXTBOOK OF SYNTHETIC DYES |
| MAITY, SAROJ KUMAR/ GHOSH, NABA KUMAR | PHYSICAL CHEMISTRY PRACTICAL |
| FINDLAY, ALEXANDER | INTRODUCTION TO PHYSICAL CHEMISTRY |
| BAIS, A. P. | TEXTBOOK OF PHYSICAL CHEMISTRY |
| SHEEHAN, WILLIAM F. | PHYSICAL CHEMISTRY |
| PAULING, LINUS | THE NATURE OF THE CHEMICAL BOND AND THE STRUCTURE OF MOLECULES AND CRYSTELS: AN INTRODUCTION TO MODERN |
| BENSON, SIDNEY W. | CHEMICAL CALCULATIONS: AN INTRODUCTION TO THE USE OF MATHEMATICS IN CHEMISTRY |
| MUKHERJEE, K. S. | TEXTBOOK ON PRACTICAL CHEMISTRY |
| CHATWAL, GURDEEP R. | ORGANIC CHEMISTRY OF NATURAL PRODUCTS VOLUME-I |
| PHADKE, BHASKAR NAGESH | CHAPTERS IN PHYSICAL CHEMISTRY |
| WRIGHT, RICHARD T. | ENVIORNMENTAL SCIENCE TOWARD A SUSTAINABLE FUTURE |
| SAHA, ANUPA/ PATHAK, ANUP | ORGANIC CHEMISTRY VOLUME II |
| PATHAK, ANUP/ SAHA, ANUPA | ORGANIC CHEMISTRY VOLUME I |
| MURTHY, PARAMESWARA/ ALI, SYED FAZAL MEHDI | UNIVERSITY CHEMISTRY VOLUME I |

# *NEWLY ADDED AND BOOKS RECEIVED IN GRATIS DURING DECEMBER 2023*

| Author | Title |
|---|---|
| GUPTA, ALKA L. | MEDICINAL CHEMISTRY |
| SYKES, PETER | A GUIDE TO MECHANISM IN ORGANIC CHEMISTRY |
| CHEMICAL BOND AP- | CHEMICAL SYSTEMS |
| SINGH, N. B./ DAS, SHIVA | PHYSICAL CHEMISTRY VOLUME II |
| UPADHYAY, AVINASH/ | BIOPHYSICAL CHEMISTRY: PRINCIPLES AND TECHNIQUES |
| LEE, J. D. | CONCISE INORGANIC CHEMISTRY |
| MAHAN, BRUCE H. | COLLEGE CHEMISTRY |
| SHRINER, RALPH L./ FU-SON, REYNOLD C. | THE SYSTEMATIC IDENTIFICATION OF ORGANIC COM-POUNDS: A LABORATORY MANUAL |
| NADKARNY, V. V. | PRACTICAL PHYSICAL CHEMISTRY |
| AGGARWAL, A. L. | A COURSE OF INORGANIC CHEMISTRY FOR INTERMEDIATE |
| KHOSALA, B. D. | PHYSICAL CHEMISTRY |
| DAY, R. A. / UNDER- | QUANTITATIVE ANALYSIS |
| MAHAN, BRUCE H. | UNIVERSITY CHEMISTRY |
| SHEEHAN, WILLIAM F. | PHYSICAL CHEMISTRY |
| RUNQUIST, OLAF / CRE- | CHEMICAL PRINCIPLES: A PROGRAMMED TEXT |
| REED-HILL, ROBERT E. | PHYSICAL METALLURGY PRINCIPLES |
| SINGH, N. B./ DAS, SHIVA | PHYSICAL CHEMISTRY |
| GILMAN, HENRY | ORGANIC CHEMISTRY: AN ADVANCED TREATISE VOLUME II |
| ALEXEYEV, V. | QUANTITATIVE ANALYSIS |
| SONI, P. L./ DHARMARHA, | TEXTBOOK OF PHYSICAL CHEMISTRY |

# *News Paper Clippings : December 2023*




Online newspapers and online services based on newspapers are becoming increasingly popular and useful in current digital age. These services helped libraries in reaching out users wherever they are and also save time of the users. The newspaper clippings are also known as press clippings in some libraries .
[*Ref: Gaur, Ramesh C., Chand, Mahesh, Gaur, Kavita & Yadav, Amar Singh. (2013). Online Newspaper Clippings and News Services for Libraries: Experiences in Indian Libraries. Accessed from [http://library.ifla.org/240/1/153-gaur-en.pdf](http://library.ifla.org/240/1/153-gaur-en.pdf)*]

**Clipping** is the cutting-out of articles from a paper publication. Newspaper clippings are often used when people have to write a report or make a presentation or for future reference. The Modern College, Shivajinagar Library subscribes to Ten (10) English Newspapers and Eleven (11) Marathi Newspapers which are referred by the students and staff. The Library has a practice of posting notifications of important news related to Education, UGC, NAAC, Savitribai Phule Pune University on the WhatsApp Groups of Staff.

Father of Library Science, Dr. S.R.Ranganathan's Fifth Law of Library Science states that *'Library is a Growing Organism'*. It means that a library should be a continually changing institution, never static in its outlook. Books, methods, and the physical library should be updated over time. As an implication of the Fifth Law of Library Science, the Modern College Library has also updated the ways of keeping and maintaining the Newspaper Clippings. E-newspaper Clippings Service gives a global viewership/user base, no maintenance required, storage space issues will be solved and any user, anytime, at any place can have an access to the Newspaper Clippings Service. The E-Newspaper Clippings Section is divided into ***News regarding MCASC, Pune-5, Education, Work of Appreciation, Health, Research, Sports, Miscellaneous .***



## *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

प्रभात

# मॉडर्न स्कूल आंतरवर्गीय क्रीडा महोत्सव, १२०० विद्यार्थ्यांचा सहभाग

**पुणे, दि. ३ -** शिवाजीनगर येथील मॉडर्न स्कूलमध्ये आंतरवर्गीय क्रीडा महोत्सवाला सुरुवात झाली. प्रशालेतील १२०० विद्यार्थ्यांसाठी विविध खेळ प्रकारांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये अॅथलेटिक्स, रिले, व्हॉलिबॉल, कबड्डी, खो-खो, डॉजबॉल या क्रीडा प्रकारांचा समावेश करण्यात आला. स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्तम खेळाचे प्रदर्शन केले. याप्रसंगी शाळा समिती अध्यक्ष चित्तरंजन कांबळे, मुख्याध्यापिका रोहिणी काळे, उपमुख्याध्यापिका वंदना सोनोने, पर्यवेक्षक निवृत्ती गोपाळे, प्रमोद शिंदे उपस्थित होते. खेळांच्या आयोजनात क्रीडा शिक्षक दादाभाऊ शिनलकर, गणपत नांगरे, चंद्रकांत आरकडे, नितीन डेरे, विकास पवार, संतोष भागित, जया फुलपगार, महेश इंगळे यांचा समावेश होता.

PuneCity, 04 Dec 2023, Page:013
https://epaper.dainikprabhat.com

## *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

लोकमत

मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसह दिग्गजांनी नोंदवला उत्स्फूर्त सहभाग

# 'शांतता... पुणेकर वाचत आहेत' दोन लाख नागरिक झाले वाचनात दंग

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे पुस्तक महोत्सवाच्या अनुषंगाने वाचन संस्कृतीला चालना देण्यासाठी गुरुवारी 'शांतता... पुणेकर वाचत आहेत' या उपक्रमाला पुणे शहरात विविध चौकांत, रिक्षाथांब्यांवर सरकारी-खासगी कार्यालये, महापालिकेची क्षेत्रीय कार्यालये, शाळा-महाविद्यालयांमध्ये उत्स्फूर्तपणे राबविण्यात आला. या उपक्रमात तब्बल दोन लाख पुणेकरांनी सहभाग घेतला.



'शांतता... पुणेकर वाचत आहेत' उपक्रमात सहभागी होत शालेय विद्यार्थ्यांनी पुस्तकाचे वाचन केले.

नागपूर येथील विधिमंडळ अधिवेशनाच्या कामकाजातून वेळ काढत विधानसभेचे सभापती ॲड. राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री चंद्रकांत पाटील, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह अनेक मान्यवर या उपक्रमात सहभागी झाले. अनेक जणांनी सोशल मीडियावर पुस्तक वाचतानाचे फोटो शेअर करीत पाठिंबा जाहीर केला.

ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, शिक्षणतज्ज्ञ डॉ. अनिरुद्ध देशपांडे, सिम्बायोसिस कुलपती डॉ.एस.बी.मुजुमदार, 'बार्टी'चे महासंचालक डॉ. सुनील वारे, भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेचे अध्यक्ष प्रदीप रावत, पुणे बार असोसिएशनचे अध्यक्ष केतन कोठावळे, 'सरहद'चे संजय नहार, डॉ. गजानन एकबोटे, डॉ. पी. डी. पाटील, डॉ. शिवाजीराव कदम, साहित्यिक शरणकुमार लिंबाळे, अभिनेता प्रवीण तरडे, डॉ. मिलिंद जोशी, चित्रपट महामंडळ अध्यक्ष मेघराज राजेभोसले यांनी उपक्रमात सहभागी झाले, असे पुणे पुस्तक महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे यांनी सांगितले.

## मोदींनी केले पुणेकरांचे कौतुक

पुण्यात शांतता... पुणेकर वाचत आहेत आणि पालक-बालक गोष्टी सांगायचा गिनीज रेकॉर्ड, या दोन्ही उपक्रमाची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दखल घेतली. आपल्या एक्स (ट्विटर) हॅण्डलवरुन वाचनसंस्कृतीचे संवर्धन केल्याबद्दल सर्व पुणेकरांचे कौतूक केले.



## पाचशे जणांनी वाचली आवडीची पुस्तके

वाचन संस्कृती संवर्धनासाठी 'शांतता... पुणेकर वाचत आहेत' या उपक्रमाला शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, सामाजिक संस्था, सरकारी आणि खासगी कार्यालये, महापालिकेची क्षेत्रीय कार्यालये, खासगी आस्थापनांमध्ये मोठा प्रतिसाद मिळाला. त्यात पुणेकरांनी दुपारी १२ ते १ दरम्यान त्यांच्या आवडीच्या पुस्तकाचे वाचन केले. फर्ग्युसन महाविद्यालयाच्या आवारात साधारण ५०० जणांनी आवडीचे पुस्तक वाचत सहभाग नोंदविला. शालेय विद्यार्थी, शिक्षक, पालक, अधिकारी, पत्रकार, राजकीय पक्षांचे नेते यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपक्रमात सहभागी झाले.

Hello Pune
Page No. 3 Dec 15, 2023
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

प्रभात

# मॉडर्न इंग्रजी हायस्कूलमध्ये 'वाचूया आनंदे'

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १९ -** पी.ई.एस. मॉडर्न इंग्रजी माध्यम हायस्कूलमध्ये पुणे पुस्तक महोत्सव या उपक्रमाचे औचित्य साधून वाचूया आनंदे या छोटेखानी पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन केले होते. प्रदर्शनाचे उद्घाटन प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे उपकार्यवाह व शाळेचे व्हिजिटर प्रा. डॉ. प्रकाश दीक्षित यांच्या हस्ते झाले.

शाळेच्या मुख्याध्यापिका माधुरी शहा, पालक-शिक्षक संघाचे पालक प्रतिनिधी, शाळेच्या ग्रंथपाल दिपाली ताम्हाणे, शिक्षक, विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला.



पुस्तक प्रदर्शनात विविध भाषांवर आधारित पुस्तके मांडलेली होती. इंग्रजी, मराठी, हिंदी, संस्कृत, विज्ञान तसेच जर्मन या भाषांची पुस्तके वाचकांनी हाताळली. प्रदर्शनातील शब्दकोश, पाककृती, आर्ट्स ऑफ स्पोर्ट्स, चाइल्ड क्राफ्ट, बायोग्राफिक्स, द वर्ल्ड बुक्स, अशा विविध साहित्यकृतींनी वाचकांचे लक्ष वेधून घेतले. या उपक्रमात शाळेने ग्रंथालयास मूल्यवान पुस्तकांचा संग्रह भेट म्हणून दिला. कार्यक्रम यशस्वीपणे संपन्न होण्यामागे प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, संस्थेच्या सहकार्यवाह प्रा. डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, संस्थेचे सेक्रेटरी शामकांत देशमुख यांचे बहुमूल्य मार्गदर्शन लाभले.

PuneCity, 20 Dec 2023, Page:015
https://epaper.dainikprabhat.com

# *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

**लोकमत**

## पुणेकरांनी विणलेले वस्त्र जाणार अयोध्येत

लोकमत न्यूज नेटवर्क



**पुणे :** अयोध्येतील श्रीरामजन्मभूमी मंदिरातील श्रीरामाच्या मूर्तीसाठी वस्त्र विणण्याचा 'दो धागे श्रीराम के लिए'' हा उपक्रम येत्या १० ते २२ डिसेंबर दरम्यान पुण्यात राबविण्यात येणार आहे. त्याला भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा उपस्थित राहणार आहेत.

श्रीरामजन्मभूमी तीर्थक्षेत्र, अयोध्या आणि पुण्यातील हेरिटेज हँडविविंग रिवायवल चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या वतीने उपक्रमाचे आयोजन केले असून, याचा शुभारंभ रविवारी (दि १०) सायं ६.३० वाजता शिवाजीनगर येथील मॉडर्न कॉलेज मैदानावर होणार आहे. हेरिटेज हँडविविंग रिवायवल चॅरिटेबल ट्रस्टच्या संचालिका अनघा घैसास यांनी ही माहिती दिली.

उद्घाटनानंतर १० ते २२ डिसेंबर दरम्यान पुण्यातील फर्ग्युसन रस्त्यावरील सौदामिनी हँडलूम या ठिकाणी सकाळी ९ ते रात्री ९ वाजेपर्यंत नागरिकांना विश्वासाचे दोन धागे रामलल्लासाठी विणता येतील, असेही घैसास म्हणाल्या.

भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या हस्ते या उपक्रमाला सुरुवात होईल.

श्रीरामजन्मभूमी तीर्थक्षेत्राचे मुख्य मार्गदर्शक आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी सरकार्यवाह भय्याजी जोशी, कोषाध्यक्ष स्वामी गोविंद देवगिरी महाराज, राज्याच्या पर्यटन आणि कौशल्य, विकास व उद्योजकता विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे आदी उपस्थित असतील. याच कार्यक्रमात राममंदिराच्या आंदोलनात सहभागी आणि संबंधित लोकांचे अनुभव कथन असलेल्या 'राममंदिराचे रामायण' या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते होईल.

Hello Pune
Page No. 3 Dec 07, 2023
Powered by: erelego.com

**पुढारी**

### संक्षिप्त

## 'दो धागे श्रीराम के लिए' उपक्रमाचे पुण्यात आयोजन

**पुणे :** अयोध्येत साकारण्यात येत असलेल्या श्रीराम मंदिराच्या कामात आपला हातभार लागावा, अशी इच्छा असलेल्या नागरिकांना प्रभू श्रीराम यांच्या मूर्तीसाठी वस्त्र विणण्याची संधी मिळणार आहे. प्रभू श्रीराम यांच्या मूर्तीसाठीचे वस्त्र पुण्यात विणले जाणार असून, त्यासाठी लोकांच्या मदतीने हे वस्त्र विणले जाणार आहे. मूर्तीसाठी वस्त्र विणण्याचा 'दो धागे श्रीराम के लिए' हा उपक्रम १० ते २२ डिसेंबरदरम्यान पुण्यात आयोजित केला आहे. श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र, अयोध्या आणि पुण्यातील हेरिटेज हँडविविंग रिवायवल चॅरिटेबल ट्रस्टने या उपक्रमाचे आयोजन केले आहे. उपक्रमाचे उद्घाटन रविवारी (दि. १०) सायंकाळी साडेसहा वाजता शिवाजीनगर येथील मॉडर्न महाविद्यालयाच्या मैदानावर होणार आहे. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या हस्ते उपक्रमाला सुरुवात होईल. उद्घाटनानंतर १० ते २२ डिसेंबरदरम्यान पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालय रस्त्यावरील सौदामिनी हँडलूम या ठिकाणी सकाळी ९ ते रात्री ९ वाजेपर्यंत नागरिकांना येऊन श्रद्धेचे व विश्वासाचे दोन धागे आपल्या श्रीराममूर्तीसाठी विणता येणार आहे. हा उपक्रम सर्वांसाठी विनामूल्य खुला असणार आहे.

My Pune Edition
Dec 7, 2023 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

# News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5

## Colleges demand open access to anti-plagiarism software

Ardhra.Nair@timesgroup.com

**Pune:** Representatives of colleges affiliated with Savitribai Phule Pune University said that while the anti-plagiarism software facility given by the university helps in detecting malpractices in research work submitted by a PhD student, it is not useful for the thesis submitted in Marathi, Hindi or any other language as the software recognises only English.

The college officials also said that the university must give access to the software to all librarians so that they can check for plagiarism in UG and PG research as well. The university only allows PhD research work to be checked.

Rajendra Zunjarrao, principal of Modern College of Arts, Science and Commerce, said that the university must give access to the software to all institutes.

Currently, only PhD guides can use the software for checking the thesis of their students. But, with NEP making research an integral part even for PG students, the university should give open access to the software to all colleges. Till two years ago, all librarians had access to the software and that was a good thing, he said.

### GUIDES MUST SEND REPORT

As per the university's circular on December 5, research guides in the departments must run the thesis submitted to them by PhD students in Turnitin software and get the plagiarism report

- Research guides in affiliated colleges should run the thesis submitted by students in the Drillbit-Extreme Plagiarism Detection Software and get the plagiarism report
- The plagiarism report should be produced before the departmental academic integrity panel committee of the research centre and should be sent to the university after all the members of the DAIP sign it



"The software is very costly and hence limited to PhD guides as the research work submitted by the research students must not be plagiarised. As for the UG and PG students and their research, the colleges can buy the software on their own if they wish to detect plagiarism – **Vijay Khare** | REGISTRAR OF THE UNIVERSITY

"Various grants that teachers used to receive from the university and the University Grants Commission have stopped in the last 5-8 years. These should be restarted. Only then will the culture of research among teachers be inculcated which will have a positive impact on the students too. Lastly, the software is ineffective for a thesis in any other language except English which needs to be looked at," he said.

Dinesh Garud, a PhD guide from SP College, said that as per rules, any thesis run through the software which comes up with less than 10% plagiarism is accepted.

"PhD guides have login IDs and we can only use the software to run the PhD thesis. We cannot use it for any other work such as UG or PG research. Once we run it by the software, the report is generated within one minute," Garud said.

Vijay Khare, registrar of the university, said that they know that the software is ineffective for a thesis written in other than the English language but at present, neither the university nor the UGC has a solution for it.

The Times of India 18.12.2023

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

पुढारी

# वाणिज्य व्यवस्थापनमध्ये अर्थशास्त्राला दुय्यम स्थान

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वाणिज्य आणि व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखेच्या संभाव्य अभ्यासक्रमात अर्थशास्त्र विषय मुख्य विषय ठेवण्याऐवजी दुय्यम ठेवण्याबाबत प्रस्तावित करण्यात आले आहे. त्यामुळे अर्थशास्त्र विषय न शिकताच विद्यार्थ्यांना वाणिज्य आणि व्यवस्थापनशास्त्र शाखेची पदवी देणे योग्य नसल्याचे सांगत व्यावसायिक अर्थशास्त्र आणि बँकिंग, फायनान्स आणि इश्युरन्स हे मुख्य विषय म्हणून समाविष्ट करण्याची मागणी करण्यात आली आहे.

अर्थशास्त्र विषयाच्या शिक्षकांनी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांची भेट घेऊन त्यांना मागणीचे निवेदन दिले. डॉ. अजय दरेकर, डॉ. मेघना भोसले, डॉ. विलास आढाव डॉ. लहानू रेटवडे, डॉ. परमेश्वर गडकर, डॉ. दत्ता घोडके, सूर्यकांत गायकवाड डॉ. मनोहर सानप आदी उपस्थित होते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीस सुरुवात झाली असून, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ या धोरणाची अंमलबजावणी करणारे अग्रगण्य विद्यापीठ आहे.

विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखेतील व्यावसायिक अर्थशास्त्र व बँकिंग अभ्यास मंडळाने संभाव्य अभ्यासक्रमात व्यावसायिक अर्थशास्त्र हा मुख्य (मेजर) विषय ठेवण्याएवजी दुय्यम (मायनर) ठेवण्याचे प्रस्तावित केले आहे. मात्र, हा अभ्यासक्रम जसाच्या तसा लागू झाल्यास विद्यार्थी व्यावसायिक अर्थशास्त्र व बँकिंग यांसारख्या मूलभूत अभ्यासापासून वंचित राहतील. परिणामी, वाणिज्य विद्याशाखेतून तयार होणारा विद्यार्थी परिपक्व होणार नाही. हा विषय मुख्य ठेवल्याने कोणत्याही विषयावर परिणाम होणार नाही. मात्र, प्रस्तावित अभ्यासक्रम जसाच्या तसा स्वीकारल्यास अर्थशास्त्र विषयाचे शिक्षक कमी होण्याचा धोका आहे. तसेच प्रस्तावित अभ्यासक्रम शिक्षकांवर अन्याय करणारा असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

Pune Edition
Dec 1, 2023 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# विद्यापीठाचे शुल्क थकवणाऱ्या स्वायत्त महाविद्यालयांवर आता कारवाई

## विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचा निर्णय

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेल्या काही स्वायत्त महाविद्यालयांनी विद्यापीठाचे शुल्क थकवल्याचे समोर आले आहे. विद्यापीठ कायद्यातील तरतुदीनुसार स्वायत्त महाविद्यालयांनी विद्यापीठाला शुल्क देणे बंधनकारक असूनही महाविद्यालयांनी ते दिलेले नाही. त्यामुळे संबंधित स्वायत्त महाविद्यालयांनी शुल्क न भरल्यास आता त्यांच्यावर कारवाई करण्याचा निर्णय विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने घेतला.

विद्यापीठाशी संलग्न अनेक महाविद्यालयांनी स्वायत्ततेच्या धोरणाअंतर्गत स्वायत्त दर्जा प्राप्त केला आहे. अशा महाविद्यालयांची संख्या सातत्याने वाढत आहे. परीक्षा महाविद्यालय स्तरावर घेणे, नवे अभ्यासक्रम तयार करून राबवण्याची मुभा मिळते. मात्र, विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या प्रमाणपत्रावर विद्यापीठाचेही बोधचिन्ह असते.

त्यामुळे स्वायत्त दर्जा मिळाल्यानंतर संबंधित महाविद्यालयांनी विद्यापीठाला शुल्क देण्याचा नियम आहे. मात्र स्वायत्त दर्जा मिळाल्यानंतर अनेक महाविद्यालयांनी शुल्काची रक्कम विद्यापीठाकडे जमा केलेली नाही. त्याबाबत विद्यापीठाने पाठपुरावा करूनही महाविद्यालयांनी दाद दिलेली नाही. त्यामुळे विद्यापीठाचा कोट्यवधी रुपयांचे उत्पन्न थकल्याचे समोर आले आहे.

या पार्श्वभूमीवर विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची बैठक बुधवारी झाली. या बैठकीत स्वायत्त महाविद्यालयांकडून थकवलेल्या शुल्काबाबत चर्चा करण्यात आली. शुल्क थकवलेल्या महाविद्यालयांना सुरुवातीला नोटीस बजावण्याचा, त्यानंतरही शुल्क न भरल्यास विद्यापीठाचे नाव, बोधचिन्ह वापरण्यास बंदी घालण्यासह कठोर कारवाई करण्याचा ठराव करण्यात आला.

> विद्यापीठाची उत्पन्नाची साधने मर्यादित आहेत. स्वायत्त महाविद्यालयांनी शुल्क थकवल्याने त्याचा विपरित परिणाम विद्यापीठाच्या अर्थकारणावर, विद्यार्थी विकासाच्या योजनांवर होतो. स्वायत्त महाविद्यालयांनी नियमानुसार शुल्क भरणे आवश्यक आहे. शुल्क थकवलेल्या स्वायत्त महाविद्यालयांवर कारवाई करण्याचा ठराव व्यवस्थापन परिषदेने केला आहे. - **सागर वैद्य**, व्यवस्थापन परिषद सदस्य

> स्वायत्त झालेल्या महाविद्यालयांकडून विद्यापीठाचे थकलेले परीक्षा शुल्क, संलग्नता शुल्क आणि इतर शुल्क त्वरित घेण्याचा निर्णय घेण्यात आला.
> - **डॉ. विजय खरे**, प्रभारी कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

01/12/2023 | Pune | Page : 08
Source : https://epaper.loksatta.com

# News Paper Clippings During December 2023

## Section: Education

लोकमत

# शुल्क न भरणाऱ्या महाविद्यालयांवर होणार कारवाई

## विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत निर्णय : ठराव एकमताने मंजूर

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** स्वायत्त महाविद्यालये विद्यापीठाचे शुल्क भरण्यास टाळाटाळ करत असून त्यांच्याकडे कोट्यवधी रुपयांची थकबाकी असल्याचे निदर्शनास आले आहे. दरम्यान, थकबाकीदार स्वायत्त महाविद्यालयांनी शुल्क न भरल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी, असा निर्णय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या बुधवारी (दि. २९) झालेल्या बैठकीत घेण्यात आला. थकबाकीदार स्वायत्त महाविद्यालयांना विद्यापीठाचे नाव, लोगो वापरण्यास बंदी घालण्यासह कठोर कारवाई करावी, असा ठराव एकमताने संमत करण्यात आला.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील पुणे, नगर, नाशिक जिल्ह्यातील अनेक महाविद्यालयांनी स्वायत्त (आटोनोमस) दर्जा मिळवला आहे. दिवसेंदिवस ही संख्येत भर पडत आहे. स्वायत्त महाविद्यालय स्वतः परीक्षेचे आयोजन करतात. तसेच नवीन कोर्सेसही तयार करतात. मात्र, या सर्व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना पदवी, गुणपत्रिका यासह सर्वप्रकारचे प्रमाणपत्रे हे पुणे विद्यापीठाकडून मिळतात. स्वायत्त दर्जा मिळवताना शासननिर्णयानुसार विद्यार्थ्यांच्या शुल्कातील १० ते १५ टक्के रक्कम महाविद्यालयांनी विद्यापीठाकडे जमा करावी लागते. या अटीवरच स्वायत्त दर्जा मंजूर केला जातो. मात्र, स्वायत्त झालेल्या अनेक महाविद्यालयांनी विद्यापीठाकडे शुल्क जमा केलेले नाही. त्यामुळे महसूल थकला आहे.

### एनएसएस अनुदानात भरीव वाढ

शासनमान्य निर्णयानुसार एनएसएसच्या अनुदानात भरीव वाढ करण्यात आली. सुधारित अनुदान २५० वरून ४०० रुपये प्रति विद्यार्थी करण्यात आले. विशेष शिबिर अनुदान ४५० वरुन ७०० रुपये प्रति विद्यार्थी करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील एनएसएसच्या १६ हजार ५०० तर शिबिरात सहभागी होणाऱ्या ८ हजार २५० विद्यार्थ्यांना लाभ होणार आहे.

Pune Main
Page No. 10 Dec 01, 2023
Powered by: erelego.com

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# समूह विद्यापीठांमध्ये आरक्षण बंधनकारक

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** सध्या उच्च शिक्षण क्षेत्रात चर्चेचा विषय ठरलेल्या प्रस्तावित समूह विद्यापीठांमध्ये राज्य शासनाच्या कायद्यानुसार सामाजिक आरक्षणाचे काटेकोरपलन करणे बंधनकारक करण्यात आले आहे. सामाजिक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना लागू करणे, तसेच निवासाची व्यवस्था करणेही विद्यापीठांना अनिवार्य करण्यात आले आहे.

विशेष म्हणजे समुह विद्यापीठांमध्ये सहभागी होणाऱ्या अनुदानित महाविद्यालयांचे अनुदान बंद केले जाणार नाही, असे उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

प्रस्तावित समुह विद्यापीठांमध्ये सामाजिक आरक्षण असणार की नाही, अन्य सुविधा काय असणार, शिक्षण शुल्क कसे आकरले जाणार या विषयही संदिग्धता होती, ती विभागाकडून दूर करण्यात आली आहे. समुह विद्यापीठांमध्ये सहभागी होणाऱ्या अनुदानित महाविद्यालयांचे अनुदान बंद होणार की कायम राहणार याबाबतही स्पष्टता नव्हती.

मात्र समुह विद्यापीठांमध्ये सहभागी होणाऱ्या कोणत्याही अनुदानित महाविद्यालयाचे अनुदान बंद केले जाणार नाही, ते कायम राहील, अशी माहिती राज्याचे उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी दिली.

01/12/2023 | Pune | Page : 04
Source : https://epaper.loksatta.com

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

प्रभात

# चला, वाचन संस्कृती आणखी फुलवू या...

## पुणे पुस्तक महोत्सव यशस्वी करू : ३०० वर प्राध्यापकांचा संकल्प

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ३० -** फर्गसन महाविद्यालयाच्या मैदानावर दि. १६ ते २४ डिसेंबर या कालावधीत पुणे पुस्तक महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. तो यशस्वी करण्याचा निर्धार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतर्गत येणाऱ्या विविध भाषा शिकविणाऱ्या ३०० हून अधिक प्राध्यापकांनी व्यक्त केला.

राष्ट्रीय पुस्तक न्यासाचे अध्यक्ष मिलिंद मराठे, पुणे पुस्तक महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, व्यवस्थापन समिती सदस्या बागेश्री मंठाळकर, फर्गसनचे प्रभारी प्राचार्य डॉ. नितीन कुलकर्णी, अण्णा भाऊ साठे अध्यासनाचे प्रमुख डॉ. सुनील भंडगे, मराठी अभ्यास मंडळाचे प्रमुख संदीप सांगळे, प्राचार्य डॉ. संजय चाकणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

Book Your Visit...

पुणे पुस्तक महोत्सव

मराठे म्हणाले, पुणे शहरात पुस्तकांची जागतिक राजधानी होण्याच्या क्षमता आहेत. त्यासाठी पुणे पुस्तक महोत्सव यशस्वी करणे हे पहिले उद्दिष्ट असेल. पुस्तकांच्या जागतिक राजधानीचा युनेस्कोचा दर्जा मिळाल्यास, वाचन संस्कृतीला संवर्धनासाठी शेकडो कोटींचे अनुदान मिळू शकेल आणि वेगवेगळ्या देशांतील भाषा तज्ज्ञांना पुस्तकाशी संदर्भात कार्यक्रमांसाठी पाचारण करता येईल. पुणे पुस्तक महोत्सव देशातील अन्य शहरांत झालेल्या पुस्तक महोत्सवांपेक्षा आगळावेगळा आणि मोठा ठरेल असा विश्वास वाटतो, त्यासाठी सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे.



अशा प्रकारचा पुस्तक महोत्सव पुणे शहरात पहिल्यांदाच होत आहे. ही पुस्तक जत्रा न होता पुस्तक वाचणाऱ्यांचा महोत्सव होईल. तो पुण्याच्या संस्कृतीला, इतिहासाला साजेसा असेल. त्यासाठी प्रत्येकाचे योगदान महत्त्वाचे आहे. वाचक आणि पुस्तकप्रेमींसाठी हा आठवणींचा महोत्सव असेल.

**- राजेश पांडे,**
संयोजक, पुणे पुस्तक महोत्सव

PuneCity, 01 Dec 2023, Page:013
https://epaper.dainikprabhat.com

सकाळ

# 'महाविद्यालयांचे अनुदान सुरूच राहील'

**मुंबई :** समूह विद्यापीठामुळे राज्यातील अनुदानित महाविद्यालये आणि अनुदानित शिक्षण व्यवस्था संकटात सापडणार असल्याची भीती राज्यातील शिक्षण तज्ज्ञांनी व्यक्त केल्यानंतर त्यावर उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी यावर आज खुलासा केला. समूह विद्यापीठात सहभागी होताना महाविद्यालयाचे अनुदान कमी होणार नाही किंवा त्यांची शैक्षणिक, आर्थिक शिस्त यात कोणताही बदल होणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. मुंबईत विभागाकडून मुंबईत समूह विद्यापीठ राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन केले होते. त्या वळी पाटील यांनी खुलासा करत समूह विद्यापीठात सहभागी होण्यासाठी संस्थांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले.

Pune, Main
01/12/2023 Page No. 9

## News Paper Clippings During December 2023

## Section: Education

# More than 5 colleges can be clubbed under cluster university guidelines

EXPRESS NEWS SERVICE
MUMBAI, NOVEMBER 30

MORE THAN five colleges can be clubbed together to form cluster university as opposed to earlier restriction of maximum participatory colleges. But such applications will be evaluated individually by state government for final approval. Newly formed cluster universities can also dissolve later and go back to original set-up, with a mandatory one-year notice to all stakeholders.

After cabinet approval for new set of guidelines for formation of cluster universities, state's higher and technical education department on Wednesday issued a Government Resolution (GR) on detailed procedure and parameters for cluster universities. Now interested managements having multiple higher education institutions will be able to submit Development Project Report (DPR) to state.

As per the guidelines issued earlier, minimum of two and maximum of five colleges located in one district and run by single management could be clubbed together to form Cluster University. But as per the GR, the limit of maximum colleges can be extended. An official from the department said, "But such relaxation is not available for all. State will have the power to individually evaluate such applications. Final approval will be subject to this evaluation."

As per GR, it will be mandatory for each cluster university to form its own start-up as well as incubation and innovation centre. "It is mandatory for any university, thereby cluster universities will also have to fulfil the parameter," said a department official.

State's higher and technical education department also held a workshop on Wednesday for colleges to understand rules and regulations and guidelines in detail.

As per information shared by office of the Higher and Technical Education Minister Chandrakant Patil, it was clarified to participants that there would be no change in grants provided to colleges.

"Most colleges looking forward to become cluster universities do receive government grants for many years. There was a general concern about whether there will be any change in their grants," it said. However, the GR specifies that management of higher education institutions willing to club its colleges in cluster university set-up will have to keep a deposit of five crore.

The Indian Express 1.12.2023

## *News Paper Clippings During December 2023*

### *Section: Education*

# 'No change in grant of college participating in cluster varsity'

Dheeraj Bengrut

dheeraj.bengrut@htlive.com

**PUNE:** Maharashtra higher education minister, Chandrakant Patil, on Thursday said that when participating in a cluster university, the grant of a college will not decrease and there will be no change in its academic and financial discipline. Patil appealed to educational institutions to participate in cluster universities. The minister was speaking at a one-day, state-level workshop organised under his chairmanship by the department of higher and technical education at Sydenham College of Commerce and Economics in Mumbai.

Also present at the one-day workshop were principal secretary of the state higher education department, Vikas Chandra Rastogi; deputy secretary, Ajit Baviskar; director of technical education, Vinod Mohitkar; director of higher education, Shailendra Deolankar and several other dignitaries.

"While implementing the new education policy (NEP), many changes are taking place in the education sector. Cluster university is one such innovative initiative which will be instrumental in taking higher education to the grassroots and providing academic initiatives to students," Patil said at the workshop.

"It also aims to strengthen the concept of coherence, precision, interdisciplinary curriculum, quality and skill development in higher education by bringing together various types of human and infrastructural resources through the integration of colleges, universities and research institutes in the city/area via cluster universities and using these resources effectively," Patil said.

> Cluster varsity will be instrumental in taking higher education to the grassroots...
>
> **CHANDRAKANT PATIL,** higher education minister

Rastogi said, "The state government has approved guidelines for setting up cluster universities for educational institutions in the state. This will reduce the administrative burden on the state-run universities, and create a stronger network of educational institutions and provide more opportunities to students."

Deolankar said, "The management and educational quality of many autonomous educational institutions in the state is good. Academically high-performing colleges, institutions with requisite infrastructure, trained faculty as well as the ability to coordinate in terms of cluster university are preferred for cluster university. For this, a state-level conference was organised for a detailed discussion and brainstorming."

## Affiliated autonomous colleges to face action over pending fees

Dheeraj Bengrut

dheeraj.bengrut@htlive.com

**PUNE:** The Savitribai Phule Pune University (SPPU) administration plans to take action against some its affiliated colleges that have failed to pay requisite fee to the varsity after becoming autonomous.

As per the varsity rules, the official documents of autonomous colleges carry the logo of Savitribai Phule Pune University and exam-related processes are also monitored by the varsity. Hence, under the Maharashtra Public Universities Act, the colleges are obliged to pay fixed fees to the university. "SPPU on Wednesday sent letters to autonomous colleges who have not paid fees. The management council has decided to act against colleges if they fail to clear the dues," said Devidas Vaydande, member, management council, SPPU, adding that some dues are pending since last 10 years.

The varsity official did not give details of autonomous colleges that defaulted on fees.

According to Savitribai Phule Pune University officials, though autonomous colleges conduct in-house exams and declare results, the varsity has record of student data.

Hindustan Times 1.12.2023

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

पुढारी

# विद्यापीठे, महाविद्यालयांच्या कॅम्पसमध्ये उभारा सेल्फी पॉईंट्स

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

फक्त युवावर्गच नव्हे, तर सर्व वयोगटातील लोकांमध्ये सेल्फीची वाढती क्रेज पाहता विद्यापीठ अनुदान आयोगाने देशभरातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांना कॅम्पसमधील मोक्याच्या ठिकाणी सेल्फी पॉईंट्स उभारण्यास सांगितले आहे. मात्र, यासाठी यूजीसीकडून काही नियम करण्यात आले आहेत. शिक्षण मंत्रालयाने शेअर केलेल्या थ्रीडी लेआउटमध्ये मान्यताप्राप्त डिझाइननुसारच संस्थांना सेल्फी पॉइंट ठेवता येणार आहेत.

**यूजीसीच्या विद्यापीठे आणि महाविद्यालयांना सूचना**

यासंदर्भात यूजीसीचे सचिव मनीष जोशी म्हणाले , सेल्फी पॉइंटच्या थीममध्ये एक भारत, श्रेष्ठ भारत यासारख्या राष्ट्रीय उपक्रमांचा आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामधील प्रमुख क्षेत्रांचा समावेश असेल. विद्यार्थी आणि इतर नागरिकांना काही विशेष क्षण टिपण्यासाठी आणि सोशल मीडियावर शेअर करण्यासाठी तसेच देशाप्रती सामूहिक अभिमानाची भावना वाढवण्यासाठी या सेल्फी पॉईंटचा उपयोग होईल. हे सेल्फी पॉइंट्स केवळ अभिमानाचे स्रोतच नाहीत, तर जागतिकस्तरावर भारताच्या विकासाला चालना देणाऱ्या परिवर्तनात्मक उपक्रमांबद्दल प्रत्येक नागरिकाला प्रबोधन करतील.

भारताच्या विविध क्षेत्रांतील प्रगतीतून घेतलेल्या प्रेरणेने तरुणांची ऊर्जा आणि उत्साह यांचा उपयोग करून त्यांची मने तयार करण्याची अनोखी संधी या माध्यमातून मिळणार आहे. या संस्थांमधील सेल्फी पॉइंट्स राष्ट्रीय अभिमानाची भावना जागृत करण्यासाठी आणि तरुणांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि भावी पिढ्यांना प्रेरणा देण्यासाठी गतिशील आणि आकर्षक जागा म्हणून उदयास येतील, असेही जोशी यांनी स्पष्ट केले आहे.

Pune Edition
Dec 2, 2023 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

## News Paper Clippings During December 2023

### Section: Education

सकाळ

# स्वायत्त महाविद्यालये थकबाकीदार

## परीक्षा शुल्काचे कोट्यवधी रुपये थकीत; विद्यापीठाचा कारवाईचा इशारा

**पुणे, ता. १ :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठापासून स्वायत्त झालेल्या बहुतेक महाविद्यालयांनी कोट्यवधी रुपयांचे परीक्षा शुल्क थकविल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. विद्यापीठाने पाठपुरावा करूनही थकीत शुल्क जमा न केल्यामुळे आता व्यवस्थापन परिषदेने कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे.

विद्यापीठाशी संलग्न पुणे, नगर आणि नाशिक जिल्ह्यातील बहुतांश सर्व नामांकित महाविद्यालये स्वायत्त झाली आहेत. त्यामुळे स्वायत्त महाविद्यालयांना त्याच्या स्तरावर परीक्षा घेण्याचे आणि निकाल घोषित करण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले. मात्र, महाविद्यालये स्वायत्त झाली तरीही विद्यार्थ्यांचा डेटा विद्यापीठाकडे ठेवावा लागतो. विद्यार्थ्यांच्या पदवीवर विद्यापीठाचा लोगो आणि नाव असते. त्यामुळे नियमानुसार महाविद्यालयांनी विद्यापीठाला शुल्क देणे अपेक्षित आहेत. तशी तरतूदही महाराष्ट्र विद्यापीठ कायद्यात करण्यात आली आहे.

मागील दहा वर्षांपासून काही महाविद्यालयांनी विविध प्रकारचे शुल्क जमा केले नसल्याचे दिसून येत आहे, तर काही महाविद्यालयांनी नियमानुसार शुल्क विद्यापीठाकडे जमा केले आहे. दिवसेंदिवस स्वायत्त महाविद्यालये आणि त्यांच्या थकीत शुल्काची संख्या वाढत चालली असून, आता ती कोट्यवधींच्या घरात आहे. त्यामुळेच विद्यापीठाने संबंधित महाविद्यालयाला पत्र पाठवून शुल्क भरण्याबाबत सूचना दिल्या आहेत. त्यावर विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत त्यावर चर्चा झाली. तसेच शुल्क थकविणाऱ्या महाविद्यालयांवर कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आला.

> महाविद्यालयांना स्वायत्तता देतानाच परीक्षासंबंधातील शुल्काशी नोंद कायद्यामध्ये स्पष्ट करण्यात आली आहे. ज्यामध्ये विद्यापीठाला निश्चित केलेले शुल्क देणे बंधनकारक आहे. अशा महाविद्यालयांनी थकीत शुल्क जमा केले नाही तर त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्याचा निर्णय व्यवस्थापन परिषद घेईल.
>
> **- रवींद्र शिंगणापूरकर,**
> व्यवस्थापन परिषद सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Pune, Main
02/12/2023 Page No. 5

# स्वायत्त महाविद्यालयांनी थकविले विद्यापीठाचे शुल्क

## व्यवस्थापन परिषदेचा कारवाईचा निर्णय

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न स्वायत्त महाविद्यालयांनी शुल्क थकवल्याच्या प्रकरणी त्यांच्यावर कारवाईचा बडगा उगारण्यात येणार आहे. विद्यापीठाशी संलग्न काही स्वायत्त महाविद्यालयांनी विद्यापीठाचे शुल्क थकवल्याचे समोर आल्यानंतर, त्यांच्यावर कारवाई करण्याचा निर्णय विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने घेतला. शुल्क थकवलेल्या महाविद्यालयांना सुरुवातीला नोटीस बजावण्याचा, त्यानंतरही शुल्क न भरल्यास विद्यापीठाचे नाव, बोधचिन्ह वापरण्यास बंदी घालण्यासह कठोर कारवाई करण्याचा ठराव करण्यात आला.

या पार्श्वभूमीवर, विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची बैठक कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या झाली. या वेळी प्र. कुलगुरू डॉ. पराग काळकर, प्र. कुलसचिव डॉ. विजय खरे, सदस्य राजेंद्र विखे पाटील, बागेश्री मंठाळकर, रवींद्र शिंगणापूरकर, डॉ. नितीन घोरपडे आदी उपस्थित होते. या बैठकीत स्वायत्त महाविद्यालयांकडून थकवलेल्या शुल्काबाबत चर्चा करण्यात आली. पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेल्या अनेक महाविद्यालयांनी स्वायत्ततेच्या धोरणाअंतर्गत स्वायत्त दर्जा प्राप्त मिळाला आहे. सध्या स्वायत्त होणाऱ्या महाविद्यालयांची संख्या सातत्याने वाढत आहे. स्वायत्ततेअंतर्गत महाविद्यालयांना शैक्षणिक योजना राबविण्यास स्वातंत्र्य मिळते. त्यानुसार परीक्षा महाविद्यालय स्तरावर घेणे, नवे अभ्यासक्रम तयार करून राबवण्याची मुभा मिळते. मात्र, विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या पदवी प्रमाणपत्रावर विद्यापीठाचेही बोधचिन्ह असते. त्यामुळे स्वायत्त दर्जा मिळाल्यानंतर संबंधित महाविद्यालयांनी विद्यापीठाला शुल्क देण्याचा नियम आहे. असे असतांनाही स्वायत्त दर्जा मिळाल्यानंतर अनेक महाविद्यालयांनी शुल्काची रक्कम विद्यापीठाकडे जमा केलेली नाही. त्याबाबत विद्यापीठाने पाठपुरावा करूनही महाविद्यालयांनी दाद दिलेली नाही. याबाबत माहिती घेतल्यावर विद्यापीठाचे कोट्यवधी रुपयांचे उत्पन्न थकल्याचे समोर आले आहे.

> सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची उत्पन्नाची साधने मर्यादित आहेत. अशा परिस्थितीत स्वायत्त महाविद्यालयांनी शुल्क थकवल्याने त्याचा विपरीत परिणाम विद्यापीठाच्या अर्थकारणावर, विद्यार्थी विकासाच्या योजनांवर होतो. शुल्क थकवलेल्या स्वायत्त महाविद्यालयांवर कारवाई करण्याचा ठराव व्यवस्थापन परिषदेत मांडण्यात आल्यावर, तो मंजूर करण्यात आला.
>
> – सागर वैद्य, व्यवस्थापन परिषद सदस्य



### 'एनएसएस'चे अनुदान मिळावे

राष्ट्रीय सेवा योजनेचे (एनएसएस) सुधारित अनुदान २५० वरून ४०० रुपये प्रतिविद्यार्थी करण्यात आले. तर, विशेष शिबिर अनुदान ४५० रुपयांवरून ७०० रुपये प्रतिविद्यार्थी करण्याला व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे. या निर्णयामुळे पुणे विद्यापीठातील १६ हजार ५०० विद्यार्थ्यांना, तर शिबिरात सहभागी होणाऱ्या आठ हजार २५० विद्यार्थ्यांना फायदा होणार आहे. केंद्र आणि राज्य सरकारकडे पाठपुरावा करून सुमारे पाच कोटी रुपयांचे हे अनुदान त्वरित मिळावे, अशी मागणी सागर वैद्य यांनी केली

Maharashtra Times 2.12.2023

## *News Paper Clippings During December 2023*

### *Section: Education*

**प्रभात**

# 'यूजीसी'च्या नव्या परिपत्रकावरून वादाला तोंड

## शिक्षण क्षेत्रात राजकारण न आणण्याचा सल्ला




**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १ -** अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे (अभाविप) संस्थापक दत्ताजी डिडोळकर यांचे जन्मशताब्दी वर्ष साजरे करण्याचे निर्देश विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) राज्यातील विद्यापीठे, महाविद्यालयांना दिले आहेत. या परिपत्रकाला अन्य संघटनांकडून विरोध करण्यात येत आहे.

देशातील हजारो विद्यार्थी आणि तरुणांसाठी दत्ताजी डिडोळकर हे प्रेरणादायी होते. त्यांनी अनेक सामाजिक आणि अन्य संस्थांची स्थापना केली. त्यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त ७ ऑगस्ट २०२३ ते ७ ऑगस्ट २०२४ या कालावधीत विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. या कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी महाराष्ट्रातील उच्च शिक्षण संस्थांनी विद्यार्थी आणि तरुणांना प्रोत्साहित करण्याबाबत परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

> यूजीसीचा निर्णय धक्कादायक आणि चुकीचा पायंडा पाडणारा आहे. विद्यार्थ्यांनी कोणत्या विचारधारेसोबत जायचे हा सर्वस्वी त्यांचा निर्णय असायला हवा. डिडोलकर हे अभाविपला पूजनीय असल्याने त्यांचे जन्मशताब्दी वर्ष साजरे करणे हा त्यांचा विषय आहे. मात्र, भाजप आणि सरकारने महाविद्यालय, विद्यापीठांमध्ये राजकारण आणून आपले विचार विद्यार्थ्यांवर लादण्याचा प्रयत्न करू नये. या निर्णयाला युवक काँग्रेसचा प्रखर विरोध आहे.
>
> – **अक्षय जैन**, अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस, माध्यम विभाग
>
> यूजीसीने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी काम करणे अपेक्षित आहे. मात्र, यूजीसीने प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकामुळे चुकीचा पायंडा पडत आहे. यूजीसीने हे परिपत्रक रद्द करावे. विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती योजना, प्रशिक्षण, कार्यशाळा असे उपक्रम घेऊन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीला प्रोत्साहन दिल्यास थोर व्यक्तींच्या कार्याचा सन्मान होईल.
>
> **कल्पेश यादव**, सहसचिव युवा सेना, उद्धव बाळासाहेब ठाकरे गट

PuneCity, 02 Dec 2023, Page:005
https://epaper.dainikprabhat.com

**प्रभात**

# अर्थशास्त्र विषयाला दुय्यम स्थान

## पुणे विद्यापीठाच्या अभ्यासक्रम कार्यपद्धतीवर टीका

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १ -** सीओईपी सारखी संस्था विद्यार्थ्यांना अर्थशास्त्राचे शिक्षण देण्यासाठी नामवंत गोखले संस्थाशी करार करुन नवा पायंडा सुरु केला आहे. मात्र, याउलट प्रकार सावित्रीबाइ पुणे विद्यापीठात दिसून येत आहे. पुणे विद्यापीठाच्या वाणिज्य आणि व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखेच्या संभाव्य अभ्यासक्रमात अर्थशास्त्र विषय मुख्य विषय ठेवण्याऐवजी दुय्यम ठेवण्याबाबत प्रस्तावित करण्यात आले आहे. त्यावरुन विद्यापीठावर अभ्यासक्रम पध्दतीवर टीका होत आहे.

अर्थशास्त्र विषय न शिकताच विद्यार्थ्यांना वाणिज्य आणि व्यवस्थापनशास्त्र शाखेची पदवी देणे योग्य नसल्याचे सांगत व्यावसायिक अर्थशास्त्र आणि बँकिंग, फायनान्स आणि इश्युरन्स हे विषय मुख्य विषय म्हणून समाविष्ट करण्याची मागणी जोर धरु लागली आहे.

अर्थशास्त्र विषयाच्या शिक्षकांनी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांची भेट घेऊन त्यांना या मागणीचे निवेदन दिले. डॉ. अजय दरेकर, डॉ. मेघना भोसले, डॉ. विलास आढाव डॉ. लहानू रेटवडे, डॉ. परमेश्वर गडकर, डॉ. दत्ता घोडके, सूर्यकांत गायकवाड डॉ. मनोहर सानप आदी उपस्थित होते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीस सुरूवात झाली असून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ या धोरणाची अंमलबजावणी करणारे अग्रगण्य विद्यापीठ आहे. विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखेतील व्यावसायिक अर्थशास्त्र व बँकिंग अभ्यास मंडळाने संभाव्य अभ्यासक्रमात व्यावसायिक अर्थशास्त्र हा मुख्य (मेजर) विषय ठेवण्याएवजी दुय्यम ठेवण्याचे प्रस्तावित केले आहे. प्रस्तावित अभ्यासक्रम जसाच्या तसा स्वीकारल्यास अर्थशास्त्र विषयाचे शिक्षक कमी होण्याचा धोका आहे.

PuneCity, 02 Dec 2023, Page:015
https://epaper.dainikprabhat.com

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

**पुढारी**

# नव्या शैक्षणिक धोरणाने देश वैश्विक ज्ञानशक्ती : राष्ट्रपती

**नागपूर : पुढारी वृत्तसेवा**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातून भारत देश एक वैश्विक ज्ञानशक्ती (ग्लोबल नॉलेज पॉवर) म्हणून स्थापित होईल, असा विश्वास राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी व्यक्त केला.

कविवर्य सुरेश भट सभागृहात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा १११ वा दीक्षांत समारंभ शनिवारी पार पडला. त्यावेळी विद्यार्थ्यांना उद्देशून राष्ट्रपती बोलत होत्या. अध्यक्षस्थानी राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस होते. औपचारिक पदवी हे शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट नसून वेगाने बदलत जाणाऱ्या जगात निरंतर शिक्षण हेच प्रत्येक विद्यार्थ्याचे ध्येय असावे, असे आवाहन राष्ट्रपतींनी केले. सध्याच्या काळात कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) उपयोग आपले जीवन सुकर करत आहे; परंतु अतिरेक सामाजिक स्वास्थ्यासाठी अतिशय घातक आहे. तंत्रज्ञानाच्या चुकीच्या उपयोगाने निर्माण होणाऱ्या समस्येच्या पार्श्वभूमीवर नैतिक शिक्षणाचा मार्ग उपकारक असल्याचे राष्ट्रपतींनी सांगितले. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा स्वीकार केल्यामुळे विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रात संधी उपलब्ध होत असल्याचा विश्वास राज्यपाल रमेश बैस यांनी व्यक्त केला.

Pune Edition
Dec 3, 2023 Page No. 9
newspaper.pudhari.co.in

# विद्यापीठे आणि महाविद्यालयांच्या कॅम्पसमध्ये उभारा सेल्फी पॉइंट्स; यूजीसीच्या सूचना

**पुणे** : देशभरातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांना कॅम्पसमधील दर्शनीस्थळी सेल्फी पॉइंट्स उभारण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. मात्र, यासाठी यूजीसीकडून काही नियम करण्यात आले आहेत. फक्त युवावर्गच नव्हे, तर सर्व वयोगटांतील लोकांमध्ये सेल्फीची वाढती क्रेज पाहता विद्यापीठ अनुदान मंडळाने देशभरातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांना परिसरातील मोक्याच्या ठिकाणी सेल्फी पॉइंट्स उभारण्यास सांगितले आहे. मात्र यासाठी यूजीसीकडून काही नियम करण्यांत आले आहेत. शिक्षण मंत्रालयाने सांगितलेल्या केलेल्य ३डी लेआउटमध्ये मान्यताप्राप्त डिझाइननुसारच संस्थांना सेल्फी पॉइंट ठेवता येतील.

याविषयी माहिती देताना यूजीसीचे सचिव मनीष जोशी म्हणाले, सेल्फी पॉइंटच्या थीममध्ये एक भारत, श्रेष्ठ भारत यासारख्या राष्ट्रीय उपक्रमांचा विस्तृत स्पेक्ट्रम आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरणमधील प्रमुख क्षेत्रांचा समावेश असेल.

विद्यार्थी आणि इतर नागरिकांना काही विशेष क्षण कॅप्चर करण्यासाठी आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर शेअर करण्यासाठी, तसेच देशाप्रती सामूहिक अभिमानाची भावना वाढवण्यासाठी या सेल्फी पॉइंटचा उपयोग होईल. हे सेल्फी पॉइंट्स केवळ अभिमानाचे स्रोतच नाहीत तर जागतिक स्तरावर भारताच्या विकासाला चालना देणाऱ्या परिवर्तनात्मक उपक्रमांबद्दल प्रत्येक नागरिकाला प्रबोधन करतील, असेही जोशी यांनी सांगितले.

भारताच्या विविध क्षेत्रांतील प्रगतीतून घेतलेल्या प्रेरणेने तरुणांची ऊर्जा आणि उत्साह यांचा उपयोग करून त्यांची मने तयार करण्याची अनोखी संधी या माध्यमातून मिळणार आहे. या संस्थांमधील सेल्फी पॉइंट्स राष्ट्रीय अभिमानाची भावना जागृत करण्यासाठी आणि तरुणांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि भावी पिढ्यांना प्रेरणा देण्यासाठी गतिशील आणि आकर्षक जागा म्हणून उदयास येतील, असेही जोशी म्हणाले.

Kesari 4.1.2023

# *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

# विद्यापीठात प्राध्यापकांची भरती

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील पूर्णवेळ प्राध्यापकांच्या २१५ रिक्त पदांपैकी १११ जागांवर प्राध्यापकांची भरती होणार असून, त्यासाठी जाहिरात येत्या आठवड्यात प्रसिद्ध केली जाणार असल्याची माहिती विद्यापीठाच्या प्रशासनाने दिली आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना पूर्णवेळ प्राध्यापक मिळणार आहेत.

पुणे विद्यापीठात साधारण १२ वर्षांपासून प्राध्यापक भरती न झाल्याने, विविध शैक्षणिक विभागांमध्ये निम्म्यापेक्षा अधिक प्राध्यापकांच्या जागा रिक्त आहेत. त्यामुळे विद्यापीठात पूर्णवेळ अध्यापन करणाऱ्या प्राध्यापकांची संख्या बोटावर मोजण्याइतकी राहिली आहे. या सर्वांचा परिणाम विद्यापीठाच्या शैक्षणिक गुणवत्तेवर होत असून, विद्यार्थ्यांना अध्यापन करण्यासाठी पुरेशा प्रमाणात प्राध्यापक उपलब्ध होत नसल्याचे चित्र आहे. या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने कंत्राटी तत्त्वावर काही काळासाठी १३३ प्राध्यापकांची भरती प्रक्रिया राबवली. काही दिवसांपूर्वी उच्च व तंत्रशिक्षण विभागाने विद्यापीठाला १११ रिक्त पदे भरण्यासाठी परवानगी दिली आहे. त्यानुसार ही पदे भरण्यासाठीची जाहिरात विद्यापीठाकडून प्रसिद्ध केली जाणार आहे. त्याची माहिती विद्यापीठाच्या वेबसाइटवरही मिळेल, अशी माहिती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ प्रशासनाकडून देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे विद्यापीठाच्या प्रशासनामध्येही काही पदे भरण्यात येणार आहे. त्याबाबतच्या जाहिरातीही लवकरच प्रकाशित केल्या जातील, असे प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

> "सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात प्राध्यापकांच्या १११ जागा भरण्याची प्रक्रिया सुरू असून, त्या अंतर्गत जाहिरात येत्या आठवड्यात प्रसिद्ध केली जाणार आहे. हे प्राध्यापक साधारण पुढील २५ वर्षे विद्यापीठात कार्यरत राहणार आहे. त्यामुळे संपूर्ण प्रक्रिया नियमांच्या आधीन राहून शैक्षणिक गुणवत्तेवर आणि पारदर्शी पद्धतीने राबविण्यात येईल.
> – डॉ. सुरेश गोसावी, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

### सेट परीक्षेचे अर्जही सुरू होणार



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून सहायक प्राध्यापकपदासाठी घेण्यात येणारी सेट परीक्षा सात एप्रिलला होणार आहे. या परीक्षेची तारीख विद्यापीठाने जाहीर करतानाच ऑनलाइन पद्धतीने अर्ज करण्याच्या तारखा लवकर प्रसिद्ध करण्यात येतील, असे सांगितले होते. त्यानुसार येत्या दोन ते तीन दिवसांत अर्ज करण्याची प्रक्रिया सुरू होण्याची शक्यता प्रशासनाने वर्तविली आहे.

Maharashtra Times 4.12.2023

# Students union opposes UGC order to celebrate Didolkar's birth anniversary

**Dheeraj Bengrut**
dheeraj.bengrut@htlive.com

**PUNE:** After the University Grants Commission (UGC) issued a circular to all colleges in Maharashtra, directing them to celebrate the birth anniversary year of Rashtriya Swayamsevak Sangh (RSS) Pracharak and Akhil Bharatiya Vidyarthi Parishad (ABVP) co-founder, Datta Didolkar, various students' organisations and students' political wings in state have strongly opposed move.

UGC secretary Manish Joshi on November 30, 2023 issued a circular to all vice-chancellors of all universities and principals of all colleges in Maharashtra state. "Honourable late Dattaji Didolkar is an inspiration for thousands of students and youths of India. He was the founder of many social and other organisations. In this regard, it is informed that from August 7, 2023 to August 7, 2024, events have been planned to celebrate the birth centenary year of Dattaji Didolkar."

"The higher education institutions in state of Maharashtra are requested to encourage youth and students to participate in events to celebrate birth centenary year of Shri Dattaji Didolkar," the circular said.

Whereas students' unions and organisations from across the state have taken strong objection to it. "Didolkar was a campaigner of the Rashtriya Swayamsevak Sangh and one of the founders of the ABVP, so this decision of the UGC is opposed by the Maharashtra Pradesh Youth Congress," said Akshay Jain, chairman, Maharashtra State Youth Congress.

Hindustan Times 4.12.2023

## *News Paper Clippings During December 2023*

### *Section: Education*

पुढारी

**पुढारी INFO**

# ॲकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिट शिक्षणातील नवा अध्याय



ॲकॅडमिक बँक ऑफ क्रेडिट म्हणजे हे एक व्हर्च्युअल स्टोअर-हाऊस आहे, जे प्रत्येक विद्यार्थ्याची शैक्षणिक माहिती साठवणार आहे. यासाठी महाविद्यालये आणि विद्यापीठांना ॲकॅडमिक बँक ऑफ क्रेडिट योजनेत आपली नोंदणी करावी लागेल. त्यानंतरच प्रत्येक विद्यार्थ्याचा डेटा येथे स्टोअर होणार आहे. ज्या विद्यार्थ्यांना काही कारणास्तव आपला अभ्यासक्रम मध्येच सोडावा लागला त्यांना या धोरणामुळे फायदा होणार आहे. या धोरणामुळे त्या विद्यार्थ्याचे वर्ष वाया जाणार नाही. महाविद्यालयीन शिक्षणाचे प्रथम वर्ष उत्तीर्ण झाल्यावर प्रमाणपत्र, द्वितीय वर्ष उत्तीर्ण झाल्यावर पदविका आणि तीन वर्षे किंवा अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर पदवी प्रदान केली जाईल. ॲकॅडमिक बँक ही एक व्यावसायिक बँकेसारखे कार्य करणार असून, यात विद्यार्थी ग्राहक असणार आहेत आणि ॲकॅडमिक बँकेत जमा होणाऱ्या क्रेडिटच्या आधारे विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, पदवी किंवा डिप्लोमा मिळणार आहे.

## ॲकॅडमिक बँकेची कार्यपद्धती




विद्यार्थ्यांचे ॲकॅडमिक बँकेत खाते उघडले जाईल, त्यानंतर प्रत्येक विद्यार्थ्याला विशेष आयडी देण्यात येईल. ॲकॅडमिक बँकेच्या प्रमाणित कार्यपद्धती (एसओपी) चे पालन करावे लागेल. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना ते पूर्ण करीत असलेल्या अभ्यासक्रमाचे क्रेडिट त्यांच्या ॲकॅडमिक बँकेच्या खात्यात जमा केले जातील. ज्या शैक्षणिक संस्था, महाविद्यालये व विद्यापीठांची यामध्ये नोंदणी असेल त्या त्यांचे विद्यार्थी या योजनेचा लाभ घेऊ शकतात व वेगवेगळ्या संस्थांमध्ये सर्व अभ्यासक्रम असतात म्हणून कोणत्याही शैक्षणिक संस्थेला ॲकॅडमिक बँकमध्ये सहभागी होण्याची परवानगी आहे.

## शिक्षण संस्थांनी दिलेले क्रेडिट थेट विद्यार्थ्यांच्या खात्यात




ॲकॅडमिक बँक ऑफ क्रेडिट ही यूजीसीने दिलेली मार्गदर्शक तत्त्वे आणि निकषांनुसार अभ्यासक्रमाचे क्रेडिट मान्य करणार आहे. ॲकॅडमिक बँक थेट नोंदणीकृत शिक्षण संस्थांनी दिलेले क्रेडिट स्वीकारणार आहे आणि नोंदणीकृत शिक्षण संस्थांनी दिलेले क्रेडिट विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा केले जातील. यामध्ये थेट विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक क्रेडिट किंवा कागदपत्रे स्वीकारणार नाही. यामध्ये यूजीसी मान्यताप्राप्त उच्च शिक्षण संस्था अभ्यासक्रमासह अभियांत्रिकी, वैद्यकीय, कायदा आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांचा समावेश असणार आहे. विद्यार्थ्यांनी मध्येच अभ्यासक्रम सोडल्यास वर्ष वाया जाणार नाही.



## • अपूर्ण राहिलेले शिक्षण पूर्ण करताना होणार फायदा

ॲकॅडमिक बँकेची मुख्य जबाबदारी नोंदणीकृत शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे खाते उघडणे, बंद करणे आणि विद्यार्थ्यांच्या माहितीची पडताळणी करणे ही असणार आहे. नवीन शैक्षणिक धोरण सोपे आणि सर्वसमावेशक बनविण्यासाठी ॲकॅडमिक बँक ही योजना महत्त्वाची आहे. यामुळे विद्यार्थ्यांना सोयीनुसार शिक्षण पूर्ण करता येईल, तर अपूर्ण शिक्षण दुसऱ्या शहरातील दुसऱ्या कॉलेजेसमध्ये सुरू करता येईल. स्टोअर क्रेडिटची शेल्फ लाईफ ७ वर्षांची आहे. त्यानंतर विद्यार्थ्यांना याचा फायदा घेता येणार नाही. याव्यतिरिक्त विविध संस्थांचे वेगवेगळे नियम असल्यास त्याचा लाभ विद्यार्थ्यांना मिळू शकेल.

(संकलन : गणेश खळदकर )

My Pune Edition
Dec 5, 2023 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

# News Paper Clippings During December 2023

## Section: Education

सकाळ

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ : आठवडाभरात जाहिरात निघणार

# प्राध्यापक भरतीचा नवा मुहूर्त

**पुणे, ता. ४ :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सहाय्यक प्राध्यापक भरतीला अजूनही मुहूर्त मिळालेला नाही. मात्र, आठवडाभरात जाहिरात प्रसिद्ध केली जाईल, असा अंदाज वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून वर्तविण्यात आला आहे. यापूर्वी नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यात भरती प्रक्रिया पूर्ण होईल, असे आश्वासन विद्यापीठ प्रशासनाकडून देण्यात आले होते. आता त्यात पुन्हा एकदा नव्या तारखेची भर पडली आहे.

विद्यापीठातील प्राध्यापकांच्या ३८४ पैकी २१५ पदे रिक्त आहेत. मागील १२ वर्षांपासून विद्यापीठातील प्राध्यापक भरती रखडली असून, अनेक विभागांत प्राध्यापकांची संख्या आता एकवर आली आहे, तर काही विभाग प्राध्यापकांअभावी बंद करण्याची नामुष्की विद्यापीठावर ओढवली आहे. विद्यापीठातील प्राध्यापक भरतीला शासनदरबारी 'तारीख पे तारीख' मिळत असल्याने शैक्षणिक नुकसानीबरोबरच विद्यापीठाच्या नावलौकिकावरही दूरगामी परिणाम होत आहे. आता आठवडाभराचे दिलेले आश्वासन तरी पूर्ण होवोत, हीच अपेक्षा आहे.

#### प्राध्यापक भरतीनंतर मूल्यांकन

- **प्राध्यापकांच्या रिक्त पदांमुळे विद्यापीठाला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रमवारीत मोठा फटका सहन करावा लागत आहे**
- **विद्यापीठासमोर नॅक मूल्यांकन टिकविण्याचे व वाढवण्याचे मोठे आव्हान**
- **कमी झालेले मनुष्यबळ आणि संशोधनात झालेली घसरण विद्यापीठांसाठी डोकेदुखी**
- **रिक्त पदांची भरती केल्याशिवाय नॅक मूल्यांकनाला सामोरे जायचे नाही, असा विचार वरिष्ठ स्तरावरील अधिकारी करत आहेत**
- **परिणामी विद्यापीठाची रखडलेली १११ पदांची भरती प्रक्रिया लवकरच सुरू होण्याची शक्यता**

**अधिकाऱ्यांचे म्हणणे...**

विद्यापीठाला लवकरच नॅक पुनर्मूल्यांकनाला सामोरे जावे लागणार आहे. त्यादृष्टीने विद्यापीठाने विविध पातळ्यांवर कामाला सुरुवात केली आहे. ॲकॅडमिक ऑडिट, फायर ऑडिट, ट्रीपल 'ए'चे ऑडिट आदी कामे झाली असून, त्यातील त्रुटी दूर करण्याचे काम सध्या सुरू आहे. तसेच विद्यापीठाकडून प्रथमतः 'आयआयक्यूए' तयार केला जात आहे. दरम्यानच्या काळात नॅकसाठी 'सेल्फ स्टडी रिपोर्ट' तयार करून ठेवला जाणार आहे, असे वरिष्ठ अधिकारी सांगतात.

#### विद्यापीठाची स्थिती

- **पुणे विद्यापीठ वगळता राज्यातील इतर विद्यापीठांतील रिक्त पदांची भरती प्रक्रिया जवळजवळ पूर्ण झाली आहे**
- **पुणे विद्यापीठात सुमारे ५० टक्के विभागप्रमुख पदाचा भार हा अतिरिक्त स्वरूपात दिला आहे**
- **विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठीसुद्धा कंत्राटी तत्त्वावर प्राध्यापकांची भरती केली आहे**
- **नॅक मूल्यांकनात उपलब्ध मनुष्यबळाला गुण आहेत. त्यामुळे रिक्त पदे भरल्याशिवाय विद्यापीठ नॅक मूल्यांकनाला सामोरे जाणार नाही**

Pune, Main
05/12/2023 Page No. 5

सकाळ

# पुणेकरांना मिळणार पुस्तकांची मेजवानी

### महोत्सवानिमित्त ग्रंथदिंडी, वाचन उपक्रमांचे आयोजन

**पुणे, ता. ४ :** राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या वतीने फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर १६ ते २४ डिसेंबर या कालावधीत 'पुणे पुस्तक महोत्सव' होत आहे. यामध्ये लोकसहभाग वाढण्यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन, ज्ञान सरिता ग्रंथदिंडी, टॅलेंट हंट, 'शांतता, पुणेकर वाचत आहेत' असे उपक्रम हाती घेतले आहेत, अशी माहिती संयोजक राजेश पांडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

राज्य सरकार, पुणे महापालिका, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, फर्ग्युसन महाविद्यालय या महोत्सवाचे सहआयोजक आहेत. तर पुणे श्रमिक पत्रकार संघ, भारतीय विचार साधना, इस्कॉन हे सहप्रायोजक आहेत. यानिमित्त आयोजित पत्रकार परिषदेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ प्र. कुलगुरू डॉ. पराग काळकर, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे, डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. शरद कुंटे, 'फर्ग्युसन'चे प्राचार्य डॉ. नितीन कुलकर्णी हे उपस्थित होते.



#### साहित्यिक गप्पांचे आयोजन

डेक्कन येथील 'इंटरनॅशनल बुक सर्व्हिस' येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुस्तक खरेदीसाठी येत असत. हे औचित्य साधून त्यांना अभिवादन करण्यासाठी बुधवारी (ता. ६) साहित्यिक गप्पांचे आयोजन केले आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, ज्येष्ठ साहित्यिक शरणकुमार लिंबाळे, साहित्यिका श्यामा घोणसे, ज्येष्ठ पत्रकार अरुण खोरे आणि काही ज्येष्ठ साहित्यिक सहभागी होणार आहेत. हा कार्यक्रम सकाळी साडेनऊ वाजता इंटरनॅशनल बुक सर्व्हिसमध्ये होणार आहे.

#### टॅलेंट हंट

राष्ट्रीय पुस्तक न्यासातर्फे शहरातील शाळा आणि महाविद्यालयांमध्ये 'टॅलेंट हंट'चे आयोजन केले आहे. कविता, भाषण, गायन, कथा-कथन, सुलेखन, चित्रकला अशा विविध स्पर्धा होणार आहेत.

#### शांतता, पुणेकर वाचत आहेत !

पुस्तक वाचनाचा उपक्रम १४ डिसेंबरला ठिकठिकाणी दुपारी १२ ते १ या वेळेत होणार आहे. यात शहरातील सर्व महाविद्यालये, शाळा, ग्रंथालये, प्रकाशन संस्था, साहित्यिक, लेखक, सामाजिक संस्था, गणेश मंडळे, व्यापारी संस्था, राजकीय पक्ष अशा पाच हजार संस्था या उपक्रमात सहभागी होणार आहेत. या दिवशी सकाळी आठ वाजता स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर पाच हजार पालक आपल्या पाल्यांना गोष्टी सांगणार आहेत. पुणे महापालिकेने हा उपक्रम आयोजित केला आहे.

#### ज्ञानसरिता ग्रंथदिंडी

विविध ३० ठिकाणांहून 'ज्ञानसरिता ग्रंथदिंडी'चे १५ डिसेंबरला प्रस्थान होणार आहे. पुणे विद्यापीठांतर्गत ३० महाविद्यालयांवर दिंड्यांची जबाबदारी सोपविली आहे. सर्व दिंड्या त्यांच्या ठिकाणापासून डेक्कन परिसरातील नदीपात्रात एकत्र येतील. तेथून एकत्रितपणे त्या फर्ग्युसन महाविद्यालयात पोहोचतील. या ठिकाणी 'भारत' हा शब्द मोठ्या अक्षरात लिहिलेला असेल.

Pune, Pune-Today
05/12/2023 Page No. 1

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

# लोकसत्ता

लोकमान्य लोकशक्ती

### लोकसहभागासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन

# राष्ट्रीय पुस्तक न्यासातर्फे १६ डिसेंबरपासून 'पुणे पुस्तक महोत्सव'

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या (बुक ट्रस्ट ऑफ इंडिया) वतीने फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर १६ ते २४ डिसेंबर या कालावधीत होणाऱ्या 'पुणे पुस्तक महोत्सवा'मध्ये लोकसहभाग वाढावा या उद्देशाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन, शांतता पुणेकर वाचत आहेत, ह्यज्ञान सरिता ग्रंथदिंडी आणि टॅलेंट हंट अशा विविध या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे यांनी सोमवारी ही माहिती दिली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, पुणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे, डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. शरद कुंटे, फर्ग्युसन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन कुलकर्णी या वेळी उपस्थित होते.

डेक्कन जिमखान्यावरील इंटरनॅशनल बुक सर्व्हिस (सध्याचे बुकगंगा) येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुस्तक खरेदीसाठी येत असत. महोत्सवाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी बुधवारी (६ डिसेंबर) सकाळी साडेनऊ वाजता आयोजित साहित्यिक गप्पांमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. सुरेश गोसावी, साहित्यिक शरणकुमार लिंबाळे, श्यामा घोणसे, अरुण खोरे सहभागी होणार आहेत.

'शांतता पुणेकर वाचत आहेत' या उपक्रमांतर्गत १४ डिसेंबर रोजी दुपारी बारा ते एक या वेळेत आहे त्या ठिकाणी पुस्तक वाचनाचे आवाहन करण्यात आले आहे. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी शहरातील सर्व महाविद्यालये, शाळा, ग्रंथालये, प्रकाशन संस्था, साहित्यिक, लेखक, सामाजिक संस्था, गणेश मंडळे, व्यापारी संस्था, राजकीय पक्ष यांच्याशी संपर्क करण्यात आला आहे. त्याच दिवशी पुणे महापालिकेच्या वतीने स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर सकाळी आठ वाजता पाच हजार पालक आपल्या पाल्यांना गोष्ट सांगणार आहेत.

शहरातील तीस ठिकाणांहून १५ डिसेंबर रोजी ज्ञानसरिता ग्रंथ दिंड्यांचे प्रस्थान होणार आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत तीस महाविद्यालयांवर दिंड्यांची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. सर्व दिंड्या त्यांच्या ठिकाणापासून डेक्कन परिसरातील नदीपात्रात एकत्र येतील. तेथून एकत्रितपणे त्या फर्ग्युसन महाविद्यालयात पोहोचतील. या ठिकाणी भारत हा शब्द मोठ्या अक्षरात लिहिलेला असेल.

**टॅलेंट हंट** राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या वतीने शहरातील शाळा आणि महाविद्यालयांमध्ये 'टॅलेंट हंट'चे आयोजन करण्यात आले आहे. कविता, भाषण, गायन, कथाकथन, सुलेखन, चित्रकला अशा विविध स्पर्धा होणार असून, त्यामध्ये यशस्वी होणाऱ्या विद्यार्थ्यांना मुख्य कार्यक्रमात व्यासपीठावर आपल्या कलांचे सादरीकरण करता येणार आहे.

05/12/2023 | Pune | Page : 14
Source : https://epaper.loksatta.com

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

**लोकसत्ता**

**लोकमान्य लोकशक्ती**

# सेल्फीची नियमावली...

**देशभरातील विद्यापीठांना** 'प्रेरक व्यक्ती'च्या प्रतिमेबरोबर सेल्फी काढण्याची मोहीम राबवण्याचे निर्देश देण्यात आल्यावर अवघे शैक्षणिक वर्तुळ आनंदून गेले. प्रत्येक महाविद्यालयात या सेल्फीसाठी विद्यार्थ्यांकडून विचारणा होऊ लागली. मात्र हे छायाचित्र काढण्याचे काम शिस्तीत व्हावे यासाठी अनेक विद्यापीठांनी मार्गदर्शक सूचना जारी केल्या. त्याचे स्वरूप साधारणपणे खालीलप्रमाणे होते.

१) सेल्फी काढताना स्वतःची सावली 'प्रेरक व्यक्ती'च्या छायाचित्रावर पडणार नाही याची काळजी विद्यार्थ्यांनी घ्यावी. सूर्य कोणत्या बाजूला आहे याचे भान ठेवणे गरजेचे.

२) छायाचित्रात देशाला दिशा देणाऱ्या योजना धूसर दिसल्या तरी चालतील, पण 'प्रेरक व्यक्ती'चे छायाचित्र ठळक दिसेल याची काळजी घ्यावी.

३) सेल्फी काढताना आपण एका राष्ट्रकार्यात सहभागी होतोय याची जाणीव प्रत्येकाने ठेवावी.

४) छायाचित्रात स्वतःचा चेहरा मोठा व 'प्रेरणादायी व्यक्ती'चा छोटा असे चालणार नाही. आपण हिरो नाही. देशाचे खरे हिरो कोण आहेत, याचे भान प्रत्येकाने बाळगणे आवश्यक.

५) तुमचा फोटो पासपोर्ट साइज व 'प्रेरक व्यक्ती'चा फुल साइज अशी प्रतिमा कॅमेऱ्यात सेट झाल्यावरच सेल्फीची कृती करावी. गुरू महान असतो ही भावना अशा वेळी मनात ठेवावी.

६) छायाचित्र काढताना छबीच्या उजव्या बाजूलाच उभे राहणे बंधनकारक.

७) तुम्ही वेगवेगळे पोशाख घालून अनेक सेल्फी काढू शकता. 'खास जॅकेट' असेल तर उत्तम.

८) उत्कृष्ट सेल्फी काढणाऱ्याला सार्वजनिक समारंभात गौरवले जाईल व अंतिम परीक्षेत दहा गुण दिले जातील. या गुणांमुळे त्याचे एकूण गुण शंभरपेक्षा जास्त भरले तरी ते मान्यताप्राप्त समजले जातील.

९) 'एंटायर पोलिटिकल सायन्स'च्या विद्यार्थ्यांना सेल्फीसाठी प्राधान्य दिले जाईल. समजा यापैकी एखाद्या विद्यार्थ्याचा सेल्फी सरस ठरून त्याला मिळालेल्या अतिरिक्त गुणांच्या आधारे तो मेरिटमध्ये आलाच तरी त्याला 'दुसरा मेरिट' असेच संबोधण्यात येईल. पहिला मेरिट कोण हे तुम्ही सर्व जण जाणताच.

११) सेल्फी काढणाऱ्या प्रत्येकाला वर्गात त्याचा अनुभव विशद करताना फलकावरील मजकुरापेक्षा 'प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वा'च्या चेहऱ्यावरील भावाचे यथार्थ वर्णन करावे लागेल. शेवटी योजनेपेक्षा प्रेरणा महत्त्वाची.

१२) घाईगडबडीत सेल्फी काढण्याचा प्रयत्‍ कुणीही करू नये. तसे करून चुकीचा फोट व्हायरल केल्यास एक हजार रुपये दं ठोठावण्यात येईल.

१३) या उपक्रमाला विरोध करणाऱ्य मंडळींपासून विद्यार्थ्यांनी सावध राहावे व तस अडथळा कुणी आणला तर तात्काळ व्यवस्थापनाला कळवावे.

१४) सेल्फीद्वारे घेतलेले छायाचित्र घरी फ्रेम करून लावले तर उत्तमच.

१५) यात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांन राष्ट्रनिष्ठेचा गौरव केला म्हणून 'कॅम्पस प्लेसमेंट' मोहिमेत प्राधान्य दिले जाईल.

(संबंधित संकेतस्थळावरून या निर्णयासोबत जोडलेले सेल्फी पॉइंटचे संकल्पचित्र अचानक गायब झाल्याने या सूचना स्थगित समजाव्यात.)

05/12/2023 | Pune | Page : 06
Source : https://epaper.loksatta.com

## *News Paper Clippings During December 2023*

### *Section: Education*

पुढारी

# 'शांतता पुणेकर वाचत आहेत'

## 'फर्ग्युसन'च्या मैदानावर दि. १६ पासून पुस्तक महोत्सव

पुढारी ANCHOR

**पुणे :राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या वतीने फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर १६ ते २४ डिसेंबर या कालावधीत होणाऱ्या 'पुणे पुस्तक महोत्सवा'मध्ये विविध उपक्रमांची रेलचेल पाहायला मिळणार आहे. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' यांना अभिवादन, 'शांतता पुणेकर वाचत आहेत', 'ज्ञानसरिता ग्रंथदिंडी' आणि 'टॅलेंट हंट' आदी उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत दिली.**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. पराग काळकर, पुणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे, डीईएसचे अध्यक्ष डॉ. शरद कुंटे, फर्ग्युसनचे प्राचार्य डॉ. नितीन कुलकर्णी आदी उपस्थित होते. राज्य सरकार, पुणे महानगरपालिका, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, फर्ग्युसन महाविद्यालय हे महोत्सवाचे सह-आयोजक आहेत. पुणे श्रमिक पत्रकार संघ, भारतीय विचार साधना, इस्कॉन हे सह - प्रायोजक आहेत.

पुण्यातील डेक्कन जिमखान्यावरील 'इंटरनॅशनल बुक सर्व्हिस' येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुस्तक खरेदीसाठी येत असत. पुण्यात आले की बाबासाहेब हमखास या दुकानाला भेट देत. 'पुणे पुस्तक महोत्सवा'च्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी त्यांच्या महापरिनिर्वाणदिनी साहित्यिक गप्पांचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवारी ६ डिसेंबरला सकाळी ९.३० वाजता 'इंटरनॅशनल बुक सर्व्हिस' येथे हा कार्यक्रम होणार आहे. गुरुवार, दिनांक १४ डिसेंबरला दुपारी १२ ते १ या वेळेत जो ज्या ठिकाणी आहे त्या ठिकाणी पुस्तक वाचनाचे आवाहन करण्यात आले आहे. शुक्रवारी १५ डिसेंबरला तीस ठिकाणांहून ज्ञानसरिता ग्रंथ दिंड्यांचे प्रस्थान होणार आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत तीस महाविद्यालयांवर दिंड्यांची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.



### शाळा आणि महाविद्यालयांमध्ये 'टॅलेंट हंट'

राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या वतीने शहरातील शाळा आणि महाविद्यालयांमध्ये 'टॅलेंट हंट'चे आयोजन करण्यात आले आहे. कविता, भाषण, गायन, कथा-कथन, सुलेखन, चित्रकला अशा विविध स्पर्धा होणार आहेत. या स्पर्धांमध्ये यशस्वी होणाऱ्या विद्यार्थ्यांना मुख्य कार्यक्रमात व्यासपीठावर आपल्या कलांचे सादरीकरण करता येणार आहे.

My Pune Edition
Dec 6, 2023 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

*News Paper Clippings During December 2023*

*Section: Education*

पुढारी

# एम. टेक., पीएच. डी. ६ जीसाठी अद्ययावत करा

**पुणे** : आगामी ६ जी तंत्रज्ञानाच्या अनुषंगाने दूरसंचार विभागाने नियुक्त केलेल्या समितीने अभियांत्रिकी विद्याशाखेतील पदव्युत्तर (एम. टेक.), पीएच. डी. अभ्यासक्रम अद्ययावत करण्याची शिफारस केली आहे. त्यामुळे ६ जी तंत्रज्ञानाच्या उदयोन्मुख क्षेत्रासाठी अभ्यासक्रम अद्ययावत करण्याची सूचना विद्यापीठ अनुदान आयोगाने विद्यापीठे, महाविद्यालयांना केली आहे.

**यूजीसीची विद्यापीठे, महाविद्यालयांना सूचना**

दर दशकात विनाजोडणी तंत्रज्ञानाची नवी पिढी जगापुढे येते. त्यामुळे संवादाची पद्धत बदलते. ५ जी नेटवर्क सध्या अत्यंत वेगाने कार्यान्वित करण्यात येत आहे आणि जगात आता ६ जीची चर्चा सुरू झाली आहे. त्यामुळे ६ जी सेवा देशात सुरू करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारत ६ जी भविष्यवेधी आराखडा २२ मार्च रोजी सादर केला. तसेच ६ जी संशोधन आणि विकास चाचणी सुविधाही सादर केली. तंत्रज्ञान नवसंकल्पना समितीच्या शिफारसींनुसार ६ जी विकसन करण्यात येत आहे. तसेच देशात ६ जीसाठी कृती कार्यक्रम निश्चित करण्यासाठी सहा कृती दलांची स्थापना करण्यात आली आहे. ६ जी संवादाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी उदयोन्मुख संकल्पना आणि तंत्रज्ञानाबाबत जाणीव निर्माण होण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे ६ जी तंत्रज्ञानाची मागणी पूर्ण करणारे पदवीपूर्व आणि पदव्युत्तर शिक्षण अद्ययावत करण्याची गरज निर्माण झाली आहे. भारत जागतिक स्तरावर स्पर्धक होण्यासाठी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होऊ शकते, स्वदेशी तंत्रज्ञानाला चालना मिळून तंत्रज्ञानाधिष्ठित विकास करता येऊ शकतो. त्या दृष्टीने जागतिक स्तरावर एकस्व अधिकार नोंदणी आणि मान्यतेमध्ये १० टक्के भाग भारताचा असण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे, असे यूजीसीने परिपत्रकात नमूद केले आहे.

Pune Edition
Dec 6, 2023 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

पुढारी

# कॉपी-पेस्ट शोधप्रबंधांना आळा बसणार

## पीएच.डी. संशोधकांच्या वाड्मय चोरीवर आणखी कठोर निर्बंध

**पुणे : पुढारी वृत्तसेवा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न संशोधन केंद्रांमध्ये संशोधन करणाऱ्या पीएच.डी.च्या विद्यार्थ्यांचे शोधप्रबंध कॉपी-पेस्ट तर नाहीत ना, हे पाहण्यासाठी त्याची सॉफ्टवेअरद्वारे तपासणी करण्यात येत होती. परंतु, आता युजीसीकडून ही तपासणी आणखी कठोर करण्यात आली आहे. त्यासाठी आणखी एका सॉफ्टवेअरची मदत घेतली जाणार आहे. त्यामुळे यापुढे कॉपी-पेस्ट शोधप्रबंधांना चांगलाच चाप बसणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.**

विद्यापीठाच्या विविध विभागांचे विभागप्रमुख, संशोधन केंद्रांचे संचालक यांना विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाच्या उपकुलसचिवांनी दिलेल्या निर्देशानुसार, पीएच.डी.चे प्रबंध स्वीकारताना विद्यार्थ्यांकडून त्याच्या प्रबंधासोबत वाड्मयचौर्य अहवाल जमा करून घेण्यात येतो. ही प्रक्रिया विद्यापीठ अनुदान आयोगाने निश्चित केली असल्याने ती सर्व संशोधक विद्यार्थ्यांना अनिवार्य आहे. यापूर्वी पीएच.डी.चे संशोधन प्रबंध 'Turnitin' व 'Urkund' या दोन सॉफ्टवेअरमध्ये तपासणी करून त्याचा अहवाल प्रबंधासोबत जमा करून घेण्यात येत होता. संबंधित प्रबंध तपासणीची प्रक्रिया करण्यासाठी विद्यापीठामार्फत संशोधक मार्गदर्शकांना लॉगीन उपलब्ध देण्यात आले होते. परंतु भारत सरकारच्या उपक्रमांतर्गत 'शोधशुद्धी' या उपक्रमाचा एक भाग म्हणून INFLIBNET या प्रकल्पांतर्गत ०१ नोव्हेंबर, २०२३ पासून 'Drillbit-Extreme Plagiarism Detection Software' लागू करण्यात आलेले आहे.



त्याअनुषंगाने विद्यापीठ परिसर शैक्षणिक विभागातील संशोधक मार्गदर्शकांनी त्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत पीएच.डी. संशोधक विद्यार्थ्यांना संशोधन प्रबंध सादर करताना 'Turnitin' या सॉफ्टवेअरमध्ये तपासणी करून त्याचा वाड्मयचौर्य अहवाल जमा करावा व संलग्नित संशोधन केंद्रातील संशोधक मार्गदर्शकांनी त्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत पीएच.डी. संशोधक विद्यार्थ्यांना संशोधन प्रबंध सादर करताना 'Drillbit- Extreme Plagiarism Detection Software द्वारे तपासणी करून त्याना वाड्मयचौर्य अहवाल जमा करावा. वाड्मयचौर्य अहवाल तपासणी करताना संशोधक मार्गदर्शकांनी त्यांच्या लॉगीनद्वारे तपासावा व तो अहवाल संशोधन केंद्राच्या डीएआयपी समितीच्या समोर ठेवून त्यावर सर्व सदस्यांच्या स्वाक्षरीसह विद्यापीठाकडे पाठवावा, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

Pune Edition
Dec 6, 2023 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

### प्राध्यापक भरतीनंतरच विद्यापीठाचे नॅक मूल्यांकन

**पुणे** : एनआयआरएफ, क्यूएस रँकिंगमध्ये घसरलेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासमोर नॅक मूल्यांकन टिकवण्याचे व वाढवण्याचे मोठे आव्हान आहे. कमी झालले मनुष्यबळ आणि संशोधनात झालली घसरण ही विद्यापीठांसाठी डोकेदुखी ठरत आहे. त्यामुळे विद्यापीठातील विविध विभागातील रिक्त पदांची भरती केल्याशिवाय नॅक मूल्यांकनाला सामोरे जायचे नाही, असा विचार वारिष्ठ स्तरावरील अधिकारी करत आहेत. परिणामी विद्यापीठाची रखडलेली १११ पदांची भरती प्रक्रिया लवकरच सुरू होण्याची शक्यता आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला लवकरच नॅक पुनर्मूल्यांकनाला सामोरे जावे लागणार आहे. त्यादृष्टीने विद्यापीठाने विविध पातळ्यांवर कामाला सुरूवात केली आहे. ॲकॅडेमिक ऑडिट, फायर ऑडिट आदी कामे झाली असून त्यातील त्रुटी दूर करण्याचे काम सध्या सुरू आहे. तसेच विद्यापीठाकडून प्रथमत: आयआयक्यूए तयार केला जात आहे. त्यासाठी सर्व विभागांकडून माहिती जमा करण्याचे काम सुरू आहे. तर माहिती देण्यास विलंब करणाऱ्या काही विभागांशी प्रत्यक्ष संवाद साधून आवश्यक माहिती मागवली जात आहे. ॲकॅडेमिक ऑडिटमध्ये स व बी ग्रेड मिळालेल्या विभागांचे सक्षमीकरण केले जात आहे. मात्र,अनेक विभागात पुरेसे मनुष्यबळ नाही.त्यामुळे विद्यापीठाने रिक्त पदांच्या भरतीला प्राधान्य देण्याचे ठरवले आहे. दरम्यानच्या काळात नॅकसाठी सेल्फ स्टडी रिपोर्ट तयार करून ठेवला जाणार आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ वगळता राज्यातील इतर विद्यापीठातील रिक्त पदांची भरती प्रक्रिया जवळवळ पूर्ण झाली आहे. सध्या पुणे विद्यापीठात सुमारे ५० टक्के विभाग प्रमुख पदाचा भार हा अतिरिक्त स्वरूपात दिला आहे. विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी सुद्धा कंत्राटी तत्त्वावर प्राध्यापकांची भरती केली आहे. नॅक मूल्यांकनात उपलब्ध मनुष्यबळाला गुण आहेत. त्यामुळे रिक्त पदे भरल्याशिवाय विद्यापीठ नॅक मूल्यांकनाला सामोरे जाणार नाही. लवकरच पदभरतीची जाहिरात प्रसिध्द होण्याची शक्यता आहे. त्यामुळे फेब्रुवारी- मार्च किंवा जुलै-ऑगस्ट या कालावधीत विद्यापीठ नॅक मूल्यांकनाला सामोरे जाईल, असा अंदाज विद्यापीठातील अधिकाऱ्यांकडून व्यक्त केला जात आहे.

Kesari 6.12.2023

पुढारी

### महाविद्यालयांमधील रिक्त पदे तातडीने भरा

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने संलग्न महाविद्यालयांमध्ये रिक्त असलेली प्राचार्य, संचालक व अध्यापक पदे भरावीत आणि त्याचा अहवाल येत्या ३१ डिसेंबरपर्यंत सादर करावा असे स्पष्ट निर्देश संलग्न महाविद्यालयांच्या अध्यक्ष, सचिवांना दिले आहेत. त्यामुळे येत्या काळात महाविद्यालयांमध्ये पदभरती होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

विद्यापीठ प्रशासनाने संलग्न महाविद्यालयांना दिलेल्या सूचनांनुसार, राज्य शासनाने १६ मे, २०२३ रोजी जाहीर केलेल्या शासन निर्णयान्वये राज्यातील सर्व विद्यापीठ स्तर आणि स्वायत्त महाविद्यालयांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणी सुरू करण्याचे आदेश दिलेले आहेत. विद्यापीठ अधिकार मंडळाने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून विद्यापीठातील शैक्षणिक विभागातील सर्व पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम आणि विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयात पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम नवीन शैक्षणिक धोरणानुसार सुरू करण्यात आले आहेत. तसेच विद्यापीठाशी संलग्नित स्वायत्त आणि अस्वायत्त कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील अभ्यासक्रम आणि श्रेयांक आराखडा तयार करण्यात आला असून, संबंधित अभ्यासक्रमही नवीन शैक्षणिक धोरणानुसार सुरू करण्यात येणार आहेत.

Pune Edition
Dec 6, 2023 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# एम.टेक., पीएचडी. अभ्यासक्रम अद्ययावत करा!

### यूजीसीचे विद्यापीठे, महाविद्यालयांना निर्देश

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** आगामी ६जी तंत्रज्ञानाच्या अनुषंगाने दूरसंचार विभागाने नियुक्त केलेल्या समितीने अभियांत्रिकी विद्याशाखेतील पदव्युत्तर (एम.टेक.), पीएच.डी. अभ्यासक्रम अद्ययावत करण्याची, नवीन अभ्यासक्रम सुरू करण्याची शिफारस केली आहे. त्या अनुषंगाने उदयोन्मुख क्षेत्रासाठी अभ्यासक्रम अद्ययावत करण्याची सूचना विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) देशभरातील विद्यापीठे, महाविद्यालयांना केली आहे.

दर दशकात विनाजोडणी तंत्रज्ञानाची नवी पिढी जगापुढे येऊन संवादाची पद्धत बदलते. ५जी नेटवर्क सध्या अत्यंत वेगाने कार्यान्वित करण्यात येत आहे आणि जगात आता ६जीची चर्चा सुरू झाली आहे. त्यामुळे देशात ६जी सेवा देशात सुरू करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारत ६जी भविष्यवेधी आराखडा २२ मार्च रोजी सादर केला. तसेच ६जी संशोधन आणि विकास चाचणी सुविधाही सादर केली. तंत्रज्ञान नवसंकल्पना समितीच्या शिफारशींनुसार ६जी विकसन करण्यात येत आहे. तसेच देशात ६जीसाठी कृती कार्यक्रम निश्चित करण्यासाठी सहा कृती दलांची स्थापना करण्यात आली आहे.

६जी तंत्रज्ञानातील संशोधन आणि विकसनामध्ये भारत आघाडीचा देश ठरू शकतो. त्यामुळे भारत जागतिक स्तरावर स्पर्धक होण्यासाठी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होऊ शकते, स्वदेशी तंत्रज्ञानाला चालना मिळून तंत्रज्ञानाधिष्ठित विकास करता येऊ शकतो.

### समितीच्या शिफारशी

दूरसंचाराशी संबंधित अभियांत्रिकी अभ्यासक्रमांचा आढावा घेण्यासाठी दूरसंचार विभागाने समिती नियुक्त केली होती. या समितीने ऑप्टिकल कम्युनिकेशन्स, सॅटेलाइट कम्युनिकेशन्स, ब्रॉडकास्टिंग, आरएफ इंजिनियरिंग, टेलिकॉम स्टँडर्डायझेशन, आयपीआर अशा विविध क्षेत्रांमध्ये ६जीच्या गरजा लक्षात घेऊन काही महत्त्वपूर्ण शिफारशी केल्या आहेत. त्यात एम.टेक. आणि पीएच.डी. अभ्यासक्रम अद्ययावत करणे, विद्यार्थ्यांना कम्युनिकेशनच्या क्षेत्रातील अन्य पर्यायी विषय उपलब्ध करून द्यावेत, अभ्यासक्रम कालसुसंगत राहण्यासाठी ठरावीक काळाने त्यात बदल करावेत, शिक्षण संस्थांमध्ये पायाभूत सुविधांची निर्मिती करणे, अशा शिफारशी करण्यात आल्या आहेत.

06/12/2023 | Pune | Page : 02
Source : https://epaper.loksatta.com

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

# तृतीयपंथी विद्यार्थ्यांचे शुल्क विद्यापीठ भरणार

### मंत्री चंद्रकांत पाटील यांची माहिती

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'राज्यातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेणाऱ्या तृतीयपंथी विद्यार्थ्यांचे संपूर्ण शैक्षणिक शुल्क विद्यापीठाला भरावे लागणार आहे,' असा निर्णय उच्च व तंत्रशिक्षण चंद्रकांत पाटील यांनी मंगळवारी जाहीर केला. नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक त्या शैक्षणिक उपाययोजना करून, अंमलबजावणीला अधिक गती द्यावी, अशा सूचनाही पाटील यांनी कुलगुरूंना केल्या.

डॉ. होमी भाभा स्टेट युनिव्हर्सिटी, मुंबई येथे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलबजावणी संदर्भात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री पाटील यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय बैठक झाली. या बैठकीला विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्थेचे कार्यकारी संचालक डॉ. निपुण विनायक, उच्च शिक्षण संचालक शैलेंद्र देवळाणकर, तंत्र शिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, सहसंचालक प्रकाश बच्छाव, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० सुकाणू समितीचे अध्यक्ष डॉ. नितीन करमळकर, प्राचार्य अनिल राव आदी उपस्थित होते.

'तृतीयपंथी विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी ठोस उपाययोजनांची आवश्यकता आहे. त्या अनुषंगाने विद्यापीठ आणि संलग्न महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या तृतीयपंथी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क विद्यापीठाने स्वनिधीतून भरल्यास, या विद्यार्थ्यांना मोफत उच्च शिक्षण उपलब्ध होईल. त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यास मदत होईल. यासाठी विद्यापीठांनी पुढाकार घ्यावा,' असे आवाहन पाटील यांनी बैठकीत केले. या आवाहनाला सर्व कुलगुरूंनी प्रतिसाद देऊन बहुमताने हा निर्णय मान्य केला. त्यामुळे यापुढे तृतीयपंथी विद्यार्थ्यांना विद्यापीठ आणि संलग्न महाविद्यालयात मोफत उच्च शिक्षण घेता येईल, असे सांगण्यात आले.

### 'नवमतदार नोंदणीत पुढाकार घ्यावा'



'अठरा वर्षे पूर्ण झालेल्या प्रत्येक नवमतदारांची नोंदणी व्हावी. यासाठी निवडणूक विभागाच्या वतीने नवमतदार नोंदणी मोहीम विद्यापीठ आणि महाविद्यालयात राबविण्यात यावी. या मोहिमेत राष्ट्रीय सेवा योजनेच्या प्रतिनिधींनी पुढाकार घ्यावा. त्यामुळे महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची मतदार नोंदणी होईल. यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या प्रशासकीय यंत्रणेणे पुढाकार घ्यावा,' असे आवाहन चंद्रकांत पाटील यांनी केले.

> काही विद्यार्थ्यांना विविध कारणांमुळे उच्च शिक्षण घेता येत नाही. मात्र, पुढे जाऊन हे विद्यार्थी व्यवसाय, नोकरी करतात. या विद्यार्थ्यांसाठी ऑडिओ-व्हिज्युअल स्वरूपात मार्गदर्शन कार्यक्रम आखता येईल का, उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांची मदत घेऊन प्रमाणपत्र कोर्स किंवा अभ्यासक्रमाची यादी तयार करता येईल का, याचा विद्यापीठांनी विचार करावा.
>
> – चंद्रकांत पाटील, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री



चंद्रकांत पाटील

Maharashtra Times 6.12.2023

## News Paper Clippings During December 2023

## Section: Education

# Universities told to bear tuition fees of transgenders

Yogita.Rao@timesgroup.com

**Mumbai:** In a bid to encourage transgenders to enrol for higher education, the state government has directed all public universities to bear their entire tuition fees, not only in university departments but affiliated colleges.

Universities have also been asked to take steps to make campuses more inclusive. While it is a step forward, activists say there is a long way to go.

In a review meeting with vice-chancellors and officials at Dr Homi Bhabha State University on Tuesday, minister of higher and technical education Chandrakant Patil appealed to universities to offer free education to transgenders. The vice-chancellors unanimously agreed to the decision.

"The idea is to encourage the trans community. It was also decided to create a positive environment so that they feel welcomed. Universities will take initiatives to sensitise campuses," said a government official. A circular or a government resolution will soon be issued with guidelines.

One of the vice-chancellors said, "Universities are expected to hold gender sensitisation programmes, to make campuses safer and comfortable for transgender students, build infrastructural facilities such as toilets, and extend financial support. All vice-chancellors have welcomed the move," he said.

Sridevi, one of Mumbai University's first transgender students (as per official records) to have graduated, said it is a welcome move, but added there is a long way to go. Sridevi is pursuing her masters from the university's Institute of Distance and Open Learning (IDOL). "Maharashtra is lagging behind Kerala, Karnataka and Tamil Nadu, even Chhattisgarh, which have policies in place. Free education is a step in the positive direction as many from the trans community have to beg for a living and can never afford higher education. Universities can probably consider setting up study centres exclusively for trans people to make them feel safer and to push them towards education," she said. Adding that sensitisation programmes are needed not only for the general public but for the trans community, Sridevi said, "There is no life and dignity in the way most of us currently live. Consideration in education and employment can help in upliftment," she said, adding that they struggle on an everyday basis for basic things, such as using a public toilet facility.

The Times of India 6.12.2023

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

लोकमत

# कार्यभार ठरविणार कसा? प्राध्यापक अतिरिक्तचा धोका

## एनईपीच्या अंमलबजावणीमुळे महाविद्यालय प्रशासनासमोर पेच

**प्रशांत बिडवे**

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्यात शासकीय तसेच स्वायत्त महाविद्यालयांत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी)च्या अंमलबजावणीला सुरूवात झाली आहे. स्वायत्त महाविद्यालयांत मुख्य, उपमुख्य विषयांसह सहा विषय शिकविण्यात येत आहेत. त्यामुळे प्राध्यापकांच्या कार्यभाराबद्दल महाविद्यालय प्रशासन तसेच शिक्षकांत संभ्रम निर्माण झाला आहे. उच्च शिक्षण विभागाने प्राध्यापकांना याबाबत स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणी महाविद्यालयांकडून केली जात आहे.

नवीन शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रमांमध्ये मुख्य विषय, उपमुख्य विषय, इतर शाखेचा एक विषय, कौशल्याधारित विषय, क्षमता विकसित करणारा विषय आणि भारतीय ज्ञान प्रणाली व मूल्याधिष्ठित शिक्षण या सहा प्रकारच्या विषयांचा समावेश केला आहे. यातील कोणता विषय अनुदानितसाठी ग्राह्य धरला जाईल आणि कोणता नाही? याबाबत अद्याप स्पष्टता दिलेली नाही. तसेच आगामी काळात विषयानुरूप विद्यार्थी संख्या कमी होण्याची शक्यता आहे.

### अनुदानाबद्दल अस्पष्टता

अनुदानित महाविद्यालयांत पदवीच्या तिसऱ्या वर्षापर्यंत अनुदान देण्यात आले आहे. मात्र, एनईपीनुसार ज्या महाविद्यालयांत पदव्युत्तर पदवी आहे तेथे पदवीचे चौथे वर्षही सुरु करता येणार आहे. मात्र, चौथ्या वर्षाच्या अनुदानाबद्दल शासनाकडून अद्याप कोणताही लेखी आदेश देण्यात आले नसल्याचे एका महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी सांगितले.

**एनईपी धोरण ठरले, अंमलबजावणीत अडथळे**

**भाग : १**



### कार्यभार तपासणी कार्यशाळाच नाही :

महाविद्यालयांची प्रवेश प्रक्रिया सप्टेंबरअखेर पूर्ण होते. त्यानंतर ऑक्टोबर महिन्यात विषयनिहाय शिक्षकांच्या कार्यभार तपासणी कार्यशाळेचे आयोजन केले जाते. दरम्यान, यंदा सहसंचालक कार्यालयाकडून कार्यशाळेचे आयोजन केलेले नाही. त्यामुळे एनईपीनुसार असलेल्या विविध सहा विषयांतील कोणता कार्यभार अनुदानासाठी गृहित धरावा, याबाबत स्पष्टता नाही.

### कार्यभार तपासणीसाठी समिती स्थापन

एनईपीनुसार प्राध्यापकांचा कार्यभार तपासणीसाठी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे माजी कुलगुरूंच्या अध्यक्षतेखाली चार शिक्षण सहसंचालकांची कार्यभार अभ्यास समिती गठीत केली आहे. डिसेंबर महिन्याअखेर समिती अहवाल सादर करणार आहे. दरम्यान, कोणाचाही कार्यभार कमी केला जाणार नाही, तसेच एकही प्राध्यापक अतिरिक्त ठरणार नाही. प्राध्यापकांना आपल्या विषयाशी संबंधित विषय शिकविण्याची तयारी करावी लागणार आहे.

- **डॉ. शैलेंद्र देवळाणकर**, प्रभारी शिक्षण संचालक, उच्च शिक्षण

Pune Main
Page No. 2 Dec 06, 2023
Powered by: erelego.com

लोकमत

# तृतीयपंथीय विद्यार्थ्यांना दिलासा

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्यातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेणाऱ्या तृतीयपंथी विद्यार्थ्यांचे संपूर्ण शैक्षणिक शुल्क विद्यापीठाने भरावे, असे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी जाहीर केले. नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक त्या शैक्षणिक उपाययोजना करून, अंमलबजावणीला गती द्यावी, अशी सूचनाही पाटील यांनी केली.

मुंबईतील डॉ. होमी भाभा स्टेट युनिव्हर्सिटी येथे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलबजावणी संदर्भात उच्च व तंत्र शिक्षणमंत्री पाटील यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय बैठक झाली. बैठकीला उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्थेचे कार्यकारी संचालक डॉ. निपुण विनायक, उच्च शिक्षण संचालक शैलेंद्र देवळाणकर, कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी आदी उपस्थित होते. काही विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेता येत नाही. मात्र, हे विद्यार्थी व्यवसाय, नोकरी करतात. अशा विद्यार्थ्यांसाठी ऑडिओ-व्हिज्युअल स्वरुपात मार्गदर्शन कार्यक्रम, प्रमाणपत्र कोर्स आखता येईल का, याचाही विचार करावा, असेही ते म्हणाले.

Pune Main
Page No. 5 Dec 06, 2023
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

लोकमत

दृष्टिक्षेप

# AI विरुद्ध माणूस : कोण ससा? कोण कासव?

## AI : भाषा-प्रतिमा-आवाज ओळखण्याच्या क्षमतेत झपाट्याने वाढ






आर्टिफिशियल इंटेलिजन्स म्हणजेच AI बरोबरच्या संभाव्य युद्धात माणूस नक्की कुठे असेल, याबाबत वेगवेगळे तर्क समोर येत असताना AI नावाची ही कृत्रिम बुद्धिमत्ता मात्र वेगाने माणसाच्या अंगभूत क्षमता आत्मसात करत निघाली आहे. २००० ते २०२० या काळात कृत्रिम बुद्धिमत्तेची भाषिक समजूत तसेच प्रतिमा आणि आवाज ओळखण्याची क्षमता प्रचंड वाढली आहे. सोबतची आकृती बारकाईने पाहाल, तर हे लक्षात येईल की सरासरी मानवी क्षमतांचा परीघ ओलांडून AI पुढे झेपावते आहे.

**संदर्भ :** रिथिंकींग बेंचमार्किंग इन एनएलपी आणि अवर वर्ल्ड इन डेटा.

Pune Main
Page No. 6 Dec 07, 2023
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

सकाळ

# उच्च शिक्षणातील 'पहाट'

**व्यावसायिकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अनुभवाधारित शिक्षण देण्यासाठी 'प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस'चा राज्य सरकारने केलेला स्वीकार, विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आलेख मांडणाऱ्या 'अ‍ॅकॅडमिक बँक ऑफ क्रेडिट'ची अंमलबजावणी, याबरोबरच आता 'समूह विद्यापीठ' स्थापनेचे पाऊलही महाराष्ट्र सरकारने टाकले आहे.**

**डॉ. शैलेंद्र देवळाणकर**

राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून अनेक महत्त्वपूर्ण आणि क्रांतिकारी निर्णय गेल्या काही महिन्यात घेण्यात आले. राज्यात नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी २०२३-२४ पासून सुरू करण्यात आली. त्यादृष्टीने विविध निर्णय घेण्यात आले. समूह विद्यापीठ स्थापनेसाठी मार्गदर्शक सूचना काढून ते प्रत्यक्षात राबविणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून राज्यातील मान्यवरांकडून सूचना मागविण्यात आल्या होत्या. या सूचनांचा विचार करून एक सर्वसमावेशक मार्गदर्शकतत्त्वे तयार करण्यात आली आहेत. त्या अनुषंगाने राज्यात आता समूह विद्यापीठे स्थापन केली जातील.

'राष्ट्रीय शिक्षण धोरणावर आधारित समूह विद्यापीठ ही संकल्पना आहे. विद्यार्थ्यांना बहुविद्याशाखीय शिक्षण देणे आणि महाविद्यालयांचे रूपांतर बहुविद्याशाखीय अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थांमध्ये करणे, ही शैक्षणिक धोरणाची प्रमुख उद्दिष्टे आहेत. शैक्षणिक संस्थांना सक्षम बनवून भविष्यात महाविद्यालयांमार्फत विद्यार्थ्यांना पदवी देणे, ही समूह विद्यापीठांची संकल्पना आहे. सध्या विद्यापीठे विद्यार्थ्यांना पदवी देतात, त्यापद्धतीने महाविद्यालयांनाही पदवी देण्याइतपत सक्षम बनविणे, यातून समूह विद्यापीठांची संकल्पना आली आहे. समूह विद्यापीठे बहुविद्याशाखीय असणार आहेत. एका जिल्ह्यामध्ये एकाच शिक्षणसंस्थेची एकाच



व्यवस्थापनांतर्गत येणारी महाविद्यालये एकत्रित येऊन समूहविद्यापीठ स्थापन करण्यात येईल. त्यासाठी काही अटी आणि मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत.

### बहुविद्याशाखीय ज्ञान

एकाच शिक्षणसंस्थेची एकाच व्यवस्थापनाची विधी, शिक्षणशास्त्र, वाणिज्य, विज्ञान अशी अनेक महाविद्यालये एकाच जिल्ह्यात असतील, तर ही सर्व महाविद्यालये समूह विद्यापीठ स्थापनेसाठी एकत्र येऊ शकतात. त्या माध्यमातून बहुविद्याशाखीय समूह विद्यापीठ उभे राहू शकते. म्हणजेच अशा संस्थेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्याला वेगवेगळ्या विद्याशाखांचा अभ्यास करता येणे शक्य होईल. त्या दृष्टिकोनातून हा निर्णय महत्त्वपूर्ण आहे. समूह विद्यापीठांची रचना विद्यापीठांप्रमाणेच आहे. महाराष्ट्र विद्यापीठ कायदा २०१६ यानुसार घटनात्मक पदे ही समूह विद्यापीठांनाही असणार आहेत.

ही विद्यापीठे स्थापन झाल्यानंतरही त्यात काही अनुदानित महाविद्यालये असतील, तर त्यांचे अनुदान भविष्यातही चालू राहणार आहे. महाराष्ट्रात स्वयंअर्थसहाय्यित किंवा खासगी विद्यापीठे आहेत. जर एखादे महाविद्यालये स्वयंअर्थसाहाय्यित विद्यापीठात गेले, तर त्याचे अनुदान तत्काळ बंद होते, असा खासगी विद्यापीठांसाठीचा नियम आहे. परंतु असा प्रकार समूह विद्यापीठांबाबत राहणार नाही. समूह विद्यापीठात अनुदानित महाविद्यालये असतील, तर त्यांचे अनुदान विद्यापीठ स्थापनेनंतरही भविष्यात चालू राहणार आहे. त्यामुळे महाविद्यालयांना त्याबाबत चिंता करण्याची आवश्यकता नाही.

समूह विद्यापीठ स्थापन करण्याची इच्छा असणाऱ्या शिक्षण संस्थांनी संबंधित प्रस्ताव अर्ज संपूर्ण कागदपत्रांच्या पुर्ततेसह उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे करायचा आहे. त्या प्रस्ताव अर्जाची छाननी केली जाईल. या प्रस्तावात संबंधित शिक्षण संस्थेला सविस्तर प्रकल्प अहवाल (डिटेल प्रोजेक्ट रिपोर्ट -डिपीआर) सादर करावा लागेल. प्रस्ताव आणि अहवाल सादर झाल्यानंतर छाननी समितीमार्फत त्याची छाननी करण्यात येईल. त्यानंतर संबंधित शिक्षण संस्थेला समूह विद्यापीठ म्हणून मंत्रिमंडळाची मान्यता घेतली जाईल. त्यानंतर मान्यतेसंदर्भातील आदेश विधीमंडळातून संमत करून जाहीर करण्यात येईल. त्यामुळे या समूह विद्यापीठांना वैधानिक दर्जा प्राप्त होणार आहे. अशा स्वरूपाच्या समूह विद्यापीठांची स्वतंत्र अभ्यास मंडळे, व्यवस्थापन परिषदा, अधिसभा असणार आहेत. त्यामुळे त्यांना त्यांचे निर्णय स्वत: घेता येतील. त्यांना पुन्हा पारंपारिक विद्यापीठांवर विसंबून राहावे लागणार नाही. ही विद्यापीठे स्वत:चे अनेक अभ्यासक्रम सुरू करू शकतात. विशेषकरून विद्यापीठांना त्या-त्या स्थानिक गरजांच्या अनुषंगाने अभ्यासक्रम तयार करता येऊ शकतात. काही शॉर्ट टर्म अभ्यासक्रमही सुरू करता येऊ शकतात. त्याला त्वरित त्यांच्या अभ्यास मंडळ, व्यवस्थापन परिषद यांच्याकडून मान्यता मिळू शकते.

राज्यात अनेक महाविद्यालये असणाऱ्या २० ते २५ शैक्षणिक संस्था आहेत. अशा शिक्षणसंस्थांना समूह विद्यापीठ स्थापन करण्याचा फायदा होऊ शकणार आहे. विद्यार्थ्यांच्या अनुषंगाने स्थानिक गरजांनुसार अभ्यासक्रम त्वरित सुरू करता येईल. बहुविद्याशाखीय अभ्यासक्रम उपलब्ध करून देण्यासाठी समूह विद्यापीठे उपयुक्त ठरतील. अशा समूह विद्यापीठांना शासनाकडे मुदतठेव ठेवावी लागणार आहे. ही मुदतठेव पाच कोटी रुपयांची असेल. खासगी विद्यापीठांसाठी अशाच प्रकारची मुदतठेवीची रक्कम १० कोटी रुपयांच्या आसपास आहे. त्यामुळे गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याच्या दृष्टिकोनातून राज्य सरकार वाटचाल करते आहे.

( लेखक राज्याचे उच्चशिक्षण संचालक आहेत. )

**(शब्दांकन : मीनाक्षी गुरव)**

Pune, Main
07/12/2023 Page No. 7

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

# प्रबंधासोबत वाङ्मयचौर्य अहवाल द्यावा

म. टा. प्रतिनिधी, पुणे

### कॉपी-पेस्ट प्रकाराला बसणार चाप

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न संशोधन केंद्रांमध्ये संशोधन करणाऱ्या पीएचडीच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रबंधासोबत वाङ्मयचौर्य अहवाल द्यावा लागणार आहे. त्यासाठी एका सॉफ्टवेअरची मदत घेतली जाणार आहे. त्यामुळे पीएचडीसाठी कॉपी-पेस्ट शोधप्रबंध सादर करण्याच्या प्रकाराला चाप बसणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

पीएचडीचे प्रबंध स्वीकारताना विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांकडून त्यांच्या प्रबंधासोबत वाङ्मयचौर्य अहवाल जमा करून घेण्यात येतो. ही प्रक्रिया विद्यापीठ अनुदान आयोगाने निश्चित केली असल्याने ती सर्व संशोधक विद्यार्थ्यांना अनिवार्य आहे. यापूर्वी पीएचडीचा संशोधन प्रबंध 'टर्निटीन' आणि 'उरकुंड' या दोन सॉफ्टवेअरमध्ये तपासणी करून त्याचा अहवाल प्रबंधासोबत जमा करून घेण्यात येत होता.

प्रबंध तपासणीची प्रक्रिया करण्यासाठी विद्यापीठामार्फत संशोधक मार्गदर्शकांना लॉग इन उपलब्ध करून देण्यात आले होते. मात्र, केंद्र सरकारच्या उपक्रमांतर्गत 'शोधशुद्धी' या उपक्रमाचा एक भाग म्हणून 'इन्फ्लिबनेट' या प्रकल्पांतर्गत 'ड्रिलबिट एक्स्ट्रीम प्लॅगिरिझम डिटेक्शन सॉफ्टवेअर' लागू करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने 'विद्यापीठ परिसर शैक्षणिक विभागातील संशोधक मार्गदर्शकांनी त्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत पीएचडी संशोधक विद्यार्थ्यांनी संशोधन प्रबंध सादर करताना 'टर्निटीन' या सॉफ्टवेअरमध्ये तपासणी करून वाङ्मयचौर्य अहवाल जमा करावा. त्याचप्रमाणे संलग्न संशोधन केंद्रातील संशोधक मार्गदर्शकांनी त्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत पीएचडी संशोधक विद्यार्थ्यांनी संशोधन प्रबंध सादर करताना 'ड्रिलबिट एक्स्ट्रीम प्लॅगिरिझम डिटेक्शन सॉफ्टवेअर'द्वारे तपासणी करून त्यांना वाङ्मयचौर्य अहवाल जमा करावा. वाङ्मयचौर्य अहवाल तपासणी करताना संशोधक मार्गदर्शकांनी त्यांच्या लॉग इनद्वारे तपासायचा आहे. त्यानंतर तो अहवाल संशोधन केंद्राच्या 'डीएआयपी समिती'समोर ठेवून, त्यावर सर्व सदस्यांच्या स्वाक्षरीसह पाठवावा,' असे विद्यापीठाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

Maharashtra Times 7.12.2023

**प्रभात**

# 'एक देश, एक विद्यार्थी, एक कार्ड'

## केंद्र सरकार तयार करतेय विद्यार्थ्यांचे युनिक कार्ड

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि.६ - आपल्या दैनंदिन कामांसाठी सर्वत्र आधार कार्ड उपयोगी ठरते. आता राष्ट्रीय स्तरावर आणखी एक कार्ड येऊ घातले आहे. एक विद्यार्थी, एक कार्ड या संकल्पनेवर हे असेल. येत्या काळात मुलांना हे कार्ड शाळेतील प्रवेशापासून ते नोकरी लागेपर्यंत उपयोगी ठरेल. केंद्र सरकारने या कार्डचे नाव अपार आयडी कार्ड असे ठेवले आहे. नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणांतर्गत हे कार्ड तयार करण्यात येत आहे.**

### कोणत्या कामासाठी ठरेल उपयोगी?

'अपार' कार्डमध्ये प्रत्येक विद्यार्थ्याची संपूर्ण माहिती डिजिटल स्वरूपात जतन करण्यात येईल. हे कार्ड म्हणजे त्यांचे शिक्षण माहितीपत्रच असेल. विद्यार्थ्याने कोणत्या इयत्तेपर्यंत शिक्षण पूर्ण केले, त्याला कोणती बक्षिसे मिळाली, प्रमाणपत्र मिळाली. त्यांची शैक्षणिक गुणवत्ता आणि क्रीडा निपुणता याचा आलेखच हे कार्ड असेल. त्यांना शिष्यवृत्ती मिळत असेल तर त्याची माहिती देण्यात येईल. शाळा बदलली तरी ही माहिती जतन असेल.

### कसे तयार होणार 'अपार' कार्ड?

'अपार' कार्ड तयार करण्यासाठी विद्यार्थ्याकडे आधार कार्ड आणि त्याचे 'डिजिलॉकर खाते असणे आवश्यक आहे. त्यामुळे विद्यार्थ्याचे केवायसी पूर्ण होईल. 'अपार' कार्ड संबंधित शाळा, महाविद्यालये नोंदणी करून देतील. त्यासाठी आई-वडिलांची सहमती घेण्यात येईल. सध्या सर्व शाळा, महाविद्यालयांकडून या माहितीचे संकलन केले जात आहे.

### काय आहे 'अपार' कार्ड?

'ऑटोमेटेड परमनंट ॲकॅडमिक अकाऊंट रजिस्ट्री' (**APAAR**) असे अपार कार्डचे सविस्तर नाव आहे. हे कार्ड १२ आकड्यांचे असेल. लहानपणापासून ते विद्यार्थ्यांचे शिक्षण होईपर्यंत हे कार्ड त्याची ओळख असेल. विद्यार्थ्याने शाळा बदलली, तरी अपार आयडी कार्ड एकच असेल. ते बदलणार नाही. अपार कार्ड हे आधार कार्डपेक्षा वेगळे असेल. पण, हे दोन्ही कार्ड एकमेकांशी लिंक असतील. या कार्डमधील माहिती शाळा–महाविद्यालय यांच्याकडून अपडेट केली जाईल.

### ठळक मुद्दे

- अपार ओळखपत्रास १२ अंकी युनिक क्रमांक असेल.
- या कार्डमध्ये विद्यार्थ्याच्या शैक्षणिक आणि सध्याच्या अभ्यासक्रमाची संपूर्ण माहिती. मागील इयत्तेतील सर्व नोंदी, मार्कशीट, गुण, विषय हे सर्व सुरक्षित असतील.




### २६ कोटी विद्यार्थी एका क्लिकवर

या कार्डच्या मदतीने देशातील १४ लाखांहून अधिक शाळा आणि महाविद्यालयांमध्ये शिकणारे २६ कोटींहून अधिक विद्यार्थी आणि ९५ लाख शिक्षकांचा डेटाबेस तयार केला जाणार आहे.

PuneCity, 07 Dec 2023, Page:005
https://epaper.dainikprabhat.com

## *News Paper Clippings During December 2023*

### *Section: Education*

# प्राध्यापक, प्राचार्यांची पदे तातडीने भरा

## पुणे विद्यापीठाच्या शिक्षणसंस्थांना सूचना

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने संलग्न महाविद्यालयांमध्ये रिक्त असलेली प्राचार्य, संचालक व अध्यापकांची पदे तातडीने भरून, त्याचा अहवाल येत्या ३१ डिसेंबरपर्यंत सादर करण्याचे स्पष्ट आदेश संलग्न महाविद्यालयांच्या संस्थांच्या अध्यक्ष आणि सचिवांना दिले आहेत. त्यामुळे येत्या काळात महाविद्यालयांमध्ये मोठ्या प्रमाणात प्राध्यापकांची पदभरती होण्याची आशा निर्माण झाली आहे.

राज्यातील सर्व विद्यापीठांतील शैक्षणिक विभाग आणि स्वायत्त महाविद्यालयांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२३-२४पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले आहेत. पुणे विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयानुसार, शैक्षणिक वर्ष २०२३-२४पासून विद्यापीठातील शैक्षणिक विभागातील सर्व पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम; तसेच विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयात पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम नवीन शैक्षणिक धोरणानुसार सुरू करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे विद्यापीठाशी संलग्न स्वायत्त आणि अस्वायत्त कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील अभ्यासक्रम आणि श्रेयांक आराखडा तयार करण्यात आला असून, संबंधित अभ्यासक्रमही नवीन शैक्षणिक धोरणानुसार सुरू करण्यात येणार आहेत. स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयातही शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी सुरू आहे.

अनेक ठिकाणी प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांची संख्या कमी आहे. त्यामुळे धोरणाची अंमलबजावणी करण्याबाबत अडचणी निर्माण होत आहेत. या पार्श्वभूमीवर शैक्षणिक धोरण यशस्वी करण्यासाठी कुशल आणि कुशाग्र मनुष्यबळाची आवश्यकता आहे. यात प्राध्यापकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

### ‘अध्यापक पदे भरावीत’

या सर्व बाबींचा विचार करता संस्थेच्या महाविद्यालयांमधील प्राचार्य, संचालक व अध्यापक पदे भरण्याची कार्यवाही करण्याबाबत यापूर्वीही कळविण्यात आले आहे. पुन्हा स्मरण करून देण्यात येत आहे. त्यामुळे संस्थेकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीचा प्रगती अहवाल ३१ डिसेंबरपूर्वी विद्यापीठाला सादर करावा, अशा सूचना विद्यापीठ प्रशासनाने शिक्षणसंस्था आणि महाविद्यालयांच्या प्रशासनाला दिल्या आहेत.

Maharashtra Times 7.12.2023

पुढारी

# लोकपाल नियुक्तीसाठी विद्यापीठांना वर्षअखेरची मुदत

पुणे : पुढारी वृत्तसेवा

विद्यापीठ अनुदान आयोग अर्थात यूजीसीकडून देशभरातील विद्यापीठांना लोकपाल नियुक्तीसाठी ३१ डिसेंबरची मुदत देण्यात आली आहे. या मुदतीत लोकपाल नियुक्ती न केल्यास नियमाचे उल्लंघन करणाऱ्या विद्यापीठांची नावे जाहीर करण्याचा इशाराही यूजीसीने दिला.

यूजीसीने यासंदर्भातील नोटीस संकेतस्थळावर जाहीर केली आहे. विद्यापीठ अनुदान आयोग (विद्यार्थी तक्रार निवारण) नियमावली २०२३ बाबतचे राजपत्र ११ एप्रिल रोजी प्रसिद्ध करण्यात आले. तसेच ३० दिवसांत लोकपाल नियुक्त करण्याची विनंती विद्यापीठांना करण्यात आली होती. त्यानंतर वारंवार स्मरणही करण्यात आले होते. विद्यापीठांनी लोकपाल नियुक्तीद्वारे विद्यार्थी तक्रार निवारण समिती स्थापनेचे पालन करणे आवश्यक आहे, असे नमूद करण्यात आले आहे. काही विद्यापीठांनी याची पूर्तता केलेली नाही. त्यामुळे त्याची गांभीर्याने दखल घेण्यात येत आहे. विद्यापीठांना आतापर्यंत पुरेशी संधी देऊन झाली आहे. त्यामुळे ३१ डिसेंबरपर्यंत लोकपाल नियुक्त करून नियमांची पूर्तता करणाऱ्या विद्यापीठांनी त्याबाबतचा अहवाल सादर करणे आवश्यक , असे स्पष्ट निर्देश यूजीसीने दिले होते.

Pune Edition
Dec 7, 2023 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

## News Paper Clippings During December 2023

## Section: Education

प्रभात

# महाविद्यालयातील रिक्त पदे तातडीने भरून अहवाल द्या

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ६ -** महाविद्यालयांमध्ये रिक्त असलेली प्राचार्य, संचालक व अध्यापकांची पदे तातडीने भरावीत. त्याचा अहवाल येत्या ३१ डिसेंबरपर्यंत सादर करण्याचे स्पष्ट आदेश सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने संलग्न महाविद्यालयांच्या संस्थांच्या अध्यक्ष आणि सचिवांना दिले आहेत.

राज्यातील सर्व विद्यापीठातील शैक्षणिक विभाग आणि स्वायत्त महाविद्यालयांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले आहेत. विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयात पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम नवीन शैक्षणिक धोरणानुसार सुरू करण्यात आले आहेत. मात्र, अनेक ठिकाणी प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांची संख्या कमी आहे. त्यामुळे ही पदे भरल्यास शिक्षण प्रक्रियेत सुसूत्रता येणार आहे.

PuneCity, 07 Dec 2023, Page:013
https://epaper.dainikprabhat.com

## *News Paper Clippings During December 2023*

### *Section: Education*

# UGC bitten by the selfie bug; youth oufits squirm

## Don't infest edu institutions with politics, say organisations

| Yashpal Sonkamble
yashpal@punemirror.com
TWEET @YashPune_Mirror

A recent order by the University Grants Commission (UGC) to all universities and colleges across the country to set up selfie points with PM Modi's image in the background at strategic locations on their campuses has been slammed by some youth organisations.

While the UGC has justified its move by saying that the intention is to raise awareness about national achievements, the protesters are calling it an attempt to use the premises of educational institutions for political gains.

The UGC has shared samples of such spots that have PM Narendra Modi's photo along with snapshots of the government's achievements in the fields of education and innovation. The selfie points are to be created following approved designs in 3D layouts shared by the Union ministry of education.

As per the order, the institutions will have to set up selfie points on themes encompassing a broad spectrum of national initiatives, such as 'Ek Bharat, Shreshth Bharat' and major thrust areas of the National Education Policy (NEP), 2020.

Akshay Jain, the chairman of




Maharashtra Youth Congress media cell, condemned the "politically motivated" initiative. "The UGC is an autonomous constitutional institution, but the ruling party at the Centre is misusing it for political gains. We respect our PM, but why do they use educational institutes for their branding and promotions?"

Jain said the government is trying to radicalise the youth of the nation. "We want jobs, and business opportunities. If they focus on basic infrastructure like world-class libraries, digital classrooms and scholarships to minority students, everyone will want to get a selfie with PM Modi. We will protest and break all such selfie points. We won't allow politicisation of educational institutes."

Sachin Pandule, the president of Youth Kranti Dal, Pune city, said the youth of the country is depressed due to unemployment, which is not allowing many, especially in rural areas, to get married. "The PM has failed to keep its promise of providing two crore jobs per year. Taking selfies will not reduce unemployment or feed people. The PM should stop such stunts. He is expected to speak on the issues of the youth, so that they don't become rebellious," he added.

According to UGC chairman M Jagadesh Kumar, the initiative has been taken to create awareness among the youth about India's excellence in areas such as space exploration, sports excellence, infrastructure development and women-led development. "Sustainable rural development, IT, digital connectivity, and much more can be exhibited through these selfie points."

Manish Ratnakar Joshi, the UGC secretary, said samples of selfie points which have Modi's photo along with snapshots of India's achievements have been shared with educational institutions. "These selfie points will not only serve as a source of pride but also enlighten every citizen about the initiatives that have propelled India's growth on the global stage. Students and visitors should be encouraged to capture and share these special moments on social media platforms, fostering a sense of collective pride."

Pune Mirror 7.12.2023

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

City | Pune Times Mirror | Thursday, December 7, 2023 | 5

# No more cut, copy, paste

## SPPU to use Drillbit to scan PhD theses of research scholars to prevent plagiarism

Yashpal Sonkamble
yashpal@punemirror.com
TWEET @YashPune_Mirror



With the advent of artificial intelligence, the technology that took the world by storm in 2023, its usage has surged in almost every field, including education and research. Even the PhD scholars could not resist its allure and started using AI to write their thesis and research papers, oblivious to the fact that this also contributes to plagiarism.

To identify plagiarised content and prevent copyright infringement, the University Grants Commission has introduced a special software – Drillbit- Extreme Plagiarism Detection Software, to cross-check theses submitted by PhD students. It has directed all universities, including the Savitribai Phule Pune University, to comply.

This is in addition to the software currently used to check papers of PhD students conducting research in the designation centres affiliated with the SPPU. The research scholars and faculty guides have welcomed the move, which they believe will contain the practice that is rapidly gaining momentum in the education sector as well.

Dr Sidharth Patil, a PhD guide and faculty said, "On the global university level, every word of the Ph.D thesis is scanned. For a thesis in English, this software will help to track plagiarism, but there is no specially-designed software for Hindi or Marathi language thesis. UGC and all universities should work on this. I welcome this decision of UGC and the university."

According to the instructions given by the SPPU vice-chancellor Suresh Gosavi to the heads of the various departments of the university, and directors of the research centres, while accepting the PhD thesis, the literature review report is collected from the students along with their thesis. As this process is prescribed by the University Grants Commission, all research students must follow it. Previously, the PhD research theses were checked in two software – Turnitin and Urkund, and their reports were submitted along with the thesis.

A login was provided to the research mentors through the university to process the relevant thesis inspection. But as a part of the 'Shodh Shuddhi' initiative by the Union government, 'Drillbit' has been introduced from November 1, 2023, under the INFLIBNET project.

Accordingly, the research mentors should check theses through the software 'Turnitin' and submit the bibliography report. The research guides of the attached research centre will then check the papers with Drillbit and submit a plagiarism report.

It has been clarified that while checking the literature report, the research guides should check through their login, and present the report in front of the DAIP committee (Departmental Academic Integrity Panel) of the research centre, and send it to the university with the signatures of all the members.

Milind Shinde, a PhD researcher in sociology said, "Synopsis of primary draft and final thesis must be scanned by specially designed software as followed by universities globally. All citations, field reports, reviews of literature, references, research articles for journal publication, critical reading, bibliography and personal opinions are always scrutinised. We welcome the decision. The guide is a key person in the process. We have to submit our research presentation before the Research Advisory Committee every six months."




Pune Mirror 7.12.2023

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

लोकमत

स्पष्टता नसल्याने अधिकारी संभ्रमात

# नवीन धोरणातील क्रेडिट आराखड्याबाबत परीक्षा विभाग प्रमुखांसमोर प्रश्नांचे डोंगर

प्रशांत बिडवे
लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** नवीन शैक्षणिक धोरणानुसार पदवी आणि पदव्युत्तर पदवीसाठी विषय, क्रेडिट आराखडा तयार झाला असून, अभ्यासक्रम विकसित केला जात आहे. केंद्रीय अकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिट्स म्हणजेच एबीसीची निर्मिती करण्यात आली आहे. मात्र, नवीन धोरणानुसार विद्यार्थ्यांचे मूल्यमापन कसे करावे? गुणपत्रिकेचे स्वरूप कसे असेल? विषयाचे कोड काय असावेत? परीक्षा पद्धती कशी असेल? याबाबत स्पष्टता नसल्याने विद्यापीठ, स्वायत्त महाविद्यालयांतील परीक्षा विभागातील अधिकाऱ्यांसमोरच विविध प्रश्न निर्माण झाले आहेत.

एनईपीनुसार विद्यार्थ्यांना बहुशाखीय शिक्षणाची संधी दिली जाणार आहे. त्यामुळे महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यास



**एनईपी धोरण ठरले, अंमलबजावणीत अडथळे**

**भाग : ३**

अभ्यासक्रमाचे 'क्रेडिट पॉइंट्स' एका शैक्षणिक संस्थेतून दुसऱ्या संस्थेत ट्रान्स्फर होणे गरजेचे आहे. केंद्र सरकारने अकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिट्सचे पोर्टल सुरू केले आहे. त्यामुळे एबीसीची राज्यातील विद्यापीठांमधील परीक्षा विभागांशी सांगड घालणे गरजेचे आहे. एबीसीकडे नोंदविले गेलेले क्रेडिट विद्यापीठाने प्रमाणित करून ते महाविद्यालयांकडे पाठविण्याची यंत्रणाही विकसित करावी लागणार आहे. एनईपीनुसार त्यामुळे श्रेयांक पत्रकांत काय बदल केले पाहिजेत याबद्दल अद्याप काहीच सूचना देण्यात आल्या नाहीत.

नवीन शैक्षणिक धोरणाची संकल्पना, अंमलबजावणीची पद्धत तसेच या धोरणाचे शिक्षण क्षेत्रावर नेमके काय परिणाम होतील? याबाबत राज्यातील विद्यापीठे, महाविद्यालयाच्या परीक्षा विभागातील अधिकाऱ्यांचे उद्बोधन शिबिर घेतली पाहिजेत. स्वायत्त महाविद्यालयांत गुणांबाबत एकसूत्रता दिसून येत नाही. काही महाविद्यालयांत ५०-५० तसेच ६०-३० तर कोठे ७०-३० यानुसार गुण दिले जात आहेत. तसेच विद्यापीठांच्या परीक्षा विभागाला विद्यार्थ्यांचा डाटा संरक्षित ठेवण्यासाठी कुशल मनुष्यबळ पुरविण्यासह संगणक सॉफ्टवेअर, हार्डवेअर अपडेट करणेही नितांत आवश्यक आहे.

## परीक्षा विभागप्रमुखांशी चर्चाच नाही

राज्यातील अकृषी विद्यापीठे आणि स्वायत्त महाविद्यालयांत एनईपी अंमलबजावणीला सुरुवात झाली आहे. येत्या शैक्षणिक वर्षापासून सर्व उच्चशिक्षण संस्थांमध्ये एनईपी लागू करण्यात येणार आहे. त्या पार्श्वभूमीवर एनईपी सुकाणू समितीने अद्याप विद्यापीठे तसेच परीक्षा विभाग प्रमुखांना विचारविनिमय किंवा चर्चेसाठी बोलावले नसल्याची माहिती समोर येत आहे.

Pune Main
Page No. 2 Dec 08, 2023
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*



# शुल्क भरा; अन्यथा परीक्षा नाही

## 'यूजीसी', 'एआयसीटीई'च्या सूचनेला महाविद्यालयांची तिलांजली; विद्यापीठ बघ्याच्या भूमिकेत

म. टा. प्रतिनिधी, पुणे

शुल्क भरले नाही; म्हणून विद्यार्थ्याला परीक्षा देण्यापासून वंचित ठेवता येणार नाही, अशा सूचना विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) दिल्यानंतरही पुणे शहरातील काही मुजोर महाविद्यालयांकडून विद्यार्थ्यांना शुल्क भरा; अन्यथा परीक्षेला बसू देणार नाही, अशी धमकी दिली जात आहे. हे प्रकार सातत्याने घडत असल्याने, या मुजोर महाविद्यालयांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ धडा शिकवणार का, अशी विचारणा होत आहे.

पुणे विद्यापीठाच्या काही अभ्यासक्रमांच्या सत्र परीक्षांना सुरुवात झाली आहे, तर उशिराने प्रवेश झालेल्या अभ्यासक्रमांची परीक्षा सुरू होत आहे. महाविद्यालयांचे वाढते शुल्क लक्षात घेता हे शुल्क भरण्यासाठी टप्पे दिले जातात. विद्यार्थ्यांनी प्रवेश घेताना काही शुल्क भरलेले असते, प्रथम सत्र संपण्यापूर्वी काही शुल्क भरणे अपेक्षित असते. मात्र, हे शुल्क भरण्यात थोडा उशीर झाल्यास, विद्यार्थ्यांना थेट परीक्षेला बसू देणार नाही, अशी धमकी देण्यात येत आहे. परीक्षा देता येणार नाही, या विचारामुळे विद्यार्थी ऐन परीक्षा कालावधीत व्यथित होत असून, मानसिक तणावाखाली येत आहेत.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (एआयसीटीई) आणि विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) शुल्क भरले नाही; म्हणून विद्यार्थ्याला परीक्षेपासून वंचित ठेवता येणार नाही, अशा स्पष्ट सूचना परिपत्रकाद्वारे दिल्या आहेत. या दोन्ही संस्थांकडून संबंधित महाविद्यालयांवर कोणतीही कारवाई होत नाही. पुणे विद्यापीठाकडून कोणतीही विचारणा किंवा दंडात्मक कारवाई होत नाही. त्यामुळे या महाविद्यालयांकडून विद्यार्थ्यांना उघड धमक्या दिल्या जात आहे. महाविद्यालयाची तक्रार केल्यास, आपल्यावर त्याचा सूड उगवला जाईल, अशी भीती विद्यार्थ्यांना असते. त्यामुळे ते तक्रार करीत नाहीत. अशा वेळी विद्यापीठाने संबंधित महाविद्यालयांना सक्त सूचना देणे अपेक्षित आहे. मात्र, असे कोणतेही पाऊल विद्यापीठाकडून उचलले जात नसल्याचे चित्र आहे. याचाच फायदा उचलून महाविद्यालयांकडून मनमानी कारभार करण्यात येत आहे.

### महाविद्यालयांनी थकवलेल्या शुल्काचे काय?

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न स्वायत्त महाविद्यालयांनी विद्यापीठाचे संलग्नता शुल्क थकवले आहे. ही रक्कम कोट्यवधी रुपयांच्या घरात आहे. संबंधित महाविद्यालये शुल्क भरण्यास टाळाटाळ करीत आहेत. अशा वेळी या महाविद्यालयांवर कारवाई करू, असा निर्णय विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने घेतला आहे. त्यामुळे या महाविद्यालयांवर कधी कारवाई होते, हे पाहावे लागेल.

### शैक्षणिक वर्ष वाया जाण्याची भीती

पुणे शहरातील एका प्रतिष्ठित शिक्षण संस्थेच्या एमबीए, पीजीडीएम, इंजिनीअरिंग अशा अभ्यासक्रमांची महाविद्यालये आहेत. या महाविद्यालयांचे शुल्क जादा असल्याने, विद्यार्थ्यांना एकाच वेळी भरणे शक्य होत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांनी शुल्क भरण्यासाठी टप्पे आखून दिले जातात. मात्र, या टप्प्यानुसार शुल्क भरण्यास थोडासाही उशीर झाल्यास, त्याला थेट परीक्षेला बसून देण्याची धमकी दिली जात आहे. हे प्रकार वेळीच न थांबल्यास, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाण्याची शक्यता आहे. या संपूर्ण प्रकारचा विद्यार्थ्यांच्या मानसिकतेवरही परिणाम होत आहे.

Maharashtra Times 9.12.2023

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

# Rainbow of literacy hope for them

## State announces free higher education for transgender students in universities, affiliate colleges

Yashpal Sonkamble
yashpal@punemirror.com

TWEET @YashPune_Mirror

Education plays a crucial role in empowering individuals, and its significance is particularly pronounced for transgender students. In a significant development that can go a long way in fostering their inclusivity in society, the state government has announced to provide transgender students with free higher education in state universities and colleges.

In a recent state-level meeting of vice-chancellors of non-agricultural universities, higher and technical education minister Chandrakant Patil said that all state universities will be required to bear the educational costs for transgender students studying in the university and its affiliated colleges. The meeting, which was held at Dr Homi Bhabha State University in Mumbai, discussed the implementation of the new National Education Policy (NEP).

The announcement has been met with enthusiasm and appreciation from transgender activists and aspiring students.

The meeting was attended by principal secretary (higher and technical education) Vikas Chandra Rastogi, State Teacher Development Institute executive director Nipun Vinayak, deputy secretary (higher and technical education) Ajit Baviskar, director (higher education) Shailendra Devlankar, director (technical education) Vinod Mohitkar, joint director (higher education) Prakash Bachhav and NEP 2020 steering committee chairman Nitin Karamalkar.



The announcement has been met with enthusiasm from transgender students. FILE PHOTO

Patil said, "Universities have been directed to bear the entire educational expenses of transgender students enrolled in the university and its affiliated colleges from their funds. The decision, which has been endorsed by all vice-chancellors, was taken to facilitate effective implementation of the NEP."

He said, "The state government intends to develop a comprehensive policy to ensure the inclusion of transgender students in the education system. Universities should address specific challenges faced by transgender students, such as inadequate infrastructure, absence of separate restrooms, lack of sensitivity among fellow students and incidents like bullying. Varsities must treat these challenges seriously and take appropriate measures."

Chandani, a transgender student, described the state government's decision as a welcome development that will help members of their community to pursue our education. "The decision will pave the way for transgender individuals to realise their dreams of attaining higher education. In the class X and XII examinations last year, we got a special gender status alongside males and females. Now, the state government is going to open doors of higher education," Chandani added.

Sheetal, a transgender rights activist, said, "We welcome the step taken by the higher and technical education ministry. Hundreds of transgender students get thrown out of mainstream education due to physical and mental harassment. Some of our family members were denied higher education due to social taboos and harassment."

"Owing to inadequate education, a large number of the transgender community fail to secure employment. Sadly, this is the sorry state of affairs after 75 years of Independence. We are still deprived of our constitutional rights to education and a respectable livelihood. However, with this decision, a new ray of hope is emerging. Several transgender students will be able to complete their higher education. We appeal to the members of the male-dominated society to accept our identity as transgender," said Sheetal.

Pune Mirror 8.12.2023

# News Paper Clippings During December 2023

## Section: Education

**पुढारी**

# दहावी-बारावीचे वेळापत्रक 'सीआयएससीई'कडून जाहीर

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

कौन्सिल फॉर द इंडियन स्कूल सर्टिफिकेट एक्झामिनेशन अर्थात सीआयएससीई बोर्डाच्या दहावी-बारावीच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहेत. विद्यार्थी मंडळाच्या cisce.org या संकेतस्थळावरून वेळापत्रक डाउनलोड करू शकतात. सीआयएससीई बोर्डाच्या दहावीच्या परीक्षा २१ फेब्रुवारीपासून, तर बारावीच्या परीक्षा १२ फेब्रुवारीपासून सुरू होणार आहेत.

वेळापत्रकानुसार दहावीच्या परीक्षा २१ फेब्रुवारीला सुरू होणार असून, २८ मार्चपर्यंत चालणार आहे. शेवटचा कला विषयाचा पेपर सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत असेल, तर इतर विषयांसाठी सकाळी ११ वाजल्यापासून दुपारी १ वाजेपर्यंत परीक्षा होईल. कला विषयाच्या पेपरचा कालावधी ३ तास आणि इतर विषयांचा कालावधी २ तासांचा असेल.

**बारावीच्या परीक्षा १२ फेब्रुवारीपासून**

बारावीच्या परीक्षा १२ फेब्रुवारीपासून सुरू होतील आणि ३ एप्रिल २०२४ रोजी संपतील. परीक्षा सर्व दिवस दुपारी २ वाजता सुरू होईल आणि परीक्षेचा कालावधी ३ तासांचा असेल. परीक्षेचा निकाल मे २०२४ मध्ये घोषित केला जाणार असल्याचे मंडळाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

Pune Edition
Dec 9, 2023 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

**प्रभात**

# पुणे पुस्तक महोत्सवात होणार चार विश्वविक्रम

**प्रभात वृत्तसेवा**

पुणे, दि. ८ - 'राष्ट्रीय पुस्तक न्यासा'च्या वतीने फर्गसन महाविद्यालयाच्या मैदानावर १६ ते २४ डिसेंबर या कालावधीत 'पुणे पुस्तक महोत्सव होत आहे. यात चार विश्वविक्रम प्रस्थापित केले जातील, अशी माहिती महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे यांनी दिली.

पुण्याची वाचन संस्कृती जगात नेण्यासाठी या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, त्यांची नोंद 'गिनिज वर्ल्ड रेकॉर्ड'मध्ये व्हावी यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. युनेस्कोच्या निकषांनुसार जागतिक पुस्तकांची राजधानी बनण्याची क्षमता पुणे शहरात आहे. त्या दृष्टीने प्रयत्न करण्याच्या उद्देशाने या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याचे राजेश पांडे यांनी सांगितले.

Book Your Visit...
पुणे पुस्तक महोत्सव

### असे असतील उपक्रम

१. जास्तीत जास्त पालकांनी आपल्या मुलांना एकाच वेळी वाचन करून दाखविण्याचा उपक्रम दिनांक १४ डिसेंबर रोजी सकाळी आठ वाजता स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर केला जाणार आहे. पुणे मनपाच्या सहकार्याने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

२. जास्तीत जास्त पुस्तकांनी तयार केलेला शब्द हा विक्रम १५ डिसेंबर रोजी फर्गसन महाविद्यालयात करण्यात येणार आहे. 'भारत' या शब्दात अधिकाधिक पुस्तकांची रचना केली जाणार आहे.

३. 'जयतू भारत' या वाक्यात जास्तीत जास्त पुस्तकांचा समावेश असेल. हा तिसरा विक्रम १६ डिसेंबर रोजी प्रस्थापित केला जाईल.

४. अधिकाधिक लोकांनी मोठ्याने वाचन करण्याच्या व्हिडिओ अल्बमचा विश्वविक्रम २१ डिसेंबर रोजी केला जाईल.

PuneCity, 09 Dec 2023, Page:013
https://epaper.dainikprabhat.com

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

पुढारी

# ‘पुणे पुस्तक महोत्सवा’त होणार चार विश्वविक्रम

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

‘राष्ट्रीय पुस्तक न्यासा’च्या वतीने फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर १६ ते २४ डिसेंबर या कालावधीत होणाऱ्या ‘पुणे पुस्तक महोत्सवा’त चार विश्वविक्रम प्रस्थापित केले जातील, अशी माहिती संयोजक राजेश पांडे यांनी दिली.

पांडे म्हणाले, पुण्याची वाचनसंस्कृती जगात नेण्यासाठी या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, त्यांची नोंद ‘गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड’मध्ये व्हावी यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. जास्तीत जास्त पालकांनी आपल्या मुलांना एकाच वेळी वाचन करून दाखविण्याचा उपक्रम दि. १४ डिसेंबर रोजी सकाळी आठ वाजता स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर केला जाणार आहे. पुणे महापालिकेच्या सहकार्याने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. जास्तीत जास्त पुस्तकांनी तयार



केलेला शब्द हा विक्रम १५ डिसेंबर रोजी फर्ग्युसन महाविद्यालयात करण्यात येणार आहे. ‘भारत’ या शब्दात अधिकाधिक पुस्तकांची रचना केली जाणार आहे. ‘जयतू भारत’ या वाक्यात जास्तीत जास्त पुस्तकांचा समावेश असेल. हा तिसरा विक्रम १६ डिसेंबर रोजी प्रस्थापित केला जाईल. अधिकाधिक लोकांनी मोठ्याने वाचन करण्याच्या व्हिडिओ अल्बमचा विश्वविक्रम २१ डिसेंबर रोजी केला जाईल. युनेस्कोच्या निकषांनुसार जागतिक पुस्तकांची राजधानी बनण्याची क्षमता पुणे शहरात आहे. त्या दृष्टीने प्रयत्न करण्याच्या उद्देशाने या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याचे पांडे यांनी सांगितले.

My Pune Edition
Dec 9, 2023 Page No. 6
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

लोकमत

# परदेशातील पुस्तकांचे डम्पिंग ग्राऊंड

**रेश्मा शिवडेकर**
विशेष प्रतिनिधी

परदेशात प्रत्येक गोष्टीसाठी पैसे मोजावे लागतात, तसे ते दारातील रद्दी उचलण्यासाठीही द्यावे लागतात. मग ही रद्दी वर्तमानपत्रांची असो वा वाचून झालेल्या बिनकामाच्या पुस्तकांची. परदेशात घराघरांतून नव्हे तर प्रकाशन संस्था, छापखाने, ग्रंथालये, शाळा, महाविद्यालये अशा अनेक ठिकाणांहून जमा होणाऱ्या रद्दीसाठी भारत ही डम्पिंग ग्राऊंड आहे. हीच रद्दी नंतर किलो किलोंच्या भावाने किंवा ५० ते ७० टक्के सवलतीत भारतीयांना उपलब्ध होते आणि आपल्या दिवाणखान्याची शोभा वाढविते.

यात जसा डॅन ब्राऊन, पाउलो कोएलो असतो, तसा युवाल नोआ हरारी, चेतन भगतही असतो. कुठलाही लेखक, विषय भारतीय क्षेपणभूमीला व्यर्ज नाही. फक्त ते 'बेस्टसेलर' असले पाहिजे. आपल्याकडे मुंबई-पुणे एक्स्प्रेस हायवेवरील पुस्तकांच्या प्रदर्शन आणि विक्रीच्या व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये जी पुस्तके दिसतात ती याच प्रकारची.

किलोच्या भावाने वा ५० ते ७० टक्के सवलतीत उपलब्ध असलेली अशी पुस्तकांची प्रदर्शने शहरात अनेक ठिकाणी भरत असतात. रस्त्याच्या कडेला वा रेल्वेच्या पुलावर पथारीवर पसरूनही ती विकली जातात. एखादे बेस्टसेलर पुस्तक इतक्या कमी किमतीत विकणे कसे परवडते, असा प्रश्न सामान्यांना पडतो. त्यात पुस्तकावरील किमती डॉलर वा युरोमध्ये. कुठून येतात ही पुस्तके?

'साहित्यजत्रा'च्या माध्यमातून पुस्तक प्रदर्शन आणि विक्री करणारे शैलेश वाजा यांनी दिलेल्या माहितीनुसार ही सगळी परदेशातील रद्दी आहे. तिथे रद्दी म्हणून टाकून दिलेली ही पुस्तके कंटेनर भरभरून भारतात येतात. तसेच एखाद्या पुस्तकाच्या प्रती किती काळ ठेवायच्या हे प्रकाशकांचे गणित निश्चित असते. हा काळ संपला की, ही पुस्तके अतिशय स्वस्तात वा चक्क रद्दीत विकली जातात. भारतात काही ठरावीक विक्रेते ठोक पद्धतीने ही पुस्तके विकत घेतात. त्यांच्या विषयवार विभागणी करतात आणि तेथून ती भारतभर विक्रीला पाठविली जातात. भारतात २००० पासून पुस्तकांचा हा बाजार बहरू लागला आहे.

मनोविकास प्रकाशनाचे अरविंद पाटकर सांगतात त्याप्रमाणे यात पायरेटेड पुस्तकेही असतात. छपाईचे तंत्र इतके विकसित झाले आहे की, यातील बनावट प्रति ओळखूनही येत नाहीत.

अशा प्रदर्शनांमध्ये म्हणूनच मराठी प्रकाशकांची पुस्तके अभावानेच आढळून येतील. कारण इतक्या स्वस्तात पुस्तके विकणे प्रकाशकांना परवडत नाही. त्यामुळे या पुस्तकांवर फार तर ५ ते १० टक्क्यांची सवलत देता येते, असे वाजा यांनी सांगितले.



## ५०,०००
### पुस्तकांचे एक कंटेनर

एका कंटेनरमध्ये ५० हजार पुस्तके असतात. यातील विक्रीमूल्य असलेली पुस्तके निवडून ती वेगळी केली जातात. इतर चक्क रद्दीत काढली जातात. त्यासाठीची यंत्रणा संबंधित व्यापाऱ्यांकडे असावी लागते. भारतात डॅन ब्राऊनसारखे लोकप्रिय परदेशी लेखक, लहान मुलांची पुस्तके हातोहात खपतात. एका कंटेनरमागे विक्रेत्याला ५ ते १० टक्के नफा निश्चतपणे होतो. भिवंडीला या पुस्तकांची अनेक गोडाऊन आहेत.

### पुस्तके येतात कुठून ?

- घराघरांतून बिनकामाची, रद्दी म्हणून टाकून दिलेली
- **शाळा, महाविद्यालये, ग्रंथालयातील नको असलेली पुस्तके**
- छापखान्यातील अतिरिक्त पुस्तके सुधारित आवृत्तीमुळे प्रकाशकांकडील राहिलेली जुन्या आवृत्तीची पुस्तके. मागणीच नसलेली, शेल लाईफ संपलेली अशी पुस्तके.

**ही पुस्तके मोठ्या प्रदर्शनात किलोने वा सवलतीत विकली तरच हातोहात खपतात आणि त्यातून नफा मिळविता येतो. पुस्तके स्वस्तात उपलब्ध असल्याने ग्राहक गरज असो वा नसो भरभरून खरेदी करतात.**

Pune Main
Page No. 6 Dec 10, 2023
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

लोकमत

# शांतता! पुणेकर वाचत आहेत...

**राजेश पांडे**
संयोजक, पुणे पुस्तक महोत्सव

महाराष्ट्राच्या साहित्य आणि सांस्कृतिक इतिहासाला प्रदीर्घ परंपरा आहे. या परंपरेचे धागे हजारो साहित्यिक, कलाकार आणि मुख्य म्हणजे महाराष्ट्राच्या जनतेने समृद्ध केले. या समृद्ध परंपरेला पुढे नेण्याचे मोठे कार्य १६ ते २४ डिसेंबर २०२३ या काळात पुण्यात होणार आहे. नॅशनल बुक ट्रस्ट (एनबीटी) यांच्यावतीने राष्ट्रीय पातळीवरचा पुणे पुस्तक महोत्सव १६ डिसेंबरपासून पुण्यात सुरू होणार आहे. 'एनबीटी'ची भारतीय भाषांमधील शेकडो पुस्तके प्रदर्शनात असतीलच; याशिवाय महाराष्ट्रातील पुस्तक प्रकाशक त्यांच्या पुस्तकांना घेऊन पुण्यात येत आहेत. केवळ प्रदर्शनापुरता हा उपक्रम मर्यादित नसून सांस्कृतिक कार्यक्रम, चर्चासत्रे, सृजनशीलतेला चालना देणारे, वाचनसंस्कृतीचा विकास घडविणारे कार्यक्रम, प्रख्यात लेखकांच्या मुलाखती अशा अनेक अंगांनी हा महोत्सव साजरा होत आहे.

लोकसहभाग हे या महोत्सवाचे अंगभूत वेगळेपण आहे. अनेक शिक्षण संस्था, नागरी संघटना, स्थानिक स्वराज संस्था यांच्यासह खासगी क्षेत्र आणि हजारो नागरिक महोत्सवात सहभागी होत आहेत. पुणे पुस्तक महोत्सव महाराष्ट्राच्या साहित्य-सांस्कृतिक परंपरेतील महत्त्वपूर्ण घटना ठरणार आहे. पुणे पुस्तक महोत्सवातील लोकसहभागासाठी आखलेल्या उपक्रमांचे स्वरूप अभिनव आहे. पुण्यात होत असलेल्या अभिनव उपक्रमांमध्ये 'शांतता, पुणेकर वाचत आहेत,' हा ऐतिहासिक ठरेल. १४ डिसेंबरला दुपारी बारा ते एक या वेळेत हा उपक्रम आहे. या दिवशी, तासभर सारे पुणे वाचणार आहे. जिथे असाल तिथे एक तास तुमच्या आवडीच्या पुस्तकाचे वाचन करायचे, असे आवाहन पुणेकरांना केले आहे. ज्यांना अजून वाचता येत नाही अशा लहान मुलांना त्यांचे पालक त्याच दिवशी सकाळी आठ वाजता स. प. महाविद्यालयात गोष्ट सांगतील.



Book Your Visit
पुणे पुस्तक महोत्सव

एकाच वेळी पाच हजार पालकांचा सहभाग यात असणार आहे. दुपारी एका तासात एकाच वेळी शहराच्या वेगवेगळ्या भागांमध्ये -चौकांपासून कॅफेपर्यंत आणि शाळा-महाविद्यालयांपासून कार्यालयांपर्यंत, रिक्षा थांब्यापासून ते मेट्रो स्थानकांमध्ये अशा हजारो ठिकाणी लाखो पुणेकर वाचन करतील. जवळपास पाच हजार संस्था, संघटना आणि प्रभावशाली व्यक्ती या उपक्रमाच्या रूपाने एक विश्वविक्रम घडवतील. पुण्यातील ऐतिहासिक, वारसा असलेल्या अशा तीस ठिकाणांहून १५ डिसेंबरला ज्ञानसरिता दिंड्या निघतील. महापुरुषांच्या आणि साहित्यिकांच्या विचारांची प्रेरणा या दिंड्या देतील. महाराष्ट्र, देश घडविणारी महान व्यक्तिमत्त्वे पुण्याने दिली. या व्यक्तिमत्त्वांची निवासस्थाने, कर्तृत्वाची ठिकाणे पुण्यात आहेत. दिंड्या या स्थानापासून सुरू होत, फर्ग्युसन कॉलेज येथे पोहोचतील. हजारो पुस्तकांच्या साह्याने एक शब्द आणि जयतु भारत हे वाक्य 'लिहिण्याचा' उपक्रमही आयोजित केला आहे. पुणे पुस्तक महोत्सवात अधिकाधिक लोकांचा सहभाग असावा आणि त्यातून वाचनसंस्कृती वाढीस लागावी, हा एकमेव हेतू या साऱ्या उपक्रमांमागे आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि पुणे महापालिकेने पुणे पुस्तक महोत्सवात नॅशनल बुक ट्रस्टच्या बरोबरीने भाग घेतला आहे. त्यामुळेच, हा महोत्सव एरव्हीच्या पुस्तक प्रदर्शनांपेक्षा वेगळा ठरतो आहे. या महोत्सवाच्या निमित्ताने देशभरातील अनेक दिग्गज लेखकांना ऐकण्याची, त्यांच्याशी संवाद साधण्याची संधी मिळणार आहे. या महोत्सवाच्या बरोबरीनेच महाराष्ट्राला पहिली 'पुस्तकांची जागतिक राजधानी' मिळण्याची शक्यता खूप आहे. या शक्यतेला वास्तवाची जाणीव करून देण्याचे काम महोत्सवातील लोकसहभागातून होईल, अशी अपेक्षा आहे. 'युनेस्को' दरवर्षी जगातील एका शहराची निवड 'पुस्तकांची जागतिक राजधानी' म्हणून करते. पुणे पुस्तक महोत्सव जागतिक राजधानीच्या दृष्टीने पहिले पाऊल ठरणार आहे.

Pune Main
Page No. 6 Dec 10, 2023
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

# वेगळ्या जगासाठीचा पूल

**गीतांजली कुलकर्णी**

माझा वाचनाचा प्रवास जरा उशिरानंच सुरू झाला. मी आधी वाचायचे, पण ते नियमित नव्हतं. लहानपणी मासिकं वाचणं व्हायचं. 'किशोर', 'चंपक', 'टार्गेट' (इंग्रजी) ही मासिकं माझ्या बालपणाचा भाग होती. मी लहान असताना रोज नित्यनेमाने वृत्तपत्र वाचायचे, कॉलेजमध्ये असताना प्रेमकथा वाचायचे. त्या वयात त्याचं वेड असायचं. त्याच्यातून काही सकस मिळत नसे, हे माहिती होतं; तरीही ते वाचताना मजा यायची. शिवाय, तेव्हा थरारकथा वाचायची चटकच लागली होती म्हणा. सिडने शेल्डनची 'ब्लडलाइन' नावाची कादंबरी दोन-तीनदा वाचली असावी. इतिहास हा आवडीचा विषय होता. त्यासाठी संदर्भग्रंथांचंच वाचन व्हायचं. माझ्या वाचनाच्या प्रवासाला खरी गती मिळाली ती 'नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा'मध्ये (एनएसडी) दाखल झाल्यानंतर.

मी 'एनएसडी'त गेल्यावर मॅक्सिम गॉर्कीचं 'माय चाइल्डहूड' हे पुस्तक वाचून काढलं होतं. त्या पुस्तकाचा माझ्यावर जबरदस्त प्रभाव पडला होता. तेव्हापासून मला आत्मचरित्र वाचायची आवड निर्माण झाली. विजय तेंडुलकर, सतीश आळेकर, महेश एलकुंचवार, मोहन राकेश, गिरीश कार्नाड यांची नाटकं वाचून काढली. शेक्सपिअर, चेकॉव्ह, इस्बेन, ब्रेख्त, बेकेट यांच्या नाटकांचा प्रभाव पडला. चित्रकला आणि त्याचा इतिहास हा विषय पहिल्यांदाच कळल्यावर, व्हॅन गॉगवरील माधुरी पुरंदरे यांनी अनुवादित केलेलं पुस्तक वाचलं. विठाबाई नारायणगावकर यांचं चरित्र, अनुताई वाघ यांनी लिहिलेलं 'कोसबाडच्या टेकडीवरून' ही सुद्धा अत्यंत आवडलेली पुस्तकं. 'एनएसडी'मधून शिक्षण घेऊन आल्यानंतर परेश मोकाशीमुळे मी वेगवेगळ्या प्रकारची पुस्तकं वाचण्यात रमू लागले. त्याच्याचमुळे 'तुंबाडचे खोत'चे तिन्ही खंड, 'भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास' हे वि. का. राजवाडे यांचं पुस्तक असं बरंच काही वाचलं. महाभारत, रामायण यासारख्या महाकाव्यांकडे, त्यातल्या कथांकडे एका वेगळ्या दृष्टिकोनातून पाहायला लागले. इथे एक सांगते... माझा वाचनाचा वेग कमी आहे. माझी आई खूप आणि झटपट वाचते!

मी सध्या 'भुरा' या शरद बावीस्करांच्या पुस्तकाची चाहती झालेय. समीना दलवाई, वसीम मणेर, भूषण कोरगावकर या लेखक मित्र-मैत्रिणींची पुस्तकं वाचली. ही पुस्तकं वेगळी भाषा, वेगळी विश्वं समोर ठेवतात. ती आपल्याला वेगळ्या काळात पोहोचवतात. तिथपर्यंत पोहोचवणारा तो एक पूलच आहे.

माझं वाचन समृद्ध झालं ते नाटकांमुळे. क्वेस्टमध्ये असताना 'गोष्टरंग' नावाचा प्रोजेक्ट करायचे. त्यामुळे लहान मुलांमध्ये वाचन-लेखन वाढवण्यासाठी नाटकाचा कसा वापर केला जाऊ शकतो, याची कल्पना आली. याच पार्श्वभूमीवर माझ्या गावात 'तारपा किताबघर' हा ग्रंथालय उभारण्याचा प्रोजेक्ट अतुल गायकवाड आणि मुक्ता नेरवेकर यांच्या 'बिलीफ' या संस्थेसोबत हाती घेतला आहे. याद्वारे गावातील मुलं या ग्रंथालयात येऊन वाचतील. एक महत्त्वाची गोष्ट... फक्त पुस्तकच नव्हे; चित्रंही वाचता येतात. आणि माणसंसुद्धा वाचावी लागतात. आता 'ह्युमन लायब्ररीज'सुद्धा आहेत. हे सगळं मला माझ्या गावात आणायचं आहे. माझ्या गावातील 'ॲक्टिव्ह प्रोग्राम लायब्ररी'मधील उपक्रमामुळे मुलं पुस्तक वाचून नाटुकली सादर करतील, प्रदर्शन भरवतील, पोस्टर्स करतील, गोष्ट लिहितील.

वाचन तुम्हाला माणूस म्हणून सर्वोच्च पातळीवर नेऊन ठेवू शकतं, असं मला वाटतं. म्हणूनच माझ्यासाठी त्याचं महत्त्व अनन्यसाधारण आहे.

**(लेखिका प्रख्यात अभिनेत्री आहेत.)**



**#वाचालतरचवाचाल**

**#Thepowerofreading**

**नवीन पिढी वाचनाकडे आकृष्ट व्हावी यासाठी 'महाराष्ट्र टाइम्स'तर्फे आगळा उपक्रम.**



# वाचक अव्यक्त कलावंतच

**सुधाकर गायधनी**

वाचनाची ओढ ओसरत आहे, वाचन संस्कृती लोक पावत आहे, असा सूर अलीकडे लावला जात आहे. विशेषतः साहित्यविश्वात हे अधिकच जाणवत आहे; पण हे पूर्णतः बरोबर नाही. काय वाचावे आणि काय पुन्हा पुन्हा वाचावे यासाठी वाचक आजही सिद्ध आहे. आज बहुविध माध्यमे उपलब्ध आहेत. टीव्ही, वृत्तपत्रे, सोशल मीडिया, सिनेमा, इत्यादी. मग लेखकांच्या पुस्तकांचे काय? पण लेखक तरी अन्य लेखकांची पुस्तके मनःपूर्वक वाचतात काय? कवी दुसऱ्या कवीच्या कविता किती आस्थेने वाचतो, हे सारे प्रश्न आज का निर्माण होतात? कारण, साहित्यिकच इतर साहित्यिकांची दर्जेदार पुस्तके वाचायला हवी तशी सवड काढू शकत नाहीत. कारण आजची गतिमान जीवनशैली. सामान्यतः सामान्य वाचक मात्र त्याला हवी असलेली पुस्तके वाचनालयात जाऊन आजही आस्थेने वाचत आहे. शाळा-महाविद्यालयामधील अध्यापक-प्राध्यापक मराठी विषय वा मराठी साहित्य शिकविताना रसपूर्णतेने अभिरुचीची मशागत करीत विद्यार्थ्यांना शिकवत असेल, तर त्यांच्यातही श्रवणाची रुची निर्माण होऊन ती अभिरुचीत बदलेल.

एक मुद्दा असा आहे की, साहित्यिक हा अभिव्यक्त कलावंत आहे, तर त्याचा प्रामाणिक वाचक-रसिक हा अव्यक्त कलावंत आहे. म्हणून साहित्यिकांनी आपल्या वाचकाशी सन्मानानेच वागले पाहिजे. साहित्यनिर्मिती ही दैवी देणगी नसून, ती प्रयत्नसाध्य सिद्धी आहे. कारण प्रतिभा बीजरूपात प्रत्येकाला निर्मात्याने दिलेली आहे. त्या बीजाची नीट मशागत जो करील, त्याला फळे प्राप्त होतील. लेखक-कवी वा शास्त्रज्ञ-तत्त्वज्ञ कुणीही होऊ शकतो; पण तो त्याच्यातील प्रतिभा बीजाची नीट मशागत करून प्रयत्न-साधना करील तरच. वाचन हीसुद्धा अभिरुचीचे संवर्धन करणारी एक कलाच आहे. कसदार वाचकांमुळेच साहित्यनिर्मिती सकस होत असते. दर्जेदार वाङ्मयकृतीला दर्जेदार वाचक मिळणे ही बाब कुठल्याही पुरस्कारापेक्षा मोलाची आहे; कारण वाचकांनी दिलेल्या पसंतीच्या पावतीमुळेच साहित्यिक युगे युगे जगत असतो.

जे साहित्य वाचकाला नवप्रत्ययाचा आनंद देते, ते साहित्य वाचक उराशी घेतो. मग त्या कथा-कादंबऱ्या, तात्त्विक ग्रंथ वा कविता असोत. आज पुस्तके महागडी झाली आहेत. सर्वसाधारण वाचक विकत घेऊन वाचायला आर्थिक गणितात बसते का याचा आधी विचार करतो. प्रकाशकांचाही एकूण लागणारा खर्च जोडून पुस्तकांच्या किमती ठरव्याव्या लागतात. यासाठी शासन अथवा गाव संस्थांकडून 'गावालय तेथे वाचनालय' अशी चळवळ राबवायला हवी.

'ॲकॅडमिक' पद्धतीचे वाचन आणि 'क्रिएटिव्ह' पद्धतीचे वाचन यात अंतर आहे. 'ॲकॅडमिक' वाचनधुंदी वाचकाला महापंडित वा थोर साहित्यिक म्हणून घडवेलच असे नाही. फार तर तो संदर्भसमृद्ध वाचक-अभ्यासक ठरेल; पण तो संदर्भाव्यतिरिक्त अंतर्मनाचे संदर्भ तळ स्तर शोधत असेल, तर तो निश्चितच स्वतंत्र प्रज्ञावंत म्हणून सिद्ध होऊ शकेल. घोकनशीलता आणि चिंतनशीलता यातला फरक बहुतेकांना कळतोच. चिंतनशील वाचनाने चित्तस्थितीला गती येते अन् ती आत्मशोधाला प्रवृत्त करते आणि अखेर चित्त शांत जळासारखे स्थिर होते. वाचक-रसिकांची अभिरुची श्रीमंत करणारे साहित्य त्या भाषेचा गौरवबिंदू ठरते. मनुष्याला रंजनाची गरज आहे; पण केवळ रंजनवादी साहित्य वाचक-अभिरुचीच्या अस्मितेला बाधित करीत असेल, तर अशा मंच शौकीन गमती-जमतींचा गंभीरतेने रसिक-वाचकांनी विचार करायला हवा.

**(लेखक ज्येष्ठ कवी आहेत.)**

Maharashtra Times 10.12.2023

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

# NEP: Maha could offer internships to UG students

Yogita.Rao@timesgroup.com

**Mumbai:** In a first, the state government plans to open its departments to undergraduate students to pursue their internships under the New Education Policy (NEP). The state's higher and technical education department is in talks with other departments to understand the opportunities that can be made available to undergraduate students from different courses.

### MAIDEN MOVE

The new four-year programmes, with exit options at every level, require students to earn credits through mandatory internships before graduating. The department plans to take the proposal to the cabinet and issue guidelines and also plans to make use of the internship portal of All India Council of Technical Education (AICTE) which is open to students as well as recruiters.

"We are in talks with various departments in the government and are exploring the opportunities that can be offered to undergraduate students. It is a developing idea and we need to work out a lot of details. Some of the departments have offered a few internships to students primarily from the professional streams, but the numbers were quite small. For the first time it is being considered at policy level," said a government official. Another official said they have already identified departments like law, school education and water conservation where there is room for such experiments.

The official added that with the implementation of NEP, internship has become mandatory across courses and not just in engineering. "We will also be making use of the AICTE portal, which is open for all students," said the official. The portal is aimed at creating and preparing a skilled workforce. It also provides details of virtual internship opportunities.

One of the vice-chancellors of state universities said the Andhra Pradesh model for internship is one of the robust ones to draw inspiration for the state universities, adding that it requires one full semester of internship. In Maharashtra, under the NEP, it is already implemented for 88 credits for the four-year honours programme for engineering students, he said.

The Times of India 10.12.2023

# News Paper Clippings During December 2023

## Section: Education

# आता 'डिप्लोमा' हद्दपार

## पुढील वर्षापासून फाउंडेशन, ॲडव्हान्स्ड अभ्यासक्रम

मटा विशेष

हर्ष दुधे
Harsh.Dudhe@timesgroup.com

| नाव | पात्रता | क्रेडिट | कालावधी | तास | गुण |
|---|---|---|---|---|---|
| फाउंडेशन कोर्स | १२वी उत्तीर्ण | ०-२२ | एक वर्षापर्यंत | १५ तास एका क्रेडिटसाठी | २५ गुण एका क्रेडिटसाठी |
| ॲडव्हान्स्ड कोर्स | पदवी उत्तीर्ण | ०-४४ | एक ते दोन वर्षे | १५ तास एका क्रेडिटसाठी | २५ गुण एका क्रेडिटसाठी |





**चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमाचे नोमेनक्लेचर**

| नोमेनक्लेचर | कालावधी | क्रेडिट्स |
|---|---|---|
| प्रमाणपत्र | एक वर्ष | २० ते २२ |
| डिप्लोमा | दोन वर्षे | ८० ते ८८ |
| पदवी | तीन वर्षे | १२० ते १३२ |
| पदवी (ऑनर्स किंवा रिसर्च) | चार वर्षे | १६० ते १७६ |

**पुणे :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीच्या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने 'सर्टिफिकेट कोर्स' आणि 'पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा' अभ्याक्रमांच्या संपूर्ण आराखड्यात आमूलाग्र बदल केले असून, त्याची अंमलबजावणी पुढील शैक्षणिक वर्षापासून होणार आहे. त्यामुळे या अभ्यासक्रमांऐवजी पुढील शैक्षणिक वर्षापासून महाविद्यालयांना बारावी उत्तीर्णांसाठी 'फाउंडेशन कोर्स', तर पदवीधरांसाठी 'ॲडव्हान्स्ड कोर्स' सुरू करता येईल. पुढील शैक्षणिक वर्षापासून 'डिप्लोमा कोर्स' बंद केले जाणार आहेत.

पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक विभाग आणि महाविद्यालयांकडून कौशल्य विकासासाठी विविध सर्टिफिकेट, डिप्लोमा आणि ॲडव्हान्स्ड डिप्लोमा अभ्यासक्रम ॲडऑन कोर्सेस म्हणून चालविले जातात. पुणे विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी सध्याचे सर्व प्रमाणपत्र, प्रगत प्रमाणपत्र, पदविका व पदव्युत्तर पदविकाचे नामाभिधान (नोमेनक्लेचर), श्रेयांक, कालावधी आदींबाबत धोरण ठरविण्यासाठी डॉ. मनोहर चासकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली होती. या समितीचा अहवाल २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्याला विद्यापीठाने मान्यता दिली आहे. त्यानुसार सर्टिफिकेट कोर्सऐवजी यापुढे फाउंडेशन कोर्स सुरू करता येणार आहे.

> "राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांमध्ये 'मल्टिपल एन्ट्री मल्टिपल एक्झिट'चा नियम लागू झाला आहे. अशा वेळी विद्यार्थ्याने चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमात पहिल्या वर्षाचे शिक्षण घेतल्यानंतर प्रमाणपत्र, तर दोन वर्षांचे शिक्षण घेतल्यानंतर डिप्लोमा मिळणार आहे. या परिस्थितीत 'मल्टिपल एन्ट्री मल्टिपल एक्झिट'द्वारे मिळणारे प्रमाणपत्र, डिप्लोमा अभ्यासक्रमांचे प्रमाणपत्र; तसेच महाविद्यालयांकडून सुरू करण्यात येणाऱ्या विविध प्रकारच्या ॲड ऑन कोर्सेस यात गोंधळ होऊ नये, यासाठी हे आवश्यक होते.
> - डॉ. मनोहर चासकर, समितीचे अध्यक्ष



पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमाऐवजी, ॲडव्हान्स्ड कोर्स सुरू करता येणार आहे, असे विद्यापीठाकडून सांगण्यात आले आहे. या निर्णयानुसार विद्यापीठाचे विभाग, सर्व संलग्न महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त संस्थांना सध्या अस्तित्वात असलेले सर्व प्रमाणपत्र, प्रगत प्रमाणपत्र, पदविका व पदव्युत्तर पदविकाचे नोमेनक्लेचर, श्रेयांक, कालावधी, अभ्यासक्रम आदींची माहिती ३० डिसेंबरपर्यंत अद्ययावत करायची आहे. त्यासाठी विद्यापीठाने सुविधा उपलब्ध करून दिली आहे. विद्यापीठाने दिलेल्या मुदतीत माहिती अद्ययावत न केल्यास पुढील शैक्षणिक वर्षापासून अशा अभ्यासक्रमाला मान्यता मिळणार नाही, अशा स्पष्ट सूचना विद्यापीठाच्या प्रशासनाने दिल्या आहेत. या निर्णयामुळे महाविद्यालयांकडून सुरू होणाऱ्या 'ॲड ऑन कोर्सेस'ला एक व्यवस्थित स्वरूप मिळणार आहे.

Maharashtra Times 11.12.2023

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

सकाळ

### कामचुकार विद्यापीठांवर ३१ डिसेंबरनंतर कारवाई : पुण्यातील स्थिती अस्पष्ट

# विद्यापीठांना लोकपाल नियुक्तीचा 'यूजीसी'चा आदेश

**पुणे, ता. ११ :** देशभरातील सर्व विद्यापीठांना आणि उच्च शिक्षण संस्थांना लोकपाल नियुक्त करण्याचा आदेश विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) दिला आहे. ५८४ विद्यापीठांमध्ये अजूनही तक्रार निवारण समितीची स्थापना झाली नसून, त्याद्वारे होणारी 'लोकपाल' नियुक्तीही रखडली आहे. अशा कामचुकार विद्यापीठांची यादी ३१ डिसेंबरनंतर घोषित करण्यात येईल, अशी माहिती 'यूजीसी'ने दिली आहे.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि प्रशासकीय तक्रारींची दखल घेण्यासाठी विद्यापीठ स्तरावर तक्रार निवारण समिती स्थापन करणे अनिवार्य केले आहे. यासंबंधी पाच डिसेंबरला दुसरी अधिसूचना जारी केली आहे. देशभरातील केंद्रीय विद्यापीठांबरोबरच अनेक राज्य आणि खासगी विद्यापीठांनी अजूनही कोणतीच हालचाल केलेली नाही. त्यामुळे 'यूजीसी'ने आता हा पवित्रा घेतला आहे.

या पत्रात 'यूजीसी'चे सचिव प्रा. मनीष जोशी म्हणतात, "एप्रिल २०२३मध्ये तक्रार निवारण समिती आणि लोकपाल नियुक्तीबद्दलचे अधिसूचित केले होते. अजूनही लोकपाल नियुक्त न करणाऱ्या विद्यापीठांना तातडीने ही कार्यवाही पूर्ण करावी. तसेच 'रिड्रेसल ऑफ ग्रिव्हन्सेस ऑफ स्टुडंट्स रेग्युलेशन २०२३'मधील इतर तरतुदी लागू करत नियमन अहवाल सादर करावा."

### पुण्यात नियुक्तीबद्दल अनभिज्ञता

**■ शहरातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये लोकपाल नियुक्तीबद्दल अनभिज्ञता दिसते. काही ठिकाणी तक्रार निवारण समिती कार्यरत आहे. मात्र, अजूनही लोकपाल नियुक्तीबद्दल स्पष्टता नाही. यामध्ये सरकारी विद्यापीठे, उच्च शिक्षण संस्थांसह खासगी अभिमत विद्यापीठांचाही समावेश आहे. लवकरच यासंबंधीची कार्यवाही पूर्ण केली जाणार असल्याचेही विद्यापीठांच्या वतीने कळविण्यात आले.**

### अपात्र घोषित करण्याची तरतूद

अधिसूचनेनंतरही लोकपालाची नियुक्ती न करणाऱ्या विद्यापीठावर दंडात्मक कारवाई करण्याचा अधिकार 'यूजीसी'कडे राखीव आहे. याच कायद्यातील २०२३च्या तरतुदीनुसार संस्थेला वाटप केलेले कोणतेही अनुदान रोखणे आणि अपात्र घोषित करणे, तसेच आवश्यक असल्यास विद्यापीठ म्हणून मान्यता काढून घेण्याबरोबरच महाविद्यालयाच्या बाबतीत संलग्नता मागे घेण्याची शिफारस करता येणार आहे.

Pune, Main
12/12/2023 Page No. 5

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

सकाळ

उपक्रमात नोंदणीसाठी क्युआर कोड स्कॅन करा.

### पुणे पुस्तक महोत्सव : उपक्रमाचे गुरुवारी आयोजन

# 'शांतता... पुणेकर वाचत आहेत'

**उपक्रमाविषयी**

- 'पुणे पुस्तक महोत्सव' १६ ते २४ डिसेंबर कालावधीत
- गुरुवारी (ता. १४) दुपारी १२ ते १ दरम्यान 'शांतता... पुणेकर वाचत आहेत' उपक्रम
- उपक्रमात सहभागासाठी 'https://Pbf23.in/register' या लिंकवर क्लिक करा किंवा क्यूआर कोड स्कॅन करा

**पुणे, ता. ११ :** भारत सरकारचे राष्ट्रीय पुस्तक न्यास, महाराष्ट्र शासन, पुणे महापालिका आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या पुणे पुस्तक महोत्सवानिमित्त 'शांतता... पुणेकर वाचत आहेत' हा उपक्रम गुरुवारी (ता. १४) दुपारी बारा ते एक या कालावधीत आयोजित केला आहे.




'पुणे पुस्तक महोत्सव' १६ ते २४ डिसेंबर कालावधीत होत आहे. यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. त्यातील 'शांतता... पुणेकर वाचत आहेत' उपक्रमानिमित्त कोथरूडमधील भावार्थ पुस्तक दालनात शहरातील अभिवाचक आपापल्या आवडत्या पुस्तकांचे वाचन करणार आहेत. यात अभिवाचक आणि अभिनेते राहुल सोलापूरकर, अनिरुद्ध दडके, तनुजा रहाणे, प्रसाद मिरासदार आदी सहभागी होणार आहेत. पुस्तकांचे अभिवाचन गुरुवारी दुपारी बारा ते एक या वेळेत होईल. दरम्यान 'सकाळ प्रकाशन आणि भावार्थ पुस्तक प्रदर्शन आणि बरेच काही...' उपक्रमाचेही उद्घाटन होणार आहे.

> पुणे पुस्तक महोत्सवानिमित्त सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे वाचकांच्या अभिरुचीचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. यातून संकलित होणाऱ्या माहितीचे विश्लेषण करून वाचनसंस्कृती, वाचक, पुस्तकांचे प्रकाशक आणि वितरक यांच्यासाठी महत्त्वाची माहिती कृत्रिम बुद्धिमत्तेची प्रणाली वापरून काढण्यात येईल. यामध्ये कोणत्या वयोगटातील, कोणत्या व्यवसायातील, कोणत्या भौगोलिक स्थानातील वाचक कोणत्या प्रकारची पुस्तके वाचत आहेत, ही माहिती समोर येईल. ही माहिती आणि त्यावरील अभिप्राय लेखक, प्रकाशक आणि मुद्रण संस्थांनाही दिला जाणार आहे.
>
> **- डॉ. सुरेश गोसावी,**
> कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**वैशिष्ट्ये...**

- ठिकठिकाणी पुस्तकांचे वाचन
- महाविद्यालये, शाळा, ग्रंथालये, प्रकाशन संस्थांमध्ये वाचन उपक्रम
- शहरातील जवळपास ५,००० संस्थांचा सहभाग




**पुण्यातील शाळांचा सहभाग**

उपक्रमात शालेय विद्यार्थी सहभागी झाल्यास त्यांना वाचनाची गोडी निर्माण होईल. त्यामुळे पुण्यातील विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त सहभागी व्हावे, यासाठी शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांनी आपल्या स्तरावरून सर्व संबंधितांना सूचना द्याव्यात, असा आदेश शालेय शिक्षण विभागाचे सहसचिव झ. मु. काझी यांनी दिला आहे.

---

## राज्यातील प[...]
## गुरुवारपासून[...]

**पुणे, ता. ११ :** परिचर्या स्तरावरी[...] रिक्तपदे तातडीने भरावीत, या प्रमु[...] मागणीसह परिचारिकांच्या जिल्हाव्या[...] जुनी सेवानिवृत्ती योजना लागू करा[...] यासाठी 'महाराष्ट्र गव्हर्नमेंट नर्से[...] असोसिएशन'तर्फे गुरुवारपासून (ता. १४) बेमुदत संप पुकारला आ[...] राज्यातील सुमारे ५० ह[...] परिचारिका यात सहभागी हो[...] असून, ससून रुग्णालयात[...] एक हजार परिचारिकां[...] त्यात समावेश असेल, अ[...] माहिती असोसिएशनत[...] देण्यात आली.

राज्य सरका[...] निम सरका[...] शिक्षक-शिक्षकेत[...] संघटना समन्व[...] समिती या[...] गुरुवारपासून (ता. १[...]

Pune, Main
12/12/2023 Page No. 3

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

प्रभात

# पुस्तक महोत्सवात विद्यार्थीही करणार वाचनाचा जागर

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ११ -** राष्ट्रीय पुस्तक न्यासातर्फे (नॅशनल बुक ट्रस्ट) १६ ते २४ डिसेंबर या कालावधीत फर्गसन महाविद्यालयाच्या मैदानावर पुणे पुस्तक महोत्सव होत आहे. यात गुरुवारी (दि.१४) दुपारी १२ ते १ या वेळेत 'शांतता पुणेकर वाचत आहेत..' हा उपक्रम होणार आहे. या निमित्ताने सर्व शाळा, महाविद्यालये, विद्यापीठांमधील विद्यार्थ्यांनी वाचन करायचे आहे, अशा सूचना राज्य सरकारने दिल्या आहेत.

Book Your Visit...

पुणे पुस्तक महोत्सव

या दिवशी सर्व पुणेकर जिथे असतील, तेथे एक तास आपल्या आवडीच्या पुस्तकाचे वाचन करणार आहेत. या उपक्रमात शालेय विद्यार्थ्यांनी अधिकाधिक सहभागी होण्यासाठी शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांनी शिक्षण विभागाला आणि शाळांना आवश्यक आदेश देण्याच्या सूचना राज्य सरकारचे सहसचिव इ.मु. काझी यांनी दिल्या आहेत.

**■ महाविद्यालयीन विद्यार्थीसह सहभागी होणार**

शांतता पुणेकर वाचत आहेत.. या उपक्रमात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, अभिमत विद्यापीठे, खासगी विद्यापीठे आणि संलग्न सर्व महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांना आवडीचे पुस्तक वाचायचे आहेत. पुस्तक वाचतांनाचा विद्यार्थ्यांच्या समुहाचा फोटो; आणि संबंधित माहिती गुगल फॉर्मद्वारे भरून द्यायची आहे.

त्यासाठी **https://pbf23.in/register** या लिंकचा वापर करायचा आहे. या उपक्रमात पुणे बार असोसिएशन, लायन्स क्लब, ग्राहकपेठ आदी संस्था सहभागी होणार आहेत, अशी माहिती महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे यांनी दिली.

PuneCity, 12 Dec 2023, Page:013
https://epaper.dainikprabhat.com

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे निर्देश

# वाङ्मयचौर्य तपासणीसाठी दोन संगणक प्रणालींचा वापर

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न संशोधन केंद्रांमध्ये संशोधन करणाऱ्या पीएच.डी.च्या शोधप्रबंधांतील वाङ्मयचौर्य सॉफ्टवेअरद्वारे तपासण्यात येते. मात्र विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) वाङ्मयचौर्य तपासणीसाठी नवी प्रणाली लागू केली आहे. त्यामुळे विद्यापीठाकडून आता जुन्या आणि नव्या अशा दोन्ही प्रणालींचा वापर केला जाणार आहे.

विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाच्या उपकुलसचिवांनी या संदर्भातील परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. पीएच.डी.चे प्रबंध स्वीकारताना विद्यार्थ्यांकडून त्याच्या प्रबंधासोबत वाङ्मयचौर्य अहवाल जमा करून घेणे यूजीसीने अनिवार्य केले आहे. टर्नइटइन आणि उरकुंड या दोन सॉफ्टवेअर प्रणालीद्वारे तपासणी करून त्याचा अहवाल प्रबंधासोबत देण्यात येत होता. मात्र शोधशुद्धी या उपक्रमाचा एक भाग म्हणून इनफ्लिबनेट या प्रकल्पांतर्गत १ नोव्हेंबरपासून ड्रिलबिट ही नवीन वाङ्मयचौर्य तपासणी प्रणाली 'यूजीसी'ने लागू केली आहे. त्या अनुषंगाने विद्यापीठ परिसर शैक्षणिक विभागातील संशोधक मार्गदर्शकांनी त्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत पीएच.डी. संशोधक विद्यार्थ्यांना संशोधन प्रबंध सादर करताना टर्न इट इन या सॉफ्टवेअर प्रणालीचा वापर करून, तर संलग्नित संशोधन केंद्रातील संशोधक मार्गदर्शकांनी त्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत पीएच.डी. संशोधक विद्यार्थ्यांचे संशोधन प्रबंध सादर करताना ड्रिलबिट प्रणालीद्वारे तपासणी करून वाङ्मयचौर्य अहवाल जमा करावा. वाङ्मयचौर्य अहवाल तपासणी सादर करताना संशोधक मार्गदर्शकांनी संशोधन केंद्राच्या समितीसमोर ठेवून सर्व सदस्यांच्या स्वाक्षरीसह विद्यापीठाकडे पाठवण्याबाबत स्पष्ट केले आहे.

12/12/2023 | Pune | Page : 11
Source : https://epaper.loksatta.com

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# पारंपरिक पदविका अभ्यासक्रम आता बंद

### विद्यापीठाकडून अभ्यासक्रमांच्या आराखड्यात बदल

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीच्या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने प्रमाणपत्र आणि पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमांच्या आराखड्यात बदल केले आहेत. या बदलांची अंमलबजावणी येत्या शैक्षणिक वर्षापासून केली जाणार आहे. त्यामुळे या अभ्यासक्रमांऐवजी महाविद्यालयांना बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी पायाभूत अभ्यासक्रम (फाउंडेशन), तर पदवीधरांसाठी प्रगत अभ्यासक्रम (ॲडव्हान्स्ड) अभ्यासक्रम सुरू करता येणार असून, पारंपरिक पदविका अभ्यासक्रम बंद होणार आहे.

विद्यापीठाच्या शैक्षणिक विभाग आणि महाविद्यालयांकडून कौशल्य विकासासाठी विविध प्रमाणपत्र, पदविका, प्रगत पदविका अभ्यासक्रम राबवले जातात. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने प्रचलित प्रमाणपत्र, प्रगत प्रमाणपत्र, पदविका आणि पदव्युत्तर पदविकाचे नामाभिधान (नॉमिन्क्लेचर), श्रेयांक, कालावधी आदींबाबत धोरण ठरविण्यासाठी डॉ. मनोहर चासकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. या समितीच्या अहवालानुसार २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून नवीन रचना लागू करण्यास विद्यापीठाने मान्यता दिली. त्यामुळे आता प्रमाणपत्र अभ्यासक्रमाऐवजी पायाभूत अभ्यासक्रम, पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाऐवजी प्रगत अभ्यासक्रम सुरू करता येणार आहे. त्याबाबतचे परिपत्रक विद्यापीठाने संकेतस्थळावर प्रसिद्ध केले. विद्यापीठाचे विभाग, सर्व संलग्न महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त संस्थांना सध्या अस्तित्वात असलेले सर्व प्रमाणपत्र, प्रगत प्रमाणपत्र, पदविका व पदव्युत्तर पदविकाचे नामाभिधान, श्रेयांक, कालावधी, अभ्यासक्रम याबाबतची माहिती ३० डिसेंबरपर्यंत अद्ययावत करावी लागणार आहे. त्यासाठीची सुविधा विद्यापीठाकडून उपलब्ध करून देण्यात आली आहे. दिलेल्या मुदतीत माहिती अद्ययावत न केल्यास पुढील शैक्षणिक वर्षापासून अशा अभ्यासक्रमाला मान्यता मिळणार नसल्याचे विद्यापीठाने स्पष्ट केले आहे.

12/12/2023 | Pune | Page : 10
Source : https://epaper.loksatta.com

*News Paper Clippings During December 2023*

*Section: Education*

# येत्या गुरुवारी पुस्तक वाचन उपक्रम

## शालेय विद्यार्थ्यांना सहभागाचे आवाहन



**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

'नॅशनल बुक ट्रस्ट'च्या वतीने फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर १६ ते २४ डिसेंबर या कालावधीत आयोजित 'पुणे पुस्तक महोत्सवा'च्या निमित्ताने गुरुवारी (१४ डिसेंबर) 'शांतता पुणेकर वाचत आहेत' हा उपक्रम होणार आहे. उपक्रमाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, यासाठी शाळा, महाविद्यालये, विद्यापीठांमधील विद्यार्थ्यांनी वाचन करावे, अशा सूचना राज्य सरकारने दिल्या आहेत.

'पुणे पुस्तक महोत्सवा'चे आयोजन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे महानगरपालिका आणि शालेय शिक्षण विभाग यांनी केले आहे. यामध्ये पुस्तक प्रदर्शनाबरोबर सांस्कृतिक कार्यक्रम, चर्चासत्रे, साहित्यिकांच्या मुलाखती आणि वाचन संस्कृतीचा विकास घडविणारे कार्यक्रम होणार आहेत.

'महोत्सवाच्या निमित्ताने गुरुवारी दुपारी १२ ते एक दरम्यान 'शांतता पुणेकर वाचत आहेत,' या उपक्रमात पुणेकरांनी आपापल्या जागी एक तास आवडीच्या पुस्तकाचे वाचन करायचे आहे. महोत्सवामध्ये शालेय विद्यार्थी सहभागी झाल्यास त्यांच्यात वाचनाची गोडी निर्माण होण्यास मदत होईल. त्यामुळे महोत्सवात शालेय विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे,' असे आवाहन शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांनी केले आहे.

### विद्यार्थी, शिक्षक सहभागी होणार

'शांतता पुणेकर वाचत आहेत,' या उपक्रमात शालेय विद्यार्थ्यांप्रमाणे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, अभिमत विद्यापीठे, खासगी विद्यापीठे आणि संलग्न सर्व महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांना आवडीचे पुस्तक वाचायचे आहे. पुस्तक वाचतानाचा विद्यार्थ्यांच्या समूहाचा फोटो; तसेच विद्यार्थ्यांना कोणते पुस्तक वाचायला आवडते, याची माहिती गुगल फॉर्मद्वारे द्यायची आहे. त्यासाठी https://pbf23.in/register या लिंकचा वापर करायचा आहे.

Maharashtra Times 12.12.2023

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# पुणे पुस्तक महोत्सवात विविध भाषांतील पुस्तकांची २०० दालने

## वैविध्यपूर्ण कार्यक्रमांचीही रेलचेल

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** राष्ट्रीय पुस्तक न्यासातर्फे १६ ते २४ डिसेंबर दरम्यान आयोजित पुणे पुस्तक महोत्सवात विविध भाषांतील पुस्तकांची दोनशे दालने असणार आहेत. तसेच महोत्सवात मुलांसाठीच्या कार्यक्रमांपासून राजकीय नेत्यांच्या वाचनापर्यंतच्या वैविध्यपूर्ण कार्यक्रमांची रेलचेल असून, हिंदी कवी डॉ. कुमार विश्वास, लेखक विक्रम संपत, डॉ. रघुनाथ माशेलकर असे अनेक मान्यवर महोत्सवात सहभागी होणार आहेत.

पुणे पुस्तक महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. कोहिनूर ग्रुपचे कृष्णकुमार गोयल, मंदार जोशी, आनंद काटीकर, राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या कांचन शर्मा या वेळी उपस्थित होते. पुणे पुस्तक महोत्सवाच्या आयोजनात अनेक संस्थांचा सहभाग आहे. फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर हा महोत्सव होणार आहे. महोत्सवाचे उद्घाटन १६ डिसेंबर आणि समारोप २४ डिसेंबरला होणार आहे. महोत्सवातील कार्यक्रमांमध्ये गायक नंदेश उमप यांचा लोकरंग हा सांस्कृतिक कार्यक्रम, डॉ. माधवी वैद्य यांचा सुट्टी आली, सुट्टी आली हा कार्यक्रम, तुकाराम दर्शन हे महानाट्य, हिंदी कवी डॉ. कुमार विश्वास यांचे व्याख्यान, पत्रकार सौरभ द्विवेदी यांच्याशी संवाद, लेखक विक्रम संपत यांचे व्याख्यान, ५८ स्वातंत्र्य सैनिकांवरील कारागृहातील कल्लोळ हा कार्यक्रम, लष्कराच्या बँडचे सादरीकरण, अविनाश धर्माधिकारी, सदानंद दाते, विश्वास पाटील यांचा सहभाग असलेला आमचा वाचन कारभार हा चर्चात्मक कार्यक्रम, फैजल हा काश्मिरी गीतांचा कार्यक्रम, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांची मुलाखत, शिवराज्याभिषेकावर आधारित श्रीमंत योगी हे महानाट्य, डॉ. सोनल कुलकर्णी यांचा मराठीच्या बोलींचे प्रतिमांकन, ॲड. आशिष शेलार, सतेज पाटील, डॉ. नीलम गोऱ्हे, सिद्धार्थ शिरोळे यांचा सहभाग असलेला राजकीय नेते काय वाचतात हा चर्चात्मक कार्यक्रम, अशा कार्यक्रमांचा समावेश आहे.

पांडे म्हणाले, की दिल्लीतील प्रगती मैदानावर होणाऱ्या पुस्तक महोत्सवानंतरचा हा मोठा पुस्तक महोत्सव महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी असलेल्या पुण्यात होणार आहे. त्यामुळे पुस्तकांसह वैविध्यपूर्ण कार्यक्रमांची मेजवानी पुणेकरांना मिळणार आहे.

### 'शांतता... पुणेकर वाचत आहेत'

महोत्सवात १४ डिसेंबरला शांतता पुणेकर वाचत आहेत, हा उपक्रम होणार आहे. या उपक्रमात एक तास आवडीच्या पुस्तकाचे वाचन केले जाणार आहे. वाचनाची आवड निर्माण होण्यासाठी शाळा, महाविद्यालये, विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी सहभागी होण्याच्या सूचना राज्य सरकारकडून देण्यात आल्या आहेत.

13/12/2023 | Pune | Page : 08
Source : https://epaper.loksatta.com

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

# पुस्तक महोत्सवात कार्यक्रमांची मेजवानी

### कवी, साहित्यिक, लेखक, कलावंतांचा सहभाग

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'राष्ट्रीय पुस्तक न्यासा'च्या वतीने फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर येत्या १६ ते २४ डिसेंबर या कालावधीत होणाऱ्या 'पुणे पुस्तक महोत्सवा'त सुमारे २०० पुस्तकांचे स्टॉल उभारले जाणार असून, पुणेकरांना दहापेक्षा अधिक भारतीय भाषांतील हजारो पुस्तके पाहायला आणि खरेदी करायला मिळणार आहे.

या पुस्तक महोत्सवाच्या निमित्ताने पुणेकरांना प्रसिद्ध कवी कुमार विश्वास, गायक नंदेश उमप, लेखक विक्रम संपत, पत्रकार सौरभ द्विवेदी, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांना ऐकण्याची, तर तुकाराम दर्शन महानाट्य, शिवराज्याभिषेक सोहळा अनुभवण्याची संधी मिळणार आहे.

युवकांना काश्मिरी बँड, उत्तर भारतीय संगीताचा आस्वाद घेता येणार असून, 'टॅलेंट हंट'मध्ये दररोज आपल्या कला सादर करता येणार आहेत. मुलांसाठी बालसाहित्यिकांकडून कथा, गोष्टी ऐकता येणार आहेत. पहिल्यांदाच होणाऱ्या 'पुणे पुस्तक महोत्सवा'चे आयोजन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे महापालिका, उच्च शिक्षण आणि शालेय शिक्षण विभाग यांनी केले असून, पुणे श्रमिक पत्रकार संघ सहआयोजक आहे. भारतीय विचार साधना आणि खडकी शिक्षण संस्थेचे यास सहकार्य लाभले आहे.

यात पुस्तक प्रदर्शनाबरोबर सांस्कृतिक कार्यक्रम, चर्चासत्रे, साहित्यिकांच्या मुलाखती, सृजनशीलतेला वाव देणारे आणि वाचन संस्कृतीचा विकास घडविणारे कार्यक्रम खुला रंगमंच आणि अॅम्फी थिएटरमध्ये होणार आहेत. या वेळी होणाऱ्या उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभागी होण्याबाबत शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांना राज्य सरकारने सूचना दिल्याची माहिती महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे यांनी दिली आहे. या वेळी 'पुस्तक न्यासा'चे प्रकल्प अधिकारी कांचन शर्मा, उद्योजक कृष्णकुमार गोयल, प्रा. आनंद काटीकर, अॅड. मंदार जोशी, प्राचार्य डॉ. संजय चाकणे आदी उपस्थित होते.



> पुणे पुस्तक महोत्सव हा वाचन संस्कृतीला चालना देण्यासाठीचा महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. पुण्यातील शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांमधील अधिकाधिक विद्यार्थ्यांनी सहभागी व्हायचे आहे. पुणेकरांनी महोत्सवाच्या काळात सकाळी १०.३० ते रात्री ८.३० या वेळेत मोठ्या संख्येने उपस्थित राहून, महोत्सव यशस्वी करावा.
>
> - राजेश पांडे, संयोजक, पुणे पुस्तक महोत्सव

#### लोकरंग, बँडचे सादरीकरण

पुणे पुस्तक महोत्सवाचे उद्घाटन शनिवारी १६ डिसेंबरला दुपारी १२ वाजता उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील आणि ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते होणार आहे. उद्घाटनाच्या सत्रानंतर दुपारी ४.३० वाजता बँडचे सादरीकरण होईल. या दिवशी रात्री गायक नंदेश उमप यांचा 'लोकरंग' हा सांस्कृतिक कार्यक्रम सायंकाळी ६.३० वाजता होणार आहे. या महोत्सवात दररोज दुपारी दीड ते साडेचार या वेळेत 'राष्ट्रीय पुस्तक न्यासा'च्या वतीने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी 'टॅलेंट हंट'चे आयोजन होणार आहे. याअंतर्गत विद्यार्थ्यांना नृत्य, गायन, वादन अशा विविध कला सादर करता येणार आहेत.

# 'वाचन संस्कृती संवर्धनासाठी कुपन'

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'राष्ट्रीय पुस्तक न्यासा'च्या वतीने फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर १६ ते २४ डिसेंबरदरम्यान 'पुणे पुस्तक महोत्सवा'चे आयोजन करण्यात आले आहे. या पुणे पुस्तक महोत्सवाला अधिकाधिक वाचकांनी भेट देऊन, पुस्तक खरेदी करण्याचा आनंद घेता येण्यासाठी कोथरूड मतदारसंघातील प्रत्येक व्यक्तीला १०० रुपयाचे कुपन देण्याचा निर्णय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी घेतला आहे.

पुस्तक खरेदीचे कुपन नागरिकांना १६ ते २२ डिसेंबरदरम्यान चंद्रकांत पाटील यांच्या कोथरूड, बाणेरमधील जनसंपर्क कार्यालयात सकाळी ११ ते सायंकाळी सहा या वेळेत उपलब्ध असतील. त्यासाठी नागरिकांना आधार कार्डची झेरॉक्स प्रत द्यावी लागणार आहे. पुस्तक महोत्सवानिमित्त उद्या, गुरुवारी (१४ डिसेंबर) 'शांतता, पुणेकर वाचत आहेत' हा उपक्रम होणार आहे. या वेळेत दुपारी १२ ते एक या वेळेत एक तास पुणेकरांनी आपल्या आवडीच्या पुस्तकाचे वाचन करायचे, असे आवाहन मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले आहे.

> 'नॅशनल बुक ट्रस्ट'ने पहिल्यांदाच दिल्लीबाहेर पुण्यात एवढा भव्य महोत्सव आयोजित केला आहे. महापालिका या उपक्रमात सक्रिय सहभागी होईल. महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थी, शिक्षक; तसेच महापालिकेचे अधिकारी, कर्मचारीही १४ डिसेंबरला सर परशुरामभाऊ महाविद्यालयात होणाऱ्या कार्यक्रमात सहभागी होतील. अधिकाधिक पुणेकरांनी उपक्रमात सहभाग नोंदवून विक्रमाला हातभार लावावा.
>
> - विक्रमकुमार, आयुक्त तथा प्रशासक, पुणे महापालिका

Maharashtra Times 13.12.2023

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

सकाळ

# पुस्तक महोत्सवाची उत्कंठा शिगेला

पुणे, ता. १२ : राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या वतीने आयोजित पुणे पुस्तक महोत्सवाचे उद्‍घाटन शनिवारी (ता. १६) मंत्री चंद्रकांत पाटील आणि ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते दुपारी बारा वाजता होणार आहे. फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर हा महोत्सव होणार आहे.

राष्ट्रीय पुस्तक न्यास यांच्यासह सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे महापालिका, उच्च शिक्षण आणि शालेय शिक्षण विभाग यांच्या वतीने हा महोत्सव १६ ते २४ डिसेंबर दरम्यान आयोजित केला आहे. महोत्सवात सुमारे २०० स्टॉल्स राहणार असून, १० भारतीय भाषांमधील हजारो पुस्तके उपलब्ध असणार आहेत. महोत्सवात पुस्तक प्रदर्शनाबरोबरच विविध सांस्कृतिक कार्यक्रम, चर्चासत्रे, साहित्यिकांच्या मुलाखती असे कार्यक्रम होणार आहेत. महोत्सवानिमित्त होणाऱ्या विविध उपक्रमांमध्ये आणि कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना सहभागी होण्याबाबत राज्य सरकारने सूचना दिल्याची माहिती महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे. यावेळी पुस्तक न्यासाचे प्रकल्प अधिकारी कांचन शर्मा, डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. शरद कुंटे उपस्थित होते. महोत्सवानिमित्त कवी कुमार विश्वास, पत्रकार सौरभ द्विवेदी, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, गायक नंदेश उमप, लेखक विक्रम संपत हे पुणेकरांशी संवाद साधणार आहेत. तर तुकाराम दर्शन महानाट्य, शिवराज्याभिषेक सोहळा अनुभवण्याची संधी मिळणार आहे.

### कोथरूडकरांना खरेदीचे कुपन

मंत्री चंद्रकांत पाटील यांनी कोथरूड मतदारसंघातील प्रत्येक व्यक्तीला पुस्तक खरेदीसाठी १०० रुपयांचे कूपन देण्याचा निर्णय घेतला आहे. कोथरूडमधील वाचनप्रेमींनी महोत्सवास भेट दिल्यास त्या प्रत्येक व्यक्तीला हे 'डिस्काऊंट' कूपन दिले जाणार आहे. हे कूपन १६ ते २२ डिसेंबर दरम्यान कोथरूड, बाणेर येथील जनसंपर्क कार्यालयात सकाळी अकरा ते सायंकाळी सहा या वेळेत उपलब्ध असणार आहे. यासाठी नागरिकांना आधार कार्डची झेरॉक्स प्रत द्यावी लागणार आहे.

वैशिष्ट्ये

- २२ भारतीय भाषांमधील पुस्तकांचे २०० स्टॉल्स
- काश्मिरी बँड, उत्तर भारतीय संगीत ऐकण्याची संधी
- टॅलेंट हंटमध्ये आपल्या कलांचे सादरीकरण करता येणार
- लहान मुलांसाठी कथाकथन
- तुकाराम दर्शन महानाट्य, शिवराज्याभिषेक सोहळा अनुभवण्याची संधी

## सोशल मीडियावर रंगली चर्चा

एकीकडे पुणे पुस्तक महोत्सवाची जय्यत तयारी सुरू असताना, दुसरीकडे मात्र आपल्या आवडत्या पुस्तकासमवेत किंवा पुस्तकांच्या संग्रहाजवळील छायाचित्रे, वाचन संस्कृती वृद्धिंगत होण्याच्या दृष्टिकोनातील संदेश, वाचनाचे महत्त्व सांगणाऱ्या ध्वनिचित्रफिती सोशल मीडियावर 'पोस्ट'द्वारे प्रसिद्ध होत आहे. याद्वारे महोत्सव सुरू होण्यापूर्वीच त्याची चर्चा रंगली आहे. ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, राज्याचे शिक्षण आयुक्त सूरज मांढरे आदी मान्यवरांनी या संदर्भात सोशल मीडियावर पोस्ट केल्या आहेत. राष्ट्रीय पुस्तक न्यास, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे महापालिका, उच्च शिक्षण आणि शालेय शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हा महोत्सव १६ ते २४ डिसेंबर दरम्यान आयोजित केला आहे. या महोत्सवाच्या निमित्ताने विविध उच्चपदस्थ मान्यवर आपल्या सोशल मीडिया अकाउंटवर यासंदर्भात पोस्ट करत आहेत. तसेच महोत्सवात अधिकाधिक वाचकांनी सहभागी व्हावे, यादृष्टीने देखील सोशल मीडियाद्वारे मान्यवरांकडून आवाहन केले जात आहे. त्याचप्रमाणे महोत्सवांतर्गत येत्या गुरुवारी (ता. १४) होणाऱ्या 'शांतता पुणेकर वाचत आहेत' या उपक्रमांचीही जोरदार चर्चा सोशल मीडियावर रंगली आहे. अनेक वाचकांनी, पुणेकरांनी या उपक्रमात सहभागी होण्याविषयी उत्सुक असल्याचे पोस्टमध्ये नमूद केले आहे.

Pune, Main
13/12/2023 Page No. 1

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

# 9-day book festival with 200 stalls comes to Fergusson College

TIMES NEWS NETWORK

**Pune:** Thousands of books in at least 200 stalls from publishers of 10 Indian languages and in English will be on sale as part of the Pune Book Festival from December 16 to 24 on Fergusson College ground.

Various cultural events will also be part of the event. As a precursor, the organisers have appealed to Puneites to read for one hour between noon and 1pm on December 14 wherever they are.

The event is organised by the National Book Trust, Fergusson College, Savitribai Phule Pune University, Pune Municipal Corporation, the department of school education and the department of higher education.

**Fergusson to host 9-day Pune book fest in December**

TOI REPORT ON NOVEMBER 25, 2023

The book festival will be open to the public, from 10.30am to 8.30pm every day. Over five lakh people are expected to attend the book festival. The organisers said that new writers will be encouraged during the event.

The focus will be on students' participation both as book readers and participants.

It will be inaugurated on December 16 by higher education minister Chandrakant Patil and renowned writer Sadanand More. A Guinness Record attempt will also be made on December 14, when over 5,000 students and their parents are expected to come together on SP College grounds to read and tell a story.

Such festivals have been held in Gomti, Ujjain, Shimla and Shillong. The organisers said there would be books for all ages and genres at the festival.

The Times of India 13.12.2023

**लोकसत्ता**

**लोकमान्य लोकशक्ती**

# 'पुणे पुस्तक महोत्सव' अंतर्गत चार विश्वविक्रमांचा प्रयत्न

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे** : राष्ट्रीय पुस्तक न्यासातर्फे (एनबीटी) १६ ते २४ डिसेंबर या कालावधीत 'पुणे पुस्तक महोत्सव' आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवात चार विश्वविक्रम प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे यांनी ही माहिती दिली. वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी पुणे पुस्तक महोत्सव होत आहे. महोत्सवात विविध भाषांतील पुस्तकांची दोनशे दालने असणार आहेत. तसेच अनेक मान्यवर लेखक, कलाकार, राजकीय नेतेही या महोत्सवात सहभागी होणार आहेत. या पार्श्वभूमीवर महोत्सवात चार विश्वविक्रम नोंदवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. त्यात गुरुवारी (१४ डिसेंबर) सकाळी आठ वाजता स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर जास्तीत जास्त पालकांनी आपल्या मुलांना वाचन करून दाखवण्याचा उपक्रम होईल. १५ डिसेंबरला फर्ग्युसन महाविद्यालयात जास्तीत जास्त पुस्तकांनी भारत हा शब्द साकारला जाणार आहे. १६ डिसेंबरला 'जयतू भारत' या वाक्यात जास्तीत जास्त पुस्तकांचा समावेश असेल. तर अधिकाधिक लोकांनी मोठ्याने वाचण्याच्या व्हिडिओ अल्बमचा उपक्रम २१ डिसेंबरला होईल.

युनेस्कोच्या निकषांनुसार जागतिक पुस्तकांची राजधानी बनण्याची क्षमता पुणे शहरात आहे. त्या दृष्टीने प्रयत्न करण्याच्या उद्देशाने हे उपक्रम आयोजित करण्यात आल्याचे पांडे यांनी सांगितले. १४ डिसेंबरला 'शांतता... पुणेकर वाचत आहेत' या उपक्रमात महापालिकेचा सहभाग आहे. त्यात महापालिकेच्या शाळा, क्षेत्रीय कार्यालये, रुग्णालय अशा ठिकाणी दुपारी बारा ते एक या वेळेत वाचन करण्यात येणार आहे, असे महापालिका आयुक्त विक्रम कुमार यांनी सांगितले.

14/12/2023 | Pune | Page : 03

Source : https://epaper.loksatta.com

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

पुढारी

# पुणे पुस्तक महोत्सवात मिळणार सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

लहान मुलांसाठी कथाकथनाचे कार्यक्रम, साहित्यिकांच्या मुलाखती, चर्चासत्रे अन् व्याख्याने....अशा वैविध्यपूर्ण कार्यक्रमांची मेजवानी पुणेकरांना पुणे पुस्तक महोत्सवात घेता येणार आहे. राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या वतीने १६ ते २४ डिसेंबर या कालावधीत फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर होणाऱ्या या महोत्सवात १० पेक्षा अधिक भारतीय भाषांमधील हजारो पुस्तके पाहायला मिळणार आहे. महोत्सवाच्या निमित्ताने कवी कुमार विश्वास, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, गायक नंदेश उमप, लेखक विक्रम संपत यांना ऐकण्याची, तर तुकाराम दर्शन महानाट्य, शिवराज्याभिषेक सोहळा अनुभवण्याची संधी मिळणार आहे.

- **शनिवारपासून रंगणार महोत्सव**
- **हजारो पुस्तके पाहण्याची संधी**



त्याचबरोबर युवकांना काश्मिरी बँड, उत्तर भारतीय संगीताचा आस्वाद घेता येणार असून, टॅलेंट हंटमध्ये रोज आपल्या कला सादर करता येणार आहेत. शनिवारपासून (दि.१६) रंगणाऱ्या या महोत्सवाचे आयोजन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे महानगरपालिका, उच्च शिक्षण आणि शालेय शिक्षण विभाग यांनी एकत्रितरित्या केले आहे. महोत्सवासाठी पुणे श्रमिक पत्रकार संघ सहआयोजक असून, भारतीय विचार साधना आणि खडकी शिक्षण संस्थेचे सहकार्य लाभले आहे. महोत्सवामध्ये पुस्तक प्रदर्शनाबरोबर विविध कार्यक्रम फर्ग्युसन महाविद्यालयातील खुला रंगमंच आणि अँफी थिएटरमध्ये होणार आहेत, अशी माहिती महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या महोत्सवाचे उद्घाटन शनिवारी (दि.१६) दुपारी १२ वाजता उच्च शिक्षण आणि तंत्रज्ञान मंत्री चंद्रकांत पाटील आणि ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते होणार आहे. उद्घाटनाच्या सत्रानंतर बँडचे सादरीकरण करण्यात येणार आहे. याच दिवशी गायक नंदेश उमप यांचा लोकरंग हा सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. या महोत्सवात रोज दुपारी दीड ते साडेचार या वेळेत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी टॅलेंट हंट उपक्रमाचे आयोजन होणार आहे. महोत्सवाची वेळ रोज सकाळी साडेदहा ते रात्री साडेआठ असणार आहे.

My Pune Edition
Dec 14, 2023 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

# वाचनसंस्कृतीचा आज जागर

## 'पुणेकर वाचत आहेत'मध्ये सहभागाचे आवाहन

**पुणे पुस्तक महोत्सव**

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

नॅशनल बुक ट्रस्टच्या वतीने फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर १६ ते २४ डिसेंबर दरम्यान पुणे पुस्तक महोत्सव होत आहे. या महोत्सवाच्या निमित्ताने आज, १४ डिसेंबर रोजी दुपारी १२ ते १ दरम्यान 'शांतता... पुणेकर वाचत आहेत' हा उपक्रम होणार आहे. त्याला शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, सामाजिक संस्था, सरकारी आणि खासगी कार्यालये, महापालिकेचे क्षेत्रीय कार्यालये, खासगी आस्थापना आदींनी पाठिंबा दिला आहे. या उपक्रमात पुणेकरांनी सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

पुणे पुस्तक महोत्सवाच्या निमित्ताने 'शांतता... पुणेकर वाचत आहेत' या उपक्रमाला पुणेकरांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या उपक्रमाला पुणे बार असोसिएशन, पुणे श्रमिक पत्रकार संघ, महाराष्ट्र साहित्य परिषद, खडकी शिक्षण संस्था, रिक्षा पंचायत, भारतीय विचार साधना, ग्राहक पेठ, लायन्स क्लब, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, विविध ग्रंथालये, सरकारी अधिकारी, कर्मचारी, राजकीय नेते, शिक्षक, प्राध्यापक, प्राचार्य, शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते आदी सहभागी होणार आहे. या उपक्रमाला यशस्वी करण्यासाठी आतापर्यंत सुमारे २५० सामाजिक संस्थांनी पाठिंबा दिला आहे.

उच्च शिक्षण व तंत्रज्ञान मंत्री चंद्रकांत पाटील, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, शिक्षणतज्ज्ञ डॉ. अनिरुद्ध देशपांडे, सिम्बायोसिस कुलपती डॉ. एस. बी मुजुमदार, भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेचे अध्यक्ष प्रदीप रावत, 'बार्टी'चे महासंचालक डॉ. सुनील वारे, साहित्यिक शरणकुमार लिंबाळे, चित्रपट महामंडळ अध्यक्ष मेघराज राजेभोसले, अभिनेता प्रवीण तरडे सहभागी होणार आहेत. या उपक्रमात पुणेकरांनी दुपारी १२ ते १ या वेळेत जिथे असाल तिथे वाचन करायचे आहे. मुख्याध्यापक आणि प्राचार्यांनी आपल्या ग्रंथालयात विद्यार्थ्यांना वाचन करण्यासाठी प्रेरित करून, वाचन संस्कृतीचे संवर्धन करण्यासाठी हातभार लावावा, असे आवाहन पुणे पुस्तक महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे यांनी केले आहे.

> **"वाचनाने आपण समृद्ध होतो आणि अधिक चांगले व्यक्ती बनतो. आज दुपारी दुपारी १२ ते १ या वेळात आपल्या आवडीचे कोणतेही एक पुस्तक वाचून या वाचन उपक्रमात आपण सहभागी होऊ शकता. या प्रतिनिधिक सहभागानंतरही वाचनाची आवड कायम ठेवून ज्ञानार्जन करू.**
> – सूरज मांढरे, शिक्षण आयुक्त

> **पुणे पुस्तक महोत्सवाच्या आयोजनात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा महत्त्वाचा सहभाग आहे. पुणेकर म्हणून आपणही सहभागी होऊन आज दुपारी बारा वाजता आवडीचे पुस्तक वाचावे. वाचन संस्कृतीचे संवर्धन करण्याच्या उद्देशाने वाचकांचे गुगल फॉर्मद्वारे सर्वेक्षण करण्यात येत आहे. त्याचा फायदा लेखक, प्रकाशक आणि मुद्रण संस्थांना होईल.**
> – डॉ. सुरेश गोसावी, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ



पुणे पुस्तक महोत्सवाच्या निमित्ताने आज, गुरुवारी स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर 'पालक सांगणार मुलांना गोष्टी' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

## पालक सांगणार मुलांना गोष्टी

**पुणे :** पुणे पुस्तक महोत्सवाच्या निमित्ताने पाच हजार पालक आपल्या पाल्यांना आज, गुरुवारी सकाळी आठ वाजता स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर गोष्टी सांगणार आहेत. पुणे महापालिकेतर्फे होणाऱ्या या उपक्रमाची नोंद गिनेस बुक रेकॉर्ड्समध्ये होणार आहे. या विश्वविक्रमाच्या निमित्ताने 'युनेस्को'चे निकष पूर्ण करण्याचा महापालिकेकडून प्रयत्न होणार असून, पुण्याला 'वर्ल्ड बुक कॅपिटल' बनवण्याचा श्रीगणेशा होणार आहे.

पालकांकडून आपल्या पाल्यांना गोष्टी सांगण्याचा उपक्रम पुणे महापालिकेच्या वतीने आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमाला उद्योजक सूर्यकांत काकडे यांचे सहकार्य लाभले आहे. महापालिकेकडून स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर जय्यत तयारी सुरू आहे. या तयारीचा आढावा महापालिकेचे आयुक्त विक्रमकुमार, अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घेतला. या वेळी संयोजक राजेश पांडे, प्रसेनजीत फडणवीस, राहुल पाखरे उपस्थित होते. या विश्वविक्रमासाठी सुमारे दहा हजार खुर्च्या समोरासमोर मांडण्यात आल्या आहेत. यात पालक पाल्यांना विविध गोष्टी, कथा सांगणार आहेत. यापूर्वीचा असा विश्वविक्रम चीनच्या नावे आहे. वर्ल्ड बुक कॅपिटल हा युनेस्कोचा एक उपक्रम असून, तो २३ एप्रिलपासून सुरू होतो. शहरामध्ये वाचन संस्कृती रुजवण्यासाठी हा महत्त्वपूर्ण पाया असतो. या अंतर्गत शहराला एका वर्षासाठी पुस्तकांना आणि वाचनाला प्रोत्साहन देण्यासाठी वर्ल्ड बुक कॅपिटलचा दर्जा देण्यात देतो, असे सांगण्यात आले.

> **"'शांतता.. पुणेकर वाचत आहेत' या उपक्रमात महापालिकेच्या शाळा, क्षेत्रिय कार्यालये, रुग्णालये आदी ठिकाणी दुपारी १२ ते १ या वेळेत उत्स्फूर्तपणे पुस्तकांचे वाचन करण्यात येणार आहे. सर्व पुणेकरांनी या उपक्रमात सहभागी होऊन, आपल्या आवडीच्या पुस्तकाचे वाचन करावे.**
> – विक्रमकुमार, आयुक्त, पुणे महापालिका

Maharashtra Times 14.12.2023

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

# 'शांतता...पुणेकर वाचत आहेत' उपक्रमात सहभागी व्हा

**पुणे** : राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या (नॅशनल बुक ट्रस्ट) वतीने फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर १६ ते २४ डिसेंबर दरम्यान पुणे पुस्तक महोत्सवाच्या होत आहे. या महोत्सवाच्या निमित्ताने आज (गुरूवारी) दुपारी १२ ते १ दरम्यान 'शांतता...पुणेकर वाचत आहे' हे अभिनव उपक्रम पार पडणार आहे.

शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, सामाजिक संस्था, सरकारी आणि खासगी कार्यालये, महापालिकेचे क्षेत्रिय कार्यालये, खासगी आस्थापना अशा सर्वांनी पाठिंबा दिला आहे. यात सर्वांनी सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

पुणे पुस्तक महोत्सवाचे आयोजन पुणे महापालिका, उच्च शिक्षण आणि शालेय शिक्षण यांनी एकत्र येत आयोजन केले आहे. उपक्रमाला विद्यापीठ, शैक्षणिक संस्थासह २५० सामाजिक संस्थांनी पाठिंबा दिला आहे.

उच्च शिक्षण व तंत्रज्ञान मंत्री चंद्रकांत पाटील, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, शिक्षणतज्ज्ञ डॉ. अनिरुद्ध देशपांडे, सिम्बायोसिस कुलपती डॉ.एस. बी मुजुमदार, भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेचे अध्यक्ष प्रदीप रावत, बार्टीचे महासंचालक डॉ. सुनील वारे, सरहदचे संजय नहार, डॉ. गजानन एकबोटे, डॉ. पी. डी. पाटील, डॉ. शिवाजीराव कदम, पुणे बार असोसिएशनचे अध्यक्ष केतन कोठावळे, पत्रकार अरुण खोरे, साहित्यिक शरणकुमार लिंबाळे, चित्रपट महामंडळ अध्यक्ष मेघराज राजेभोसले, अभिनेता प्रवीण तरडे आदी या उपक्रमात सहभागी होणार आहेत.

शांतता ..पुणेकर वाचत आहे हा उपक्रम पुणेकरांचा उपक्रम आहे. त्यामुळे त्यात पुणेकरांचे योगदान महत्त्वाचे आहे. सर्व पुणेकरांनी आज दुपारी १२ ते १ या वेळेत जिथे असाल तिथे वाचन करायचे आहे. या उपक्रमात शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थी मोठ्या संख्येने होत आहे. मुख्याध्यापक आणि प्राचार्यांनी आपल्या ग्रंथालयात विद्यार्थ्यांना वाचन करण्यासाठी प्रेरित करून, वाचन संस्कृतीचे संवर्धन करण्यासाठी हातभार लावावा, असे आवाहन पुणे पुस्तक महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे यांनी केले आहे.

Book Your Visit...

**पुणे पुस्तक महोत्सव**

**16 ते 24 डिसेंबर, 2023**

वाचनाने आपण समृद्ध होतो आणि अधिक चांगले व्यक्ती बनतो. आज दुपारी दुपारी १२ ते १ या वेळात आपल्या आवडीचे कोणतेही एक पुस्तक वाचून या वाचन उपक्रमात आपण सहभागी व्हा.

**- सूरज मांढरे,**
**शिक्षण आयुक्त, महाराष्ट्र**

---

वाचन संस्कृतीचे संवर्धन करण्याच्या उद्देशाने होणाऱ्या या महोत्सवाच्या निमित्ताने वाचकांचे गुगल फॉर्मद्वारे सर्वेक्षण करण्यात येत आहे. यातून पुणेकर काय वाचतात, वयोगट कोणता, आवडता विषय, आवडतो, आवडते लेखक किंवा साहित्यिक कोणते अशी माहिती समोर येणार आहे. त्याचा फायदा लेखक, प्रकाशक आणि मुद्रण संस्थांना होईल.

**- डॉ. सुरेश गोसावी, कुलगुरू,**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

**असे व्हा सहभागी..**

उपक्रमात आज (गुरुवारी) दुपारी १२ ते १ या वेळेत आपल्या आवडीचे पुस्तक वाचायचे आहे. तुम्ही जिथे असाल, तिथे पुस्तक वाचायचे आहे. त्याची माहिती तुम्ही समाज माध्यमावर mybookstory हा हॅशटॅग वापरून शेअर करता येईल, असे महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे यांनी सांगितले.

Kesari 14.12.2023

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

सकाळ

# चला... सामील होऊ वाचनोत्सवात

## आज दुपारी १२ ते एक ; उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन

**पुणे, ता. १३ :** राष्ट्रीय पुस्तक न्यासातर्फे (नॅशनल बुक ट्रस्ट) फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर १६ ते २४ डिसेंबरदरम्यान पुणे पुस्तक महोत्सव होत आहे. या निमित्ताने गुरुवारी (ता. १४) दुपारी १२ ते एकदरम्यान 'शांतता... पुणेकर वाचत आहेत' हे अभिनव अभियान होणार आहे. यासाठी शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, सरकारी कार्यालये, महापालिकेचे क्षेत्रीय कार्यालय अशा सर्वांनी पाठिंबा दिला आहे. यामध्ये सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे.

पुणे महापालिका, उच्च शिक्षण आणि शालेय शिक्षण यांनी पुणे पुस्तक महोत्सवाचे आयोजन केले आहे. उपक्रमाला पुणे बार असोसिएशन, पुणे श्रमिक पत्रकार संघ, महाराष्ट्र साहित्य परिषद, खडकी शिक्षण संस्था, रिक्षा पंचायत, भारतीय विचार साधना, ग्राहक पेठ, लायन्स क्लब, डेक्कन एज्युकेशन सोसायटी,




मॉडर्न लॉ कॉलेज, आबासाहेब गरवारे महाविद्यालय, विमलाबाई गरवारे प्रशाला, एच. व्ही. देसाई महाविद्यालय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, एटीएसएस कॉलेज ऑफ बिझनेस स्टडीज अँड कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, सह्याद्री शिक्षण मंडळ आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, मामासाहेब मोहोळ कॉलेज आदी सुमारे २५० सामाजिक संस्थांनी पाठिंबा दिला आहे.

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, शिक्षणतज्ज्ञ डॉ. अनिरुद्ध देशपांडे, सिंबायोसिसचे कुलपती डॉ. शां. ब. मुजुमदार, भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेचे अध्यक्ष प्रदीप रावत, बार्टीचे महासंचालक डॉ. सुनील वारे, 'सरहद'चे संजय नहार, डॉ. गजानन एकबोटे, डॉ. पी. डी. पाटील, डॉ. शिवाजीराव कदम, पुणे बार असोसिएशनचे अध्यक्ष केतन कोठावळे, पत्रकार अरुण खोरे, साहित्यिक शरणकुमार लिंबाळे, चित्रपट महामंडळ अध्यक्ष मेघराज राजेभोसले, अभिनेता प्रवीण तरडे आदी सहभागी होणार आहेत, असे महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे यांनी सांगितले.

### उपक्रमाविषयी

- उपक्रम गुरुवारी (ता.१४) दुपारी १२ ते १
- आपल्या आवडीचे पुस्तक वाचा
- जेथे असाल, तेथे पुस्तक वाचा
- त्याची माहिती सोशल मीडियावर #mybookstory वापरून शेअर करा

### पुस्तकांचे अभिवाचन...

'शांतता... पुणेकर वाचत आहेत' उपक्रमानिमित्त कोथरूडमधील भावार्थ पुस्तक दालनात शहरातील अभिवाचक आपापल्या आवडत्या पुस्तकांचे वाचन करणार आहेत. यात अभिवाचक आणि अभिनेते राहुल सोलापूरकर, अनिरुद्ध दडके, तनुजा रहाणे, प्रसाद मिरासदार आदी मान्यवर सहभागी होणार आहेत. पुस्तकांचे अभिवाचन गुरुवारी दुपारी बारा ते एक या वेळेत होईल. दरम्यान, 'सकाळ प्रकाशन आणि भावार्थ पुस्तक प्रदर्शन आणि बरेच काही...' उपक्रमाचेही उद्घाटन होणार आहे.

Pune, Main
14/12/2023 Page No. 3

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

पुढारी

# विद्यापीठाकडून पुढील वर्षापासून डिप्लोमा कोर्स बंद

## बारावी उत्तीर्णांसाठी 'फाउंडेशन कोर्स', तर पदवीधरांसाठी 'अॅडव्हान्स्ड कोर्स'

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीच्या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने 'सर्टिफिकेट कोर्स' आणि 'पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा' अभ्याक्रमांच्या संपूर्ण आराखड्यात आमूलाग्र बदल केले असून, त्याची अंमलबजावणी पुढील शैक्षणिक वर्षापासून होणार आहे. त्यामुळे या अभ्यासक्रमांऐवजी पुढील शैक्षणिक वर्षापासून महाविद्यालयांना बारावी उत्तीर्णांसाठी 'फाउंडेशन कोर्स', तर पदवीधरांसाठी 'अॅडव्हान्स्ड कोर्स' सुरू करता येईल. त्यामुळे पुढील शैक्षणिक वर्षापासून 'डिप्लोमा कोर्स' बंद केले जाणार आहेत.

विद्यापीठाच्या शैक्षणिक विभाग आणि महाविद्यालयांकडून कौशल्य विकासासाठी विविध सर्टिफिकेट, डिप्लोमा आणि अॅडव्हान्स्ड डिप्लोमा अभ्यासक्रम अॅडऑन कोर्सेस म्हणून चालविले जातात. पुणे विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी सध्याचे सर्व प्रमाणपत्र, प्रगत प्रमाणपत्र, पदविका व पदव्युत्तर पदविकाचे नामाभिधान (नोमेनक्लेचर), श्रेयांक, कालावधी आदींबाबत धोरण ठरविण्यासाठी डॉ. मनोहर चासकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली होती. या समितीचा अहवाल २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्याला विद्यापीठाने मान्यता दिली आहे. त्यानुसार सर्टिफिकेट कोर्सऐवजी यापुढे फाउंडेशन कोर्स सुरू करता येणार आहे. पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमाऐवजी, अॅडव्हान्स्ड कोर्स सुरू करता येणार आहे, असे विद्यापीठाकडून सांगण्यात आले आहे. या निर्णयानुसार विद्यापीठाचे विभाग, सर्व संलग्न महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त संस्थांना सध्या अस्तित्वात असलेले सर्व प्रमाणपत्र, प्रगत प्रमाणपत्र, पदविका व पदव्युत्तर पदविकाचे नोमेनक्लेचर, श्रेयांक, कालावधी, अभ्यासक्रम आदींची माहिती ३० डिसेंबरपर्यंत अद्ययावत करायची आहे. त्यासाठी विद्यापीठाने सुविधा उपलब्ध करून दिली आहे. विद्यापीठाने दिलेल्या मुदतीत माहिती अद्ययावत न केल्यास पुढील शैक्षणिक वर्षापासून अशा अभ्यासक्रमाला मान्यता मिळणार नाही, अशा सूचना विद्यापीठ प्रशासनाने दिल्या आहेत. या निर्णयामुळे महाविद्यालयांकडून सुरू होणाऱ्या 'अॅडऑन कोर्सेस'ला व्यवस्थित स्वरूप मिळणार आहे.



**नाव पात्रता क्रेडिट कालावधी तास गुण**

- फाउंडेशन कोर्स १२वी उत्तीर्ण ०-२२ एक वर्षापर्यंत १५ तास एका क्रेडिटसाठी २५ गुण एका क्रेडिटसाठी
- अॅडव्हान्स्ड कोर्स पदवी उत्तीर्ण ०-४४ एक ते दोन वर्षे १५ तास एका क्रेडिटसाठी २५ गुण एका क्रेडिटसाठी

**चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमाचे नोमेनक्लेचर**

- नोमेनक्लेचर कालावधी क्रेडिट्स
- प्रमाणपत्र एक वर्ष २० ते २२
- डिप्लोमा दोन वर्षे ८० ते ८८
- पदवी तीन वर्षे १२० ते १३२
- पदवी (ऑनर्स किंवा रिसर्च) चार वर्षे १६० ते १७६

My Pune Edition
Dec 14, 2023 Page No. 6
newspaper.pudhari.co.in

## News Paper Clippings During December 2023

## Section: Education

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# अभिमत विद्यापीठांसाठी स्वतंत्र संकेतस्थळ

**'यूजीसी'च्या निर्णयामुळे मान्यता प्रक्रिया सुलभ, वेगवान होणे शक्य**

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** देशभरात अभिमत विद्यापीठ स्थापन करण्यासाठी, अभिमत विद्यापीठाचे अन्यत्र केंद्र सुरू करण्याची प्रक्रिया आता ऑनलाइन करण्यात आली आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) अभिमत विद्यापीठासाठी स्वतंत्र संकेतस्थळ सुरू केले असून, या संकेतस्थळामुळे संपूर्ण प्रक्रिया सुलभ आणि वेगवान होणार आहे.

देशभरात वेगवेगळ्या प्रकारची विद्यापीठे आहेत. त्यात केंद्रीय विद्यापीठ, राज्य विद्यापीठ, खासगी विद्यापीठांप्रमाणेच अभिमत विद्यापीठांचाही समावेश आहे. उच्च शिक्षण संस्थेला विद्यापीठ अनुदान आयोगाकडून अभिमत विद्यापीठाचा दर्जा दिला जातो. अभिमत विद्यापीठांना शैक्षणिक स्वायत्तता असते. अभिमत विद्यापीठे विविध विद्याशाखांमध्ये स्वतःचे अभ्यासक्रम तयार करू शकतात. आतापर्यंत अभिमत विद्यापीठ किंवा विद्यापीठाचे केंद्र स्थापन करण्यासाठी पारंपरिक पद्धतीने अर्ज करून मान्यता प्रक्रिया पूर्ण करावी लागत होती. मात्र, तंत्रज्ञानाच्या साहाय्याने ही प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबवणे शक्य असल्याने स्वतंत्र संकेतस्थळाची निर्मिती करून ते कार्यान्वित करण्यात आले आहे.

### २० पेक्षा जास्त अर्ज दाखल

अभिमत विद्यापीठांच्या ऑनलाइन प्रक्रियेत जनरल, डिस्टिक्ट, डिस्टिक्ट (न्यू) आणि ऑफ कॅम्पस अशा चार श्रेणींचा समावेश आहे. या श्रेणीअंतर्गत आतापर्यंत २०पेक्षा जास्त अर्ज दाखल झाल्याची माहिती डॉ. जोशी यांनी दिली.

यूजीसीच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या यादीनुसार सध्या देशभरात १२५ अभिमत विद्यापीठे आहेत.

अभिमत विद्यापीठाच्या संकेतस्थळाबाबत यूजीसीचे सचिव प्रा. मनीष जोशी म्हणाले, की पहिल्यांदाच अभिमत विद्यापीठांसाठी स्वतंत्र संकेतस्थळाची निर्मिती करण्यात आली आहे. अभिमत विद्यापीठ सुरू करण्यासाठी इच्छुक संस्था किंवा अन्यत्र केंद्र सुरू करण्यासाठी अभिमत विद्यापीठे संकेतस्थळाद्वारे आवश्यक कागदपत्रांसह अर्ज करू शकतात. यूजीसीने अभिमत विद्यापीठांसाठी समिती नियुक्त केली आहे. संकेतस्थळाद्वारे आलेल्या अर्जांची समितीद्वारे छाननी करून आवश्यकतेनुसार विद्यापीठाच्या ठिकाणी भेट देऊन यूजीसीला शिफारस केली जाईल. त्यानंतर मान्यता प्रक्रिया पूर्ण होईल. संकेतस्थळामुळे ही प्रक्रिया वेगवान, सुलभ आणि पारदर्शी पद्धतीने होण्यास मदत होऊ शकणार आहे.

14/12/2023 | Pune | Page : 10
Source : https://epaper.loksatta.com

## News Paper Clippings During December 2023

## Section: Education

पुढारी

# दहावी, बारावीच्या प्रात्यक्षिक परीक्षांसाठी मार्गदर्शक सूचना

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने (सीबीएसई) दहावी आणि बारावीच्या १५ फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या परीक्षांचे वेळापत्रक प्रसिद्ध केले. त्याबरोबरच आता प्रात्यक्षिक परीक्षांसाठीच्या मार्गदर्शक सूचनाही प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. प्रात्यक्षिक परीक्षेचे गुण संकेतस्थळावर भरताना शाळा, अंतर्गत परीक्षक यांनी योग्य गुण भरल्याची खात्री करून घ्यावी. गुण भरल्यानंतर त्यात सुधारणा करता येणार नसल्याचे सीबीएसईने स्पष्ट केले.

दहावी-बारावी प्रात्यक्षिक परीक्षांसाठी मार्गदर्शक सूचना सीबीएसईने संकेतस्थळावर उपलब्ध करून दिल्या आहेत. दहावी आणि बारावीच्या प्रात्यक्षिक परीक्षा १ ते १२ जानेवारी या कालावधीत घेतल्या जाणार आहेत. प्रात्यक्षिक परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक उत्तरपत्रिका विभागीय कार्यालयात पाठविण्याची गरज नाही. सर्व प्रात्यक्षिक परीक्षांचे गुण परीक्षेच्या तारखांपासून एकाच वेळी भरले जाणार आहेत. संकेतस्थळावर गुण भरण्याचे करण्याचे काम संबंधित वर्गाच्या प्रात्यक्षिक परीक्षेच्या शेवटच्या तारखेपर्यंत पूर्ण केले जाईल. प्रत्येक शाळेत प्रात्यक्षिक परीक्षा आणि विशिष्ट विषयांच्या प्रकल्प मूल्यमापनासाठी बाह्य परीक्षक सीबीएसईकडूनच नियुक्त केले जाणार असून, स्थानिक पातळीवर बाह्य परीक्षकांसाठी पर्यायी व्यवस्था करण्याची शाळांना परवानगी नाही. प्रात्यक्षिक परीक्षेनंतर शाळांना प्रत्येक बॅचचे विद्यार्थी, शिक्षक, अंतर्गत परीक्षक, बाह्य परीक्षक या सर्वांचे चेहरे स्पष्ट दिसतील असे छायाचित्र संकेतस्थळावर द्यावे लागणार आहे. त्यासह वेळ, दिनांक ही माहिती द्यावी लागणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

**गुण भरल्यानंतर सुधारणा करता येणार नसल्याचे सीबीएसईचे स्पष्टीकरण**

Pune Edition
Dec 14, 2023 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

## News Paper Clippings During December 2023

## Section: Education

सकाळ

पुणे | पुणे | मुंबई | कोल्हापूर | नाशिक | छत्रपती संभाजीनगर | सोलापूर | नागपूर | सातारा | जळगाव | नांदेड | अकोला | सांगली | अहमदनगर येथून प्रसिद्ध

SakalNews @SakalMediaNews www.esakal.com 9225 800 800

सकाळ

भारतीय निर्देशांकांनी गाठली विक्रमी उंची

शुक्रवार, १५ डिसेंबर २०२३

किंमत ₹ ६ ● आजचा अंक : पुणे शहर, पिंपरी-चिंचवड : पाने २८ (२ पानी जॅकेट +२ पानी जॅकेट +२ पानी जॅकेट +१०+२ पानी जॅकेट +२ पानी जॅकेट +८)

### पंतप्रधानांकडून पुणेकरांचे कौतुक

'शांतता...पुणेकर वाचत आहेत' आणि 'पालकांनी आपल्या पाल्यांना गोष्टी सांगायच्या' असे दोन उपक्रम पुणेकरांच्या लोकसहभागातून झाले. या उपक्रमांचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'एक्स'वर कौतुक केले. याबद्दल 'पुणे पुस्तक महोत्सवाचे' संयोजक राजेश पांडे यांनी त्यांचे आभार मानले. नॅशनल बुक ट्रस्टने आपल्या 'एक्स' हॅंडलवर उपक्रमांची माहिती व छायाचित्रे ट्विट केली. ती पंतप्रधानांनी शेअर करत "वाचनाचा आनंद पोहोचवण्यासाठी उत्तम प्रयत्न केले आहेत. या प्रयत्नांमध्ये सहभागी झालेल्या सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन," अशा शुभेच्छा दिल्या. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत एका गुगल फॉर्मवर नागरिकांनी आपला प्रतिसाद नोंदवला. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी मिलिंद वेर्लेकर, डॉ. संजय चाकणे, प्रसेनजित फडणवीस, राहुल पाखरे आदींनी परिश्रम घेतले.

दरम्यान, पंतप्रधानांच्या 'मन की बात' कार्यक्रमातून वाचनाची प्रेरणा घेऊन आजच्या गिनीज रेकॉर्डची संकल्पना आकाराला आली. पंतप्रधानांनी उपक्रमांची दखल घेतली, ही पुणेकरांसाठी अभिमानाची बाब आहे, असे महोत्सवाचे संयोजक पांडे आणि राष्ट्रीय पुस्तक न्यासाचे संचालक युवराज मलिक यांनी सांगितले.



पुणे : 'राष्ट्रीय पुस्तक न्यासा'तर्फे आयोजित पुणे पुस्तक महोत्सवानिमित्त पुणे महापालिकेने गुरुवारी सर परशुरामभाऊ महाविद्यालयाच्या मैदानात 'पालकांनी आपल्या पाल्यांना गोष्टी सांगायच्या' हा उपक्रम आयोजित केला होता. यात तब्बल तीन हजार ६६ पालक सहभागी झाले होते. यानिमित्ताने भारताने चीनचा विश्वविक्रम मोडून काढत नवा विक्रम प्रस्थापित केला आहे.

### पालकांनी पाल्यांना गोष्टी सांगण्याचा उपक्रम; उत्साहपूर्ण वातावरणात वाचन

# पुण्यात नोंदविला नवा विश्वविक्रम




पुणे, ता. १४ : वेळ सकाळी नऊ-दहाची...एकामागोमाग पालक आणि मुले मैदानावर जमली. पालकांनी गोष्टींची पुस्तके हातात घेतली अन् मोठ्या उत्सुकतेने त्यातील गोष्टी आपल्यासमोर बसलेल्या मुलांना वाचून दाखविल्या. या प्रकारे एकाच वेळी तीन ते पाच मिनिटे एकत्रित पुस्तक वाचनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात झाला. 'पालकांनी आपल्या पाल्यांना गोष्टी सांगायच्या' उपक्रमात तब्बल तीन हजार ६६ पालक सहभागी झाले होते. पालक आणि विद्यार्थ्यांच्या साक्षीने भारताने चीनचा विश्वविक्रम मोडून नवा विश्वविक्रम नोंदविला.

राष्ट्रीय पुस्तक न्यासातर्फे आयोजित पुणे पुस्तक महोत्सवानिमित्त पुणे महापालिकेने सर परशुरामभाऊ महाविद्यालयाच्या मैदानात 'पालकांनी आपल्या पाल्यांना गोष्टी सांगायच्या' उपक्रम गुरुवारी (ता. १४) आयोजित केला होता. उपक्रमाच्या विश्वविक्रमाची नोंद झाल्यानंतर ढोल-ताशांचा गजर आणि देशभक्तीपर गीते सादर करून आनंदोत्सव साजरा केला. यावेळी महापालिका आयुक्त विक्रम कुमार, अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, उद्योजक जय काकडे, शिक्षण प्रसारक मंडळीच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष ॲड. एस. के. जैन, खडकी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल, न्यासाचे संचालक युवराज मलिक, अभिनेत्री प्राजक्ता माळी, संयोजक राजेश पांडे, माजी महापौर मुरलीधर मोहोळ, प्रसेनजित फडणवीस, राहुल पाखरे, भाग्यश्री मंठाळकर आदी उपस्थित होते.

वाचन संस्कृतीला चालना देण्यासाठी गुरुवारी सकाळी दहाच्या सुमारास तीन हजारांहून अधिक पालक आणि पाल्य मैदानावर आले होते. पालकांनी पाल्यांना क्षिप्रा शहाणे यांनी लिहिलेल्या 'निसर्गाचा नाश करू नका' पुस्तकातील धड्याचे सलग तीन मिनिटे वाचन केले. त्याची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डच्या अधिकाऱ्यांनी नवा विश्वविक्रम भारताच्या नावाने प्रस्थापित केल्याचे जाहीर केले. त्यानंतर मैदानावर जल्लोष झाला. उपक्रमाला उद्योजक सूर्यकांत काकडे यांचे सहकार्य लाभले. प्राजक्ता माळी यांनी मुले-मुली आणि पालकांना वाचन करण्यासंदर्भात मार्गदर्शन केले. यावेळी चैतन्य कुलकर्णी यांनी मराठी गीतांचा कार्यक्रम सादर केला. डॉ. संजय चाकणे आणि मिलिंद कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले.

#### चीनचा रेकॉर्ड मोडला...

- 'पालकांनी आपल्या पाल्यांना गोष्टी सांगायच्या' उपक्रमाचा विश्वविक्रम यापूर्वी चीनच्या नावावर होता. चीनमध्ये आठ वर्षांपूर्वी दोन हजार ४७९ पालकांनी एकाच वेळी पाल्यांना गोष्टी सांगितल्या. त्यानंतर गुरुवारी स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर तीन हजार ६६ पालकांनी एकत्रित येत पाल्यांना गोष्टी वाचून चीनचा विक्रम मोडीत काढून नवा विश्वविक्रम नोंदविला.




Pune, Main
15/12/2023 Page No. 101

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

आशिष काळे



'पालकांनी आपल्या पाल्यांना गोष्टी सांगायच्या' या उपक्रमात स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर ३०६६ जणांनी सहभाग घेतला.

# विश्वविक्रमाची यशस्वी 'गोष्ट'

## उपक्रमात ३०६६ जणांचा सहभाग

**पुणे पुस्तक महोत्सव**

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर गुरुवारी सकाळी आयोजित केलेल्या 'पालकांनी आपल्या पाल्यांना गोष्टी सांगायच्या' या उपक्रमात तीन हजार ६६ पालकांनी सहभागी होऊन, आपल्या पाल्यांना सलग चार मिनिटे गोष्ट सांगितली. ही गोष्ट पूर्ण होताच पालकांनी पाल्यांना गोष्ट सांगण्याचा चीनचा रेकॉर्ड मोडून नवा विश्वविक्रम प्रस्थापित केला. त्यानंतर ढोल-ताशांच्या गजरात आणि देशभक्तिपर गीतांवर आनंदोत्सव साजरा झाला.

राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या वतीने (नॅशनल बुक ट्रस्ट) फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर १६ ते २४ डिसेंबर या कालावधीत पुणे पुस्तक महोत्सव होत आहे. या महोत्सवाच्या निमित्ताने पुणे महापालिकेने पालकांनी आपल्या पाल्यांना गोष्टी सांगायच्या उपक्रमाचे आयोजन केले होते. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून महापालिका आयुक्त विक्रमकुमार, अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे, सवित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, उद्योजक जय काकडे, अॅड. एस. के. जैन, खडकी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल, न्यासाचे संचालक युवराज मलिक, अभिनेत्री प्राजक्ता माळी, संयोजक राजेश पांडे, माजी महापौर मुरलीधर मोहोळ, प्रसेनजित फडणवीस, राहुल पाखरे, बागेश्री मंठाळकर आदी उपस्थित होते.

सकाळी दहाच्या सुमारास ३,२००पेक्षा अधिक पालक आणि त्यांच्या पाल्यांनी सहभाग नोंदवला. पालकांनी क्षिप्रा शहाणे यांनी लिहिलेल्या 'निसर्गाचा नाश करू नका' या पुस्तकातील धड्याचे सलग तीन मिनिटे वाचन केले. या वेळी गिनेस बुक रेकॉर्डच्या अधिकाऱ्यांनी हा नवा विश्वविक्रम भारताच्या नावाने प्रस्थापित केल्याचे जाहीर केले. या संपूर्ण उपक्रमाला उद्योजक सूर्यकांत काकडे यांचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन प्राचार्य डॉ. संजय चाकणे आणि मिलिंद कुलकर्णी यांनी केले.

> "मुलांना वाचनाची गोडी लागण्याच्या दृष्टीने चांगला उपक्रम आहे. माझा मुलगा लहानपणीपासून वाचतो. या उपक्रमाच्या निमित्ताने गोष्ट सांगून रेकॉर्डमध्ये सहभागी होता आले.
>
> – शलाका शिराळकर, पालक

> पालकांकडून गोष्ट ऐकण्याचा उपक्रम चांगला आहे. वाचनाची आवड असल्याने, पुस्तके वाचली आहे. या उपक्रमात आठवीच्या मुलांच्या दृष्टीने पुस्तके दिली असती, तर आणखी आनंद झाला असता.
>
> – ओजस शिराळकर, आठवीतील विद्यार्थी

### आधीचा विक्रम चीनमध्ये

'पालकांनी आपल्या पाल्यांना गोष्टी सांगायच्या' या उपक्रमाचा यापूर्वीचा विश्वविक्रम चीनच्या नावावर होता. चीनमध्ये आठ वर्षांपूर्वी दोन हजार ४७९ पालकांनी एकाच वेळी पाल्यांना गोष्टी सांगितल्या.

### पंतप्रधानांकडून कौतुक

**पुणे :** 'बालक-पालक : पालकांनी आपल्या पाल्यांना गोष्टी सांगायच्या' उपक्रमाची नोंद गिनेस बुक ऑफ रेकॉर्डसमध्ये झाल्याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्वीट करून पुणेकरांचे अभिनंदन केले आहे. या उपक्रमाबाबत राष्ट्रीय पुस्तक न्यासाने 'एक्स' हँडलवर ही माहिती दिली. ही पोस्ट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शेअर केली. ही अभिमानास्पद गोष्ट असल्याचे संयोजक राजेश पांडे यांनी सांगितले.

### ज्ञानसरिता ग्रंथ दिंडीचे आयोजन

पुणे पुस्तक महोत्सवाच्या निमित्ताने आज, शुक्रवारी, १५ डिसेंबर रोजी ज्ञानसरिता ग्रंथ दिंडीचे आयोजन करण्यात आले आहे. या दिंडीची सुरुवात दुपारी दीड वाजता आबासाहेब गरवारे महाविद्यालयापासून होणार असून, या दिंडीमध्ये पुणे जिल्ह्याच्या विविध ३० ठिकाणांहून महापुरुष आणि संतांच्या दिंड्या सहभागी होतील,' असे प्राचार्य डॉ. संजय चाकणे यांनी सांगितले.

### आज पुस्तकांतून 'भारत'

**पुणे :** पुणे पुस्तक महोत्सवानिमित्त फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी एकत्र येऊन शुक्रवारी 'भारत' हा शब्द हजारो पुस्तकांच्या माध्यमातून लिहिणार आहेत.

यामध्ये खडकी शिक्षण संस्थेने पुढाकार घेतला आहे. पुण्याच्या वाचन परंपरेला पुढे घेऊन जाण्यासाठी आमच्या संस्थेचे योगदान महत्त्वपूर्ण राहील,' अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल आणि संस्थेचे सचिव आनंद छाजेड यांनी दिली.

## श्शू! आम्ही पुस्तक वाचतोय...

**पुणे :** वाचनाची अवड निर्माण करण्यासाठी गुरुवारी राबविण्यात आलेल्या, 'शांतता... पुणेकर वाचत आहेत' या उपक्रमाला पुणेकरांनी भरभरून प्रतिसाद दिला. हा उपक्रम पुणे शहरात विविध चौकात, सरकारी-खासगी कार्यालये, महापालिकेचे क्षेत्रीय कार्यालये, रिक्षा थांब्यांवर, शाळा-महाविद्यालयांमध्ये उत्स्फूर्तपणे राबविण्यात आला. या उपक्रमात दोन लाख जणांनी सहभाग घेतला.

राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या (नॅशनल बुक ट्रस्ट) वतीने आयोजित पुणे पुस्तक महोत्सव १६ ते २४ डिसेंबर दरम्यान होणार आहे. या महोत्सवाच्या अनुषंगाने गुरुवारी आयोजित या उपक्रमाला शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, सामाजिक संस्था, सरकारी आणि खासगी कार्यालये, महापालिकेचे क्षेत्रीय कार्यालये, खासगी आस्थापनांमध्ये मोठा प्रतिसाद मिळाला. त्यात पुणेकरांनी दुपारी १२ ते १ दरम्यान त्यांच्या आवडीच्या पुस्तकाचे वाचन केले. फर्ग्युसन महाविद्यालयाच्या आवारात सुमारे ५०० जणांनी आवडीचे पुस्तक वाचत सहभाग नोंदवला.

### मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री सहभागी

नागपूर येथे सुरू असलेल्या विधिमंडळ अधिवेशनाच्या कामकाजातून वेळ काढून विधानसभेचे अध्यक्ष अॅड. राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह अनेक मान्यवर या उपक्रमात सहभागी झाले.

ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, शिक्षण आयुक्त सूरज मांढरे, कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, शिक्षणतज्ज्ञ डॉ. अनिरुद्ध देशपांडे उपक्रमात सहभागी होते. 'अशा उपक्रमांनीच नवी पिढी वाचनाकडे वळणार आहे. तसेच, वाचन संस्कृतीचे संवर्धन होण्यास मदत होणार आहे,' असे महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे यांनी सांगितले.

स्वप्नील शिंदे



'शांतता... पुणेकर वाचत आहेत' या उपक्रमामध्ये अनेक शाळांतील विद्यार्थ्यांनीही सहभाग घेतला.

Maharashtra Times 15.12.2023

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

लोकमत

### पुणे महापालिकेच्या उपक्रमाची 'गिनिज बुक'मध्ये नोंद; तीन हजार गोष्टी सांगत मोडला चीनचा रेकॉर्ड

# गोष्टी ऐकवण्यातही पुणेकर जगात भारीच!

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : आजी-आजोबाच्या तोंडून लहानग्यांना सांगण्यात येणाऱ्या गोष्टी त्यांच्या आयुष्यभर लक्षात राहतात. हाच धागा पकडून पुणे महापालिकेने आयोजित केलेल्या 'पालकांनी आपल्या पाल्यांना गोष्टी सांगायच्या' या उपक्रमाची नोंद आज गिनिज बुक रेकॉर्डसमध्ये केली गेली. स.प. महाविद्यालयाच्या मैदानावर पार पडलेल्या या उपक्रमात तब्बल ३ हजार ६६ पालकांनी सहभाग घेऊन आपल्या मुलांना गोष्टी सांगितल्या. आपल्या पाल्यांना गोष्ट सांगण्याचा यापूर्वीचा चीनचा रेकॉर्ड मोडत नवा विश्वविक्रम भारताने प्रस्थापित केला. महापालिकेच्या पुढाकारातून आयोजित या उपक्रमाची नोंद विश्वविक्रमात होताच ढोल-ताशांच्या गजरात आणि देशभक्तिपर गीतांवर एकच जल्लोष करण्यात आला.

मुलांमधील वाचन संस्कृती वाढावी, म्हणून हजारो पालकांनी एकत्र येत आपल्या पाल्यांना गुरुवारी सकाळी आठ वाजता स.प. महाविद्यालयाच्या मैदानावर गोष्टी सांगितल्या. पुणे महापालिकेतर्फे आयोजित या उपक्रमाची नोंद गिनिज बुक रेकॉर्डस्मध्ये केली जाणार होती. शिक्षणाचे माहेरघर असणाऱ्या पुणे शहरात 'वर्ल्ड बुक कॅपिटल' होण्याची क्षमता असल्याचे या उपक्रमातून अधोरेखित होणार होते. त्यामुळे या विश्वविक्रमाच्या निमित्ताने युनेस्कोचे निकष पूर्ण करण्याचा महापालिकेकडून जोरदार प्रयत्न केला गेला. यास राष्ट्रीय पुस्तक न्यास (नॅशनल बुक ट्रस्ट) यांचेही सहकार्य लाभले. या उपक्रमात पुणे महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. त्याचबरोबर डेक्कन एज्युकेशन सोसायटी, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीसह अनेक शिक्षण संस्थांतील विद्यार्थ्यांनीही आपल्या पालकांसह सहभाग नोंदविला.

अभिनेत्री प्राजक्ता माळी यांनी उपस्थित मुलांना मार्गदर्शन करीत त्यांना वाचन करण्याची प्रेरणा दिली. यावेळी चैतन्य कुलकर्णी यांनी मराठी गीतांच्या सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सूत्रसंचालन प्राचार्य डॉ. संजय चाकणे आणि मिलिंद कुलकर्णी यांनी केले.



### सकाळीच मुलांसह पालकांची गर्दी

स.प. महाविद्यालयाच्या मैदानावर सकाळी आठ वाजता सुरु झालेल्या या उपक्रमाचा श्रीगणेशा महापालिकेचे आयुक्त विक्रम कुमार, अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थित झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, उद्योजक संजय काकडे, ॲड. एस.के. जैन, पुणे पुस्तक महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे, खडकी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल, न्यासाचे संचालक युवराज मलिक, अभिनेत्री प्राजक्ता माळी, माजी महापौर मुरलीधर मोहोळ, प्रसेनजित फडणवीस, राहुल पाखरे, भाग्यश्री मंठाळकर आदी उपस्थित होते.



### मैदानावर जल्लोष

महापालिकेच्या वतीने आयोजित या विश्वविक्रमासाठी दहा हजार खुर्च्या स.प. महाविद्यालयाच्या मैदानात मांडल्या होत्या. 'पालकांनी आपल्या पाल्यांना गोष्टी सांगायच्या' या उपक्रमात ३ हजार ६६ पालकांनी सहभागी होत, त्यांनी आपल्या पाल्यांना सलग चार मिनिटे गोष्ट सांगितली व यापूर्वीच्या चीनच्या नावे असलेल्या विश्वविक्रमाला मागे टाकून नवा विश्वविक्रम प्रस्थापित केला. चीनमध्ये आठ वर्षांपूर्वी म्हणजेच २०१५ मध्ये २ हजार ४७१ पालकांनी आपल्या पाल्यांसाठी एकत्र येत गोष्टींचे वाचन केले होते. उपक्रमात क्षिप्रा शहाणे यांनी लिहिलेल्या 'निसर्गाचा नाश करू नका' या पुस्तकातील धड्याचे सलग तीन मिनिटे वाचन केले. यावेळी गिनिज बुक रेकॉर्डच्या अधिकाऱ्यांनी 'पालकांनी आपल्या पाल्यांना गोष्टी सांगायच्या' हा विश्वविक्रम भारताच्या नावावर नोंद झाल्याचे जाहीर केले आणि मैदानावर एकच जल्लोष झाला. विश्वविक्रमानंतर पालक आणि मुलांनी वंदे मातरम, भारत माता की जय, अशा घोषणा देत आनंदोत्सव साजरा केला.

Hello Pune
Page No. 7 Dec 15, 2023
Powered by: erelego.com

## News Paper Clippings During December 2023

## Section: Education

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# पालकांनी मुलांना गोष्ट सांगण्याच्या नव्या विश्वविक्रमाची नोंद

### चीनमध्ये नोंदवला गेलेला आठ वर्षांपूर्वीचा विक्रम मोडीत

**पंतप्रधानांकडून विश्वविक्रमाची दखल**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुण्यात नोंदवल्या गेलेल्या विश्वविक्रमाची दखल समाजमाध्यमाद्वारे घेतली. वाचनाचा आनंद पोहोचवण्यासाठीचे प्रयत्न कौतुकास्पद असल्याचे पंतप्रधानांनी नमूद केले.



**'शांतता... पुणेकर वाचत आहेत' उपक्रमाला प्रतिसाद**

महोत्सवाअंतर्गत आयोजित 'शांतता... पुणेकर वाचत आहेत' हा उपक्रम शहरात ठिकठिकाणी राबवण्यात आला. शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, सामाजिक संस्था, शासकीय कार्यालये, महापालिकेची क्षेत्रिय कार्यालये, खासगी आस्थापनांमध्ये प्रतिसाद मिळाला. दुपारी बारा ते एक या वेळेत आवडीच्या पुस्तकाचे वाचन करण्यात आले. त्याशिवाय विधीमंडळ अधिवेशनाच्या कामातून वेळ काढत विधानसभेचे सभापती राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासह अनेक मान्यवरांनीही उपक्रमात सहभाग घेतला. पुणे पुस्तक महोत्सव फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर १६ ते २४ डिसेंबर या कालावधीत होत आहे. या महोत्सवात विविध भाषांतील पुस्तकांच्या दोनशे दालनांच्या प्रदर्शनासह विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

**पुणे :** सूचना देण्यात आल्यानंतर घड्याळ सुरू झाले अन् स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर शांतता पसरली... सर्व तपासणी पूर्ण करून पालकांनी मुलांना गोष्ट सांगण्याचा नवा विश्वविक्रम भारताच्या नावे नोंदवला गेल्याचे जाहीर करण्यात आले. या उपक्रमातून चीनमध्ये नोंदवला गेलेला आठ वर्षांपूर्वीचा विक्रम मोडीत काढण्यात आला.

वाचन संस्कृतीला चालना देण्यासाठी राष्ट्रीय पुस्तक न्यासातर्फे आयोजित पुणे पुस्तक महोत्सवाअंतर्गत पुणे महापालिकेने स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर 'पालकांनी आपल्या पाल्यांना गोष्ट सांगणे' हा उपक्रम गुरुवारी आयोजित केला होता. महापालिका आयुक्त विक्रम कुमार, अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, उद्योजक जय काकडे, अॅड. एस. के. जैन, खडकी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल, न्यासाचे संचालक युवराज मलिक, अभिनेत्री प्राजक्ता माळी, संयोजक राजेश पांडे, माजी महापौर मुरलीधर मोहोळ, प्रसेनजित फडणवीस, राहुल पाखरे, भाग्यश्री मंठाळकर, जगदीश मुळीक या वेळी उपस्थित होते.

उपक्रमात क्षिप्रा शहाणे यांनी लिहिलेल्या 'निसर्गाचा नाश करू नका' ही गोष्ट पालकांनी आपल्या मुलांना सलग तीन मिनिटे वाचून दाखवली. ३ हजार ६६ पालकांनी या उपक्रमात सहभाग घेतला. त्यानंतर 'गिनेस बुक'च्या अधिकाऱ्यांनी तपासणी करून विश्वविक्रमांची नोंद झाल्याचे जाहीर करताच घोषणा देऊन आनंद साजरा करण्यात आला. चीनमध्ये आठ वर्षांपूर्वी दोन हजार ४७९ पालकांनी एकाचवेळी आपल्या पाल्यांना गोष्टी सांगून विश्वविक्रम नोंदवला होता. आता नवा विश्वविक्रम पुण्यात नोंदवला गेला आहे.

15/12/2023 | Pune | Page : 05
Source : https://epaper.loksatta.com

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

सकाळ

पुणे पुस्तक महोत्सव
16 ते 24 डिसेंबर, 2023

# पुणेकर रमले वाचनात

## उपक्रमाला भरघोस प्रतिसाद; मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्याचाही सहभाग

**पुणे, ता. १४ :** विविध चौक, ग्रंथालये, रिक्षा थांबे, सरकारी-खासगी कार्यालये व शाळा-महाविद्यालयांत वाचन करत पुणेकरांनी 'शांतता... पुणेकर वाचत आहेत' उपक्रमाला भरघोस प्रतिसाद दिला.

राष्ट्रीय पुस्तक न्यासातर्फे आयोजित पुणे पुस्तक महोत्सवाच्या माध्यमातून वाचन संस्कृतीला चालना मिळावी, या उद्देशाने शहरात 'शांतता... पुणेकर वाचत आहेत' उपक्रम गुरुवारी (ता. १४) राबविण्यात आला. याशिवाय नागपूर येथे सुरू असलेल्या विधिमंडळ अधिवेशनाच्या कामकाजातून वेळ काढत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानसभेचे सभापती ॲड. राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह अनेक मान्यवरांनीही पुस्तक वाचन करून सहभाग नोंदविला. अनेकांनी सोशल मीडियावर पुस्तक वाचतानाची छायाचित्रे प्रसिद्ध केली.

उपक्रमाला शाळा-महाविद्यालये, विद्यापीठे, सामाजिक संस्था, सरकारी आणि खासगी कार्यालये, महापालिकेचे क्षेत्रीय कार्यालये, गणेशोत्सव मंडळे यांतून लक्षणीय प्रतिसाद मिळाला. याअंतर्गत नागरिकांनी गुरुवारी दुपारी बारा ते एकदरम्यान त्यांच्या आवडीच्या पुस्तकाचे वाचन केले. फर्ग्युसन महाविद्यालयाच्या आवारातही विद्यार्थ्यांनी आवडीचे पुस्तक वाचण्याचा आनंद घेतला. महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे म्हणाले, "वाचन संस्कृती जोपासणाऱ्या अशा उपक्रमांनी नवी पिढी वाचनाकडे वळणार आहे. वाचन संस्कृतीचे संवर्धन होण्यास मदत होणार आहे." शालेय विद्यार्थी, शिक्षक, पालकांसह अधिकारी, राजकीय नेते, विविध क्षेत्रांतील मान्यवरही उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते.



**फर्ग्युसन महाविद्यालय, ॲम्फी थिएटर :** पुणे पुस्तक महोत्सवांतर्गत 'शांतता... पुणेकर वाचत आहेत' उपक्रमात शालेय विद्यार्थ्यांनी पुस्तक वाचनाचा आनंद घेतला.

### विद्यार्थी म्हणतात...

- **भक्ती खोत :** 'वाचाल तर वाचाल' हे खरे आहे. आपण पुस्तके वाचली पाहिजेत, त्यातून आपल्याला अधिकाधिक माहिती मिळते. पुस्तक वाचताना कुतूहल जागृत होते.
- **पिहू ठाकूर :** मला पुस्तक वाचायला आवडते. त्यातून प्रेरणा मिळते. पुस्तक हे आपले मित्र बनू शकतात.
- **अबुसाद चौधरी :** मला विज्ञानातील कुतूहल उलगडणारी पुस्तके वाचायला आवडतात. त्यातून विज्ञानातील गमतीजमती, माहिती मिळते.



**कोथरूड :** पुस्तक वाचन उपक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी (डावीकडून) दीपाली चौधरी, राहुल सोलापूरकर, राजेश पांडे, प्रसाद मिरासदार, माधव गोखले आणि मान्यवर उपस्थित होते.

# वाचनप्रेमींच्या उपस्थितीत अभिवाचन

**पुणे, ता. १४ :** पुस्तक दालनातील आपल्या आवडीचे पुस्तक हातात घेणे...अन् त्या पुस्तकाचे वाचनप्रेमींच्या उपस्थितीत केलेले अभिवाचन... त्याला मिळालेली टाळ्यांच्या कडकडाटाची दाद अशा उत्स्फूर्त वातावरणात 'शांतता...पुणेकर वाचत आहेत' उपक्रम राबविण्यात आला.

'सकाळ प्रकाशन, भावार्थ पुस्तक प्रदर्शन आणि बरेच काही...' उपक्रमाचे उद्घाटन गुरुवारी कोथरूड येथील भावार्थ या पुस्तक दालनात झाले. या वेळी अभिनेते राहुल सोलापूरकर, 'स्टोरीटेल'चे प्रसाद मिरासदार, सकाळ प्रकाशनाच्या संपादक दीपाली चौधरी, 'साप्ताहिक सकाळ'चे संपादक माधव गोखले, पुणे पुस्तक महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे उपस्थित होते. राष्ट्रीय पुस्तक न्यास यांच्यातर्फे पुण्यात १६ ते २४ डिसेंबरदरम्यान पुस्तक महोत्सव होत आहे. याअंतर्गत 'शांतता... पुणेकर वाचत आहेत' हा उपक्रम गुरुवारी राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत भावार्थ पुस्तक दालनातही पुस्तकांच्या अभिवाचनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सोलापूरकर, अनिरुद्ध दडके, तनुजा रहाणे यांनी या वेळी अभिवाचन केले.

### मोहोळ महाविद्यालयात वाचनाचा जागर

**कोथरूड :** पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या मामासाहेब मोहोळ महाविद्यालयात दुपारी बारा ते एक दरम्यान 'शांतता... पुणेकर वाचत आहेत' उपक्रम घेण्यात आला. यामध्ये विद्यार्थी व प्राध्यापक सहभागी झाले होते. प्राचार्य डॉ. महेंद्र अवघडे, डॉ. श्रीनिवास इपलपल्ली, डॉ. अशोक शेळके, डॉ. शोभा तितर, ग्रंथपाल डॉ. तुषार दिलपाक, संजय कुंभार, कार्यालयप्रमुख विनोद रणपिसे उपस्थित होते.

Pune, Main
15/12/2023 Page No. 202

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

# Reading session at Pune book festival sets world record

Ashish Gupta



Over 3,000 people participate on the first day of Pune book festival

Ashish.Gupta
@timesgroup.com

**Pune:** In a display of literary fervour, the Pune Book Festival 2023 began on a note of extraordinary achievement which brought together families and secured a position in the Guinness World Records.

The expansive SP College grounds on Tilak Road bore witness to a record-breaking gathering of 3,066 participants, surpassing the previous record for the 'most parents reading to their children.'

The focal point of the literary spectacle was the collective endeavour of parents and children engrossed in a synchronised reading of 'Nisargacha Nash Karu Naka' (Do not destroy nature) by Kshipra Shahane. The four-minute reading session unfolded as voices resonated with the joy of shared storytelling beneath the open sky.

Swapnil Dangarikar, serving as the official adjudicator at Guinness World Records, was present to witness and authenticate the historic achievement. Dangarikar officially declared that the parents and their children had "undeniably set a Guinness World Record."

The previous record stood at 2,479 parents reading to their children simultaneously, a milestone achieved by Shenyang McDonald's (restaurants food) Co Ltd in China on October 17, 2015. Pune's triumphant gathering surpassed the number.

Participant Shila Narkar, mother to Neelam, said, "The experience goes beyond the numbers. It's about building a tradition of shared stories and creating lasting memories with our children."

Participant Kula Kondkar said, "The event showcases how literature has the power to bring people together."

The Times of India 16.12.2023

## *News Paper Clippings During December 2023*

### *Section: Ed-*

प्रभात

# ७,५०० पुस्तकांनी लिहिला 'भारत' शब्द

## पुणे पुस्तक महोत्सवात विश्वविक्रम

Book Your Visit...

पुणे पुस्तक महोत्सव

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १५ -** पुणे पुस्तक महोत्सवाच्या निमित्ताने भारत हा शब्द सुमारे ७,५०० पुस्तकांनी लिहून, सौदी अरेबियाचा रेकॉर्ड मोडण्यात आला आहे. त्यामुळे पुण्यात भारत शब्दाने विश्वविक्रमाला गवसणी घातली आहे.

यावेळी नॅशनल बुक ट्रस्टचे अध्यक्ष मिलिंद मराठे, संचालक युवराज मलिक, महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे, भाजप नेते माधव भांडारी, उद्योजक कृष्णकुमार गोयल, आनंद छाजेड, प्रसेनजित फडणवीस, बागेश्री मंठाळकर, राहुल पाखरे, प्राचार्य डॉ. संजय चाकणे यांच्यासह पुस्तकप्रेमी उपस्थित होते.

गिनिज बुक ऑफ रेकॉर्डचे अधिकारी स्वप्नील डांगरिकर यांनी घोषणा केल्यानंतर, विद्यार्थी व प्राध्यापकासह उपस्थित पुणेकरांनी आकाशात फुगे उडवून जल्लोष साजरा केला.

**■ ग्रंथ दिंडीत विद्यार्थी उत्स्फूर्तपणे सहभागी**

पुस्तक महोत्वसाच्या पूर्वदिनी गरवारे महाविद्यालय ते फर्गसन महाविद्यालयादरम्यान ज्ञान सरिता ग्रंथ दिंडी काढण्यात आली. ढोल-ताशा, टाळ मृदुंगाच्या साथीने झालेल्या या ग्रंथदिंडीमध्ये पुणे शहर, जिल्ह्यातील ३० महाविद्यालयांतील विद्यार्थी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले. लोकसेवा ई स्कूलच्या विद्यार्थ्यांनी 'चला चला रे वाचू आपण पुस्तक, ज्ञानापुढे होऊ नतमस्तक' असा संदेश देत बालभारती ते फर्गसन महाविद्यालय मार्गावर बाल साहित्य दिंडी काढण्यात आली.

**महोत्सवाचे आज उद्घाटन**

पुणे पुस्तक महोत्सव दि. १६ ते २४ डिसेंबर या कालावधीत फर्गसन महाविद्यालयाच्या मैदानावर होत आहे. त्याचे उद्घाटन शनिवारी (दि.१६) सायंकाळी चार वाजता उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील आणि ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते होईल. यावेळी अधिकाधिक पुणेकरांनी पस्थित राहून महोत्सवाची शोभा वाढवावी, असे आवाहन महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे यांनी केले.

PuneCity, 16 Dec 2023, Page:005
https://epaper.dainikprabhat.com



फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर 'भारत' हा शब्द सुमारे ७ हजार ५०० पुस्तकांनी साकारला आहे.

# साडेसात हजार पुस्तकांनी साकारला 'भारत'

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या वतीने १६ ते २४ डिसेंबर या कालावधीत फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर पुणे पुस्तक महोत्सव होत आहे. या महोत्सवाच्या निमित्ताने 'भारत' हा शब्द सुमारे ७५०० पुस्तकांनी लिहून, सौदी अरेबियाचा रेकॉर्ड मोडण्यात आला आहे. त्यामुळे पुण्यात 'भारत' शब्दाने विश्वविक्रमाला गवसणी घातली आहे. या विश्वविक्रमानंतर आकाशात फुगे सोडून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

**पुण्यात 'भारत' शब्दाने विश्वविक्रमाला गवसणी**

या वेळी नॅशनल बुक ट्रस्टचे अध्यक्ष मिलिंद मराठे, संचालक युवराज मलिक, महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे, भाजप नेते माधव भांडारी, उद्योजक कृष्णकुमार गोयल, आनंद छाजेड, प्रसेनजित फडणवीस, बागेश्री मंठाळकर, राहुल पाखरे, प्राचार्य डॉ. संजय चाकणे आदी उपस्थित होते. पुणे पुस्तक महोत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात असून, आज शनिवारपासून त्याची सुरुवात होणार आहे.

त्या अनुषंगाने शुक्रवारी फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर 'भारत' हा शब्द सुमारे ७ हजार ५०० पुस्तकांच्या साहाय्याने लिहिण्यात आला. हा शब्द लिहिल्यानंतर, भारताने सौदी अरेबियाचा सात हजार १९१ पुस्तकांचा रेकॉर्ड मोडला. गिनीज बुक ऑफ रेकॉर्डचे अधिकारी स्वप्निल डांगरिकर यांनी घोषण केल्यानंतर, विद्यार्थी, प्राध्यापकासह उपस्थित पुणेकरांनी जल्लोष साजरा केला.

"पुणे पुस्तक महोत्सव हा पुणेकरांचा महोत्सव आहे. त्यामुळे त्यात अधिकाधिक विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षक, प्राचार्य आणि नागरिकांनी सहभागी व्हायचे आहे. पुणे हे शिक्षणाचे माहेरघर आहे. त्याला आता पुस्तकांची जोड मिळाली आहे. त्यामुळे पुढील काळात पुणे पुस्तकांचे शहर म्हणून नावारूपाला येईल.

- **युवराज मलिक,** संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट.

"आपल्या भारताला पुढे नेण्यासाठी पुस्तकांच्या माध्यमातून काम करायचे आहे. पुस्तकांच्या माध्यमातून भारताला ओळखायचे आहे, जाणून घ्यायचे आहे, भारताला समजायचे आहे आणि भारताला तयार करण्यासाठी काम करायचे आहे. त्याचाच एक भाग म्हणून पुणे पुस्तक महोत्सवाला यशस्वी करायचे आहे.

**मिलिंद मराठे,** अध्यक्ष, नॅशनल बुक ट्रस्ट.

"पुणे पुस्तक महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पालकांनी आपल्या पाल्यांना गोष्टी सांगायच्या आणि 'भारत' शब्द पुस्तकांच्या माध्यमातून लिहायचा, अशा दोन उपक्रमांची नोंद गिनीज बुक ऑफ रेकोर्डमध्ये झाली आहे. हे पुणेकरांमुळे शक्य झाले. आता पुणेकरांनी पुणे पुस्तक महोत्सवात सहभाग घेऊन, तो यशस्वी करावा.

- **राजेश पांडे,** संयोजक, पुणे पुस्तक महोत्सव.

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

पुढारी

# पुणे पुस्तक महोत्सवाचे आज उद्‌घाटन

पुणे : पुढारी वृत्तसेवा

**वाचनसंस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी राष्ट्रीय पुस्तक न्यासातर्फे पुणे पुस्तक महोत्सव आज (दि.१६) पासून फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर सुरू होत आहे. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते ४ वाजता महोत्सवाचे उद्‌घाटन होणार असून, महोत्सवात पुस्तक प्रदर्शनासह वैविध्यपूर्ण कार्यक्रमांची मेजवानी पुणेकरांना मिळणार आहे. त्याशिवाय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची स्वाक्षरी असलेली देशाच्या संविधानाची प्रत, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांचे हस्तलिखित, भगतसिंग यांचे हस्तलिखितही पुणेकरांना या महोत्सवात पाहता येणार आहे.**

राष्ट्रीय पुस्तक न्यास आयोजित या महोत्सवाला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे महापालिका, उच्च शिक्षण आणि शालेय शिक्षण विभाग यांच्यासह सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील २५० विविध संस्थांनी पाठिंबा दिला आहे. महोत्सवात दहा भारतीय भाषांतील पुस्तकांची दोनशेहून अधिक दालने असणार आहेत. पुस्तक प्रदर्शनाबरोबरच विविध सांस्कृतिक कार्यक्रम, चर्चासत्रे, साहित्यिकांच्या मुलाखती, सृजनशीलतेला वाव देणारे आणि वाचन संस्कृतीचा विकास घडविणारे कार्यक्रम फर्ग्युसन महाविद्यालयातील खुला रंगमंच आणि ॲम्पी थिएटर येथे होणार आहेत. हा महोत्सव २४ डिसेंबरपर्यंत सुरू राहणार आहे. महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे म्हणाले, की पुणे शहरात वाचनसंस्कृतीला पोषक वातावरण आहे. त्यामुळे दिल्लीतील प्रगती मैदानावर होणाऱ्या पुस्तक महोत्सवानंतरचा भव्य महोत्सव पुण्यात होत आहे.

नव्या पिढीला पुस्तकांकडे, वाचनाकडे आकर्षित करण्याच्या उद्देशाने पुणे पुस्तक महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. उद्योजक जय काकडे, खडकी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल यांचे या महोत्सवासाठी सहकार्य लाभले आहे.

### पुस्तक प्रदर्शनात विविध भाषांतील पुस्तकांची २०० दालने

### पुणेकरांना वैविध्यपूर्ण कार्यक्रमांची मेजवानी

### पार्किंगची व्यवस्था

पुणे पुस्तक महोत्सवाच्या निमित्ताने फर्ग्युसन मैदानावर येणाऱ्या नागरिकांच्या वाहनांची पार्किंगची व्यवस्था बीएमसीसी कॉलेजच्या मैदानावर आणि नवमल फिरोदिया लॉ कॉलेजच्या परिसरात करण्यात आली आहे. बीएमसीसी कॉलेजच्या मैदानावर येण्यासाठी आघारकर रस्ता, नामदार गोपाळ कृष्ण गोखले चौकातून (गुडलक चौक) येता येईल. नवमल फिरोदिया लॉ कॉलेजच्या परिसरात ज्ञानेश्वर पादुका चौकातून; तसेच तुकाराम पादुका चौकातून येता येईल. नागरिकांनी शक्यतो सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. फर्ग्युसन कॉलेजच्या मुख्य प्रवेशद्वारातून पायी ये-जा करता येणार आहे.

### आज 'जयतू भारत'चा विश्वविक्रम

फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर आज शनिवारी सकाळी ११ वाजता सुमारे १५ हजार पुस्तकांच्या माध्यमातून 'जयतू भारत' हे वाक्य तयार करण्यात येणार आहे. या विक्रमाची नोंदही गिनीज बुक रेकॉर्डमध्ये केली जाणार आहे, अशी माहिती महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे यांनी दिली.

### महोत्सवात होणारे कार्यक्रम

- महोत्सवात सांस्कृतिक कार्यक्रम, संगीत कार्यक्रम, चर्चा, व्याख्यान असे विविध प्रकारचे कार्यक्रम होणार आहेत.
- गायक नंदेश उमप यांचा 'लोकरंग' हा सांस्कृतिक कार्यक्रम.
- डॉ. माधवी वैद्य यांचा 'सुट्टी आली, सुट्टी आली' हा कार्यक्रमय
- 'तुकाराम दर्शन' हे महानाट्य.
- हिंदी कवी डॉ. कुमार विश्वास यांचे व्याख्यान.
- ५८ स्वातंत्र्यसैनिकांवरील 'कारागृहातील कल्लोळ' हा कार्यक्रम, लष्कराच्या बँडचे सादरीकरण, अविनाश धर्माधिकारी, सदानंद दाते, विश्वास पाटील यांचा सहभाग असलेला 'आमचा वाचन कारभार' हा चर्चात्मक कार्यक्रम.
- पत्रकार सौरभ द्विवेदी यांच्याशी संवाद, लेखक विक्रम संपत यांचे व्याख्यान.
- 'फैजल' हा काश्मिरी गीतांचा कार्यक्रम.
- ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांची मुलाखत.
- शिवराज्याभिषेकावर आधारित 'श्रीमंत योगी' हे महानाट्य.
- डॉ. सोनल कुलकर्णी यांचा मराठीच्या बोलींचे प्रतिमांकन.
- ॲड. आशिष शेलार, सतेज पाटील, डॉ. नीलम गोऱ्हे, सिद्धार्थ शिरोळे यांचा सहभाग असलेला 'राजकीय नेते काय वाचतात' हा चर्चात्मक कार्यक्रम अशा कार्यक्रमांचा समावेश आहे.

My Pune Edition
Dec 16, 2023 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

*News Paper Clippings During December 2023*

*Section: Education*

लोकमत

बालभारतीच्या प्रांगणात काढली बालसाहित्य दिंडी

# 'चला चला वाचू पुस्तक, ज्ञानापुढे होऊ नतमस्तक'

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : लोकसेवा ई-स्कूलच्या विद्यार्थ्यांनी 'चला चला रे वाचू आपण पुस्तक, ज्ञाना पुढे होऊ नतमस्तक' असा संदेश देत बाल साहित्य दिंडी काढली. या दिंडीने बालभारतीच्या प्रांगणातून प्रस्थान ठेवले. साहित्य कला अकादमी पुरस्कार विजेत्या साहित्यिकांनी सर्वांना वाचनाचे महत्त्व सांगण्यासह रंगीबेरंगी फुगे सोडून साहित्य दिंडीचा प्रारंभ केला.

साहित्य अकादमी पुरस्कार विजेते लेखक ल. म. कडू, राजीव तांबे, कवयित्री डॉ. संगीता बर्वे, श्यामची आई चित्रपटातील बालकलाकार शर्व गाडगीळ, बालसाहित्यिक आराध्या नंदकर, पुणे पुस्तक प्रदर्शनाचे मुख्य संयोजक राजेश पांडे, राष्ट्रीय पुस्तक न्यासाचे युवराज मलिक, किशोर मासिकाचे संपादक किरण केंद्रे, ई-स्कूलच्या मुख्याध्यापिका चैत्राली जैन, संवाद पुणेचे सुनील महाजन उपस्थित होते.

ल. म. कडू म्हणाले की, सध्याच्या धकाधकीच्या काळात स्थिर, शाश्वत जीवन जगता यावे यासाठी वाचन आवश्यक आहे.

सुनील महाजन म्हणाले की, लहान मुलांना वाचनाची गोडी लागावी आणि त्यांच्यात वाचन संस्कृती रुजवावी, यासाठी ही दिंडी काढण्यात आली.

ही दिंडी बालभारतीपासून निघून बीएमसीसी, रानडे इन्स्टिट्यूट ते फर्ग्युसन महाविद्यालय मैदानावर पोहोचली. पुस्तक प्रदर्शन फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर शनिवारपासून सुरू होणार आहे. सूत्रसंचालन अंजली अत्रे यांनी केले, तर किरण केंद्रे यांनी आभार केले.



बाल साहित्य दिंडीत सहभाग घेत 'चला चला रे वाचू आपण पुस्तक, ज्ञाना पुढे होऊ नतमस्तक'चा संदेश देताना विद्यार्थी.

## दिंडीने वेधले लक्ष

या बाल साहित्य दिंडीत ढोल-लेझीम पथक, पालखी, संत परंपरा, ऐतिहासिक व्यक्तिरेखांच्या वेषभूषेतील मुले, कॉमिक वर्ल्ड, मोराल स्टोरीज, विविध राज्यांतील पारंपरिक वेषभूषेतील बाल कलाकार, ऑटो बिओग्रॅफिस, नो आबाउट पोएट, रामायणातील वेशभूषेतील कलाकार असे सुमारे पाचशे शालेय विद्यार्थी सहभागी झाले होते. हातात फलक घेतले होते.

Hello Pune
Page No. 8 Dec 16, 2023
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

# पुणे पुस्तक महोत्सवासह वैविध्यपूर्ण कार्यक्रमांची मेजवानी आजपासून

**पुणे** : वाचनसंस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी राष्ट्रीय पुस्तक न्यासातर्फे पुणे पुस्तक महोत्सव (शनिवार) पासून फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर सुरु होत आहे. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते दुपारी चार वाजता महोत्सवाचे उद्घाटन होणार असून, महोत्सवात भव्य पुस्तक प्रदर्शनासह वैविध्यपूर्ण कार्यक्रमांची मेजवानी पुणेकरांना मिळणार आहे. त्याशिवाय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची स्वाक्षरी असलेली देशाच्या संविधानाची प्रत, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांचे हस्तलिखित, भगतसिंग यांचे हस्तलिखितही पुणेकरांना या महोत्सवात पाहता येणार आहे.

पुस्तक महोत्सवाच्या निमित्ताने भारत हा शब्द सुमारे ७५०० पुस्तकांनी लिहून, सौदी अरेबियाचा रेकॉर्ड मोडण्यात आला आहे. त्यामुळे पुण्यात भारत शब्दाने विश्वविक्रमाला गवसणी घातली आहे. या विश्व विक्रमानंतर आकाशात फुगे सोडून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

यावेळी नॅशनल बुक ट्रस्टचे अध्यक्ष मिलिंद मराठे, संचालक युवराज मलिक, महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे, भाजप नेते माधव भांडारी, उद्योजक कृष्णकुमार गोयल, आनंद छाजेड, प्रसेनजित फडणवीस, बागेश्री मंठाळकर, राहुल पाखरे, प्राचार्य डॉ. संजय चाकणे आदी उपस्थित होते.

शुक्रवारी फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर भारत हा शब्द सुमारे ७५०० हजार शब्दांनी लिहिण्यात आला. हा शब्द लिहिल्यानंतर , भारताने सौदी अरेबियाचा सात हजार १९१ पुस्तकांचा रेकॉर्ड मोडला. गिनेस बुक ऑफ रेकॉर्डचे अधिकारी स्वप्निल डांगरिकर यांनी घोषणा केल्यानंतर, विद्यार्थी, प्राध्यापकासह उपस्थित पुणेकरांनी जल्लोष साजरा केला. या विश्वविक्रमासाठी खडकी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल यांचे विशेष सहकार्य लाभले आहे. त्याचबरोबर संस्थेचे प्राध्यापक, प्राचार्य आणि विद्यार्थ्यांनी विशेष मेहनत घेतली. प्राचार्य डॉ. संजय चाकणे यांनी विशेष परिश्रम घेतले.



पुणे हे शिक्षणाचे माहेरघर आहे. त्याला आता पुस्तकांची जोड मिळाली आहे. त्यामुळे पुढील काळात पुणे पुस्तकांचे शहर म्हणून नावारूपाला येईल.

**- युवराज मलिक, संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट**

पालकांनी आपल्या पाल्यांना गोष्टी सांगायच्या आणि भारत शब्द पुस्तकांच्या माध्यमातून लिहायच्या, अशा दोन उपक्रमांची नोंद गिनेस बुक ऑफ रेकॉर्डमध्ये झाली आहे. हे पुणेकरांमुळे शक्य झाले. आता पुणेकरांनी पुणे पुस्तक महोत्सवात सहभाग घेऊन, तो यशस्वी करावा.

**- राजेश पांडे, संयोजक, पुणे पुस्तक महोत्सव**

**आज 'जयतू भारत'चा विश्वविक्रम**

फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर आज शनिवारी सकाळी ११ वाजता सुमारे १५ हजार पुस्तकांच्या माध्यमातून जयतू भारत हे वाक्य तयार करण्यात येणार आहे. हा विक्रमाची नोंदही गिनेस बुक रेकॉर्डमध्ये केली जाणार आहे, अशी माहिती महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे यांनी दिली.

Kesari 16.12.2023

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

# वाचनसंस्कृतीचा आजपासून कुंभमेळा

## पुणे पुस्तक महोत्सवाचे दुपारी उद्घाटन

**पुणे पुस्तक महोत्सव**

म. टा. प्रतिनिधी, पुणे

वाचनसंस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या (नॅशनल बुक ट्रस्ट) पुणे पुस्तक महोत्सवाचे उद्घाटन आज, शनिवारी (१६ डिसेंबर) फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर दुपारी चार वाजता होणार आहे. या महोत्सवात नागरिकांना सुमारे २५० पुस्तकांच्या स्टॉल्समधून १५पेक्षा अधिक भाषांमधील सुमारे दोन लाख पुस्तके पाहण्याची आणि विकत घेण्याची संधी मिळणार आहे. त्याचप्रमाणे विविध राज्यांतील खाद्यसंस्कृतीची चव चाखण्याची संधी मिळणार आहे.

महोत्सवाचे औपचारिक उद्घाटन उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते होणार असून, महोत्सवात भव्य पुस्तक प्रदर्शनासह वैविध्यपूर्ण कार्यक्रमांची मेजवानी पुणेकरांना मिळणार आहे. याच दिवशी सायंकाळी गायक नंदेश उमप यांचा 'लोकरंग' हा सांस्कृतिक कार्यक्रम सायंकाळी सात वाजता होईल. या महोत्सवाला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे महापालिका, उच्च शिक्षण आणि शालेय शिक्षण विभाग यांच्यासह सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील २५० विविध संस्थांनी पाठिंबा दिला आहे. पुस्तक प्रदर्शनाबरोबरच विविध सांस्कृतिक कार्यक्रम, चर्चासत्रे, साहित्यिकांच्या मुलाखती, सृजनशीलतेला वाव देणारे आणि वाचन संस्कृतीचा विकास घडविणारे कार्यक्रम फर्ग्युसन महाविद्यालयातील खुला रंगमंच आणि ॲम्फी थिएटर येथे होणार आहेत. हा महोत्सव २४ डिसेंबरपर्यंत सुरू राहणार आहे.

**'वाचनासाठी पोषक वातावरण'**

पुण्यात वाचनसंस्कृतीला पोषक वातावरण आहे. त्यामुळे दिल्लीतील प्रगती मैदानावर होणाऱ्या पुस्तक महोत्सवानंतरचा भव्य महोत्सव पुण्यात होत आहे. नव्या पिढीला पुस्तकांकडे, वाचनाकडे आकर्षित करण्याच्या उद्देशाने हा महोत्सव होत आहे. त्याशिवाय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची स्वाक्षरी असलेली राज्यघटनेची प्रत, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, भगतसिंग यांचे हस्तलिखितही पुणेकरांना या महोत्सवात पाहता येणार आहे, असे महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे यांनी सांगितले.

### आज 'जयतू भारत'चा विश्वविक्रम?

फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर आज शनिवारी सकाळी ११ वाजता सुमारे १५ हजार पुस्तकांच्या माध्यमातून 'जयतू भारत' हे वाक्य तयार करण्यात येणार आहे. हा विक्रमाची नोंदही गिनेस बुक रेकॉर्डमध्ये केली जाणार आहे, अशी माहिती प्रसेनजित फडणवीस आणि बागेश्री मंठाळकर यांनी दिली.

### पार्किंगची व्यवस्था

पुणे पुस्तक महोत्सवाच्या निमित्ताने फर्ग्युसन मैदानावर येणाऱ्या नागरिकांच्या वाहनांची पार्किंगची व्यवस्था बीएमसीसी कॉलेजच्या मैदानावर आणि नवलमल फिरोदिया लॉ कॉलेजच्या परिसरात करण्यात आली आहे. बीएमसीसी कॉलेजच्या मैदानावर येण्यासाठी आगरकर रस्ता, नामदार गोपाळ कृष्ण गोखले चौकातून (गुडलक चौक) येता येईल. नवलमल फिरोदिया लॉ कॉलेजच्या परिसरात ज्ञानेश्वर पादुका चौकातून; तसेच तुकाराम पादुका चौकातून येता येईल. नागरिकांनी शक्यतो सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. फर्ग्युसन कॉलेजच्या मुख्य प्रवेशद्वारातून नागरिकांना पायी ये-जा करता येणार आहे.

Maharashtra Times 16.12.2023

## News Paper Clippings During December 2023

### Section: Education



फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर शुक्रवारी साडेसात हजार पुस्तकांच्या माध्यमातून 'भारत' शब्द साकारून विश्वविक्रम केला.

# पुस्तकांतून साकारला 'भारत'

**विश्वविक्रमाला सलग दुसऱ्या दिवशी गवसणी**

म. टा. प्रतिनिधी, पुणे

पुणे पुस्तक महोत्सवाच्या निमित्ताने शुक्रवारी दुपारी विद्यार्थी, प्राध्यापक आणि नागरिकांनी एकत्र येऊन, साडेसात हजार पुस्तकांच्या माध्यमातून 'भारत' या शब्दाची निर्मिती केली. या उपक्रमाची नोंदही गिनेस बुक ऑफ रेकॉर्डसमध्ये झाली असून, भारताने सौदी अरेबियाचा रेकॉर्ड मोडला आहे. त्यामुळे पुणे शहरात 'बालक-पालक : पालकांनी आपल्या पाल्यांना गोष्टी सांगायच्या' या उपक्रमानंतर सलग दुसऱ्या दिवशी नव्या विश्वविक्रमाची नोंद करण्यात आली आहे.

**सौदी अरेबियाचा मोडला विक्रम**

फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर आज, शनिवारी १६ डिसेंबरपासून पुणे पुस्तक महोत्सवाची सुरुवात होणार आहे. महोत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात असताना साडेसात हजार पुस्तकांच्या माध्यमातून 'भारत' शब्दाची निर्मिती करण्यात आली. या उपक्रमाद्वारे यापूर्वी सौदी अरेबियाचा सात हजार १९१ पुस्तकांचा विक्रम मोडण्यात आला. या विश्वविक्रमासाठी वापरण्यात येणारी पुस्तके व्यावसायिक असून, ती नॅशनल बुक ट्रस्टद्वारे मान्यताप्राप्त आहेत. गिनेस बुक ऑफ रेकॉर्डचे अधिकारी स्वप्नील डांगरीकर यांनी घोषणा केल्यानंतर, विद्यार्थी-प्राध्यापकांसह उपस्थित पुणेकरांनी जल्लोष साजरा केला.

या विश्वविक्रमासाठी खडकी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल यांचे विशेष सहकार्य लाभले आहे. त्याचबरोबर संस्थेचे प्राध्यापक, प्राचार्य आणि विद्यार्थ्यांनी विशेष मेहनत घेतली. खडकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय चाकणे यांनी विशेष परिश्रम घेतले. या वेळी नॅशनल बुक ट्रस्टचे अध्यक्ष मिलिंद मराठे, संचालक युवराज मलिक, महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे, भाजप नेते माधव भांडारी, उद्योजक कृष्णकुमार गोयल, आनंद छाजेड, प्रसेनजित फडणवीस, बागेश्री मंठाळकर, राहुल पाखरे, प्राचार्य डॉ. संजय चाकणे उपस्थित होते.

" पुणे हे शिक्षणाचे माहेरघर आहे. त्याला आता पुस्तकांची जोड मिळाली आहे. त्यामुळे पुढील काळात पुणे पुस्तकांचे शहर म्हणून नावारूपाला येईल. पुणे पुस्तक महोत्सव हा पुणेकरांचा महोत्सव असल्याने, त्यात अधिकाधिक विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षक, प्राचार्य आणि नागरिकांनी सहभागी व्हायचे आहे.

– युवराज मलिक, संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट

पुस्तकांच्या माध्यमातून भारताला ओळखायचे आहे, जाणून घ्यायचे आहे, भारताला समजायचे आहे आणि भारताला तयार करण्यासाठी काम करायचे आहे. आपल्या भारताला पुढे नेण्यासाठी पुस्तकांच्या माध्यमातून काम करायचे आहे. त्याचाच एक भाग म्हणून पुणे पुस्तक महोत्सवाला यशस्वी करायचे आहे.

– मिलिंद मराठे, अध्यक्ष, नॅशनल बुक ट्रस्ट

पुणेकरांच्या सहभागामुळे 'बालक-पालक : पालकांनी आपल्या पाल्यांना गोष्टी सांगायच्या' आणि 'भारत' शब्द पुस्तकांच्या माध्यमातून लिहायच्या, अशा दोन उपक्रमांची नोंद गिनेस बुक ऑफ रेकॉर्डमध्ये झाली आहे. आता पुणेकरांनी पुणे पुस्तक महोत्सवात सहभाग घेऊन, तो यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करावेत.

– राजेश पांडे, संयोजक, पुणे पुस्तक महोत्सव

Maharashtra Times 16.12.2023

*News Paper Clippings During December 2023*

*Section: Education*

# College heads answerable for severe ragging: UGC

Times News Network

**TIMES VIEW:** Cases of ragging seldom become news. Nonetheless, the anti-ragging website has seen over 118 million visitors since it was set up, which shows that the problem is more frequent than acknowledged. The fact is that ragging is a form of sadism, an act intended to humiliate the survivor and establish domination over him or her. Many sufferers are scarred for a long time. The decision to make college and university authorities answerable is welcome. It will force them to be more proactive on the subject. That apart, the anti-ragging helpline should be widely advertised.

**New Delhi:** Urging all higher education institutions (HEIs) to step up anti-ragging measures, the University Grants Commission has said that in cases of extreme ragging and suicide, college principal and registrar of the university concerned will be answerable to the National Anti-Ragging Monitoring Committee for any non-compliance of its regulations on ragging.

NCRB data show that there has been one lakh 70 thousand 924 cases of accidental deaths and suicides in the year 2022, out of which only 1.2 per cent cases pertains to deaths which are in connection with failure in examinations.

Issuing strict instructions to comply with all anti-ragging guidelines, the higher education regulator asked all universities, colleges and HEIs not to be negligent in implementing them. If steps are not taken as per UGC regulations, including constitution of anti-ragging committee and installation of CCTV cameras at vital points, action will be taken against the educational institution concerned and its officials will not be able to escape their responsibility, it said.

The letter to heads of all HEIs reiterated the five-point compliance directed by the SC and the Commission made it clear that if any case of ragging and suicide comes to light in any HEI in future, registrar of the university and principal of the college will be summoned.

UGC said that as per the order of the Supreme Court, it has made regulations to prevent ragging in higher education institutions and it is mandatory to implement them. Providing information about nodal officers on the university-college website will be compulsory, said UGC Secretary Manish Joshi.

It said surprise inspections will be necessary in places like hostels, canteens, rest rooms and bus stands and anti-ragging posters should be displayed throughout the campus. Students can also call the National Anti-Ragging Helpline 1800-180-5522 anytime within 24 hours and report their problems.

UGC has said it is necessary to investigate every complaint. Apart from the helpline, complaints can also be made on helpline@antiragging.in.

The Times of India 16.12.2023

# News Paper Clippings During December 2023

## Section: Education

सामना

# 'पुस्तक महोत्सवा'तून पुणेकरांना साहित्य मेजवानी



पुणे, दि. १६ (प्रतिनिधी) – 'पुणे पुस्तक महोत्सवा'च्या निमित्ताने २४ डिसेंबरपर्यंत फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर नागरिकांसाठी साहित्यिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक कार्यक्रमांची मेजवानी घेता येणार आहे. शालेय विद्यार्थ्यांसाठी चिल्ड्रन्स कॉर्नर असून, त्यामध्ये चित्रकला, लिहिण्याची कार्यशाळा, कथा-गोष्टींचे उपक्रम, स्टोरीटेलिंग असे कार्यक्रम राहणार आहेत. नागरिकांसाठी 'साहित्यिक कट्टा' उपक्रम राबविण्यात येणार असून, त्या अंतर्गत कवी, साहित्यिक, लेखकांना चर्चा करता येणार असून, त्यांच्याशी संवाद साधता येईल. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना विविध बॅन्ड्स, लोकसंगीत, महानाट्य, परिसंवाद आदींचा आस्वाद घेता येईल.

'राष्ट्रीय पुस्तक न्यासा'च्या वतीने फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर 'पुणे पुस्तक महोत्सवा'चे उद्घाटन उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते झाले. या पुस्तक महोत्सवात १५ पेक्षा अधिक भाषांमधील सुमारे अडीच लाख पुस्तके २५० स्टॉल्सच्या माध्यमातून उपलब्ध राहणार आहे. पुस्तके खरेदीसाठी आकर्षक सवलतही देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे विविध राज्यांमधील खाद्यसंस्कृतीची चवही चाखता येणार आहे. शालेय विद्यार्थ्यांसाठी गाथा शिवरायांची, आवडणारे चित्र काढा, नावीन्यपूर्ण-कल्पकतेने लिहिण्याची कार्यशाळा, सुट्टी आली-सुट्टी आली, ओरिगामी कार्यशाळा, रागावर नियंत्रण ठेवणे, कविता करणे असे नावीन्यपूर्ण कार्यक्रम दररोज सकाळी होणार आहेत.

या काळात प्रसिद्ध लेखक कुमार विश्वास यांचा 'कवि की कलम से' हा कार्यक्रम राहणार आहे. त्याचप्रमाणे ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांची प्रकट मुलाखत ऐकण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळणार आहे. त्याचप्रमाणे साहित्यिक, पत्रकार, लेखक, कवी आदींचे परिसंवाद आणि चर्चासत्र होणार आहे. दररोज सकाळी ११ ते ८ अशी महोत्सव सुरू राहणार आहे, असे संयोजक राजेश पांडे यांनी सांगितले.

Pune Edition
Dec 17, 2023 Page No. 2
Powered by : eReleGo.com

नवभारत

## खड़की शिक्षा संस्था के 150 विद्यार्थियों ने बनाया विश्व रिकॉर्ड

# 7500 पुस्तकों से साकार हुआ 'भारत'

■ पुणे, (सं). कृष्णकुमार गोयल की खड़की शिक्षा संस्था ने आज एक अनोखा विश्व कीर्तिमान अपने नाम कर लिया. फर्ग्युसन महाविद्यालय के पटांगण में चल रहे भव्य पुणे पुस्तक महोत्सव में 7500 पुस्तकों से 'भारत' को साकार किया. खड़की शिक्षा संस्था के 150 विद्यार्थियों के अथक प्रयासों से यह सफल हो सका.



Pune Edition
17-december-2023 Page No. 2
epaper.enavabharat.com

नवभारत

## राष्ट्रीय पुस्तक न्यास ने की मदद

इस उपक्रम को राष्ट्रीय पुस्तक न्यास (एनबीटी) का सहयोग मिला. जिसने सही पुस्तकें उपलब्ध कराई. उसके अध्यक्ष मिलिंद मराठे के सहयोग एवं महोत्सव के आयोजक राजेश पांडे की कल्पना से साकार हुआ यह उपक्रम सफल हो सका. गिनीज वर्ल्ड रिकॉर्ड के लंदन से आए अधिकारी स्वप्नील डंगरीकर ने इस विश्व कीर्तिमान की घोषणा की. इसके पहले यह रिकॉर्ड सौदी के नाम था. इसके लिए 7191 पुस्तकों का उपयोग किया गया था. पुणे में लगातार दूसरा गिनीज रिकॉर्ड बनाया गया. दोनों ही रिकॉर्ड में कृष्ण कुमार गोयल की सक्रियता रही.

Pune Edition
17-december-2023 Page No. 2
epaper.enavabharat.com

## *News Paper Clippings During December 2023*

### *Section: Education*

पुढारी




तब्बल १८ हजार ७६० पुस्तकांच्या माध्यमातून 'जयतु भारत' हे वाक्य तयार करण्यात आले असून, सलग तिसरा विश्वविक्रम नोंदविण्यात आला आहे.

# पुस्तक महोत्सवात कार्यक्रमांची रेलचेल

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

पुणे पुस्तक महोत्सवाच्या निमित्ताने २४ डिसेंबरपर्यंत फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर नागरिकांसाठी साहित्यिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक कार्यक्रमांची मेजवानी राहणार आहे. शालेय विद्यार्थ्यांसाठी चिल्ड्रन्स कॉर्नर असून, त्यामध्ये चित्रकला, लिहिण्याची कार्यशाळा, कथा-गोष्टींचे उपक्रम, स्टोरीटेलिंग असे कार्यक्रम राहणार आहेत. नागरिकांसाठी साहित्यिक कट्टा उपक्रम राबविण्यात येणार असून, त्या अंतर्गत कवी, साहित्यिक, लेखकांना ऐकता येणार असून, त्यांच्याशी संवाद साधता येईल. महाविद्यालयीन युवक-युवतींसाठी 'कल्चरल एक्स्ट्रॅवॅगन्झा' उपक्रम असून, त्याअंतर्गत विविध बॅन्डस्, लोकसंगीत, महानाट्य, परिसंवाद आदींचा आस्वाद घेता येईल.

राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या वतीने फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर शनिवारपासून पुणे पुस्तक महोत्सवाची सुरुवात झाली आहे. या पुस्तक महोत्सवात १५ पेक्षा अधिक भाषांमधील सुमारे अडीच लाख पुस्तके ही २५० स्टॉल्सच्या माध्यमातून उपलब्ध राहणार आहे. त्याचप्रमाणे विविध राज्यांमधील खाद्यसंस्कृतीची चव ही २० पेक्षा अधिक खाण्याच्या स्टॉल्समधून चाखता येणार आहे. या महोत्सवात शालेय विद्यार्थ्यांसाठी 'गाथा शिवरायांची', 'छुक छुक चली कहानी रेल की रेल', 'आवडणारे चित्र काढा', नावीन्यपूर्ण-कल्पकतेने लिहिण्याची कार्यशाळा, 'सुटी आली-सुटी आली', ओरिगामी कार्यशाळा, स्टोरीटेलिंग उपक्रम, अमरचित्रकथा, मंडाला आर्ट, रागावर नियंत्रण ठेवणे, कविता करणे, ओंकार काव्यदर्शन असे नावीन्यपूर्ण कार्यक्रम दररोज सकाळी होणार आहेत. नागरिकांसाठी प्रसिद्ध लेखक कुमार विश्वास यांचा 'कवि की कलम से' हा कार्यक्रम राहणार आहे. लल्लनटॉपचे पत्रकार सौरभ द्विवेदी यांचे विचार ऐकता येणार आहे. त्याचप्रमाणे प्रसिद्ध लेखक विक्रम संपत यांचेही विचार ऐकण्याची संधी मिळणार आहे. ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांची प्रकट मुलाखत ऐकण्याची संधी मिळेल. स्वातंत्र्यपूर्व काळातील कारागृहात साहित्य निर्मिती करणाऱ्या ५८ स्वातंत्र्यसैनिकांवर 'कारागृहातील कल्लोळ' हा दृक-श्राव्य कार्यक्रम, 'हिंदुस्थानच्या फाळणीची शोकांतिका' कार्यक्रमात 'व्यथा हिंदुस्थानच्या फाळणीची' पुस्तकाचे प्रकाशन, 'वाचणारे अधिकारी' अंतर्गत 'आमचा वाचन कारभार', 'ज्ञानपीठातील ज्ञानतपस्वी' अशा कार्यक्रमांची मेजवानी मिळणार आहे. युवक-युवकांसाठी फैजल काश्मिरी बँड, टॅलेंट हंट (नृत्य, गायन, वादन स्पर्धा) आर्मी बँड, कलर्स बँड, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा इंद्रधनुष्य कार्यक्रम, 'पश्मिना के धागे से' अशा बहारदार कार्यक्रमांचा आनंद घेता येणार आहे. त्याचप्रमाणे 'शक्तिदात्री - द लिबरेशमून ऑफ सीता', तसेच 'तुकाराम दर्शन' हे महानाट्य पाहता येईल. त्याचप्रमाणे साहित्यिक, पत्रकार, लेखक, कवी आदींचे परिसंवाद आणि चर्चासत्र ऐकता येणार आहे. हे संपूर्ण कार्यक्रम विनामूल्य असून, महोत्सवाची वेळ दररोज सकाळी ११ ते ८ अशी राहणार आहे, असे संयोजक राजेश पांडे यांनी सांगितले.

### पुणे महोत्सवात आज काय?

- द मॅजिक ऑफ वर्डस : स्टोरीटेलिंग सेशन फॉर किडस : स.१० ते १०.४५
- फोल्ड अँड फन : ओरिगामी वर्कशॉप : ११ ते ११.४५
- सुट्टी आली-सुट्टी आली : सादरकर्त्या : माधवी वैद्य
- यंग पिकोसोज : इलस्ट्रेशन वर्कशॉप दुपारी १२ ते १२.४५ -
- टॅलेंट हंट स्पर्धा : दुपारी - १.३०
- अ सिम्बोसिस ऑफ वर्ल्ड लिटरेटर : ऋचा लिमये - दुपारी ४.३०
- शक्तिदात्री : द लिबरेशन ऑफ सीता : सायंकाळी ५.३०
- तुकाराम दर्शन महानाट्य : सायंकाळी ६.३०

### पुणे पुस्तक महोत्सव यशस्वी करा : चंद्रकांत पाटील

### महोत्सवात दिव्यांगांसाठी विशेष स्टॉल

माय ३ वर

My Pune Edition
Dec 17, 2023 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

## News Paper Clippings During December 2023

## Section: Education

# 'पुणे पुस्तक महोत्सव यशस्वी करावा'

### उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांचे आवाहन

**पुणे** : जागतिक स्तरावरील पुस्तक महोत्सवाची मेजवानी पुणेकरांना मिळाली आहे. सांस्कृतिक, साहित्यिक आणि शैक्षणिक कार्यक्रमांनी नटलेला हा पुणे पुस्तक महोत्सव सुरू झाला आहे. या महोत्सव पुणेकरांनी एकत्र येत यशस्वी करावा, असे आवाहन राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी शनिवारी केले.

राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या वतीने फर्ग्युसन मैदानावर आयोजित केलेल्या पुणे पुस्तक महोत्सवाचे उद्घाटन डॉ. गोऱ्हे आणि उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी पाटील बोलत होते. यावेळी विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे, राष्ट्रीय पुस्तक न्यासाचे अध्यक्ष मिलिंद मराठे, संचालक युवराज मलिक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, पुणे महापलिकेचे आयुक्त विक्रम कुमार, अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे, माजी महापौर मुरलीधर मोहोळ, उद्योजक विशाल चोरडिया, जय काकडे, सुशील जाधव, कृष्णकुमार गोयल, शहीद भगतसिंग यांचे पणतू यागवेंद्र सिंग संधू, प्रकाशक राजीव बर्वे, डीईएसचे डॉ. शरद कुंटे आदी उपस्थित होते. मोहन शेटे लिखित हिंदवी स्वराज्य स्थापना या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

पाटील म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी लिखित एक्झाम वॉरियर्स पुस्तक एक लाख विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे हिंदवी स्वराज्य स्थापना हे पुस्तकसुद्धा एक लाख विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे. या पुस्तक महोत्सवात कोथरूड मतदार संघातील पुस्तक घेणाऱ्या नागरिकांना सवलत देण्यात येणार असल्याचे पाटील यांनी सांगितले.




### सलग तिसरा विश्वविक्रम

पुणे पुस्तक महोत्सवाच्या निमित्ताने आयोजित होणाऱ्या उपक्रमांत सलग तिसऱ्या दिवशी गिनेस बुक ऑफ रेकॉर्डमध्ये विश्वविक्रमाची नोंद करण्यात आली आहे. फर्ग्युसन महाविद्यालयात विद्यार्थी, प्राध्यापक आणि प्राचार्यांनी एकत्र येत १८ हजार ७६० पुस्तकांच्या माध्यमातून जयतु भारत हे वाक्य तयार केले. एवढ्या मोठ्या प्रमाणात पुस्तकांचा वापर करून, बनविण्याचा हा रेकॉर्ड आहे.

> भगतसिंगांनी रचलेल्या मेरा रंग दे बसंती चोला या गाण्यापासून म्हणजे १९३१ पासून महाराष्ट्र आणि भगतसिंग यांचे ऋणानुबंध आहे. भगत सिंग यांनी तुरुंगामध्ये १०० पेक्षा अधिक पुस्तके वाचली. आपण सुद्धा अशाच प्रकारे पुस्तके वाचायची आहे. आगामी काळात आपल्याला देशात अधिकाधिक भगत सिंग घडवायचे आहेत, असे यागवेंद्र सिंग यांनी आवाहन केले.

Kesari 17.12.2023

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

... मिळविण्यासाठी readercontact@timesgroup.co




### पुणेकरांच्या नावे तिसरा विश्वविक्रम

पुणे पुस्तक महोत्सवाच्या निमित्ताने विद्यार्थी, प्राध्यापक आणि प्राचार्यांनी शनिवारी एकत्र येत १८ हजार ७५१ पुस्तकांच्या माध्यमातून 'जयतु भारत' शब्द तयार करून गिनेस बुक ऑफ रेकॉर्डमध्ये विश्वविक्रम प्रस्थापित केला. त्यामुळे पुणे शहरात तीन दिवसांत तीन सलग विश्वविक्रम झाले. यापूर्वीचा, ११ हजार १११ पुस्तकांच्या माध्यमातून वाक्य तयार करण्याचा विश्वविक्रम हा सौदी अरेबियाच्या नावावर होता.

➤ संबंधित वार्तांकन...३

Maharashtra Times 17.12.2023

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

# राज्यातही पुस्तक महोत्सव व्हावेत

## उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांची अपेक्षा; पुणे पुस्तक महोत्सवाचे उद्घाटन

**पुणे पुस्तक महोत्सव**

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

'पुणे हे सांस्कृतिक राजधानीचे शहर आणि शिक्षणाचे माहेरघर आहे. 'राष्ट्रीय पुस्तक न्यास'च्या पुस्तक महोत्सवामुळे पुणे शहरात सांस्कृतिकदृष्ट्या मोलाची भर पडली असून, शहराची मान उंचावली आहे. अशाच प्रकारचे पुस्तक महोत्सव राज्यातील इतर शहरांमध्ये सुरू व्हावेत,' अशी अपेक्षा विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी व्यक्त केली.



पुणे पुस्तक महोत्सवात बच्चे कंपनीचा लक्षणीय सहभाग दिसून आला.

**■ महोत्सवाचे उद्घाटन**

'राष्ट्रीय पुस्तक न्यास'च्या वतीने फर्ग्युसन मैदानावर आयोजित केलेल्या पुणे पुस्तक महोत्सवाचे उद्घाटन डॉ. गोऱ्हे आणि उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते झाले. या वेळी डॉ. गोऱ्हे बोलत होत्या. या प्रसंगी न्यासाचे अध्यक्ष मिलिंद मराठे, संचालक युवराज मलिक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, महापालिकेचे आयुक्त विक्रमकुमार, अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे, माजी महापौर मुरलीधर मोहोळ, उद्योजक विशाल चोरडिया, जय काकडे, सुशील जाधव, कृष्णकुमार गोयल, शहीद भगतसिंग यांचे पणतू यागवेंद्र सिंग संधू, प्रकाशक राजीव बर्वे, 'डीईएस'चे डॉ. शरद कुंटे आदी उपस्थित होते. या वेळी मोहन शेटे लिखित 'हिंदवी स्वराज्य स्थापना' या पुस्तकाचे प्रकाशन झाले.

**■ 'हा जनतेचा सोहळा'**

डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, 'दिल्ली, जयपूर येथील विविध फेस्टिव्हल पाहिले आहेत. हे फेस्टिव्हल ठरावीक लोकांपुरते मर्यादित असतात. मात्र, पुणे पुस्तक महोत्सव जनतेचा सोहळा झाल्याने सामान्य जनतेला वाचन संस्कृतीचा आस्वाद घेता येणार आहे. त्यामुळे महोत्सवाच्या आयोजनाबाबत अभिनंदन केले पाहिजे. देशात मध्यमवर्गीयांची संख्या वाढत आहे. मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण वाढत आहे. अशा वेळी सर्वांना ज्ञानासाठी पुस्तके उपलब्ध करून देण्याची गरज आहे. त्यासाठी पुणे पुस्तक महोत्सव महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.'

'सोशल मीडियामुळे वाचन संस्कृतीला फटका बसला आहे. पायरसीमुळे पुस्तकांना फटका बसला आहे,' अशी खंतही डॉ. गोऱ्हे यांनी व्यक्त केली.

**■ विविध कार्यक्रमांची मेजवानी**

'पुस्तक महोत्सवाच्या निमित्ताने पुणेकरांना सांस्कृतिक, शैक्षणिक, साहित्यिक कार्यक्रमांची मेजवानी मिळणार आहे, त्याचबरोबर खाद्यसंस्कृतीचा आस्वाद घेता येणार आहे. या महोत्सवाच्या पहिल्याच दिवशी नागरिकांनी भरभरून प्रतिसाद दिला. असाच प्रतिसाद पुढील आठ दिवस द्यावा,' असे आवाहन मराठे यांनी केले.

**■ '१० हजार पुणेकर'**

'पुणे पुस्तक महोत्सवाच्या पहिल्याच दिवशी १० हजार पुणेकरांनी भरभरून प्रतिसाद दिला आहे. विश्वविक्रमांनी सजलेला पुस्तक महोत्सव पहिल्यांदाच पाहतोय. पुणे हे शिक्षणाचे माहेरघर आहे. आता यापुढे आपल्या पुण्याला देशातील पुस्तकांची राजधानी करायचे आहे. त्यासाठी पुणेकरांनी पुढे येऊन महोत्सवाला पाठिंबा द्यायचा आहे. हा पुस्तक महोत्सव देशातच नाही, तर जगात प्रसिद्ध होण्यासाठी प्रयत्न करायचे आहेत,' असे मलिक यांनी सांगितले.

**■ '१०० पुस्तकांचे प्रकाशन'**

'या महोत्सवाच्या कालावधीत एकूण १०० पुस्तकांचे प्रकाशन होणार आहे. त्यातील ३२ पुस्तकांचे प्रकाशन एकाच वेळी होईल. त्यामुळे अधिकाधिक पुणेकरांनी महोत्सवात सहभागी व्हावे,' असे आवाहन संयोजक राजेश पांडे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. संजय चाकणे आणि मिलिंद कुलकर्णी यांनी केले. बागेश्री मंठाळकर यांनी आभार मानले.

**■ 'भगतसिंग घडवायचे आहेत'**

'भगतसिंगांनी रचलेल्या 'मेरा रंग दे बसंती चोला' या गाण्यापासून, म्हणजे १९३१पासून महाराष्ट्र आणि भगतसिंग यांचे ऋणानुबंध आहे. भगतसिंग यांनी जेलमध्ये १००पेक्षा अधिक पुस्तके वाचली. आपणसुद्धा अशाच प्रकारे पुस्तके वाचायची आहेत. आगामी काळात आपल्याला देशात अधिकाधिक भगतसिंग घडवायचे आहेत,' असे प्रतिपादन यागवेंद्र सिंग यांनी केले.

**■ 'सर्व कार्यक्रम विनामूल्य'**

'युवक-युवकांसाठी फैजल काश्मिरी बँड, टॅलेंट हंट (नृत्य, गायन, वादन स्पर्धा) आर्मी बँड, कलर्स बँड, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा इंद्रधनुष्य कार्यक्रम, 'पश्मिना के धागों से' अशा बहारदार कार्यक्रमांचा आनंद घेता येणार आहे. त्याचप्रमाणे 'शक्तिदात्री-द लिबरेशन ऑफ सीता', 'तुकाराम दर्शन' हे महानाट्य पाहता येईल. त्याचप्रमाणे साहित्यिक, पत्रकार, लेखक, कवी आदींचे परिसंवाद आणि चर्चासत्रे ऐकता येणार आहेत. हे सर्व कार्यक्रम विनामूल्य आहेत,' असे संयोजक राजेश पांडे यांनी सांगितले.

**'पुस्तक महोत्सव यशस्वी करावा'**

'जागतिक स्तरावरील पुस्तक महोत्सवाची मेजवानी पुणेकरांना मिळाली आहे. सांस्कृतिक, साहित्यिक आणि शैक्षणिक कार्यक्रमांनी नटलेला हा पुणे पुस्तक महोत्सव आजपासून सुरू होत आहे. हा महोत्सव पुणेकरांनी एकत्र येऊन यशस्वी करावा. पंतप्रधान नरेंद्र मोदी लिखित 'एक्झाम वॉरियर्स', तसेच 'हिंदवी स्वराज्य स्थापना' या पुस्तकांचे वाटप करण्यात येणार आहे. पुस्तक महोत्सवात कोथरूड मतदारसंघातील नागरिकांना पुस्तक घेण्यासाठी सवलत देण्यात येईल. त्यासाठी त्यांनी कोथरूड आणि बाणेर येथील जनसंपर्क कार्यालयात संपर्क साधावा,' असे आवाहन चंद्रकांत पाटील यांनी केले.

Maharashtra Times 17.12.2023

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

सकाळ

# पुण्याने नोंदविला तिसरा विश्वविक्रम

## पुणे पुस्तक महोत्सवाचे उद्‌घाटन; १८ हजार पुस्तकांच्या साह्याने केले वाक्य तयार

**पुणे, ता. १६ :** पुस्तकांच्या साह्याने वाक्य लिहिण्याचा नवा विश्वविक्रम पुण्यात नोंदविला गेला आहे. तब्बल १८ हजार ७६० पुस्तकांच्या साह्याने फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर 'जयतु भारत' हे वाक्य तयार करण्यात आले. त्याची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डने विश्वविक्रम म्हणून नोंद घेतली आहे.

राष्ट्रीय पुस्तक न्यास यांच्यातर्फे आयोजित पुणे पुस्तक महोत्सवाचे आज उद्‌घाटन झाले. या उपक्रमांतर्गत नोंदविण्यात आलेला सलग तिसरा विश्वविक्रम आहे. फर्ग्युसन महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक आणि प्राचार्यांनी एकत्र येत १८ हजार ७६० पुस्तकांच्या माध्यमातून वाक्य तयार केले. यापूर्वीचा विश्वविक्रम हा सौदी अरेबियाच्या नावावर होता. त्यांनी ११ हजार १११ पुस्तकांच्या साह्याने वाक्य तयार केले होते. गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डचे अधिकारी स्वप्नील डांगरीकर यांनी या विश्वविक्रमाची घोषणा केली. यानंतर मैदानावर देशभक्तिपर गीते लावून जल्लोष साजरा करण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते आकाशात फुगे सोडून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

या महोत्सवांतर्गत भव्य पुस्तक प्रदर्शन भरविण्यात आले आहे. यात

पान ४ वर >



**फर्ग्युसन महाविद्यालय मैदान :** पुणे पुस्तक महोत्सवानिमित्त शनिवारी आयोजित पुस्तक प्रदर्शनाला वाचनप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

### महोत्सवात रविवारी

- सकाळी १० ते १०.४५ : द मॅजिक ऑफ वर्ड्स - स्टोरीटेलिंग सेशन फॉर किड्स
- सकाळी ११ ते ११.४५ : फोल्ड अँड फन - ओरिगामी वर्कशॉप, सुट्टी आली सुट्टी आली - सादरकर्त्या - माधवी वैद्य
- दुपारी १२ ते १२.४५ : यंग पिकोसोज - इलेस्ट्रेशन वर्कशॉप
- दुपारी १.३० : टॅलेंट हंट स्पर्धा
- दुपारी ४.३० : अ सिम्बोसिस ऑफ वर्ल्ड लिटरेटर - ऋचा लिमये
- सायंकाळी ५.३० : शक्तिदात्री - द लिबरेशन ऑफ सीता
- सायंकाळी ६.३० : तुकाराम दर्शन महानाट्य

Pune, Main
17/12/2023 Page No. 1

सकाळ

# पुण्याने नोंदविला तिसरा विश्वविक्रम

> पान १ वरून

जवळपास २५० स्टॉल असून, त्यात दहाहून अधिक भारतीय भाषांमधील तब्बल दोन लाखांहून अधिक पुस्तके आहेत. तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रम, कार्यशाळा होणार आहे. महोत्सव २४ डिसेंबरपर्यंत सकाळी अकरा ते रात्री आठ या वेळेत असेल.

**दिव्यांगांसाठी विशेष स्टॉल**

"महोत्सवातील पुस्तक प्रदर्शनात डेहराडून, दिल्ली, चेन्नई आणि सिकंदराबाद येथील दिव्यांगांच्या राष्ट्रीय स्तरावरील संस्थांची ब्रेल पुस्तके, सांकेतिक भाषेची पुस्तके, याशिवाय दिव्यांगांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करणाऱ्या संस्था-संघटनांची माहिती देणारे विशेष स्टॉल असणार आहेत. या स्टॉलवर ब्रेल पुस्तके दृष्टिहीनांना मोफत दिली जाणार आहेत. हरियाणातील वेल्फेअर सोसायटीतर्फे कर्णबधिर व मूकबधिर दिव्यांगांसाठी कार्य करणाऱ्या संस्थांना सांकेतिक भाषेच्या प्रसारासाठी संपूर्ण पुस्तक संच मोफत उपलब्ध करून दिला जाणार आहे," अशी माहिती पुणे जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे प्रकल्प संचालक विजय कान्हेकर यांनी दिली.

Pune, Main
17/12/2023 Page No. 4

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

प्रभात

# जागतिक स्तरावरील पुस्तक महोत्सवाची पुणेकरांना मेजवानी

## १८,७६० पुस्तकांच्या माध्यमातून 'जयतु भारत'चा विश्वविक्रम

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. १६** - जागतिक स्तरावरील पुस्तक महोत्सवाची मेजवानी पुणेकरांना मिळाली आहे. सांस्कृतिक, साहित्यिक आणि शैक्षणिक कार्यक्रमांनी नटलेला हा पुणे पुस्तक महोत्सव आजपासून सुरू होत आहे. हा महोत्सव पुणेकरांनी एकत्र येत यशस्वी करावा, असे आवाहन उच्च शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी शनिवारी केले. यावेळी १८ हजार ७६० पुस्तकांच्या माध्यमातून जयतु भारत या वाक्याची निर्मिती केली. हा विक्रम पाहण्यासाठी वाचकांनी गर्दी केली होती.




राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या वतीने फर्ग्युसन मैदानावर आयोजित केलेल्या पुणे पुस्तक महोत्सवाचे उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी विधान परिषदेच्या उपसभापती निलम गोऱ्हे, राष्ट्रीय पुस्तक न्यासाचे अध्यक्ष मिलिंद मराठे, संचालक युवराज मलिक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, पुणे महापलिकेचे आयुक्त विक्रम कुमार, अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे, माजी महापौर मुरलीधर मोहोळ, उद्योजक विशाल चोरडिया, जय काकडे, सुशील जाधव, कृष्णकुमार गोयल, शहीद भगतसिंग यांचे पणतू यागवेंद्र सिंग संधू, महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे, प्रकाशक राजीव बर्वे, डीईएसचे डॉ. शरद कुंटे आदी उपस्थित होते.

डॉ. गोऱ्हे म्हणाल्या की, पुणे हे सांस्कृतिक राजधानीचे आणि शिक्षणाचे माहेरघर आहे. पुस्तक महोत्सवामुळे पुणे शहरात सांस्कृतिक दृष्ट्या मोलाची भर पडली आहे. सोशल मीडियामुळे वाचन संस्कृतीचा फटका बसला आहे. पायरसीमुळे पुस्तकांना फटका बसला आहे. पुस्तक विक्री कमी होते, अशी खंतही त्यांनी बोलून दाखविली.

### सलग तिसरा विश्वविक्रम

पुणे पुस्तक महोत्सवाच्या निमित्ताने आयोजित होणाऱ्या उपक्रमांत सलग तिसऱ्या दिवशी गिनेस बुक ऑफ रेकॉर्डमध्ये विश्वविक्रमाची नोंद करण्यात आली. फर्गसन महाविद्यालयात विद्यार्थी, प्राध्यापक आणि प्राचार्यांनी एकत्र येत १८ हजार ७६० पुस्तकांच्या माध्यमातून जयतु भारत हे वाक्य तयार केले. एवढ्या मोठ्या प्रमाणात पुस्तकांचा वापर करून, बनविण्याचा हा रेकॉर्ड आहे. यापूर्वीचा, रेकॉर्ड हा सौदी अरेबियाच्या नावावर होता. तेथे ११ हजार १११ पुस्तकांच्या माध्यमातून वाक्य तयार करण्यात आले होते. गिनेस बुक ऑफ रेकॉर्डचे अधिकारी स्वप्नील डांगरीकर यांनी विश्वविक्रमाची घोषणा केली. विश्वविक्रम झाल्यानंतर मैदानावर देशभक्तीपर गाण्यांवर जल्लोष साजरा करण्यात आला.

### सांस्कृतिक, साहित्यिक कार्यक्रमांची रेलचेल

या महोत्सवात पुढील आठ दिवस सांस्कृतिक आणि साहित्यिक कार्यक्रमांची रेलचेल राहणार आहे. या महोत्सवात शहीद भगतसिंगांनी जेलमध्ये लिहिलेली डायरी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेली संविधानाची मूळ प्रत, छत्रपती शिवाजी महाराजांशी निगडित ऐतिहासिक कागदपत्रे पाहायला मिळणार आहे. या महोत्सवाच्या कालावधीत एकूण १०० पुस्तकांचे प्रकाशन होणार आहे. त्यातील ३२ पुस्तकांचे प्रकाशन एकाचवेळी होईल. त्यामुळे अधिकाधिक पुणेकरांनी महोत्सवात सहभागी व्हावे, असे आवाहन राजेश पांडे यांनी केले.

PuneCity, 17 Dec 2023, Page:007
https://epaper.dainikprabhat.com

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*




पुणे पुस्तक महोत्सवाच्या निमित्ताने आयोजित उपक्रमांत शनिवारी सलग तिसऱ्या दिवशी 'गिनीज बुक ऑफ रेकॉर्ड'मध्ये विश्वविक्रमाची नोंद करण्यात आली आहे. फर्ग्युसन महाविद्यालयात विद्यार्थी, प्राध्यापक आणि प्राचार्यांनी एकत्र येत १८ हजार ७६० पुस्तकांच्या माध्यमातून 'जयतु भारत' हे वाक्य तयार केले. एवढ्या मोठ्या प्रमाणात पुस्तकांचा वापर करून, बनविण्याचा हा विक्रम आहे. यापूर्वीचा विक्रम हा सौदी अरेबियाच्या नावावर होता. तेथे ११ हजार १११ पुस्तकांच्या माध्यमातून वाक्य तयार करण्यात आले होते.

Loksatta 17.12.2023

सकाळ

### कंपन्या, महाविद्यालयांना 'यूजीसी'कडून ताकीद

**नवी दिल्ली :** विद्यापीठ अनुदान आयोगाशी (यूजीसी) सहयोगी नसणाऱ्या परदेशी विद्यापीठांच्या पदव्या देणाऱ्या एडटेक कंपन्या आणि महाविद्यालयांना 'यूजीसी'ने ताकीद दिली आहे. तसेच, यामधील कोणतीही पदवी वैध नसल्याचे सांगत अशा संस्थांमध्ये प्रवेश घेऊ नयेत, अशीही सूचना 'यूजीसी'ने विद्यार्थ्यांना दिली आहे. अनेक उच्च शिक्षण संस्था आणि महाविद्यालयांनी परदेशस्थ शैक्षणिक संस्थांबरोबर पदवीसाठी सहयोग केला असून, या संस्थांना यूजीसीची मान्यता नसल्याचे निदर्शनास आले आहे, असे यूजीसीचे सचिव मनीष जोशी याबाबतीत बोलताना म्हणाले.

Pune, Main
17/12/2023 Page No. 6

## *News Paper Clippings During December 2023*

### *Section: Education*

# Readers' rush at Fergusson College as book fest starts

TIMES NEWS NETWORK

**Pune**: The much-awaited Pune Book Festival started on Fergusson College grounds on Saturday.

People from all walks of life were seen browsing the books, mostly available in Marathi and English.

The festival, organised by the National Book Trust in collaboration with various other organisations, will go on till December 24.

Aarohi Pathak, a class IV student who was at the festival with her parents, said, "I liked this place. There are a lot of storybooks. I have bought two and will buy more once I finish reading these."

Apart from the hundreds of stalls at the book festival, individual writers were also promoting their work among attendees.

A Guinness World Record was also created by using a total of 18,760 PM Narendra Modi's book — Exam Warriors — which were kept in a way that read "Jayatu Bharat".

Yadvinder Singh Sandhu, a freedom fighter and Bhagat Singh's grand-nephew, who was one of the guests at the inauguration function, said he was leaving behind the actual jail diary of Bhagat Singh at the nine-day book festival so people visiting the festival could see it.

Chandrakant Patil, the higher and technical education minister of the state, lauded the organisers' efforts, especially the fact that the festival has included many other cultural activities.

Neelam Gorhe, the deputy chairperson of Maharashtra Legislative Council, rued the decreasing interest in reading among youngsters and urged them to read more, further stating that such festivals help people rekindle the interest in books.

Aditya Waikul



Pune Book Festival started at Fergusson College on Saturday

The Times of India 17.12.2023

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

सकाळ

# ऑनलाइन अभ्यासक्रमांच्या फसव्या जाहिरातींवर कारवाई

## यूजीसीचा इशारा; विद्यार्थ्यांना जागृत राहण्याचा सल्ला

**पुणे, ता. १७ :** ऑनलाइन अभ्यासक्रमांच्या फसव्या जाहिराती करणाऱ्या परदेशी विद्यापीठांवर कारवाई करण्याचा इशारा विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) दिला आहे. यूजीसीने नुकतेच परदेशी विद्यापीठासाठी देशात कॅम्पस सुरू करण्यासाठी नियम प्रसिद्ध केले आहेत. त्यानंतर आता यूजीसीकडून यासंबंधीची नवीन अधिसूचना काढली आहे.

अधिसूचनेत यूजीसीने एडटेक कंपन्या आणि काही परदेशी विद्यापीठांना स्पष्ट ताकीद दिली आहे. यूजीसी म्हणते, “काही एडटेक कंपन्यांसह काही परदेशी विद्यापीठे किंवा संस्थांच्या सहकार्याने वृत्तपत्रे, सोशल मीडिया, टेलिव्हिजन आदींवर ऑनलाइन पद्धतीने पदवी आणि पदविका कार्यक्रम ऑफर करणाऱ्या जाहिराती करत असल्याचे लक्षात आले आहे. अशा फ्रँचायझी व्यवस्थेला परवानगी नाही. तसेच असा कोणताही कार्यक्रम किंवा पदवी यूजीसीद्वारे मान्यताप्राप्त होणार नाही. सर्व फसव्या एडटेक कंपन्यांवर तसेच त्यांच्या एचईआयएलवर नियमानुसार कारवाई केली जाईल.” त्याचप्रमाणे विद्यार्थी आणि जनतेला याबाबत जागरूक राहण्याचा सल्ला यूजीसीने दिला आहे. आयोगाच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणतीही परदेशी उच्च शैक्षणिक संस्था भारतात कोणताही अभ्यासक्रम देऊ शकणार नाही, असेही अधिसूचनेत म्हटले आहे.

> परवानगी नसतानाही परदेशी विद्यापीठे आणि भारतीय आस्थापने ऑनलाइन अभ्यासक्रम प्रदान करत आहेत. अशा संस्थांची पदवी यूजीसी स्वीकारणार नाही.
>
> **- डॉ. एम. जगदीशकुमार**

Pune, Pune-Today
18/12/2023 Page No. 1

लोकमत

# देशात लवकरच स्थापन होणार उच्चशिक्षण आयोग

## डॉ. अभय जेरे यांचे प्रतिपादन

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्यांमध्ये खासगी विद्यापीठांची संख्या वाढत असून, त्याद्वारे मोठ्या संख्येने पदवी प्रमाणपत्रांचे वाटप केले जात आहे. या प्रकारावर कुठेतरी अंकुश लावण्याची गरज आहे. विद्यापीठांनी संख्येपेक्षा गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यावर भर देण्याची आवश्यकता आहे. देशात अनेक दिवसांपासून उच्चशिक्षण आयोगाच्या स्थापनेसंदर्भात चर्चा सुरू आहे. या आयोगाचे विधेयक संसदेत लवकर मंजूर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे उच्चशिक्षणावर लक्ष ठेवणारा उच्चशिक्षण आयोग लवकरच अस्तित्वात येण्याची शक्यता आहे, अशी माहिती अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे (एआयसीटीई) उपाध्यक्ष आणि केंद्रीय शिक्षण विभागाचे चीफ इनोव्हेशन ऑफिसर डॉ. अभय जेरे यांनी दिली.

पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या ८४ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात डॉ. जेरे बोलत होते. यावेळी पत्रकार संघाचे अध्यक्ष पांडुरंग सांडभोर, सरचिटणीस सुकृत मोकाशी, पुणे पत्रकार प्रतिष्ठानचे कार्यवाह गजेंद्र बडे उपस्थित होते. डॉ. जेरे यांच्या हस्ते उल्लेखनीय कामगिरी करणारे पत्रकार, तसेच संज्ञापन आणि वृत्तपत्रविद्या विभागातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

डॉ. जेरे म्हणाले की, उच्चशिक्षण आयोगांतर्गत विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी), अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (एआयसीटीई), नॅशनल कौन्सिल ऑफ टीचर्स एज्युकेशन (एनसीटीई) या प्रामुख्याने तीन संस्था येतील. देशात नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी सुरू आहे.



> नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रसारमाध्यमे महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. हे धोरण सामान्यांपर्यंत पोहोचण्यासाठी शिक्षण विभाग आणि प्रसारमाध्यमांनी एकत्रित काम करण्याची गरज आहे.
>
> **-डॉ. अभय जेरे, उपाध्यक्ष, एआयसीटीई आणि चीफ इनोव्हेशन ऑफिसर, केंद्रीय शिक्षण विभाग**

### ...तरच देशातील शिक्षणसंस्था टिकतील

पुढील २५ वर्षांनी वर्गखोल्या कशा पद्धतीने राहतील, शिक्षणव्यवस्था कशी काम करेल, तंत्रज्ञानाचा शिक्षणात वापर, कुशल मनुष्यबळ, अशा सर्व बाजूंनी विचार करणारी शिक्षण संस्था टिकतील. आयआयटीमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांएवढ्याच लहान शहरांतील विद्यार्थ्यांकडून नावीन्यपूर्ण कल्पना पुढे येत असल्याचेही त्यांनी सांगितले.

Pune Main
Page No. 2 Dec 18, 2023
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

सकाळ

# 'उच्च शिक्षण आयोगाचे विधेयक लवकरच मंजूर होईल'

**पुणे, ता. १७ :** "देशात अनेक दिवसांपासून उच्च शिक्षण आयोगाची स्थापना होण्याबाबत चर्चा सुरू आहे. या आयोगांतर्गत विद्यापीठ अनुदान आयोग, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद (एनसीटीई) अशा तीन संस्था येणार आहेत. उच्च शिक्षण आयोगाचे विधेयक संसदेत लवकर मंजूर होण्याची शक्यता आहे," असे सूतोवाच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे (एआयसीटीई) उपाध्यक्ष आणि केंद्रीय शिक्षण विभागाचे चीफ इनोव्हेशन ऑफिसर डॉ. अभय जेरे यांनी केले.

पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात 'पुढील २५ वर्षांतील शिक्षण व्यवस्था' विषयावर डॉ. जेरे बोलत होते. यावेळी पत्रकार संघाचे अध्यक्ष पांडुरंग सांडभोर, सरचिटणीस सुकृत मोकाशी आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. जेरे म्हणाले,'‘देशात नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीची प्रक्रिया सुरू आहे. या धोरणाची अंमलबजावणी पूर्ण होण्यासाठी २०३० पर्यंतचा कालावधी लागणार आहे. पुढील २५ वर्षांनी वर्गखोल्या कशा असतील, शिक्षण व्यवस्था कशी काम करेल, तंत्रज्ञानाचा शिक्षणात वापर, कुशल मनुष्यबळ अशा सर्व बाजूंनी विचार करणाऱ्या शिक्षणसंस्था भविष्यात टिकतील."

डॉ. जेरे म्हणाले, "भारतीय तंत्रज्ञान संस्थेत (आयआयटी) शिकणाऱ्या विद्यार्थ्यांइतक्याच टू टायर आणि थ्री टायर शहरांतील विद्यार्थ्यांकडून भन्नाट आणि नावीन्यपूर्ण कल्पना पुढे येत आहेत. त्यांच्याकडून यशस्वी स्टार्टअपची निर्मिती होत आहे. चांद्रयान मोहिमेतही याच शहरांमधील विद्यार्थ्यांनी भूमिका बजावली आहे. नेचर जर्नलमध्येही भारतातील विज्ञान क्षेत्रातील प्रगतीबाबत आढावा घेण्यात आला आहे."

"राज्यात खासगी विद्यापीठांची संख्या वाढत असून, त्याद्वारे मोठ्या संख्येने पदवी प्रमाणपत्रांचे वाटप केले जात आहे. या प्रकारावर कुठेतरी अंकुश लावण्याची गरज आहे. विद्यापीठांनी विद्यार्थ्यांना पदवी वाटपाची मोठी संख्या गाठण्यापेक्षा गुणवत्तापूर्ण शिक्षणावर भर देण्याची आवश्यकता आहे," असे डॉ. जेरे यांनी सांगितले.

"येत्या काळात नोकऱ्यांचे स्वरूपही बदलणार आहे. अशा परिस्थितीत या पिढीला दोन ते तीन क्षेत्रांत नोकऱ्या कराव्या लागणार आहेत. त्यासाठी वेळोवेळी आवश्यक कौशल्याचे शिक्षण घ्यावे लागणार आहे. केवळ एकदा शिक्षण घेतले आणि झाले, ही संकल्पना संपुष्टात येईल. 'मल्टिटास्किंग' पद्धतीने काम करण्यासाठी ठराविक काळाने पुन्हा शिक्षण घ्यावे लागणार असल्याचे डॉ. जेरे यांनी अधोरेखित केले.

Pune, Main
18/12/2023 Page No. 2

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

# पुणे पुस्तक महोत्सवात पुणेकरांची तुडुंब गर्दी

पुणे : पुणे पुस्तक महोत्सवातील दालनामध्ये विविध लेखकांची असलेल्या पुस्तकांच्या खरेदीसाठी, याशिवाय महोत्सवातील विविध सांस्कृतिक कार्यक्रमांसह वैविध्यपूर्ण उपक्रमांना पुणेकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. रविवारचा दिवस पुस्तकप्रेमींनी सत्कारणी लावला.

राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या वतीने फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर पुणे पुस्तक महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. महोत्सवात रविवारी लहान मुलांसाठी द मॅजिक ऑफ वर्ड्स हे स्टोरी टेलिंगचे सत्र, ओरिगामी कार्यशाळा, ज्येष्ठ साहित्यिका डॉ. माधवी वैद्य यांचा सुट्टी आली, सुट्टी आली हा कार्यक्रम, यग पिकासोज ही इलस्ट्रेशन्सची कार्यशाळा, टॅलेंट हट, ऋचा लिमये यांचा अ सिम्बायोसिस ऑफ वर्ल्ड लिटरेचर, सायंकाळी शक्तीदात्री-द लिबरेशन ऑफ सीता अशी विविध सत्रे झाली. तर, तुकाराम दर्शन हे महानाट्य सादर झाले.



पुणे पुस्तक महोत्सवात विविध भाषातील पुस्तकांची दोनशेहून अधिक दालने आहेत. दररोज वेगवेगळे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. त्यामुळे पुणेकरांनी पुणे पुस्तक महोत्सवाला आवर्जून भेट दिली पाहिजे. पुणे पुस्तक महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे आणि राष्ट्रीय पुस्तक न्यासचे युवराज मलिक यांनी उत्तम नियोजन केले आहे.

**- प्रकाश जावडेकर, खासदार**

रविवारच्या सुटीचा योग साधून मोठ्या संख्येने पालक मुलांना घेऊन महोत्सवात दाखल झाले. सांस्कृतिक कार्यक्रमांचा आनंद घेत, त्यांना प्रतिसाद दिला. तसेच स्टोरीटेलिंग, इलस्ट्रेशन्सची कार्यशाळा, टॅलेंट हट अशा कार्यक्रमांमध्ये मुले उत्साहात सहभागी झाली. तसेच महोत्सवात असलेल्या विविध भारतीय भाषांतील पुस्तकांची दोनशेहून अधिक दालने फिरून पुस्तकांची खरेदीही आवर्जून करण्यात आली. या प्रदर्शनात धार्मिक, अध्यात्मिक साहित्याच्या पुस्तकांपासून ललित साहित्य, अनुवाद, स्पर्धा परीक्षा, शिक्षण, अभियांत्रिकी, तंत्रज्ञान अशा विविध विषयांवरील पुस्तके उपलब्ध आहेत. त्यामुळे पालक, मुले, युवा वर्ग या पुस्तकांमध्ये दिवसभर रमून गेले. त्यामुळे पुस्तक महोत्सवाला रविवारी प्रचंड गर्दी झाली होती.



Kesari 18.12.2023

# परदेशी विद्यापीठांच्या ऑनलाइन अभ्यासक्रमांना बंदी

**पुणे** : विद्यापीठ अनुदान मंडळा(यूजीसी)तर्फे नुकतीच परदेशी विद्यापीठांसाठी देशात कॅम्पस सुरू करण्यासाठी नियमावली प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यानंतर आता यूजीसीकडून एक नवीन अधिसूचना काढण्यात आली आहे. त्यानुसार ऑनलाइन अभ्यासक्रमाची फसवी जाहिरात करणाऱ्या परदेशी विद्यापीठांवर आणि जाहिरात देणाऱ्यावर नियमानुसार कारवाई करण्याचा इशारा यूजीसीने दिला आहे.

यूजीसीचे सचिव मनीष जोशी यांनी परिपत्रकाद्वारे दिलेल्या माहितीनुसार, काही एडटेक कंपन्या, काही परदेशी विद्यापीठे विविध संस्थांच्या सहकार्याने वृत्तपत्रे/समाज माध्य/टेलिव्हिजन इत्यादींवर ऑनलाइन पद्धतीने पदवी आणि पदविका कार्यक्रम ऑफर करणाऱ्या जाहिराती करत असल्याचे लक्षात आले आहे. अशा फ्रॅन्चायझी व्यवस्थेला परवानगी नाही. तसेच असा कोणताही कार्यक्रम, पदवी यूजीसीद्वारे मान्यताप्राप्त होणार नाही.

सर्व फसव्या एडटेक कंपन्यांवर, तसेच त्यांच्या एचईएलवर नियमानुसार कारवाई केली जाईल, असे यूजीसीने स्पष्ट केले आहे. त्याचप्रमाणे विद्यार्थी आणि जनतेला याबाबत जागरूक राहण्याचा सल्ला यूजीसीने दिला आहे.

आयोगाच्या पूर्वपरवानगी शिवाय कोणतीही परदेशी उच्च शैक्षणिक संस्था भारतात कोणताही अभ्यासक्रम देऊ शकणार नाही. हायर एज्युकेशन इन्स्टिट्यूट कोणत्याही फ्रॅन्चायझी व्यवस्थेअंतर्गत अभ्यासक्रम देऊ शकता नाही. तसेच अशा अभ्यासक्रमांना यूजीसीद्वारे मान्यता दिली जाणार नाही, असेही यूजीसीने आपल्या अधिसूचनेत स्पष्ट केले आहे.

Kesari 18.12.2023

# *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

लोकमत

# पुण्याचा पुस्तक महोत्सव समस्त नागरिकांचा

## डॉ. नीलम गोऱ्हे : राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या वतीने साहित्यिक कार्यक्रमांची मेजवानी

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** मी परराज्यातील, अनेक मोठ्या शहरांमधील पुस्तक महोत्सव पाहिले. ते सगळे विशिष्ट वर्गासाठी आयोजित होते. पुण्यातील पुस्तक महोत्सव मात्र समस्त नागरिकांचा झाला आहे, अशा शब्दात विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या वतीने आयोजित पुस्तक महोत्सवाचे कौतुक केले. फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित या महोत्सवाचे उद्घाटन शनिवारी सायंकाळी डॉ. गोऱ्हे यांच्या हस्ते झाले.

राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. न्यासाचे अध्यक्ष मिलिंद मराठे, संचालक युवराज मलिक, सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. सुरेश गोसावी, पुणे महापालिकेचे आयुक्त विक्रम कुमार, अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे, माजी महापौर मुरलीधर मोहोळ, उद्योजक विशाल चोरडिया, जय काकडे, सुशील जाधव, कृष्णकुमार गोयल, शहीद भगतसिंग यांचे पणतू यादवेंद्र सिंग संधू, प्रकाशक राजीव बर्वे, डीईएसचे डॉ. शरद कुंटे व्यासपीठावर होते. मोहन शेटे लिखित 'हिंदवी स्वराज्य स्थापना' पुस्तकाचे प्रकाशन कार्यक्रमात करण्यात आले.

संयोजक राजेश पांडे म्हणाले, महोत्सवात १०० पुस्तकांचे प्रकाशन करणार आहे. ३२ पुस्तकांचे प्रकाशन डॉ. संजय चाकणे व मिलिंद कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. बागेश्री मंठाळकर यांनी आभार व्यक्त केले.

### कोथरूडच्या नागरिकांना खास सवलत

कोथरूड मतदारसंघातील जे नागरिक पुस्तक खरेदी करतील त्यांना सवलत देऊ, असे मंत्री पाटील यांनी जाहीर केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी वॉरियर्स व हिंदवी स्वराज्य स्थापना ही पुस्तके नागरिकांना देण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. महाराष्ट्र व भगतसिंग यांचा फार जुना ऋणानुबंध असल्याचे भगतसिंग यांचे वंशज यादवेंद्र सिंग यांनी सांगताच श्रोत्यांनी टाळ्यांचा कडकडाट केला. भगतसिंग यांनी तुरुंगात १०० पेक्षा जास्त पुस्तके वाचली होती. पुस्तकांमधून ज्ञान मिळते. अशा वाचनामधूनच देशात आणखी भगतसिंग निर्माण होतील, असे ते म्हणाले.

Pune Main
Page No. 2 Dec 18, 2023
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

**लोकमत**

पुणे पुस्तक महोत्सवातील डायरी पाहिल्यानंतर तरुणांच्या भावना

# भगतसिंग यांची हस्तलिखित डायरी पाहताक्षणी आले अंगावर शहारे!

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** 'प्रचंड संघर्ष, असहनीय यातना, अत्याचार भगतसिंग यांच्यावर होत असताना जेलमध्ये त्यांनी ही डायरी लिहिली. यात कुठेच जराही खोडाखोड नाही. यावरून इतका संघर्ष करत असतानाही त्यांचे विचार किती स्पष्ट होते? याची कल्पना येते. भगतसिंग हे त्यांच्या कार्यातूनच नव्हे तर त्यांचा संघर्ष किती विचारपूर्वक व ध्येयाने झपाटलेला असेल याची अनुभुती घेता येते. ही डायरी पाहताक्षणी अंगावर शहारे आले, अशी भावना तरुणांनी व्यक्त केली.



भगतसिंग यांची हस्तलिखित डायरीची प्रत.



वाचनसंस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या (नॅशनल बुक ट्रस्ट) पुस्तक महोत्सवाचे उद्‌घाटन शनिवारी (१६ डिसेंबर) फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर झाले. या महोत्सवात भगतसिंग यांनी जेलमध्ये असताना लिहिलेली डायरी तरुणांना प्रेरित करण्यासाठी ठेवण्यात आली आहे. ही डायरी पाहण्यासाठी आलेला रोहित कुळत सांगत होता.

तरुण पिढी वाचन संस्कृती विसरत चाललेली आहे. अशी तक्रार करत बसण्यापेक्षा वाचनासाठी पोषक वातावरण मिळावे. भगतसिंग यांची डायरी पाहून प्रेरणा मिळावी हा हेतू यामागे आहे. ही डायरी पाहण्यासाठी पुण्यातीलच नाही तर इतर शहरातूनसुद्धा तरुण येत आहेत.

भगतसिंग यांना फाशी देण्याअगोदर अंतिम इच्छा विचारण्यात आली. त्यावेळी मला पुस्तकाचा शेवटचा धडा वाचून झाल्यानंतर फाशी द्या. समोर मरण उभे असताना रडत न बसता माझं पुस्तक मला वाचून संपवून मग मला शहीद व्हायचे आहे, असा विचार भगतसिंग करतात. त्यांना वाचन किती प्रिय होते, हे लक्षात येते, असे संयोजिका सदस्य सांगत होत्या.

पुणे पुस्तक महोत्सवात ज्येष्ठ कवी कुमार विश्वास यांचे व्याख्यान आज (सोमवारी) दु. १२ वा. होईल. यावेळी भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे उपस्थित राहणार आहे.

> या महोत्सवाच्या माध्यमातून तरुणांमध्ये वाचनाची गोडी निर्माण होऊन त्यांना मोबाइल नावाच्या डिजिटल ड्रग्जपासून दूर ठेवता येईल, असा आमचा प्रयत्न आहे.
>
> **- बागेश्री मंठाळकर, पुणे पुस्तक महोत्सव संयोजन समिती सदस्य**

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची स्वाक्षरी असलेली प्रत

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची स्वाक्षरी असलेल्या संविधानाच्या जगभरात केवळ ५ प्रती आहेत. त्यातील एक प्रत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडे आहे. ती प्रत महोत्सवामध्ये उपलब्ध होणार आहे. यासोबतच छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांचे हस्तलिखितही यावेळेस पाहता येणार आहे.

### मुलांसाठी विशेष उपक्रम

पुणे पुस्तक महोत्सवात लहान मुलांसाठी द मॅजिक ऑफ वर्डस हे स्टोरी टेलिंगचे सत्र, ओरिगामी कार्यशाळा, ज्येष्ठ साहित्यिका डॉ. माधवी वैद्य यांचा सुटी आली, सुटी आली हा कार्यक्रम, यंग पिकासोज ही इलस्ट्रेशन्सची कार्यशाळा, टॅलेंट हंट, ऋचा लिमये यांचा अ सिम्बायोसिस ऑफ वर्ल्ड लिटरेचर, सायं. शक्तीदात्री - द लिबरेशन ऑफ सीता अशा विविध सत्रांचे आयोजन करण्यात आले होते, तर तुकाराम दर्शन हे महानाट्य सादर झाले.

Hello Pune
Page No. 4 Dec 18, 2023
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

सकाळ

# वाचकांची पुस्तक प्रदर्शनाला अलोट गर्दी

## गोष्टी वाचण्यात रमले बालवाचक; पुस्तक खरेदीसाठी रांगा

पुणे पुस्तक महोत्सव
16 ते 24 डिसेंबर, 2023

**पुणे, ता. १७ :** रविवारचा सुट्टीचा दिवस असल्याने वाचनप्रेमींची पावले आपोआपच फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानाकडे वळाली. एकीकडे आपल्या आवडत्या साहित्य प्रकारातील पुस्तके हातात घेऊन निहाळणारे वाचक... अन् दुसरीकडे मोठ्या उत्सुकतेने गोष्टींच्या पुस्तकांमध्ये नकळत रमलेले बालवाचक. पुस्तकप्रेमांची अलोट गर्दी हे पुणे पुस्तक महोत्सवाच्या आजच्या दिवसाचे वैशिष्ट्य ठरले.

'राष्ट्रीय पुस्तक न्यास'तर्फे आयोजित पुणे पुस्तक महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी जवळपास ३० हजारांहून अधिक नागरिकांनी पुस्तक प्रदर्शनाला भेट दिली. प्रदर्शनात भारतीय भाषांमधील लाखो पुस्तके येथे उपलब्ध आहेत. हे प्रदर्शन पाहण्यासाठी आपल्या मुलांसह पालक मोठ्या संख्येने आले होते. तर, आजी-आजोबादेखील आपल्या नातवंडांसह पुस्तकांवरून हात फिरवत होते. पुस्तक खरेदीसाठी वाचकांच्या रांगा लागल्याचे चित्र महोत्सवात पाहायला मिळाले. महोत्सवात रविवारी लहान मुलांसाठी 'द मॅजिक ऑफ वर्ड्स', ओरिगामी कार्यशाळा, ज्येष्ठ लेखिका डॉ. माधवी वैद्य यांचा 'सुट्टी आली, सुट्टी आली' हा कार्यक्रम, 'यंग पिकासोज' ही कार्यशाळा, टॅलेंट हंट यांसह विविध कार्यक्रम झाले. तर 'तुकाराम दर्शन' हे महानाट्य सादर झाले.



फर्ग्युसन महाविद्यालय मैदान : पुणे पुस्तक महोत्सवांतर्गत आयोजित पुस्तक प्रदर्शनाला पुस्तकप्रेमींनी भेट दिली.

### पुस्तक प्रदर्शनातील निरीक्षणे

- लहान मुलांसाठी असणाऱ्या पुस्तकांच्या दालनात प्रचंड गर्दी
- विविध साहित्य प्रकारातील इंग्रजी पुस्तकांकडे वाचकांचा सर्वाधिक कल
- पारंपरिक मराठी साहित्यासह नवीन लिखाणाला पसंती

"पुणे पुस्तक महोत्सवात विविध भाषांतील पुस्तकांची दोनशेहून अधिक दालने आहेत. दररोज वेगवेगळे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. त्यामुळे पुणेकरांनी पुणे पुस्तक महोत्सवाला आवर्जून भेट दिली पाहिजे. इतक्या मोठ्या प्रमाणावर पुण्यात पहिल्यांदाच पुस्तक महोत्सव होत आहे.

**- प्रकाश जावडेकर**, खासदार

## कुमार विश्वास, विक्रम संपत, द्विवेदी यांना ऐकण्याची संधी

पुणे पुस्तक महोत्सवात कवी कुमार विश्वास, लेखक विक्रम संपत आणि 'लल्लनटॉप'चे सौरभ द्विवेदी यांचे विचार सोमवारी (ता. १८) ऐकण्याची संधी पुणेकरांना मिळणार आहे. हे तिन्ही कार्यक्रम विनामूल्य आहेत, अशी माहिती महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे यांनी दिली.

राष्ट्रीय पुस्तक न्यास यांच्यातर्फे २४ डिसेंबरपर्यंत पुणे पुस्तक महोत्सव फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित केला आहे. या महोत्सवांतर्गत कवी कुमार विश्वास यांचा 'कवि की कलम से' हा कार्यक्रम सोमवारी दुपारी बारा वाजता महाविद्यालयाच्या ॲम्फी थिएटरमध्ये होणार आहे.

या वेळी भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे उपस्थित राहतील. तर सौरभ द्विवेदी यांचे विचार दुपारी चार वाजता ऐकण्याची संधी मिळणार आहे. त्यानंतर लेखक विक्रम संपत हे 'स्वातंत्र्यवीर सावरकर समज आणि गैरसमज' विषयावर सायंकाळी साडे पाच वाजता मार्गदर्शन करतील.

### आजचे कार्यक्रम

- **स्टोरी टेलिंग : सकाळी १०.३० वाजता**
- **मंडला आर्ट कार्यक्रम : सकाळी ११.३० वाजता**
- **वेदिक मॅथेमॅटिक्स : दुपारी १२.३० वाजता**
- **टॅलेंट हंट : दुपारी १.३० वाजता**
- **काश्मिरी बँड : सायंकाळी ६.३० वाजता**

Pune, Main
18/12/2023 Page No. 3

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

पुढारी





रविवारी पुणे पुस्तक महोत्सवाला प्रचंड प्रतिसाद मिळाला. पुस्तके पाहण्यासाठी आणि खरेदीसाठी पुणेकरांनी मोठी गर्दी केल्याचे दिसत होते.

# रविवार ठरला 'पुस्तक वार'

## तुडुंब गर्दी अन् सहकुटुंब पुस्तक खरेदी



**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**रविवार सुटीचा दिवस पुणेकरांचा खऱ्या अर्थाने 'पुस्तक वार' ठरला. पुस्तक महोत्सवातील दालनांमध्ये पुस्तके पाहण्यासाठी लहान मुलांसह कुटुंबीयांनी उपस्थिती लावली. सांस्कृतिक कार्यक्रम, वैविध्यपूर्ण उपक्रमांना प्रतिसाद दिला.**

राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या वतीने फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर पुणे पुस्तक महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. महोत्सवात रविवारी लहान मुलांसाठी 'द मॅजिक ऑफ वर्ड्स' हे स्टोरी टेलिंगचे सत्र, ओरिगामी कार्यशाळा, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. माधवी वैद्य यांचा 'सुट्टी आली, सुट्टी आली' हा कार्यक्रम, 'यंग पिकासोज' ही इलस्ट्रेशन्सची कार्यशाळा, टॅलेंट हंट, ऋचा लिमये यांचा 'अ सिम्बायोसिस ऑफ वर्ल्ड लिटरेचर', सायंकाळी 'शक्तिदात्री - द लिबरेशन ऑफ सीता' अशी विविध सत्रे झाली. तर, 'तुकाराम दर्शन' हे महानाट्य सादर झाले.

या प्रदर्शनात धार्मिक, आध्यात्मिक साहित्याच्या पुस्तकांपासून ललित साहित्य, अनुवाद, स्पर्धा परीक्षा, शिक्षण, अभियांत्रिकी, तंत्रज्ञान अशा विविध विषयांवरील पुस्तके उपलब्ध आहेत. त्यामुळे पालक, मुले, युवावर्ग या पुस्तकांमध्ये दिवसभर रमून गेले. रविवारच्या सुटीचा योग साधून मोठ्या संख्येने पालक मुलांना घेऊन महोत्सवात दाखल झाले. इंग्रजी रहस्य कथा, गोष्टी आणि कॉर्टून्सच्या स्वरूपातील राम, कृष्णाच्या कथा घेण्याकडे मुलांचा जास्त कल असल्याचे दिसले. स्टोरीटेलिंग, इलस्ट्रेशन्सची कार्यशाळा, टॅलेंट हंट अशा कार्यक्रमांमध्ये मुले उत्साहात सहभागी झाली. तसेच महोत्सवात असलेल्या विविध भारतीय भाषांतील पुस्तकांची दोनशेहून अधिक दालने फिरून पुस्तकांची खरेदीही केली.

### कुमार विश्वास, विक्रम संपत, सौरभ द्विवेदी यांना आज ऐकण्याची संधी

पुणे पुस्तक महोत्सवाच्या निमित्ताने सोमवारी (दि.१८) एकाच दिवशी पुणेकरांना प्रसिद्ध कवी कुमार विश्वास, लेखक विक्रम संपत आणि 'लल्लनटॉप' फेम पत्रकार सौरभ द्विवेदी यांचे विचार ऐकता येणार आहेत. हे तिन्ही कार्यक्रम विनामूल्य असल्याने, विद्यार्थी, शिक्षक, अभ्यासक आणि प्राध्यापकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे यांनी केले आहे. राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या (नॅशनल बुक ट्रस्ट) वतीने फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर २४ डिसेंबरपर्यंत पुणे पुस्तक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवानिमित्ताने नागरिकांना साहित्यिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचा आस्वाद घेता येणार आहे. पुणे पुस्तक महोत्सवाच्या निमित्ताने नामांकित विचारवंतांना ऐकण्याची संधी पुणेकरांना मिळणार आहे. त्यामुळे अधिकाधिक नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे यांनी केले आहे.

**पंतप्रधानांच्या हस्ते संविधान :** पुस्तक महोत्सवामध्ये जागोजागी सेल्फी पॉईंट उभा करण्यात आले आहेत. लहान मुलांसह मोठ्यांनी समाजमाध्यमावर फोटो पोस्ट करण्यासाठी आणि पुस्तक महोत्सवाची आठवण राहावी म्हणून सेल्फी पाईंटवर फोटो काढत होते. यामध्ये दोन सेल्फी पॉईंटवर अधिक गर्दी दिसून आली. त्यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून संविधान स्वीकारत असल्याचा सेल्फी काढण्यासाठी गर्दी होती. तर त्याच्याच बाजूला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे पुस्तक देतानाचा सेल्फी पॉईंट नागरिकांचे आकर्षण ठरत आहे.

My Pune Edition
Dec 18, 2023 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

## News Paper Clippings During December 2023

## Section: Education

पुढारी

# पुण्यात कन्नड पुस्तकं हेच खरं सरप्राईज होतं!

पुढारी ANCHOR

नरेंद्र साठे
पुढारी प्रतिनिधी

**पुणे : 'वीस वर्षे झाली, पुण्यात स्थायिक झालोय. आमचं शिक्षण गावी मंगलोरलाच झालं. आम्हा दोघा नवरा- बायकोला वाचनाची आवड असल्यानं, पुस्तक महोत्सवाला येण्याचं ठरलं होतं. मराठी फारशी वाचता येत नाही, पण इंग्रजी, हिंदी पुस्तकं घेण्याच्या उद्देशानं महोत्सवाला आलो. मात्र, फिरत असताना अचानक कन्नड भाषेतील फलक दिसला. बघतो तर सगळी कन्नड भाषेतील पुस्तकं! हे आमच्यासाठी सरप्राईज होतं,' पुण्यात राहणारे कन्नड भाषिक रविशंकर मय्या आणि अनुपमा मय्या सांगत होते.**

### कन्नड भाषिकांना पुणे पुस्तक महोत्सवात सुखद धक्का



पुण्यातील कन्नड भाषिकांनी आपली आवडती कन्नड पुस्तके पाहिली.

पुण्यात पहिल्यांदाच साहित्य संमेलनाव्यतिरिक्त इतर ठिकाणी एवढ्या मोठ्या प्रमाणात पुस्तक महोत्सव होत असल्याचे जाणकार सांगत आहेत. या महोत्सवामध्ये मराठी भाषेची सर्वाधिक दालने असली तरी इंग्रजीसह अन्य भारतीय भाषांची दालने पाहण्यासाठीही गर्दी होत आहे. राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या वतीने फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर पुणे पुस्तक महोत्सव सुरू आहे. रविशंकर मय्या म्हणाले, 'लहानपणी गोष्टींची पुस्तकं वाचली होती. गोष्टी ऐकल्या होत्या. त्या आता पुस्तकस्वरूपात उपलब्ध झाल्या आहेत. त्या घेण्यासाठी आम्हाला मंगलोर किंवा कर्नाटकमध्ये जाण्याची गरज भासली नाही. पुण्यात आम्हाला पहिल्यांदाच कन्नड भाषेतील पुस्तकं एकाच ठिकाणी एवढ्या मोठ्या प्रमाणात मिळाली. इतर पुस्तकं घेतलीच, पण मातृभाषेतील पुस्तकं पाहून मोह आवरला नाही. मित्रांनाही मला पुस्तके भेट देता येणार आहेत.'

### छत्रपती शिवाजी महाराजांसह तुकोबादेखील कन्नड साहित्यात

महोत्सवात 'साहित्य भांडार, बंगलोर' असा इंग्रजीत नाव लिहिलेल्या स्टॉलच्या पुढं एका कापडी बॅनरवर हेच नाव कन्नड भाषेत लिहिलेलं असल्यानं लक्ष वेधून घेतं. या दालनाचे अभिजित राशी म्हणाले, 'अनेकांनी स्वतः येऊन आमची विचारपूस केली आहे, काहींनी कन्नड साहित्याची आवड असल्यानं पुस्तकं घेतली आहेत. मराठी वाचकांना कन्नड आणि मराठीमध्येही भैरप्पा यांची दोन्हीही पुस्तकं एकाच वेळी उपलब्ध झाली आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांची मराठी भाषेतील काही पुस्तकं कन्नडमध्ये भाषांतरित झाली आहेत, त्याशिवाय संत तुकाराम महाराजांच्या संदर्भातील काही पुस्तकंदेखील कन्नडमध्ये उपलब्ध आहेत.'

> 'आमच्यासाठी हा नवीन अनुभव होता. एस. एल. भैरप्पांची पुस्तकं आम्ही प्रकाशित करत असल्यानं त्यांचे सर्व साहित्य उपलब्ध करून देण्यात आलं. भैरप्पांच्या पुस्तकांची अनेकांकडून विचारणा होत असून, ते आम्हाला उपलब्ध करून देत असल्याचा आम्हाला आनंद होत आहे,' कन्नड पुस्तकाच्या दालनातील ईश्वर व्ही. एन. सांगत होते.

My Pune Edition
Dec 18, 2023 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

चित्रवृत्त

सर्व फोटो : स्वप्नील शिंदे



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे छायाचित्र असणाऱ्या 'फोटो पॉइंट'ने पुणेकरांचे लक्ष वेधले. याद्वारे नागरिकांनी मोदी यांच्या बरोबर फोटो काढण्याची संधी साधली.



शहीद भगतसिंग यांनी जेलमध्ये लिहिलेल्या डायरीची मूळ प्रत मोबाइलच्या कॅमेऱ्यामध्ये पुणेकरांनी टिपली.



लहान मुलांनीही आवडती पुस्तके आनंदाने हाताळली.



पुणे पुस्तक महोत्सवात रविवारी तरुणाईचे प्रमाण उल्लेखनीय होते.

Maharashtra Times 18.12.2023

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

# वाचनप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## रविवारी दिवसभरात हजारो नागरिकांनी दिली भेट; तरुणाईचे प्रमाण उल्लेखनीय

**पुणे पुस्तक महोत्सव**

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्व जण रविवारी फर्ग्युसन महाविद्यालयात पुस्तके हाताळण्यात रमले होते. आकर्षक सजावट, रविवारची सुट्टी, पुस्तकांमधील वैविध्य अन् सांस्कृतिक कार्यक्रमांची जोड अशी पर्वणी पुणेकरांना पुणे पुस्तक महोत्सवात एकाच छताखाली मिळाली. दुपारनंतर पुस्तकप्रेमींच्या गर्दीने उच्चांक गाठला. सुमारे पन्नास हजारांच्या घरात ही संख्या पोहोचली होती. विशेषतः तरुणाईचे प्रमाण उल्लेखनीय होते.

राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या वतीने फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर पुणे पुस्तक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी लहान मुलांसाठी 'द मॅजिक ऑफ वर्ड्स' हे स्टोरी टेलिंगचे सत्र, ओरिगामी कार्यशाळा, ज्येष्ठ लेखिका डॉ. माधवी वैद्य यांचा 'सुट्टी आली, सुट्टी आली' हा कार्यक्रम, 'यंग पिकासोज' ही इलस्ट्रेशन्सची कार्यशाळा, टॅलेंट हंट, ऋचा लिमये यांचा 'अ सिम्बायोसिस ऑफ वर्ल्ड लिटरेचर', 'शक्तीदात्री - द लिबरेशन ऑफ सीता' अशी विविध सत्रे झाली. त्यानंतर तुकाराम दर्शन हे महानाट्य सादर झाले.

महोत्सवात रविवारी दिवसभर सुमारे दोनशेहून अधिक स्टॉल्सच्या माध्यमातून नागरिकांनी हजारो पुस्तके हाताळली. विविध साहित्यप्रकारांसह सामाजिक, अध्यात्मिक, ऐतिहासिक, शैक्षणिक अशा विविध विषयांची लाखो पुस्तके नागरिकांना महोत्सवात पाहिली. यासह करिअर मार्गदर्शन, एकाग्रता, तंत्रज्ञानविषयक सप्रयोग माहिती देणारे विभागही नागरिकांचे लक्ष वेधणारे ठरले. मराठी, हिंदी, इंग्रजीसह प्रादेशिक भाषांतील पुस्तकांचाही प्रदर्शनात समावेश आहे. खासगी प्रकाशन संस्थांसह बालभारती, साहित्य अकादमीसह विविध सरकारी संस्थांही यामध्ये सहभागी झाल्या आहेत. पालकांनी रविवारच्या सुट्टीचे निमित्त साधून लहान मुलांसोबत प्रदर्शनाला हजेरी लावली. साहित्य क्षेत्रातील मान्यवरांनीही महोत्सवाला

स्वप्नील शिंदे



राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या वतीने फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित पुणे पुस्तक महोत्सवाला रविवारी हजारो नागरिकांनी भेट दिली.

### फोटो पॉइंटची क्रेझ

पुस्तक महोत्सवाच्या आठवणी कॅमेरामध्ये साठवून ठेवण्यासाठी नागरिकांची लगबग सुरू होती. यातच पंतप्रधान नरेंद्र मोदी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे छायाचित्र असणारे सेल्फी पॉइंट, फोटो काढण्यासाठी केलेल्या खास फ्रेमही सर्व वयोगटांतील नागरिकांचे आकर्षण ठरल्या.

### दिव्यांगांसाठीही विशेष स्टॉल

कर्णबधिर, दृष्टिहीनांसह विशेष मुलांची गरज लक्षात घेऊन प्रकाशन संस्थांनी पुस्तके उपलब्ध करून दिली आहेत. राष्ट्रीय पुस्तक न्यासाने प्रकाशित केलेली पुस्तके, सांकेतिक भाषेबाबत जागृती करणारे स्टॉल या महोत्सवात समाविष्ट केले आहेत.

### महोत्सवाची वैशिष्ट्ये

- दोनशेहून अधिक स्टॉल्सवर दोन लाखांहून अधिक पुस्तके.
- मराठीसह देशभरातील विविध भाषांतील पुस्तके, ग्रंथ उपलब्ध.
- मुलांसाठी रंजक गोष्टींची पुस्तके.
- पौराणिक पोथ्या, शैक्षणिक पुस्तकांचाही समावेश.
- आंतरराष्ट्रीय आणि सरकारी प्रकाशन संस्थाही समाविष्ट.
- 'किशोर'च्या मुखपृष्ठांचे प्रदर्शन.



"पुणे पुस्तक महोत्सवात विविध भाषांतील पुस्तकांची दोनशेहून अधिक दालने आहेत. दररोज वेगवेगळे कार्यक्रमही आयोजित केले असल्यामुळे पुणेकरांनी महोत्सवाला आवर्जून भेट द्यायला हवी. इतक्या मोठ्या प्रमाणावर पुण्यात पहिल्यांदाच पुस्तक महोत्सव होत आहे.

\- प्रकाश जावडेकर, खासदार

### पुस्तकप्रेमी सांगतात...

"एकाच ठिकाणी अनेक पुस्तके उपलब्ध होत आहेत. लहान मुलांना विविध प्रकारची पुस्तके पाहायला मिळत आहेत. या निमित्ताने त्यांचीही वाचनजिज्ञासा वाढत आहे.

\- पूजा ठुबे

विविध प्रकारची लाखो पुस्तके पाहून पुस्तक खरेदीबाबत उत्सुकता वाढत आहे. विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचा समावेश असल्याने वेळ चांगला जात आहे.

\- उषा गरड

### यांनीही वेधले लक्ष

- डोसा, भेळ, हुरडा, आईस्क्रीम अशा जीभेचे चोचले पुरविणाऱ्या खाद्यपदार्थांची मेजवानी
- प्रवेशद्वारातच चित्र रेखाटणारे कलाकार, मातीतून आकार घेणारी शिल्प
- पुस्तकाच्या गावाची माहिती देणारी प्रदर्शनी

Maharashtra Times 18.12.23

## News Paper Clippings During December 2023

### Section: Education



City | Pune Times Mirror | Monday, December 18, 2023 | 5

# Keep a distance from shady online courses

**UGC decision to categorise degrees obtained from foreign institutes as invalid welcomed**

Yashpal Sonkamble
yashpal@punemirror.com
TWEET @YashPune_Mirror

The decision by the University Grants Commission (UGC) to declare collaborative agreements between specific higher education institutes (HEIs) and foreign educational institutions as fraudulent has been met with approval from students, parents, working professionals and senior citizens.

This decision is expected to bring immense relief to learners ensnared in fraudulent practices by education technology (edutech) companies.

In a recent development, the UGC has urged students and learners to steer clear of shady online and distance learning courses, including bachelor's and master's degree and doctorate programmes, and other diploma programmes, being offered by certain edutech companies and colleges in India in collaboration with unrecognised foreign universities.

The UGC has emphasised the importance of credible education and called on students to exercise caution and refrain from enrolling in such online degree courses.

PIC FOR REPRESENTATIONAL PURPOSES ONLY

At the same, a stern warning has been issued to edutech companies and colleges, directing them to cease the operation of any illegal degree courses.

In an official notification, the UGC said, "UGC has observed and has been informed that many HEIs and colleges have entered into collaborative agreements/arrangements with foreign-based educational institutions/providers not recognized by the Commission and have been facilitating the issuance of degrees to the students enrolled in those institutions/college from such foreign-based educational institutions/educational providers."

"Any such kind of collaboration/arrangement is not recognized by the UGC and, accordingly, the degrees issued subsequent to such collaboration/arrangement are also not recognized by the Commission," it read.

Harshal Lohkare, a post-graduate student, said, "Students and parents have been advocating for a ban on degree courses offered by such education technology companies for the past several years. The UGC has finally made a significant decision. This will provide considerable relief to students who find themselves trapped in fraudulent practices by edutech companies."

Smita Patil, a parent and an education activist said, "Over 500 fraudulent virtual edutech companies are offering online and distance learning degrees with no real value. Their certificates turn out to be just decorative pieces of paper, as parents and students neglect to verify their affiliation with legitimate foreign universities. Many such edutech companies even lack a physical presence and rely on telecommunications, enticing advertisements and digital marketing to lure students, working professionals and senior citizens."

Prakash Pawar, vice-principal of Fergusson College, appreciated the UGC's decision. He said, "The regulation of online and distance learning degree courses by the apex body of the Indian education system is a welcomed move. Students and parents to remain informed about these developments."

Manish Joshi, secretary, UGC, said, "Several higher education institutes and colleges have started online degree programs by partnering with foreign educational institutions that lack recognition from the UGC. However, degrees obtained by pursuing courses from foreign universities that are not officially recognised do not hold validity."

He added, "The UGC has noted that edutech companies persist in advertising these unlawful courses. It is crucial for students and parents to be aware that invalid degree and diploma courses are being offered through online education systems. Strict action will be taken against such edutech companies that provide unauthorised courses."

REAL RICH
Mortgage rates expected to come down in 2024.
#RealRichPrediction
thee_realrich RealRich The Real Rich Show

Pune Mirror 18.12.2023

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

**प्रभात**

# पुस्तकवाचन हा स्वसंवादाचा उत्तम मार्ग

**डॉ. कुमार विश्वास यांचे प्रतिपादन**

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १८** - पुस्तकांमुळे वाचकाच्या कल्पनाशक्तीला वाव मिळतो. मात्र, वेब सीरिज, चित्रपटांतून प्रेक्षकांच्या कल्पना दृश्यांतून बंदिस्त केल्या जातात. पुस्तकांचे वाचन हा स्वसंवादाचा उत्तम मार्ग आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध हिंदी कवि डॉ. कुमार विश्वास यांनी केले. त्यामुळे पिझ्झा, कपडे अशा गोष्टींवरील खर्च कमी करा, पण पुस्तके विकत घेऊन वाचा, असे आवाहनही त्यांनी केले. पुस्तकांमुळे आत्म्याची इम्युनिटी वाढते. वाचलेले मनात राहते आणि कधी ना कधी कामी येते, असे त्यांनी सांगितले.

राष्ट्रीय पुस्तक न्यासतर्फे आयोजित पुणे पुस्तक महोत्सवात कवि की कल्पना से या विषयावर डॉ. कुमार विश्वास यांनी संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते. भारतीय जनता पक्षाचे सरचिटणीस विनोद तावडे, राष्ट्रीय पुस्तक न्यासचे संचालक युवराज मलिक, महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे, खडकी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल, भाजपचे पुणे शहराध्यक्ष धीरज घाटे, प्रसेनजित फडणवीस या वेळी उपस्थित होते. दरम्यान, गेल्या तीन दिवसांत तीन पुस्तकांशी, वाचनाशी संबंधित तीन विश्वविक्रम पुणे पुस्तक महोत्सवात नोंदवले गेले आहेत. पुस्तकांची दोनशेपेक्षा जास्त दालने असल्याचे राजेश पांडे यांनी सांगितले.

### विचार करण्याची आवश्यकता

स्वराज्य म्हणजे केवळ पाच वर्षांतून एकदा येणाऱ्या निवडणुकीत मतदान करा आणि आपली जबाबदारी पूर्ण, असे मुळीच नाही. तुम्हाला पाच वर्षांतील घडामोडींचा आत्मबोध घेऊन, विचार करण्याची आवश्यकता आहे, असे मत प्रसिद्ध पत्रकार सौरभ द्विवेदी यांनी व्यक्त केले.

PuneCity, 19 Dec 2023, Page:005
https://epaper.dainikprabhat.com

# पुस्तकांचे वाचन हवेच

## प्रसिद्ध कवी डॉ. कुमार विश्वास यांनी व्यक्त केली भावना

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

'विजेत्याचा इतिहास लिहिला जातो. मात्र, त्यातील दोन्ही बाजू समजून घेण्यासाठी पुस्तकांचे वाचन होणे महत्त्वाचे आहे. 'वेबसीरीज'सारख्या माध्यमांतून प्रेक्षकांच्या कल्पना बंदिस्त होतात. मात्र, वाचनातून कल्पनाशक्तीचा विस्तार होतो,' असे मत प्रसिद्ध कवी डॉ. कुमार विश्वास यांनी व्यक्त केले. वाचन हा स्वसंवादाचा मार्ग असून, वाचन ही प्राथमिकता व्हायला हवी, असा सल्ला त्यांनी तरुणाईला दिला.

'राष्ट्रीय पुस्तक न्यास'तर्फे आयोजित 'पुणे पुस्तक महोत्सवा'त 'कवि की कल्पना से' या विषयावर डॉ. कुमार विश्वास यांनी संवाद साधला. या वेळी भारतीय जनता पक्षाचे सरचिटणीस विनोद तावडे, राष्ट्रीय पुस्तक न्यासचे संचालक युवराज मलिक, महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे, खडकी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल, भाजपचे पुणे शहराध्यक्ष धीरज घाटे, प्रसेनजित फडणवीस उपस्थित होते.

'चांगले आणि यशस्वी असण्यातील फरक जाणून घेऊन चांगले होण्यासाठी वाचन महत्त्वाचे आहे. विषयांचे विविध आयाम जाणून घेण्यासाठी विविध प्रकारची पुस्तके वाचली पाहिजेत,' असे डॉ. कुमार विश्वास म्हणाले. विश्वास यांनी 'कोई दिवाना कहता है' ही त्यांची प्रसिद्ध रचना सादर करतानाच तरुणाईने दाद दिली.

'महाराष्ट्रात पुस्तके विकत घेऊन वाचली जातात हे साहित्य संमेलनातील पुस्तकांच्या विक्रीच्या आकड्यांतून कळते. 'पुणे पुस्तक महोत्सव' ही पुणेकरांसाठी पर्वणी आहे,' असे तावडे म्हणाले.



**"कवी, साहित्यिक अनेकदा व्यासपीठाप्रमाणे बोलतात. कवी आयोजक आणि मान्यवरांची भाषा बोलणे उचित नाही. कवींनी निर्भयपणे बोलणे आवश्यक असून, हेच कवींचे काम आहे.**
**- डॉ. कुमार विश्वास**

### 'तुम्हीही मुख्यमंत्री व्हाल'

'माझ्या कार्यक्रमांना उपस्थिती लावलेली व्यक्ती पंतप्रधान झाली. तुम्हीही मुख्यमंत्री व्हाल. २००६-०७मध्ये मला ऐकलेले २०१४मध्ये पंतप्रधान झाले. आता दुसऱ्या पक्षाचे लोक मला शोधत आहेत,' अशी मिश्कील टिपण्णी विनोद तावडे यांना लक्ष्य करून डॉ. कुमार विश्वास यांनी केली.

### डॉ. कुमार विश्वास म्हणाले...

- आजच्या पिढीला वाचन सोयीचे झाले असून, मौजेतून आर्थिक बचत करून दर महिन्याला दोन पुस्तके घेतली पाहिजेत.
- 'पुणे पुस्तक महोत्सव' हा कोणत्याही मॉलपेक्षा मोठा खजिना आहे.
- कृत्रिम बुद्धिमत्ता दिवसेंदिवस मानवी संवेदनांवर हल्ला करीत आहे.
- देशात हुतात्म्यांचा इतिहास लिहिला गेला नाही.
- पाश्चात्त्य संस्कृतींचा प्रभाव पाडला जात आहे.

### आजचे कार्यक्रम - १९ डिसेंबर

- स. १०.३० : सांस्कृतिकमंत्री सुधीर मुनगंटीवार भेट
- स. १०.३० : गाथा शिवरायांची- सादरकर्ते- मोहन शेटे
- दु. १.३० : टॅलेंट हंट
- दु. ३.३० : स्वातंत्र्यपूर्व काळातील कारागृहात साहित्यनिर्मिती करणाऱ्या ५८ स्वातंत्र्यसैनिकांवरील 'कारागृहातील कल्लोळ' दृक्-श्राव्य कार्यक्रम
- सायं. ५.३० : हिंदुस्थानच्या फाळणीची शोकांतिका कार्यक्रम- 'व्यथा हिंदुस्थानच्या फाळणीची' या पुस्तकाचे प्रकाशन- हस्ते- सुनील आंबेकर
- सायं. ६.३० : कलर्स ऑफ भारत- सोनाली कुलकर्णी आणि शर्वरी जमेनीस
- सायं. ७.३० : आर्मी बँडचे सादरीकरण
- रात्री ८.३० : महाराष्ट्राची संस्कृती

Maharashtra Times 19.12.2023

# News Paper Clippings During December 2023

## Section: Education

सकाळ

# विद्यापीठाची 'एसओपी' रखडली

## शांतता बैठकीला महिना उलटला; विद्यार्थी संघटना आक्रमक

**पुणे, ता. १८ :** विद्यार्थी संघटनांची आंदोलने, कर्मचाऱ्यांचे प्रश्न आणि शिक्षकांच्या मागण्यांसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने नवीन कार्यप्रणाली (एसओपी) विकसित करण्यात येणार आहे. त्यासाठी १८ नोव्हेंबरला सर्वच घटकांची एक शांतता बैठक घेतली. मात्र महिना उलटला, तरी एसओपी तयार करण्याची प्रक्रिया 'जैसे थे' आहे. त्यामुळे विद्यार्थी संघटनांची कोंडी होत असून, त्या आक्रमक पवित्रा घेत आहेत.

विद्यापीठात नोव्हेंबरच्या पहिल्या दिवशी विद्यार्थी संघटनांमध्ये सदस्य नोंदणीवरून जोरदार हाणामारी झाली. तोच वाद पुढे राजकीय पक्षांच्या आंदोलनापर्यंत वाढत गेला. विद्यापीठात वारंवार होणारे वाद आणि त्याचा शैक्षणिक कार्यावर होणारा दुष्परिणाम लक्षात घेता, विद्यापीठ प्रशासनाने पोलिस आयुक्त रितेश कुमार यांच्या उपस्थितीत सर्वच घटकांची सुसंवाद बैठक आयोजित केली होती. त्यात कोणत्याही प्रकारचा मसुदा समोर ठेवला

पान २ वर »

> "विद्यापीठ प्रशासनाने 'एसओपी'संदर्भात तत्काळ सर्व पक्षीय संघटनांची बैठक आयोजित करावी. यात जी काही नियमावली तयार होईल, ती सर्वांच्या संमतीने लागू करावी."
>
> **- आदिनाथ जाविर,**
> सचिव, युवक काँग्रेस पुणे शहर

> "विद्यापीठातील आदर्श कार्यपद्धतीबद्दल आम्ही विद्यार्थी संघटनांशी चर्चा करत आहोत. लवकरच नवीन एसओपी पाहायला मिळेल."
>
> **- डॉ. विजय खरे,**
> प्रभारी कुलसचिव, सा. फु. पुणे विद्यापीठ

### 'एसओपी' अभावी

- विद्यार्थी संघटनांना त्यांचे कार्यक्रम राबवता येत नाही
- विद्यार्थी हिताच्या गोष्टींना किंवा प्रश्नांना योग्य वाव मिळत नाही
- विद्यार्थ्यांशी निगडित बैठक, सार्वजनिक कार्यक्रमांच्या आयोजनाला पायबंद बसतो
- जाचक अटींचा फार्स

Pune, Pune-Today
19/12/2023 Page No. 1

सकाळ

# विद्यापीठाची 'एसओपी' रखडली

» पान १ वरून

नव्हता. यावर विद्यार्थी संघटनांनी तीव्र नाराजी व्यक्त केली होती. लवकरच आम्ही यासंबंधीचे नियम चर्चेसाठी संकेतस्थळावर जाहीर करू, असे आश्वासन विद्यापीठाने दिले होते. सोमवारी महिनाभरानंतरही परिस्थितीत कोणताच बदल झाला नाही. याबद्दल युवासेनेचे शहराध्यक्ष राम थरकुटे म्हणाले, "पोलिस आयुक्तांच्या उपस्थितीत शांतता बैठक झाली, त्यात आम्हा सर्व संघटनांसाठी लवकरच आंदोलने व इतर उपक्रमासाठी एक आदर्श नियमावली सर्वानुमते तयार केली जाईल, असे सांगितले होते. परंतु अद्याप एसओपीवर कार्यवाही झालेली नाही."

Pune, Pune-Today
19/12/2023 Page No. 2

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

# पुस्तकांचे वाचन हा स्वसंवादाचा उत्तम मार्ग

### डॉ. कुमार विश्वास यांचे मत



**पुणे** : पुस्तकांमुळे वाचकाच्या कल्पनाशक्तीला वाव मिळतो. मात्र वेब सीरिज, चित्रपटांतून प्रेक्षकांच्या कल्पनादृश्यांतून बंदिस्त केल्या जातात. पुस्तकांचे वाचन हा स्वसंवादाचा उत्तम मार्ग आहे. त्यामुळे पिझ्झा, कपडे अशा गोष्टींवरील खर्च कमी करा, पण पुस्तके विकत घेऊन वाचा, असे आवाहन प्रसिद्ध हिंदी कवी डॉ. कुमार विश्वास यांनी केले. पुस्तकांमुळे आत्म्याची इम्युनिटी वाढते. वाचलेले मनात राहते आणि कधी ना कधी कामी येते, असे त्यांनी सांगितले.

राष्ट्रीय पुस्तक न्यासतर्फे आयोजित पुणे पुस्तक महोत्सवात 'कवि की कल्पना से' या विषयावर डॉ. कुमार विश्वास यांनी संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते. भारतीय जनता पक्षाचे सरचिटणीस विनोद तावडे, राष्ट्रीय पुस्तक न्यासचे संचालक युवराज मलिक, महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे, खडकी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आणि या कार्यक्रमाचे प्रायोजक कृष्णकुमार गोयल, भाजपचे पुणे शहराध्यक्ष धीरज घाटे, प्रसेनजित फडणवीस या वेळी उपस्थित होते.

गेली ३५ वर्षे, ४४ देशांत रंगमंचावरून कविता सादर करत असल्याचे सांगून डॉ. कुमार विश्वास यांनी वाचनाचे महत्त्व सांगितले. ते म्हणाले, की चुकीच्या गोष्टींवर भाष्य करणे हे कवीचे काम आहे. सरकारे येतील आणि जातील, पण लोकशाही टिकली पाहिजे, असे अटलबिहारी वाजपेयी म्हणायचे. त्यामुळे कवींनी निर्भयपणे बोलले पाहिजे. चौथीत असताना मला लोकमान्य टिळकांचे गीतारहस्य पारितोषिक म्हणून मिळाले होते. विनोबा भावे, ओशो अशा अनेकांनी गीतेवर उत्तम लेखन केले आहे. मात्र कर्मयोगाच्या संदर्भात टिळकांचे गीतारहस्य सर्वोत्तम आहे. चांगले असणे आणि यशस्वी असणे यात फरक आहे. त्यामुळे चांगले होण्यासाठी वाचणे आवश्यक आहे. वाचनाने माणूस चांगला होतो. प्रत्येक विषयाचे विविध आयाम समजून घेण्यासाठी विविध प्रकारची पुस्तके वाचली पाहिजेत.

आज स्वतंत्र भारताच्या ७५व्या वर्षी भारत जगातील आघाडीचे देश आहे. मात्र शंभराव्या वर्षी भारत आध्यात्मिक आणि आर्थिक महासत्ता होईल. व्हॉट्सअॅप, आर्टिफिशियल इंटेलिजन्स ही माया आहे. व्हॉट्सअॅपवर संदेशांचा कचरा येऊन पडत राहतो, तर आर्टिफिशियल इंटेलिजन्सद्वारे मानवी संवेदनांवर हल्ला होणार आहे. मात्र मानवी संवेदनाच यंत्राच्या संवेदनेपेक्षा श्रेष्ठ आहेत, असे डॉ. विश्वास यांनी सांगितले.

व्याख्यानानंतर विश्वास यांनी कोई दिवाना कहता है ही त्यांची प्रसिद्ध रचना सादर केली. त्यांचे व्याख्यान आणि सादरीकरणाला उपस्थितांचा उत्तम प्रतिसाद लाभला. तावडे म्हणाले, की कुमार विश्वास हे महत्त्वाचे कवी आहेत. त्यांनी कवींचे वेगळे स्थान निर्माण केले. त्यांच्यामुळे अनेक नव्या कवींना ओळख मिळाली. महाराष्ट्रात पुस्तके विकत घेऊन वाचली जातात हे साहित्य संमेलनातील पुस्तकांच्या खपांच्या आकड्यांतून कळते. त्यामुळे हा पुणे पुस्तक महोत्सव वाचकांसाठी पर्वणी आहे.

गेल्या तीन दिवसांत तीन पुस्तकांशी, वाचनाशी संबंधित तीन विश्वविक्रम पुणे पुस्तक महोत्सवात नोंदवले गेले आहेत. पुस्तकांची दोनशेपेक्षा जास्त दालने या महोत्सवात असल्याचे राजेश पांडे यांनी सांगितले.

Kesari 19.12.2023

---

**लोकसत्ता**

# लोकपाल नियुक्तीसाठी विद्यापीठांना ३१ डिसेंबरची मुदत

**पुणे :** विद्यापीठ अनुदान आयोगाकडून (यूजीसी) देशभरातील विद्यापीठांना लोकपाल नियुक्ती करण्यासाठी ३१ डिसेंबरची मुदत देण्यात आली आहे. या मुदतीत लोकपाल नियुक्ती न केल्यास नियमांचे उल्लंघन करणाऱ्या विद्यापीठांची नावे जाहीर करण्याचा इशाराही 'यूजीसी'ने दिला आहे.

'यूजीसी'ने या संदर्भातील नोटीस संकेतस्थळावर प्रसिद्ध केली आहे. विद्यापीठ अनुदान आयोग (विद्यार्थी तक्रार निवारण) नियमावली २०२३ बाबतचे राजपत्र ११ एप्रिल रोजी प्रसिद्ध करण्यात आले. तसेच ३० दिवसांत लोकपाल नियुक्त करण्याची विनंती विद्यापीठांना केली होती. त्यानंतर वारंवार स्मरणही केले होते. विद्यापीठांनी लोकपाल नियुक्तीद्वारे विद्यार्थी तक्रार निवारण समिती स्थापनेचे पालन करणे आवश्यक आहे, असे नमूद करण्यात आले आहे.

काही विद्यापीठांनी याची पूर्तता केलेली नाही. विद्यापीठांना आतापर्यंत पुरेशी संधी दिली आहे. त्यामुळे ३१ डिसेंबरपर्यंत लोकपाल नियुक्त करून नियमांची पूर्तता करणाऱ्या विद्यापीठांनी अहवाल सादर करणे आवश्यक आहे.

20/12/2023 | Pune | Page : 02 Source : https://epaper.loksatta.com

## News Paper Clippings During December 2023

### Section: Education

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# परदेशी विद्यापीठांच्या अभ्यासक्रमांबाबत नियमावली

**देशातील उच्च शिक्षण संस्थांना 'यूजीसी'चा इशारा**

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** देशातील उच्च शिक्षण संस्थांनी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) पूर्वपरवानगीशिवाय परदेशी विद्यापीठांच्या सहकार्याने अभ्यासक्रम राबवू नये, असा इशारा 'यूजीसी'ने इशारा दिला आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या उच्च शिक्षण संस्थांवर कारवाई करण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

'यूजीसी'ने या संदर्भातील परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. विद्यापीठ अनुदान आयोग कायदा १९५६ (सुधारित केल्यानुसार) अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करताना 'यूजीसी'ने भारतीय आणि परदेशी उच्च शिक्षण संस्थांमधील शैक्षणिक सहयोग 'ट्विनिंग' अभ्यासक्रम, संयुक्त पदवी, दुहेरी पदवी अभ्यासक्रम २०२२ आणि 'यूजीसी' अधिनियम २०२३ (भारतातील परदेशी उच्च शैक्षणिक संस्थांच्या कॅम्पसची स्थापना आणि संचालन) नुसार आयोगाच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणत्याही परदेशी उच्च शैक्षणिक संस्थेने भारतात कोणताही अभ्यासक्रम सुरू करू नये, असे नमूद केले आहे.

शिक्षण तंत्रज्ञानाच्या ऑनलाइन मंचांनीही ऑनलाइन पद्धतीने पदवी आणि पदविका अभ्यासक्रम राबवण्यास मनाई करण्यात आली आहे. 'परदेशी विद्यापीठे, संस्थांच्या सहकार्याने ऑनलाइन पद्धतीने पदवी, पदविका अभ्यासक्रमाच्या जाहिराती वर्तमानपत्र, समाजमाध्यमे, दूरचित्रवाणीच्या माध्यमातून काही शिक्षण तंत्रज्ञान कंपन्या करत आहेत. मात्र अशा प्रकारची कोणतीही व्यवस्था लागू नाही. 'फ्रँचाइज'अंतर्गत सुरू केलेल्या अभ्यासक्रमांना मान्यता दिली जाणार नाही. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या उच्च शिक्षण संस्था, शिक्षण तंत्रज्ञान कंपन्यांवर कारवाई करण्यात येईल, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

20/12/2023 | Pune | Page : 02
Source : https://epaper.loksatta.com

# *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# शैक्षणिक अभ्यासक्रमात निवडणूक प्रक्रियेचे धडे

### केंद्रीय शिक्षण मंत्रालय, निवडणूक आयोग यांच्यात करार

लोकसत्ता प्रतिनिधी



### शिक्षण संस्थांमध्ये 'राष्ट्रीय मतदार दिन'

प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रिया समजावण्यासाठी शैक्षणिक संस्थांमध्ये अभिरूप निवडणूक (मॉक पोल) घेतली जाणार आहे. तसेच येत्या २५ जानेवारी रोजी शैक्षणिक संस्थांमध्ये 'राष्ट्रीय मतदार दिन' साजरा करण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे.

**पुणे :** देशातील निवडणूक प्रक्रियेबाबत विद्यार्थ्यांना शालेय स्तरापासूनच जागरूक करण्यासाठी निवडणूक प्रक्रियेचा अभ्यासक्रमात समावेश करण्यात येणार आहे. त्यासाठी केंद्रीय शिक्षण मंत्रालय आणि भारत निवडणूक आयोग यांच्यात करार करण्यात आला असून, त्या अनुषंगाने उच्च शिक्षणातील विद्यापीठ, महाविद्यालय स्तरावर मतदार शिक्षण आणि निवडणूक साक्षरता या विषयी अभ्यासक्रम तयार करण्याचे निर्देश विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) दिले आहेत.

'यूजीसी'चे सचिव मनीष जोशी यांनी या संदर्भातील परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. विद्यार्थ्यांना लोकशाही, मतदान आदी प्रक्रिया समजावून सांगण्यासाठी अभ्यासक्रमाची निर्मिती करणे, त्यासाठीचे श्रेयांक निश्चित करणे, वयाची १७ वर्षे पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांचा मतदारनोंदणीसाठी संस्थास्तरावरील आराखडा तयार करून 'एआयएसएसई' आणि 'यू-डायस' संकेतस्थळाला जोडणे, संबंधित विद्यार्थ्यांची मतदारनोंदणी करणे, अध्यापनासाठी शिक्षक-प्राध्यापकांना ऑनलाइन किंवा ऑफलाइन पद्धतीने प्रशिक्षित करणे, विद्यार्थ्यांमध्ये मतदान आणि त्याबाबतचे प्रक्रियेबाबत जागरूक करण्यासाठी अभियान राबवण्यासंदर्भातील सूचना परिपत्रकाद्वारे देण्यात आल्या आहेत.

निवडणूक प्रक्रियेमध्ये, विद्यार्थ्यांना इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र, भारतीय निवडणूक आयोगाचे मोबाइल उपयोजन, बॅलेट युनिट, मतदान विभाग, नियंत्रण विभाग, पीठासन अधिकारी, दोन मतदान अधिकारी, पोलिंग एजंट, मतदान कप्पे आदींबाबतची माहिती दिली जाईल. निवडणूक प्रक्रियेची संपूर्ण माहिती विद्यार्थ्यांना देऊन जागरूक करण्याचा उद्देश आहे.

21/12/2023 | Pune | Page : 02
Source : https://epaper.loksatta.com

प्रभात
प्रभात गुरुवार, दि. २१ डिसेंबर २०२३ || ५

# पुणे पुस्तक महोत्सवाला दीड लाख नागरिकांची भेट

### शालेय विद्यार्थी आणि युवकांची संख्या लक्षणीय

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि.२०** - राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या वतीने फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर भरलेल्या पुणे पुस्तक महोत्सवाला आतापर्यंत दीड लाख नागरिकांनी भेट दिली असून, यामध्ये युवक - युवतींची संख्या लक्षणीय आहे. पुणे पुस्तक महोत्सवातील प्रकाशकांच्या स्टॉलवर विविध प्रकारची पुस्तके घेण्यासाठी नागरिकांची गर्दी होत आहे. या स्टॉलवर सरासरी ५० हजार रुपयांची पुस्तक विक्री होत असल्याची माहिती न्यासाचे अध्यक्ष मिलिंद मराठे आणि महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे यांनी बुधवारी दिली.

पुणे पुस्तक महोत्सवाला पुणेकरांनी भरभरून प्रतिसाद दिला आहे. या महोत्सवात २८ हजार शालेय विद्यार्थ्यांनी भेट दिली आहे. हे विद्यार्थी छत्रपती शिवाजी महाराजांवर असणारी पुस्तके आवर्जून पाहत आहेत. त्याचप्रमाणे महाराजांवरील माहिती प्रदर्शनालाही भेट देत असल्याचे पांडे यांनी सांगितले. पुणे पुस्तक महोत्सवात साधारण २५० स्टॉल्स आहेत. ....२०० स्टॉल्सवर सरासरी ५० हजार रुपयांच्या पुस्तकांची विक्री होत आहे. त्यामुळे दिवसभरात साधारण १ कोटी रुपयांची आर्थिक उलाढाल होत आहे. या सर्वांचा अभ्यास केल्यास, आतापर्यंत साधारण चार कोटी रूपयांपेक्षा अधिकची पुस्तकांची विक्री झाली आहे. या आकडा वाढण्याचीही शक्यता आहे, असे पांडे आणि मराठे यांनी सांगितले.

मराठी भाषा विद्यापीठाच्या निर्मितीसाठी समिती स्थापन करण्यात आली होती. या विद्यापीठाची घोषण करण्यात आली आहे. या निमित्ताने पुणे पुस्तक महोत्सवात डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष डॉ. शरद कुंटे यांच्या हस्ते ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र - कुलगुरू डॉ. पराग काळकर, कुलसचिव डॉ. विजय खरे, महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे, भाजप नेते माधव भांडारी, प्रसेनजीत फडणवीस, ड. मंदार जोशी, बागेश्री मंठाळकर, राजेंद्र भामरे आदी उपस्थित होते.



पुणे पुस्तक महोत्सवाला आतापर्यंत दीड लाख नागरिकांची भेट दिली.

### पुस्तक महोत्सवाला सुधीर मुनगंटीवार यांची भेट

पुणे पुस्तक महोत्सवाला सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी भेट दिली. एकविसाव्या शतकात डिजिटल माध्यमांचा प्रसार वेगाने होत असताना नव्या पिढीत वाचनसंस्कृती रुजविण्यासाठी पुणे पुस्तक महोत्सवासारखे उपक्रम महत्त्वपूर्ण असल्याचे मुनगंटीवार यांनी स्पष्ट केले आहे. विविध विषयांचे ज्ञान प्राप्त करण्यासाठी पुस्तके मार्गदर्शक ठरतात आणि मुलांना पुस्तकापर्यंत पोहोचविण्यासाठी पुस्तक महोत्सवासारखे आयोजन महत्त्वाचे आहे, असे त्यांनी नमूद केले आहे.

PuneCity, 21 Dec 2023, Page:005
https://epaper.dainikprabhat.com

## *News Paper Clippings During December 2023*

### *Section: Education*

पुढारी

# वर्ल्ड बुक फेअरची पुण्यात क्षमता

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**पुणे पुस्तक महोत्सवाला अतिशय उत्तम प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे पुण्यामध्ये दिल्लीत होणाऱ्या वर्ल्ड बुक फेअरशी स्पर्धा करण्याची क्षमता आहे, असे मत राष्ट्रीय पुस्तक न्यासचे अध्यक्ष मिलिंद मराठे यांनी मांडले. देशात पहिल्यांदाच पुस्तकांच्या प्रचारासाठीचे धोरण राष्ट्रीय पुस्तक न्यास तयार करत असून, लवकरच हे धोरण जाहीर करण्यात येणार आहे, अशी माहितीही त्यांनी दिली.**

राष्ट्रीय पुस्तक न्यासतर्फे फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर पुणे पुस्तक महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या अनुषंगाने मिलिंद मराठे यांनी संवाद साधला. पुणे पुस्तक महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे, माधव भंडारी, ॲड. मंदार जोशी या वेळी उपस्थित होते.

राष्ट्रीय पुस्तक न्यासचे अध्यक्ष मिलिंद मराठे यांची माहिती

मराठे म्हणाले, प्रदर्शनातील पुस्तक संपल्याने सहभागी प्रकाशकांना दोन वेळा पुस्तके आणावी लागली आहेत. त्यामुळे पुणे पुस्तक महोत्सवाला मिळत असलेला प्रतिसाद फार चांगला आहे. राष्ट्रीय पुस्तक न्यासतर्फे यंदा उज्जैन, शिलाँग, लडाख, गोमती येथे पुस्तक महोत्सव झाला. तर संबलपूर, दिल्ली येथे पुस्तक महोत्सव होणार आहे. कर्नाटक, जम्मू काश्मीर येथेही पुस्तक महोत्सव आयोजित करण्याची मागणी करण्यात आली आहे. आतापर्यंत झालेल्या पुस्तक महोत्सवांच्या तुलनेत पुण्यातील महोत्सवाला मिळालेला प्रतिसाद प्रचंड मोठा आहे. राष्ट्रीय पुस्तक न्यासच्या पुस्तकांची विक्रमी विक्री झाली आहे. पुण्याखालोखाल उज्जैन, शिलाँग येथेही चांगली विक्री झाली. सीमावर्ती राज्यातही महोत्सव आयोजित करत आहोत. कोरोनानंतर पुस्तकांचे वाचनाचे प्रमाण वाढले. ऑनलाइन शिक्षणाच्या मर्यादा विद्यार्थी-पालकांना कळल्या. त्यामुळे विशेषतः लहान मुलांच्या पुस्तकांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली. ही वाढ ३० ते ३५ टक्क्यांपर्यंत आहे. त्यात ॲक्टिव्हिटी बुक, अवांतर वाचनासाठी गोष्टींच्या पुस्तकांना मागणी असल्याचे निरीक्षण मराठे यांनी नोंदवले.

**पुस्तक प्रचार धोरण**

२०११मध्ये पुस्तक प्रचार धोरण तयार करण्यात आले होते. त्याचे पुढे काही झाले नव्हते. पण आता नव्याने धोरण तयार करण्यात येत आहे. ३० कोटी विद्यार्थ्यांनी किमान दोन पुस्तके वाचल्यास ६० कोटी पुस्तके वाचली जातील. तसेच केंद्राच्या योजनेनुसार गाव तिथे ग्रंथालय झाल्यास मोठ्या



प्रमाणात पुस्तके लागणार आहेत. त्या अनुषंगाने पुस्तक प्रचार धोरण महत्त्वाचे ठरणार असल्याचे मराठे यांनी सांगितले.

**प्रकाशन अभ्यासक्रम**

प्रकाशनाचे शास्त्रशुद्ध शिक्षण आतापर्यंत उपलब्ध नव्हते. प्रकाशनामध्ये आशय कळणे, पुस्तकांच्या निवडीसह आर्थिक व्यवस्थापन, मनुष्यबळ व्यवस्थापन अशा अनेक घटकांचा समावेश असतो. त्यामुळे राष्ट्रीय पुस्तक न्यासतर्फे ऑनलाइन अभ्यासक्रम राबवण्यात येत आहे. या अभ्यासक्रमातील सहभागींना प्रत्यक्ष अनुभवासाठी एक महिन्याची इंटर्नशिपही उपलब्ध करून देण्यात येत आहे. आता प्रकाशनाचा अभ्यासक्रम विद्यापीठांच्या साहाय्याने राबवण्याचा मानस आहे, असे मराठे म्हणाले.

**डिजिटलची निर्मिती**

सध्या राष्ट्रीय पुस्तक न्यास छापील पुस्तके तयार करते. मात्र डिजिटल माध्यमालाही असलेली मागणी लक्षात घेऊन येत्या काळात ऑडिओ-व्हिडिओ पुस्तकांची निर्मितीही राष्ट्रीय पुस्तक न्यासकडून करण्यात येणार आहे. त्यानुसार दिल्ली येथे होणाऱ्या वर्ल्ड बुक फेअरपर्यंत पाच ऑडिओ-व्हिडिओ पुस्तके तयार करण्याचा प्रयत्न आहे, अशी माहिती मराठे यांनी दिली.

### महोत्सवात आज काय

- सकाळी १०.३० वाजता : चारुहास पंडित यांची व्यंगचित्रांवर कार्यशाळा.
- दुपारी १.३० वाजता : ग्रंथपाल परिसंवाद.
- दुपारी १.३० वाजपासून : टॅलेंट हंट.
- सायंकाळी ५ वाजता : वाचन संस्कृतीतील माध्यमांचे योगदान' हा वृत्तपत्रांच्या संपादकांचा परिसंवाद. सहभाग : मुकुंद संगोराम, श्रीधर लोणी, सुनील माळी, सम्राट फडणीस, किरण शेलार.
- सायंकाळी ५ : टॅलेंट हंट ग्रुप सादरीकरण.
- सायंकाळी ६ : चौथ्या विश्वविक्रमाची घोषणा.
- सायं. ६.३० वा. : पुणे नगर वाचन मंदिर, पुणे श्रमिक पत्रकार संघ आणि महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या पदाधिकाऱ्यांचा प्रातिनिधिक सत्कार.
- सायंकाळी ७.३० वा. : फैजल बँडचे (लडाख) सादरीकरण.

# दीड लाख नागरिकांची भेट

पुढारी ANCHOR

**पुणे :** पुणे पुस्तक महोत्सवाला आतापर्यंत दीड लाख नागरिकांनी भेट दिली असून, यामध्ये शालेय विद्यार्थी आणि युवकांची संख्या लक्षणीय आहे. प्रकाशकांनादेखील चांगला प्रतिसाद मिळत असल्याची माहिती न्यासाचे अध्यक्ष मिलिंद मराठे आणि महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे यांनी बुधवारी दिली.

ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे, भाजप नेते माधव भांडारी आदी यावेळी उपस्थित होते. पुणे पुस्तक महोत्सवाच्या निमित्ताने राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या वतीने पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले. पांडे म्हणाले, पुणे पुस्तक महोत्सवाला पुणेकरांनी भरभरून प्रतिसाद दिला आहे. पुस्तक महोत्सवाचे उद्घाटन झाल्यानंतर, साधारण दीड लाख नागरिकांनी भेट दिली आहे. येत्या काही दिवसात हा आकडा वाढणार आहे. शनिवारी आणि रविवारी नागरिकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता आहे, त्यामुळे प्रदर्शन रात्री साडेआठ वाजेपर्यंत सुरू राहणार आहे. या महोत्सवात २८ हजार शालेय विद्यार्थ्यांनी भेट दिली आहे. हे विद्यार्थी छत्रपती शिवाजी महाराजांवर असणारी पुस्तके आवर्जून पाहत आहेत. त्याचप्रमाणे महाराजांवरील माहिती प्रदर्शनालाही भेट देत आहेत.

> पुणे शहरात पुणे पुस्तक महोत्सवाचे आयोजन होणे ही अत्यंत चांगली बाब आहे. या निमित्ताने लोकांना विविध प्रकाराची पुस्तके खरेदी करण्याची संधी मिळते. या महोत्सवाला पुणेकरांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. या महोत्सवाचे आयोजन करणाऱ्या राजेश पांडे आणि त्यांच्या टीमचे अभिनंदन करायला हवे. असे उपक्रम यापुढील काळातही पुणे शहरात व्हायला हवेत.
>
> \- डॉ. सदानंद मोरे, ज्येष्ठ साहित्यिक

# 'किशोर'चे स्मरणरंजन

**पुणे :** बालभारतीचे 'किशोर' मासिक हे राज्यभरात लोकप्रिय आहे. गेल्या पाच दशकांचा समृद्ध वारसा असलेल्या 'किशोर' मासिकच्या गेल्या पन्नास वर्षांतील मुखपृष्ठांचे प्रदर्शन पुणे पुस्तक महोत्सवात भरवण्यात आले आहेत. महोत्सवाला भेट देणारे पुणेकर हे प्रदर्शन पाहून स्मरणरंजनात दंग होत आहेत. राष्ट्रीय पुस्तक न्यासतर्फे 'पुणे पुस्तक महोत्सव' आयोजित करण्यात आला आहे. विविध भाषांतील पुस्तकांची दोनशेहून अधिक दालने या महोत्सवात आहेत. फर्ग्युसन महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारावरच 'किशोर'च्या मुखपृष्ठांचे प्रदर्शन भरवण्यात आले असल्याने पुणेकरांना येता-जाता हे प्रदर्शन पाहण्याची संधी मिळत आहे. त्यामुळे ज्येष्ठ नागरिक त्यांच्या बालपणीच्या 'किशोर'च्या आठवणींमध्ये रमत आहेत, तर पालक त्यांच्या मुलांना 'किशोर'चे प्रदर्शन दाखवून त्यांच्या वाचनाच्या आठवणी सांगताना दिसत आहेत. 'किशोर' मासिकाच्या मुखपृष्ठाच्या प्रदर्शनाविषयी 'किशोर'चे संपादक किरण केंद्रे म्हणाले, 'किशोर' मासिकाचे सध्या ५२ वे वर्ष सुरू आहे. या मासिकासाठी आजवर अनेक मान्यवर चित्रकारांनी योगदान दिले आहे. महोत्सवात 'किशोर'च्या गाजलेल्या ५० मुखपृष्ठांचे प्रदर्शन भरवण्यात आले आहे. जुन्या आठवणींना उजाळा मिळत आहे.




My Pune Edition
Dec 21, 2023 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

# दिल्लीत होणाऱ्या वर्ल्ड बुक फेअरशी स्पर्धा करण्याची पुण्यामध्ये क्षमता

**पुणे** : पुणे पुस्तक महोत्सवाला अतिशय उत्तम प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे पुण्यामध्ये दिल्लीत होणाऱ्या वर्ल्ड बुक फेअरशी स्पर्धा करण्याची क्षमता आहे, असे मत राष्ट्रीय पुस्तक न्यासचे अध्यक्ष मिलिंद मराठे यांनी मांडले. देशात पहिल्यांदाच पुस्तकांच्या प्रचारासाठीचे धोरण राष्ट्रीय पुस्तक न्यास तयार करत असून, लवकरच हे धोरण जाहीर करण्यात येणार आहे, अशी माहितीही त्यांनी दिली.




राष्ट्रीय पुस्तक न्यासतर्फे फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर पुणे पुस्तक महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या अनुषंगाने मिलिंद मराठे यांनी संवाद साधला. पुणे पुस्तक महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे, माधव भंडारी, ॲड. मंदार जोशी या वेळी उपस्थित होते.

मराठे म्हणाले, प्रदर्शनातील पुस्तक संपल्याने सहभागी प्रकाशकांना दोनवेळा पुस्तके आणावी लागली आहेत. त्यामुळे पुणे पुस्तक महोत्सवाला मिळत असलेला प्रतिसाद फार चांगला आहे. राष्ट्रीय पुस्तक न्यासतर्फे यंदा उज्जैन, शिलाँग, लडाख, गोमती येथे पुस्तक महोत्सव झाला. तर संबलपूर, दिल्ली येथे पुस्तक महोत्सव होणार आहे. कर्नाटक, जम्मू काश्मीर येथूनही पुस्तक महोत्सव आयोजित करण्याची मागणी करण्यात आली आहे. आतापर्यंत झालेल्या पुस्तक महोत्सवांच्या तुलनेत पुण्यातील महोत्सवाला मिळालेला प्रतिसाद प्रचंड मोठा आहे. राष्ट्रीय पुस्तक न्यासच्या पुस्तकांची विक्रमी विक्री झाली आहे. पुण्याखालोखाल उज्जैन, शिलाँग येथेही चांगली विक्री झाली. सीमावर्ती राज्यातही महोत्सव आयोजित करत आहोत.

कोरोनानंतर पुस्तकांचे वाचनाचे प्रमाण वाढले. ऑनलाइन शिक्षणाच्या मर्यादा विद्यार्थी-पालकांना कळल्या. त्यामुळे विशेषतः लहान मुलांच्या पुस्तकांचा मागणी मोठ्या प्रमाणात वाढली. ही वाढ ३० ते ३५ टक्क्यांपर्यंत आहे. त्यात ॲक्टिव्हिटी बुक, अवांतर वाचनासाठी गोष्टींच्या पुस्तकांना मागणी असल्याचे निरीक्षण मराठे यांनी नोंदवले. २०११ मध्ये पुस्तक प्रचार धोरण तयार करण्यात आले होते. त्याचे पुढे काही झाले नव्हते. पण आता नव्याने धोरण तयार करण्यात येत आहे.

३० कोटी विद्यार्थ्यांनी किमान दोन पुस्तके वाचल्यास ६० कोटी पुस्तके वाचली जातील. तसेच केंद्राच्या योजनेनुसार गाव तिथे ग्रंथालय झाल्यास मोठ्या प्रमाणात पुस्तके लागणार आहेत. त्या अनुषंगाने पुस्तक प्रचार धोरण महत्त्वाचे ठरणार असल्याचे मराठे यांनी सांगितले.

सध्या राष्ट्रीय पुस्तक न्यास छापील पुस्तके तयार करते. मात्र डिजिटल माध्यमालाही असलेली मागणी लक्षात घेऊन येत्या काळात ऑडिओ-व्हिडिओ पुस्तकांची निर्मितीही राष्ट्रीय पुस्तक न्यासकडून करण्यात येणार आहे. त्यानुसार दिल्ली येथे होणाऱ्या वर्ल्ड बुक फेअरपर्यंत पाच ऑडिओ-व्हिडिओ पुस्तके तयार करण्याचा प्रयत्न आहे, अशी माहिती मराठे यांनी दिली.

Kesari 21.12.2023

## News Paper Clippings During December 2023

## Section: Education

# 'पुस्तकांच्या प्रचारासाठी धोरण'

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती वाढण्यासाठी आणि पुस्तके वाचणाऱ्यांची संख्या वाढण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय पुस्तक न्यासाकडून (नॅशनल बुक ट्रस्ट) पहिल्यांदाच पुस्तकांच्या प्रचारासाठीचे धोरण तयार करण्यात येत आहे. नागरिकांसाठी लवकरच हे धोरण जाहीर करण्यात येणार आहे,' अशी माहिती 'नॅशनल बुक ट्रस्ट'चे अध्यक्ष मिलिंद मराठे यांनी दिली.

'नॅशनल बुक ट्रस्ट'तर्फे फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर पुणे पुस्तक महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या अनुषंगाने मिलिंद मराठे यांनी संवाद साधला. या वेळी महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे, प्रसेनजीत फडणवीस, माधव भांडारी, ॲड. मंदार जोशी उपस्थित होते.

मराठे म्हणाले, '२०११ मध्ये पुस्तक प्रचार धोरण तयार करण्यात आले होते. त्याचे पुढे काही झाले नव्हते; पण आता नव्याने धोरण तयार करण्यात येत आहे. देशातील ३० कोटी विद्यार्थ्यांनी किमान दोन पुस्तके वाचल्यास ६० कोटी पुस्तके वाचली जातील. केंद्राच्या योजनेनुसार गाव तिथे ग्रंथालय झाल्यास मोठ्या प्रमाणात पुस्तके लागणार आहेत. त्या अनुषंगाने पुस्तक प्रचार धोरण महत्त्वाचे ठरणार आहे.'

पुणे पुस्तक महोत्सवातील पुस्तके संपल्याने सहभागी प्रकाशकांना दोन वेळा पुस्तके आणावी लागली आहेत. या महोत्सवाला मिळणारा प्रतिसाद फार चांगला आहे. या महोत्सवाची दिल्लीत होणाऱ्या वर्ल्ड बुक फेअरशी स्पर्धा करण्याची क्षमता आहे. आतापर्यंत झालेल्या पुस्तक महोत्सवांच्या तुलनेत पुण्यातील महोत्सवाला मिळालेला प्रतिसाद प्रचंड मोठा आहे. नॅशनल बुक ट्रस्टच्या पुस्तकांची विक्रमी विक्री झाली आहे. नॅशनल बुक ट्रस्टतर्फे यंदा उज्जैन, शिलाँग, लडाख, लखनौ येथे पुस्तक महोत्सव झाला. तर संबलपूर, दिल्ली येथे पुस्तक महोत्सव होणार आहे. कर्नाटक, जम्मू काश्मीर येथूनही पुस्तक महोत्सव आयोजित करण्याची मागणी करण्यात आली आहे, असे मराठे यांनी सांगितले.

### 'मुलांचे वाचन वाढले'

करोनानंतर पुस्तकांचे वाचनाचे प्रमाण वाढले. ऑनलाइन शिक्षणाच्या मर्यादा विद्यार्थी-पालकांना कळल्या. त्यामुळे विशेषतः लहान मुलांच्या पुस्तकांचा मागणी मोठ्या प्रमाणात वाढली. ही वाढ ३० ते ३५ टक्क्यांपर्यंत आहे. त्यात ॲक्टिव्हिटी बुक, अवांतर वाचनासाठी गोष्टींच्या पुस्तकांना मागणी असल्याचे निरीक्षण मराठे यांनी नोंदवले.

### 'अभ्यासक्रम व इंटर्नशिप'

'प्रकाशनामध्ये आशय कळणे, पुस्तकांची निवडीसह आर्थिक व्यवस्थापन, मनुष्यबळ व्यवस्थापन अशा अनेक घटकांचा समावेश असतो. त्यामुळे नॅशनल बुक ट्रस्टतर्फे ऑनलाइन अभ्यासक्रम राबवण्यात येत आहे. या अभ्यासक्रमातील सहभागींना प्रत्यक्ष अनुभवासाठी एक महिन्याची इंटर्नशीपही उपलब्ध करून देण्यात येत आहे. प्रकाशनाचा अभ्यासक्रम विद्यापीठांच्या सहाय्याने राबवण्याचा मानस आहे,' असे मराठे यांनी सांगितले.

> डिजिटल माध्यमाला मागणी आहे. हे लक्षात घेऊन नॅशनल बुक ट्रस्टकडून येत्या काळात ऑडिओ-व्हिडिओ पुस्तकांची निर्मितीही करण्यात येईल. त्यानुसार दिल्लीत होणाऱ्या वर्ल्ड बुक फेअरपर्यंत पाच ऑडिओ-व्हिडिओ पुस्तके तयार करण्याचा प्रयत्न आहे.
>
> – मिलिंद मराठे, अध्यक्ष, नॅशनल बुक ट्रस्ट



Maharashtra Times 22.12.2023

# News Paper Clippings During December 2023

## Section: Education




पुणे पुस्तक महोत्सवात बुधवारी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या 'इंद्रधनुष्य' या समूहाने सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

# महोत्सवात 'अवघा रंग वाचनाचा'

**पुणे पुस्तक महोत्सव**

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

पुणे पुस्तक महोत्सवाला आतापर्यंत दीड लाख नागरिकांनी भेट दिली असून, पुस्तकांच्या एका स्टॉलवर रोज सरासरी ५० हजार रुपयांची पुस्तक विक्री होत असल्याची माहिती न्यासाचे (नॅशनल बुक ट्रस्ट) अध्यक्ष मिलिंद मराठे आणि महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे यांनी बुधवारी दिली. महोत्सवाला भेट देणाऱ्यांमध्ये युवक-युवतींची आणि शालेय विद्यार्थ्यांची संख्या लक्षणीय असल्याचेही दिसून आले.

पुणे पुस्तक महोत्सवाच्या निमित्ताने राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या वतीने पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले. या वेळी मराठे आणि पांडे यांनी पत्रकारांना माहिती दिली. भाजप नेते माधव भांडारी, प्रसेनजीत फडणवीस, ॲड. मंदार जोशी उपस्थित होते. पांडे म्हणाले, 'पुणे पुस्तक महोत्सवाला पुणेकरांनी भरभरून प्रतिसाद मिळत आहे. येत्या शनिवारी आणि रविवारी नागरिकांची गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे महोत्सव दर रोज सकाळी दहा ते रात्री साडेआठ वाजेपर्यंत सुरू राहणार आहे. या महोत्सवाला २८ हजार शालेय विद्यार्थ्यांनी भेट दिली आहे. हे विद्यार्थी छत्रपती शिवाजी महाराजांवर असणारी पुस्तके आवर्जून पाहत आहेत.' मराठी भाषा विद्यापीठाच्या निर्मितीसाठी समिती स्थापन करण्यात आली होती. मराठी विद्यापीठाची घोषणा नुकतीच करण्यात आली आहे. या निमित्ताने पुणे पुस्तक महोत्सवात डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष डॉ. शरद कुंटे यांच्या हस्ते ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे यांचा सत्कार करण्यात आला.

> पुणे शहरात पुणे पुस्तक महोत्सवाचे आयोजन होणे ही अत्यंत चांगली बाब आहे. या निमित्ताने लोकांना विविध प्रकाराची पुस्तके खरेदी करण्याची संधी मिळते. या महोत्सवाला पुणेकरांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. या महोत्सवाचे आयोजन करणाऱ्या राजेश पांडे आणि त्यांच्या टीमचे अभिनंदन करायला हवे. असे उपक्रम यापुढेही पुण्यात व्हायला हवेत.
>
> – डॉ. सदानंद मोरे, ज्येष्ठ साहित्यिक

### आतापर्यंत चार कोटींची उलाढाल

पुणे पुस्तक महोत्सवात सुमारे २५० स्टॉल आहेत. यातील साधारण २०० स्टॉलवर सरासरी ५० हजार रुपयांच्या पुस्तकांची दररोज विक्री होत आहे. त्यामुळे दिवसभरात साधारण एक कोटी रुपयांची आर्थिक उलाढाल होत आहे. आतापर्यंत साधारण चार कोटी रुपयांपेक्षा अधिकची पुस्तकांची विक्री झाली आहे. या आकडा वाढण्याचीही शक्यता आहे, असे पांडे आणि मराठे यांनी सांगितले.

### आजचे कार्यक्रम २१ डिसेंबर

- **सकाळी १०.३० वा.** : चारुहास पंडित यांची व्यंगचित्रांवर कार्यशाळा
- **दुपारी १.३० वा.** : ग्रंथपालांचा परिसंवाद
- **दुपारी १.३० वाजल्यापासून** : टॅलेंट हंट
- **सायंकाळी ५ वा.** : 'वाचन संस्कृतीतील माध्यमांचे योगदान' हा वृत्तपत्रांच्या संपादकांचा परिसंवाद; सहभाग - मुकुंद संगोराम, श्रीधर लोणी, सुनील माळी, सम्राट फडणीस, किरण शेलार
- **सायंकाळी ५ वा.** : टॅलेंट हंट ग्रुप सादरीकरण
- **सायंकाळी ६ वा.** : चौथ्या विश्वविक्रमाची घोषणा
- **सायंकाळी ६.३० वा.** : पुणे नगर वाचन मंदिर, पुणे श्रमिक पत्रकार संघ आणि महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या पदाधिकाऱ्यांचा प्रातिनिधिक सत्कार
- **सायंकाळी ७.३० वा.** : फैजल बँडचे (लडाख) सादरीकरण

Maharashtra Times 22.12.2023

# News Paper Clippings During December 2023

## Section: Education

सकाळ

### पुस्तकांची आतापर्यंत चार कोटींची विक्री

पुणे पुस्तक महोत्सव : तरुणांकडून सर्वाधिक खरेदी

**पुणे, ता. २०** : पुण्यात सुरू असलेल्या पुस्तक महोत्सवात गेल्या चार दिवसांत सुमारे चार कोटी रुपयांच्या पुस्तकांची विक्री झाल्याची माहिती मुख्य संयोजक राजेश पांडे यांनी दिली.

महोत्सवानिमित्त आयोजित पत्रकार परिषदेत ही माहिती देण्यात आली. महोत्सवाच्या पहिल्या दिवसापासूनच पुस्तकप्रेमींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. पुस्तक प्रदर्शनाला दररोज सुमारे ३० ते ४० हजार नागरिक भेटी देत आहेत. आतापर्यंत दीड लाख नागरिकांनी प्रदर्शनाला भेट दिली असून, त्यात २८ हजार विद्यार्थ्यांचा समावेश आहे. पुस्तकखरेदीमध्ये तरुणांची संख्या सर्वाधिक आहे. लहान मुलांसाठी असणाऱ्या पुस्तकांची खरेदीही मोठ्या प्रमाणात होत असल्याचे निरीक्षण पांडे यांनी नोंदविले.

'राष्ट्रीय पुस्तक न्यास'चे अध्यक्ष मिलिंद मराठे म्हणाले, ''प्रदर्शनात स्टॉल असणाऱ्या प्रकाशकांना आतापर्यंत किमान दोन ते तीन वेळा पुस्तके पुन्हा विक्रीसाठी आणावी लागली आहेत. पुण्याखालोखाल उज्जैन, शिलाँग येथेही पुस्तकांची चांगली विक्री झाली आहे.''

Pune, Main
21/12/2023 Page No. 201

सकाळ

### पुणे पुस्तक महोत्सवासारखे उपक्रम महत्त्वाचे : सुधीर मुनगंटीवार

**पुणे :** ''एकविसाव्या शतकात डिजिटल माध्यमांचा प्रसार वेगाने होत आहे. असे असताना नव्या पिढीत वाचनसंस्कृती रुजविण्यासाठी पुणे पुस्तक महोत्सवासारखा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरत आहे,'' असे मत राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केले. पुणे पुस्तक महोत्सवाला मुनगंटीवार यांनी मंगळवारी रात्री भेट दिली. याप्रसंगी ते बोलत होते. या वेळी महोत्सवाचे मुख्य संयोजक राजेश पांडे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे अधिसभा सदस्य प्रसेनजीत फडणवीस आदी उपस्थित होते. ''विविध विषयांचे ज्ञान प्राप्त करण्यासाठी पुस्तके मार्गदर्शक ठरतात. मुलांना पुस्तकांपर्यंत पोहोचविण्यासाठी पुस्तक महोत्सवाचे आयोजन महत्त्वाचे आहे,'' असे मुनगंटीवार यांनी सांगितले.

Pune, Main
21/12/2023 Page No. 202

सकाळ

### परीक्षेच्या गुणदानाचे संकेतस्थळ 'हँग'

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ ; अडचण दूर केल्याचा दावा

**पुणे, ता. २०** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांत सध्या हिवाळी सत्राच्या परीक्षा चालू आहे. परीक्षांचे गुणदान करण्यासाठी विद्यापीठाने उपलब्ध केलेले ऑनलाइन संकेतस्थळ सतत हँग होत असल्याची माहिती प्राध्यापकांनी दिली. मात्र, संबंधित अडचण मागील आठवड्यातच दूर केल्याचा दावा परीक्षा व मूल्यमापन मंडळाने केला.

विद्यार्थ्यांच्या अंतर्गत गुणांसह विविध विषयांचे गुणदान करण्यासाठी परीक्षा विभागाने संकेतस्थळ उपलब्ध केले आहे. यावर संबंधित महाविद्यालयाने विद्यार्थ्यांचे विषयानुसार गुणदान करणे गरजेचे आहे. यासाठी बुधवारपर्यंत (ता.२०) मुदत देण्यात आली होती. मात्र संकेतस्थळ सतत बंद पडणे, हँग होणे, एरर दाखविणे अथवा लॉगआऊट होण्याचे प्रकार वाढले होते. पर्यायाने विद्यार्थ्यांचे गुणदान वेळेत करण्यात महाविद्यालयांच्या कर्मचाऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागला होता.



या विषयी पुण्यातील एका महाविद्यालयातील प्राध्यापक म्हणाले ''संकेतस्थळ सतत बंद पडते. दहा विद्यार्थ्यांचे गुणदान होईपर्यंत आम्ही 'साईट'वरून 'लॉगआऊट' झालेले असायचो. त्यामुळे प्राध्यापकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागला. या संदर्भात विद्यापीठाच्या परीक्षा विभागालाही कळविण्यात आले आहे.''

मागील सत्रामध्ये वेळेत गुणदान न झाल्यामुळे परीक्षांच्या निकालाला उशीर झाला होता. याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या प्रवेशावर झाला होता.

> संकेतस्थळासंबंधीच्या समस्यांमुळे प्राध्यापकांना मनस्ताप सहन करावा लागतो. विद्यार्थ्यांच्या गुणदानास विलंब झाल्यास निकाल लांबतो. पर्यायाने याचे खापर थेट महाविद्यालयांवर फोडले जाते. आमची चूक झाल्यास हजारो रुपयांचा दंड भरावा लागतो. मात्र, विद्यापीठानेही आपली यंत्रणा निर्दोष असल्याची खात्री करावी.
> **- एक प्राध्यापक**

> मोठ्या प्रमाणावर चालू असलेल्या परीक्षांमुळे मागील आठवड्यापर्यंत संकेतस्थळासंबंधी समस्या होत्या. मात्र आम्ही हार्ड डिस्क आणि रॅम वाढवली आहे. त्यामुळे आता तो प्रश्न निकाली निघाला असून, संकेतस्थळावर येणाऱ्या अडचणीही दूर केल्या आहेत.
> **- डॉ. महेश काकडे,** संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

Pune, Main
21/12/2023 Page No. 202

## News Paper Clippings During December 2023

## Section: Education

सकाळ





फर्ग्युसन महाविद्यालय मैदान : पुणे पुस्तक महोत्सवाच्या ठिकाणी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे कटआऊट लावण्यात आले आहे. अनेक नागरिक एक्झाम वॉरिअर्स या त्यांच्या पुस्तकाच्या प्रतीसह तेथे छायाचित्र काढून घेतात. (दुसऱ्या छायाचित्रात) प्रदर्शनाला भेट दिलेल्या विद्यार्थिनी पुस्तके उत्सुकतेने चाळताना.

# पुस्तक प्रोत्साहन धोरण लवकरच

## मिलिंद मराठे : तीस कोटी विद्यार्थ्यांपर्यंत पुस्तके पोहोचविणार

Book Your Visit...
पुणे पुस्तक महोत्सव
16 ते 24 डिसेंबर, 2023

"कोरोना काळात घरोघरी विद्यार्थी ऑनलाइन शिक्षण घेत होते. त्यामुळे लहान मुलांचा स्क्रीन टाइम प्रचंड वाढला आहे. त्यामुळे पालक स्वत: मुलांना पुस्तक वाचनाची सवय लावण्यासाठी खूप गांभीर्याने प्रयत्न करत आहेत. कोरोनानंतर लहान मुलांच्या वाचन करण्याच्या सवयीमध्ये ३० ते ३५ टक्क्यांनी वाढ झाल्याचे दिसून येते. यात लहान मुले प्रामुख्याने गोष्टींची पुस्तके, पझल्स्, उपक्रमशील पुस्तके वाचत आहेत.
**- मिलिंद मराठे**, अध्यक्ष, राष्ट्रीय पुस्तक न्यास

**पुणे, ता. २० :** ''पुस्तकांची उपलब्धता, गुणवत्ता, सुलभता आणि वाचकांची संख्या वाढावी. वाचनाचे महत्त्व लक्षात घेऊन देशातील प्रत्येक विद्यार्थ्याला वाचनास प्रोत्साहन देण्यासाठी आता लवकरच राष्ट्रीय पुस्तक न्यास (एनबीटी) यांच्या वतीने 'राष्ट्रीय पुस्तक प्रोत्साहन धोरण' आणण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने या धोरणाचा मसुदा तयार झाला आहे,'' अशी माहिती 'राष्ट्रीय पुस्तक न्यास'चे अध्यक्ष मिलिंद मराठे यांनी दिली.

महोत्सवानिमित्त मराठे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. त्यावेळी त्यांनी ही माहिती दिली. मराठे म्हणाले, '' देशातील जवळपास ३० कोटी शालेय आणि उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांपर्यंत पुस्तके पोहोचावीत, त्यांना वाचनाची आवड लागावी, यासाठी धोरणात तरतुदी करण्यात आल्या आहेत. यामध्ये विद्यार्थ्यांनी वर्षातून किमान दोन पुस्तके वाचावीत, असे सूचविण्यात आले आहे.''

देशात 'गाव तिथे ग्रंथालय' अशी संकल्पना राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या वतीने मांडण्यात आली आहे. याशिवाय नवीन शैक्षणिक धोरणात गोष्टीतून शिक्षण अधोरेखित केले आहे. त्यामुळे आगामी काळात गोष्टी सांगण्याला, गोष्टी सांगण्याच्या पद्धतीला महत्त्व प्राप्त होणार आहे. त्यादृष्टीकोनातून शिक्षकांना गोष्टी सांगण्याचे कौशल्य अवगत करावे लागणार आहे. त्यादृष्टीने उपक्रम राबविण्याचा मानस असल्याचे मराठे यांनी सांगितले.

### राष्ट्रीय पुस्तक न्यासाचे आगामी प्रकल्प

- 'अनुवाद' विषयावर अभ्यासक्रम निर्मिती करणार
- प्रकाशन व्यवसायासंदर्भात अभ्यासक्रमाची आखणी
- देशातील विविध विद्यापीठांसमवेत सामंजस्य करारातून नवे अभ्यासक्रम प्रकाशन व्यवसायासंदर्भात १०० तासांचा ऑनलाइन अभ्यासक्रम सुरू
- लवकर ऑडिओ-व्हिडिओ स्टुडिओची निर्मिती
- ऑडिओ बुक निर्मिती
- कर्नाटक, जम्मू काश्मीर या राज्यांत पुस्तक महोत्सव भरविण्यासाठी आले प्रस्ताव

Pune, Main
21/12/2023 Page No. 202

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

लोकसत्ता

# वृत्तपत्रे ही वाचन संस्कृतीची वाहक

### चर्चासत्रामध्ये संपादकांचा सूर

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** वृत्तपत्रे ही वाचन संस्कृतीची वाहक आहेत. वृत्तपत्र वाचनाकडूनच प्रत्येकाचा प्रवास पुस्तकांच्या वाचनाकडे होतो. तंत्रज्ञानाचा वापर वाचनासाठी करता येऊ शकतो, असा सूर वृत्तपत्र संपादकांच्या चर्चासत्रामध्ये गुरुवारी उमटला.

राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या वतीने फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित 'पुणे पुस्तक महोत्सवा'त 'वाचन संस्कृतीतील माध्यमांचे योगदान' या विषयावरील चर्चासत्रात 'लोकसत्ता'चे सहायक संपादक मुकुंद संगोराम, 'महाराष्ट्र टाइम्स'चे निवासी संपादक श्रीधर लोणी, 'सकाळ'चे संपादक सम्राट फडणीस, 'पुढारी'चे निवासी संपादक सुनील माळी आणि 'तरुण भारत'चे संपादक किरण शेलार यांनी सहभाग घेतला. वसुंधरा काशीकर आणि मिलिंद कुलकर्णी यांनी त्यांच्याशी संवाद साधला.

संगोराम म्हणाले, की वृत्तपत्र वाचली, तर पुस्तके वाचतील. वाचन ही प्रक्रिया आहे. चांगले साहित्य असेल, तर लोक नक्की वाचतात, यावर संपादकांनी विश्वास ठेवला पाहिजे. तसेच वाचन सोईसाठी किंडलवर पुस्तक असायला पाहिजेत.

लोणी म्हणाले, की वाचन हा लेखनाचा रियाज आहे. मुलांनी वाचण्यासाठी आधी आई-वडिलांनी वाचले पाहिजे. पुस्तके वाचकांपर्यंत जाण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

फडणीस म्हणाले, की तंत्रज्ञानाचा वापर चांगल्या वाचनासाठी केला पाहिजे. लेखकांनी आपली लेखनशैली बदलण्याची गरज आहे.

माळी म्हणाले, की पूर्वी वृत्तपत्रांमध्ये मोठे लेख आणि मोठ्या बातम्या असायच्या. आता तितके वाचण्याचा संयम वाचकांमध्ये राहिलेला नाही. त्यामुळे वाचनाची बैठक कमी झाली आहे. शेलार म्हणाले, की दर्जेदार साहित्य असेल तर वाचन चळवळीला मदत होईल. मोठ्या प्रमाणात संदर्भ साहित्याची निर्मिती केली पाहिजे.

22/12/2023 | Pune | Page : 08
Source : https://epaper.loksatta.com

सकाळ

### पुस्तक महोत्सव : संपादकांच्या परिसंवादात उमटला सूर

# वृत्तपत्रे ही वाचनसंस्कृतीची वाहक

**पुणे, ता. २१ :** वाचकांना नवी माहिती देणे गरजेचे आहे. वाचनसंस्कृतीत वृत्तपत्रांची भूमिका महत्त्वाची आहे. वाचक आधी वृत्तपत्रे वाचतात, नंतर पुस्तकांकडे वळतात. वृत्तपत्रांचे वाचन ही वाचनसंस्कृतीची पहिली पायरी आहे. वृत्तपत्रे ही वाचनसंस्कृतीची वाहक असल्याचा सूर संपादकांच्या परिसंवादात उमटला.

राष्ट्रीय पुस्तक न्यासातर्फे फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित पुणे पुस्तक महोत्सवात गुरुवारी सायंकाळी 'वाचनसंस्कृतीतील माध्यमांचे योगदान' या विषयावर चर्चासत्र झाले. यात 'सकाळ'चे संपादक सम्राट फडणीस, 'लोकसत्ता'चे सहायक संपादक मुकुंद संगोराम, 'महाराष्ट्र टाइम्स'चे निवासी संपादक श्रीधर लोणी, 'पुढारी'चे निवासी संपादक सुनील माळी, 'तरुण भारत'चे संपादक किरण शेलार यांनी सहभाग घेतला.

फडणीस म्हणाले की, "तंत्रज्ञानाशिवाय आज जगू शकत नाही. वाचनसंस्कृती वाढविण्यासाठी पुस्तकांचे नवे ट्रेंड शोधणे गरजेचे आहे. त्या ट्रेंडचा अभ्यास करणे आवश्यक आहे. लहान मुलांनी वृत्तपत्र वाचावे, असा आपला आग्रह असतो. मात्र त्यांच्यासाठी वर्तमानपत्रात काही नसते. तेव्हा मुलांसाठी वर्तमानपत्र काढणे आवश्यक आहे. 'सकाळ'ने तसा प्रयोग केला आहे. पुस्तकांचे कॉमिक्समध्ये रूपांतर केलं पाहिजे. लेखनाचा घाट बदलण्याची गरज आहे."

संगोराम यांनी सांगितले की, 'हल्ली कुणीच वाचत नाही, असे म्हटले जाते. पण त्यात काहीतरी गडबड आहे. एकेकाळी साप्ताहिक पुरवण्या ललित साहित्याने भरलेल्या असायच्या, त्याची जागा आता वैचारिक लेखांनी घेतली. लोकांनी वृत्तपत्र वाचली, तर ते पुस्तके वाचतील. वाचन ही प्रक्रिया आहे. चांगले साहित्य असेल तर लोक नक्की वाचतात.'

लोणी म्हणाले की, "मराठी साहित्य आणि वृत्तपत्र यांनी हातात हात घालून काम केले आहे. वाचन हा लेखनाचा रियाज आहे. मुलांनी वाचण्यासाठी आधी आई-वडिलांनी वाचले



पाहिजे. त्यासाठी घरात भरपूर पुस्तके ठेवली पाहिजेत. वाचनसंस्कृती टिकली तर वृत्तपत्रे टिकणार आहेत. पुस्तकाची बाजारपेठ अद्याप विकसित झालेली नाही. ती विकसित होणे गरजेचे आहे."

माळी यांनी सांगितले की, 'भाषा ही सामान्य वाचकांना समजायला हवी. वृत्तपत्रांमुळे अवांतर वाचनाची गोडी लागते. पूर्वी वृत्तपत्रांमध्ये मोठे लेख आणि मोठ्या बातम्या असायच्या. आता तीनशे शब्दांत बातमी लिहिली जाते. लेखनाचा केंद्रबिंदूही आता महानगरांकडून मराठवाडा, विदर्भाकडे सरकला आहे. पुस्तकाच्या दर्जाबरोबरच त्याची प्रसिद्धी झाली पाहिजे. वाचनसंस्कृती वाढविण्यासाठी सर्वांनी एकत्र येण्याची गरज आहे.

शेलार म्हणाले की, "आपल्या देशात पुस्तकाचा दर्जा महत्त्वाचा आहे. दर्जेदार साहित्य असेल तर वाचन चळवळीला मदत होईल. आपल्याकडे संदर्भ साहित्याला खूप मोठी मागणी आहे. याचा विचार करून मोठ्या प्रमाणात संदर्भ साहित्याची निर्मिती केली पाहिजे." परिसंवादाचे सूत्रसंचालन मिलिंद कुलकर्णी व वसुंधरा काशीकर यांनी केले.

Pune, Main
22/12/2023 Page No. 5

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

सकाळ

# पुणे पुस्तक महोत्सवात चौथा विश्वविक्रम

## ११ हजार ४३ नागरिकांनी ३० सेकंदांत वाचला परिच्छेद

**पुणे, ता. २१ :** पुणे पुस्तक महोत्सवात चौथ्या विश्वविक्रमाची नोंद गुरुवारी झाली. एकाच पुस्तकातील एकच परिच्छेद ११ हजार ४३ नागरिकांनी ३० सेकंदांत वाचण्याचा विश्वविक्रम गिनेस बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंदविण्यात आला.

महोत्सवाच्या निमित्ताने भारताने दुसऱ्यांदा चीनच्या नावावरील विश्वविक्रम मोडला गेला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सहकार्याने उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हा उपक्रम झाला. 'लार्जेस्ट ऑनलाइन अल्बम ऑफ पीपल रीडिंग सेम पॅराग्राफ ऑफ मिनीमम ड्यूरेशन ऑफ ३० सेकंद' या गटात विश्वविक्रम झाला. गिनेसचे अधिकारी स्वप्नील डांगरीकर यांनी विश्वविक्रमाची अधिकृत घोषणा केल्यानंतर उपस्थित विद्यार्थी आणि नागरिकांनी जल्लोष केला.

या वेळी महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, प्रभारी कुलसचिव डॉ. विजय खरे, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे डॉ. पी. डी. पाटील, ज्येष्ठ कवयित्री दोन अरुणा ढेरे, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ. मिलिंद जोशी, विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागाचे प्रमुख डॉ. आदित्य अभ्यंकर, प्रकाशक राजीव बर्वे आदी उपस्थित होते.

> सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागातील विद्यार्थ्यांना यानिमित्ताने एक प्रकारे उमेदवारीची संधी मिळाली. त्यांनी १४ हजारांहून जास्त वाचकांच्या ध्वनिचित्रफितींचे छायाचित्रण केले. यातून डेटा ॲनॅलिसिस, इमेज-व्हिडिओ प्रोसेसिंग शिकता आले. या कामाचे विद्यार्थ्यांना क्रेडिट मिळतील.
>
> **- डॉ. आदित्य अभ्यंकर,** विभागप्रमुख, तंत्रज्ञान विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

> पुस्तक वाचनातून माणूस घडतो. माणूस घडविण्याची ही प्रक्रिया यापुढेही सुरू राहायला हवी. महोत्सवाला नागरिकांनी दिलेला प्रतिसाद उत्तम आहे. दिल्ली, जयपूर, कोलकता येथील महोत्सवाच्या तोडीचा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे.
>
> **- डॉ. अरुणा ढेरे,** ज्येष्ठ कवयित्री

Pune, Main
22/12/2023 Page No. 5

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# पुणे पुस्तक महोत्सवात चौथ्या विश्वविक्रमाची नोंद

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** पुणे पुस्तक महोत्सवात चौथा विश्वविक्रम नोंदवला गेला. एकाच पुस्तकातील समान परिच्छेद तीस सेकंदात वाचण्याचा हा विक्रम असून, ११ हजार ४२ नागरिकांनी या विक्रमात सहभाग घेतला. या विक्रमाद्वारे दुसऱ्यांदा चीनचा विक्रम मोडीत काढण्यात आला.

राष्ट्रीय पुस्तक न्यासतर्फे आयोजित पुणे पुस्तक महोत्सवात या पूर्वी नोंदवलेल्या तीन विश्वविक्रमांनंतर चौथ्या विश्वविक्रमाची नोंद उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत झाली. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र कुलगुरू डॉ. पराग काळकर, कुलसचिव डॉ. विजय खरे, डॉ. पी. डी. पाटील, ज्येष्ठ कवयित्री डॉ. अरूणा ढेरे, मसापचे कार्याध्यक्ष डॉ. मिलिंद जोशी, महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे या वेळी उपस्थित होते. 'लार्जेस्ट ऑनलाइन अल्बम ऑफ पीपल रिडींग सेम पॅराग्राफ ऑफ मिनिमम ड्यूरेशन ऑफ ३० सेकंड' या संकल्पनेवर विश्वविक्रम नोंद झाल्याचे गिनेस बुक ऑफ रेकॉर्डचे अधिकारी स्वप्निल डांगरीकर यांनी जाहीर केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागाचे प्रमुख आदित्य अभ्यंकर म्हणाले, की विभागातील विद्यार्थ्यांना या निमित्ताने एकप्रकारे कार्यप्रशिक्षण मिळाले. विद्यार्थ्यांनी १४ हजारांपेक्षा अधिक नागरिकांच्या दृकश्राव्य चित्रफिती तयार करणे, त्यांचे विदा विश्लेषण याचे शिक्षण मिळाले.

22/12/2023 | Pune | Page : 08
Source : https://epaper.loksatta.com

---

प्रभात
प्रभात शुक्रवार, दि. २२ डिसेंबर २०२३ ॥ ५



# पुणे पुस्तक महोत्सवात चौथा विश्वविक्रम

## भारताने सलग दुसऱ्यांदा चीनला विश्वविक्रमात मागे टाकले

### गिनेस बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. २१** - पुणे पुस्तक महोत्सवाच्या निमित्ताने वाचन संस्कृती वाढण्यासाठी भारताने संलग्न चौथा विश्वविक्रमाची नोंद गुरुवारी करण्यात आली. या विश्वविक्रमांतर्गत ११ हजार ४३ नागरिकांनी एकाच पुस्तकातील एकच परिच्छेद ३० सेकंदात वाचण्याचा नवा विश्वविक्रम गिनेस बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंदवला आहे. यापूर्वी, असा रेकॉर्ड चीनच्या नावावर होता. या महोत्सवाच्या निमित्ताने दुसऱ्यांदा चीनचा रेकॉर्ड मोडण्यात आला आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सहकार्याने विश्वविक्रमात पुन्हा एकदा भारताने चीनला मागे टाकले आहे.

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत या शृंखलेत चौथा विश्वविक्रम नोंदवण्यात आला. यावेळी यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे, पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, प्रभारी कुलसचिव डॉ. विजय खरे, डॉ. पी. डी. पाटील, ज्येष्ठ कवयित्री अरूणा ढेरे, मसापचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, प्राचार्य डॉ. संजय चाकणे, डॉ. आदित्य अभ्यंकर, प्रकाशक राजीव बर्वे, बागेश्री मंठाळकर, प्रसेनजीत फडणवीस, सुनिताराजे पवार, मिलिंद वेर्लेकर उपस्थित होते. हा विश्वविक्रम लार्जेस्ट ऑनलाइन अल्बम ऑफ पीपल रिडींग सेम पॅराग्राफ ऑफ मिनीमम ड्यूरेशन ऑफ ३० सेकंड या विषयावर नोंदविला आहे. गिनेस बुक ऑफ रेकॉर्डचे अधिकारी स्वप्निल डांगरिकर यांनी विश्वविक्रमाची घोषणा केली. मधुमिलन मेहेंदळे, राजीव बर्वे, सुनिताराजे पवार यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

### 'पक्षी उन्हाचा यावर आज चर्चा

पुस्तक महोत्सवात साधना प्रकाशनाच्या राजन हर्षे लिखित 'पक्षी उन्हाचा : सात विद्यापीठांच्या आवारात' या पुस्तकावरील चर्चेचा कार्यक्रम अचानक रद्द करण्यात आल्याने नवा वाद निर्माण झाला. आयोजकांनी ऐनवेळी कार्यक्रम रद्द केल्याचा आरोप साधनाचे संपादक विनोद शिरसाठ यांनी याचा निषेध नोंदवला. आयोजकांनी घेतलेल्या निर्णयाचा निषेध करून हा कार्यक्रम शुक्रवारी (दि. २२) सकाळी १०.३० वाजता महाराष्ट्र साहित्य परिषदेचे सभागृहात घेण्यात आल्याचे शिरसाठ यांनी सांगितले. दरम्यान, साधना प्रकाशनाने महोत्सवात कार्यक्रम करण्यासंदर्भात संयोजन समितीशी संवाद साधलेला नाही. ज्या वेळी ही माहिती कळाली, तेव्हा कोणताही स्लॉट उपलब्ध नव्हता. या प्रकाशन संस्थेचा पुस्तकांचा एक स्टॉल प्रदर्शनात समाविष्ट आहे, अशी माहिती महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे यांनी दिली.

PuneCity, 22 Dec 2023, Page:005
https://epaper.dainikprabhat.com

## News Paper Clippings During December 2023

## Section: Education

**प्रभात**

# ‘संशोधनाचा समाजाला उपयोगासाठी प्रयत्न व्हावा’

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आविष्कार -२०२३चे उद्घाटन संपन्न

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २१** - आपल्या संशोधनाचा समाजाला उपयोग व्हावा, यासाठी संशोधकाने प्रयत्नशील राहायला हवे, असे मत इस्रोचे माजी संचालक पद्मश्री डॉ. प्रमोद काळे यांनी व्यक्त केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात १अविष्कार -२०२३ या १६ व्या विद्यापीठस्तरीय संशोधन संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या संमेलनाच्या उद्घाटनाप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, प्रभारी कुलसचिव डॉ. विजय खरे, अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाचे संचालक डॉ. संजय ढोले, आविष्कार -२०२३ समितीचे अध्यक्ष डॉ. देविदास वायदंडे, डॉ. दीपक माने, अधिसभा सदस्य डॉ. धोंडीराम पवार, विद्या परिषद सदस्य डॉ. संजय चाकणे, डॉ. के. सी. मोहिते, डॉ. प्रगती ठाकूर, डॉ. मोहन वामन आदी उपस्थित होते.

तसेच संशोधक म्हणून तुमच्यात पॅशन, पेशन्स आणि पर्सिस्टन्स या तीन गोष्टी प्रामुख्याने असल्या पाहिजे, असेही ते यावेळी उपस्थित युवा संशोधकांचे संबोधन करताना डॉ. काळे म्हणाले. २०३५ पर्यंत सावित्रीबाई फुले विद्यापीठाला आपण संशोधन विद्यापीठ म्हणून बघण्याचा प्रयत्न करतो आहे. आविष्कार या स्पर्धेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला ९ वेळा विजेतेपद मिळाले आहे, त्यामुळे या स्पर्धेतील विद्यापीठाचे यश पाहता हा आत्मविश्वास वाढला असल्याचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर यावेळी म्हणाले. याप्रसंगी पुणे शहर, पुणे जिल्हा, नाशिक आणि अहमदनगर जिल्हातील विविध महाविद्यालयामधील विद्यार्थी त्यांच्या प्रकल्पासह सहभागी झाले होते.

### तीन जिल्ह्यांतून ३५०० प्रकल्प

या स्पर्धेसाठी पुणे शहर, पुणे जिल्हा, नाशिक आणि अहमदनगर जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांतून जवळपास ३५०० प्रकल्प विद्यापीठाकडे आले होते. त्यानंतर झोनल पातळीवर परत स्पर्धा घेऊन एकूण २७३ प्रकल्पांची या स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. एकूण सहा विभागांत होणाऱ्या या स्पर्धेत शेवटी ४८ प्रकल्पांची निवड करण्यात येणार आहे. त्यानंतर हे ४८ प्रकल्प जानेवारी २०२४ मध्ये महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक येथे होणाऱ्या राज्यस्तरीय संशोधन स्पर्धेत सहभाग घेतील.



PuneCity, 22 Dec 2023, Page:015
https://epaper.dainikprabhat.com

**प्रभात**

# अल्प मुदतीचे अभ्यासक्रमांचा मार्ग मोकळा

## कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक्ससह २७ क्षेत्रांतील अभ्यासांचा समावेश

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २१** - विद्यापीठ व महाविद्यालयांना अल्प मुदतीचे प्रमाणपत्र सुरु करणे शक्य होणार आहे. अशा पद्धतीचे अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी उच्च शिक्षण संस्थांनी कौशल्य विकास केंद्र, तज्ज्ञांची सल्लागार समिती स्थापन करणे आवश्यक आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक्स, योग विज्ञान, डिजिटल विपणन असे एकूण २७ क्षेत्रांशी संबंधित अभ्यासक्रम राबवता येणार असल्याचे विद्यापीठ अनुदान आयोगाने (युजीसी) स्पष्ट केले आहे.

युजीसीने अल्प मुदतीचे कौशल्य अभ्यासक्रम राबवण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचनांचा मसुदा संकेतस्थळावर प्रसिद्ध केला आहे. या मसुद्यावर २० जानेवारीपर्यंत हरकती-सूचना नोंदवता येणार आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०मध्ये शिक्षण प्रक्रिया सर्वसमावेशक करण्यावर भर देण्यात आला आहे. त्यामुळे उच्च शिक्षण संस्थांमध्ये प्रात्यक्षिकावर आधारित अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना शिकता येण्यासाठी अल्प मुदतीच्या अभ्यासक्रमांची व्यवस्था करून कौशल्य प्रशिक्षण, कौशल्य अद्ययावतीकरण करण्याची कल्पना आहे. बारावी उत्तीर्ण असलेल्यांना या अभ्यासक्रमाला प्रवेश घेता येणार आहे. अल्प मुदतीच्या अभ्यासक्रमांचा कालावधी तीन ते सहा महिन्यांच्या दरम्यान असेल. त्यात प्रामुख्याने व्यावहारिक शिक्षणावर लक्ष केंद्रित केले जाईल. अल्प मुदतीच्या अभ्यासक्रमासाठी प्रत्येक गटात जास्तीत जास्त ६० विद्यार्थ्यांना प्रवेश देता येईल.

### उद्योगातील तज्ज्ञांची नियुक्ती शक्य

अभ्यासक्रमांसाठी उच्च शिक्षण संस्था शिक्षक, प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिक्स, उद्योगातील तज्ज्ञांची नियुक्ती करू शकतात. अल्प मुदत अभ्यासक्रमांमध्ये किमान १२ श्रेयांक, तर जास्तीत जास्त ३० श्रेयांकांचे अभ्यासक्रम राबवता येतील. या अभ्यासक्रमांमध्ये ३० विद्यार्थ्यांमध्ये एक शिक्षक असणे आवश्यक आहे. विद्या परिषद आणि सक्षम प्राधिकरणामार्फत अभ्यासक्रमाची मान्यता प्रक्रिया पूर्ण करणे गरजेचे आहे. अभ्यासक्रमांचे शुल्क आणि शुल्क परतावा धोरण उच्च शिक्षण संस्थांनी स्वत:च्या संकेतस्थळावर जाहीर करणे आवश्यक आहे, असेही यूजीसीने स्पष्ट केले आहे.

PuneCity, 22 Dec 2023, Page:005
https://epaper.dainikprabhat.com

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

सकाळ

# सेटची ऑनलाइन अर्ज प्रक्रिया जानेवारीत

### पुढील वर्षी शेवटची ऑफलाइन परीक्षा होणार

**पुणे, ता. २१ :** राज्यस्तरीय सहायक प्राध्यापक पदासाठीची पात्रता परीक्षा (सेट) ७ एप्रिल २०२४ रोजी होईल. यासाठी ऑनलाइन अर्जप्रक्रिया जानेवारीच्या दुसऱ्या आठवड्यात सुरू होईल, अशी माहिती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सेट विभागाकडून देण्यात आली. ही अखेरची ऑफलाइन सेट परिक्षा असेल.

याबाबतची घोषणा २९ नोव्हेंबर रोजी झाली होती. त्यानंतर काही दिवसांतच ऑनलाइन अर्ज प्रक्रियेसंबंधी घोषणा अपेक्षित होती. अखेरीस सेट विभागाकडून तारखेची माहिती देण्यात आली. उमेदवारांना परीक्षा अर्ज भरण्यासाठी सुमारे एका महिन्याचा कालावधी दिला जातो. त्यानंतर परीक्षा अर्जांची छाननी, प्रवेशपत्र तयार करणे, आदी गोष्टींसाठी दोन ते तीन महिन्यांचा कालावधी लागतो.

**शेवटची ऑफलाइन 'सेट'**

मागील काही वर्षांपासून नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए) द्वारे नेट परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेतली जात आहे. पुणे विद्यापीठ सेट परीक्षा ऑनलाइन घेतली जाणार की ऑफलाइन याबाबत शंका होती. विद्यापीठ अनुदान आयोग पुरस्कृत समितीची ऑक्टोबर महिन्यात एक बैठक झाली. त्यात एप्रिल २०२४ मधील होणारी सेट परीक्षा ऑफलाइन पद्धतीने घ्यावी, मात्र, त्यानंतर पुढील सर्व परीक्षा ऑनलाइन घ्याव्यात, असे निश्चित करण्यात आले. त्यानुसार ७ एप्रिल रोजी मध्ये शेवटची ऑफलाइन (पेन आणि पेपर) परीक्षा होईल. त्यानंतर ४० वी सेट परीक्षा ऑनलाइन (संगणकावर) होईल.

**आकडे बोलतात**

- एकूण विषय : ३२
- सहभागी शहरे : १७
- परीक्षा केंद्रे : २६२
- सहभागी विद्यार्थी (अंदाजे) : १,२५,०००

> सेटच्या ३९ व्या परीक्षेची घोषणा करण्यात आली आहे. ७ एप्रिल २०२४ रोजी पार पडणाऱ्या परीक्षेसाठी प्रश्नपत्रिका संच तयार करण्याला वेग आला आहे. ही प्रक्रिया जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात संपेल, त्यानंतर लगेचच उमेदवारांना ऑनलाइन अर्जासाठी संकेतस्थळ खुले करण्यात येईल.
>
> **- डॉ. बी. पी. कापडणीस,**
> समन्वयक, सेट विभाग

Pune, Main
22/12/2023 Page No. 2

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# राज्याच्या अन्य भागांतही पुस्तक महोत्सव घ्या

### उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सूचना

लोकसत्ता प्रतिनिधी



**पुणे :** सशक्त आणि वैचारिकदृष्ट्या प्रगल्भ राष्ट्र निर्मितीसाठी पुस्तक महोत्सवासारखे उपक्रम उपयुक्त आहेत. त्यामुळे नाशिक, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर अशा शहरांतही पुस्तक महोत्सव झाले पाहिजे. त्यासाठी राष्ट्रीय पुस्तक न्यासाने पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी येथे व्यक्त केली. देशाकडे किती संपत्ती आहे, या पेक्षा विचारांचा खजिना किती आहे, हे महत्त्वाचे आहे, असेही त्यांनी सांगितले.

राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या वतीने फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित पुणे पुस्तक महोत्सवाला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भेट दिली, त्यावेळी ते बोलत होते. विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, आमदार सुनील कांबळे, महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे, राष्ट्रीय पुस्तक न्यासाचे संचालक युवराज मलिक, महापालिका आयुक्त विक्रम कुमार यांच्यासह अन्य पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

मुलांचा स्क्रीन टाइम वाढला आहे, अशी तक्रार पालक वर्गाकडून सातत्याने होत आहे. या परिस्थितीत पुस्तक महोत्सवाला मिळत असलेला प्रतिसाद पहाता ज्ञानवर्धनाची उत्कंठा दिसून येत आहे, असे सांगून फडणवीस म्हणाले की, पुस्तके म्हणजे केवळ पाने नाहीत. तर व्यक्तिमत्त्व विकास आणि वैचारीक बैठक पुस्तकातून तयार होते. विचारांच्या कक्षा रुंदावितात. समाजाबाबत, राष्ट्राबाबतची भावना त्यातून वाढीस लागते. इतिहासाचे, स्वातंत्र्याचे मोल समजते. त्यामुळे पुस्तके हा ज्ञानाचा अनमोल ठेवा आहे.

ते म्हणाले की, पुस्तकामुळे विचार आणि व्यक्ती घडतात. व्यक्तील जीवनाची दिशा सापडते. त्यामुळे पुस्तकांच्या रुपाने पुढच्या पिढीपर्यंत ज्ञान पोहचविणारा पुस्तक महोत्सव समाजनिर्मिती आणि राष्ट्रनिर्मितीचे महत्त्वाचे साधन आहे. ज्ञान संकुचित ठेवल्यास समाज प्रगती करू शकत नाही. ज्ञान दिल्याने वाढते. त्यामुळे पुस्तक महोत्सवासारखे उपक्रम राज्यातील अनेक शहरांत गरजेचे झाले आहेत. त्यासाठी राष्ट्रीय पुस्तक न्यासाने पुढाकार घ्यावा.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजेश पांडे यांनी केले. महोत्सवाला पुणेकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

23/12/2023 | Pune | Page : 03
Source : https://epaper.loksatta.com

## *News Paper Clippings During December 2023*

### *Section: Education*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# वाचनाद्वारे ज्ञानार्जन न करणाऱ्या व्यक्ती कालबाह्य होतील

## ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांचे मत



**पुणे :** आधुनिक काळात दोन ते पाच वर्षांमध्ये ज्ञान बदलत आहे. त्यात वाढ होत आहे. त्यामुळे पुस्तकांद्वारे ज्ञानार्जन करणे आवश्यक आहे. त्यातूनच नवसर्जनशीलता निर्माण होणार आहे. वाचनाद्वारे ज्ञानार्जन न करणाऱ्या व्यक्ती कालबाह्य होतील, असे मत ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी शुक्रवारी मांडले.

राष्ट्रीय पुस्तक न्यासातर्फे आयोजित पुणे पुस्तक महोत्सवात सागर देशपांडे यांनी डॉ. माशेलकर यांची मुलाखत घेतली. त्या वेळी ते बोलत होते. माझी शाळा महापालिकेची असूनही माझ्या जडणघडणीवर परिणाम झाला नाही. वाचनाची आवड शाळेत असल्यापासूनच असल्याने एखादे पुस्तक मिळाल्यावर ते पूर्ण वाचूनच सोडायचो. नव्या पुस्तकांचा सुगंध मला फार आवडतो. लहानपणी माझ्या प्रवासात रोज पुस्तक वाचायचो. लहानपणी संजय, बालमित्र, मंथन अशी अनेक मासिके वाचायचो आणि त्यात लिहायचो. त्या वेळी माझ्या लेखांना पारितोषिकेही मिळायची. मृत्युंजय, ययाति, प्रकाशवाटा, मंतरलेले दिवस अशी अनेक पुस्तके माझ्या जवळची आहेत, असे डॉ. माशेलकर यांनी सांगितले.

वाचनामुळे शब्दसंग्रह वाढतो. त्याचा फायदा लेखन आणि वक्तृत्वासाठी होतो. पुस्तक वाचनासाठी वेळ काढला पाहिजे. रहस्यकथा, आत्मचरित्रावरील पुस्तके वाचायला आवडतात, असे डॉ. माशेलकर म्हणाले. पुणे शहर हे अनेक महोत्सवांचे शहर आहे. पुण्यात होणाऱ्या महोत्सवांमध्ये आता पुस्तक महोत्सवाची भर पडली आहे. वाचन संस्कृती वाढवण्यासाठी ही चांगली बाब आहे, असेही त्यांनी सांगितले.

### माणसे वाचायला आवडतात

महोत्सवात 'माझे वाचन माझा अनुभव' या विषयावरील चर्चेत विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते माधव भांडारी, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे सरचिटणीस अनिल शिदोरे यांनी सहभाग घेतला. वसुंधरा काशीकर यांनी त्यांच्याशी संवाद साधला. घरी वाचनपूरक वातावरण असल्याचे नमूद करून भांडारी, शिदोरे, डॉ. गोऱ्हे या तिघांनीही त्यांच्या वाचनाचे अनुभव, पुस्तकांच्या आवडीनिवडी, प्रभावित केलेल्या पुस्तकांविषयी सांगितले. राजकीय नेते वाचत नाहीत हा समज चुकीचा आहे. मात्र पुस्तकांपेक्षा माणसे जास्त व्यामिश्र आहेत. त्यामुळे पुस्तकांपेक्षा माणसे वाचायला जास्त आवडतात, असा सूर या चर्चेत व्यक्त झाला.

23/12/2023 | Pune | Page : 03
Source : https://epaper.loksatta.com

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

लोकमत

चीनला टाकले दुसऱ्यांदा मागे : गिनीज बुकने घेतली नोंद

# पुणे पुस्तक महोत्सवाने रचला वाचनाचा चौथा विश्वविक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या पुणे पुस्तक महोत्सवात ११ हजार ४३ नागरिकांनी एकाच पुस्तकातील एकच परिच्छेद ३० सेकंदात वाचण्याचा नवा विश्वविक्रम केला आहे. विशेष म्हणजे याची नोंद गिनीज बुक ऑफ रेकॉर्डमध्ये घेण्यात आली. हा विक्रम करून भारताने चीनचा विक्रम मोडला आहे. यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे सहकार्य झाले.

या वेळी राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील उपस्थित होते. संयोजक राजेश पांडे, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, कुलसचिव डॉ. विजय खरे, डॉ. डी.वाय. पाटील, डॉ. पी.डी. पाटील, ज्येष्ठ कवयित्री डॉ. अरुणा ढेरे, डॉ. मिलिंद जोशी, डॉ. संजय चाकणे, डॉ. आदित्य अभ्यंकर, प्रकाशक राजीव बर्वे, बागेश्री मंठाळकर, प्रसेनजीत फडणवीस, सुनीताराजे पवार, मिलिंद वेर्लेकर यांच्या साक्षीने या विक्रमाला गवसणी घालण्यात आली.

गिनीज बुक ऑफ रेकॉर्डचे अधिकारी स्वप्निल डांगरीकर यांनी अधिकृतपणे या विश्वविक्रमाची घोषणा केल्यानंतर, उपस्थित विद्यार्थी आणि नागरिकांनी जल्लोष करीत तिरंगा फडकवत आणि फुगे सोडून आनंदोत्सव साजरा केला. वाचन संस्कृती वाढविण्यासाठी हा विश्वविक्रम करण्यात आला. कार्यक्रमात मधुमिलन मेहेंदळे, राजीव बर्वे, सुनीताराजे पवार यांचा सत्कार करण्यात आला. मिलिंद कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले.

> सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागातील विद्यार्थ्यांना यानिमित्ताने एक प्रकारे इंटर्नशिप मिळाली आहे. त्यांनी १४ हजारांपेक्षा अधिक नागरिकांचे व्हिडीओ रेकॉर्ड केले. या व्हिडीओंचा डेटा ॲनालिसिस, प्रोसेसिंग, इमेज प्रोसेसिंग, व्हिडीओ प्रोसेसिंग शिकता आले. त्याचा फायदा विद्यार्थ्यांना होणार आहे.
>
> **- डॉ. आदित्य अभ्यंकर, विभागप्रमुख, तंत्रज्ञान विभाग**



**राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या पुणे पुस्तक महोत्सवात पुस्तक वाचन उपक्रमात सहभागी झालेली चिमुकली मुले.**

Hello Pune
Page No. 6 Dec 23, 2023
Powered by: erelego.com

प्रभात

# राष्ट्र निर्मितीसाठी ग्रंथमहोत्सव महत्त्वाचे साधन

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : पुणे पुस्तक महोत्सवाला भेट



**पुणे : पुस्तक महोत्सवात विविध रेकॉर्ड्स करण्यात आले. त्याच्या प्रमाणपत्रांची पाहणी करताना राजेश पांडे, देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत पाटील.**

**पुणे, दि. २२ (प्रभात वृत्तसेवा)** - पुस्तकातून व्यक्तिमत्व, विचार घडविण्यासोबतच ज्ञानकक्षा रुंदावतात. ज्ञान पुढच्या पिढीपर्यंत नेण्याची व्यवस्था करण्याचा उत्तम मार्ग म्हणजे ग्रंथमहोत्सव आहे. हा ग्रंथमहोत्सव समाजाच्या, राष्ट्राच्या निर्मितीसाठी महत्त्वाचे साधन आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले.

राष्ट्रीय पुस्तक न्यासच्या वतीने आयोजित पुस्तक महोत्सवाला फडणवीस यांनी शुक्रवारी भेट दिली. याप्रसंगी विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, आमदार सुनील कांबळे, राहुल कुल, श्रीकांत भारतीय, राष्ट्रीय पुस्तक न्यासाचे संचालक युवराज मलिक, कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, संयोजक राजेश पांडे उपस्थित होते. फडणवीस म्हणाले, हल्ली तरुणाईचा स्क्रीन टाइम वाढल्याचा प्रकार समोर आला असताना पुस्तक महोत्सवाला मिळणारा तरुणांचा प्रतिसाद हा अभिनंदनीय आहे. पुस्तक प्रदर्शनासाठी पुण्यापेक्षा उत्तम जागा असूच शकत नाही. मलिक म्हणाले, 'दिल्ली वगळता एवढा मोठा पुस्तक महोत्सव कुठेच होत नाही. महोत्सव यशस्वी करण्यासाठी महाराष्ट्र शासन आणि प्रशासनाने चांगेल सहकार्य केले. लोकसहभागातून भव्य आयोजन शक्य होते हे पुण्याने दाखवून दिले.'

PuneCity, 23 Dec 2023, Page:005
https://epaper.dainikprabhat.com

# *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

# 'ज्ञानार्जनासाठी पुस्तक वाचनाशिवाय पर्याय नाही'

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'आधुनिक काळात ज्ञानसंग्रह दोन ते पाच वर्षांमध्ये दुप्पट होणार असून, ज्ञानात वाढच होत राहणार आहे. अशा वेळी आपल्याला ज्ञानार्जन उत्तम करायचे असल्यास आणि नवसृजनाला वाव द्यायचा असल्यास पुस्तक वाचनाशिवाय पर्याय नाही. पुस्तक न वाचणारे आगामी काळात 'आउट ऑफ डेट' होतील,' असे मत ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी शुक्रवारी व्यक्त केले.

राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या (नॅशनल बुक ट्रस्ट) वतीने आयोजित पुणे पुस्तक महोत्सवात ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांची मुलाखत सागर देशपांडे यांनी घेतली. या वेळी महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे उपस्थित होते.

“ आपले पुणे शहर अनेक महोत्सवांचे शहर आहे. या शहराच्या विकासासाठी आणि त्यादृष्टीने विचारमंथन होण्यासाठी आम्ही पुणे इंटरनॅशनल सेंटर स्थापन केले आहे. त्यात आता पुणे पुस्तक महोत्सवाची भर पडली आहे. पुस्तक महोत्सवाच्या निमित्ताने नागरिकांना विविध विषयांवरील पुस्तके वाचण्याची संधी मिळत आहे. वाचनसंस्कृती वाढविण्यासाठी ही उत्तम बाब आहे.

– डॉ. रघुनाथ माशेलकर, ज्येष्ठ शास्त्रज्ञ



डॉ. माशेलकर म्हणाले, 'वाचायला लागल्यावर तुमचा शब्दसंग्रह उत्तम होतो. तुम्हाला एकाच गोष्टीचा विविध पद्धतींनी विचार करता येतो. याचा फायदा तुम्हाला लिहायला आणि भाषण करण्यासाठी उत्तम होतो. एखादी गोष्ट तुम्हाला प्रभावीपणे कमी वाक्यात मांडायची असल्यास, तुमच्याकडे प्रभावी शब्दसंग्रह हवा. त्यासाठी पुस्तके वाचायला हवी आणि त्यासाठी वेळ काढायला हवा. मला लहानपणीपासून रहस्यकथा वाचायला आवडतात. त्याचप्रमाणे आत्मचरित्रावरील पुस्तके वाचायला आवडतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. एपीजे अब्दुल कलाम, सचिन तेंडुलकर अशा व्यक्तिमत्त्वांची पुस्तके खूप भावली. शाळेत असल्यापासूनच मला वाचनाची भरपूर आवड होती. एखादे पुस्तक हाती पडले, की ते पूर्ण वाचूनच सोडायचो. नव्या पुस्तकांचा सुगंध मला फार आवडतो. लहानपणी माझ्या प्रवासात साधारण दररोज २० मिनिटांचा वेळ जायचा. लहानपणी संजय, बालमित्र, मंथन अशी अनेक मासिके वाचायचो आणि त्यात लिहायचो. त्या वेळी माझ्या अनेक लेखांना पारितोषिकेही मिळाली. मृत्युंजय, ययाती, प्रकाशवाटा, मंतरलेले दिवस अशी अनेक पुस्तके माझ्या जवळची आहेत,' असे डॉ. माशेलकर यांनी सांगितले.

### 'मराठी माध्यमाच्या शाळेत शिकलो'

'आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने, मी महापालिकेच्या शाळेत शिकलो. शाळा मराठी माध्यमाची होती. त्यामुळे मराठी माध्यमातून शिकलो. मात्र, याचा माझ्या जडणघडणीवर कोणताही परिणाम झाला नाही. आपला जन्म प्रतिकूल परिस्थितीत झाला असला तरी, आपल्याला आयुष्यात जे मिळवायचे आहे, ते मिळवता येते. त्यासाठी मेहनतीची आणि कष्ट करण्याची जिद्द आवश्यक आहे,' असेही डॉ. माशेलकर यांनी सांगितले.

Maharashtra Times 23.12.2023

# वाचनसंस्कृतीला नव्याने चालना

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विश्वास; पुणे पुस्तक महोत्सवाला भेट

पुणे पुस्तक महोत्सव

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'संकुचित विचारांमध्ये अडकून आपण ज्ञान इतरांपर्यंत पोहोचू देत नाही, तेव्हा ते ज्ञान संपते. ज्ञान पुढील पिढीकडे पोहोचविण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे ग्रंथ. त्यामुळे पुणे पुस्तक महोत्सवासारखे महोत्सव राज्यात सर्वत्र व्हायला हवेत. त्यातून वाचनसंस्कृतीला नव्याने चालना मिळेल,' असा विश्वास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी व्यक्त केला.

राष्ट्रीय पुस्तक न्यासातर्फे आयोजित पुस्तक प्रदर्शनाला फडणवीस यांनी भेट दिली. त्या वेळी ते बोलत होते. विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, आमदार सुनील कांबळे, राहुल कुल, श्रीकांत भारतीय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, पुणे महापालिकेचे आयुक्त विक्रमकुमार, पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे, न्यासाचे संचालक कर्नल युवराज मलिक (नि.) आणि महोत्सवाचे मुख्य संयोजक राजेश पांडे उपस्थित होते.



पुणे पुस्तक महोत्सवातील पुस्तकांच्या स्टॉलला भेट देऊन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुस्तकांविषयी जाणून घेतले.

'पुस्तके म्हणजे फक्त पाने नव्हे. पुस्तके आपल्याला विचार देतात, दिशा देतात. त्यातून आपल्या कक्षा रुंदावतात, व्यक्तिमत्त्व घडते. एखाद्या समाजात कुठले साहित्य वाचले जाते, यावर त्या समाजाचा आरसा ठरतो. त्या पुस्तकांत समाजाचे प्रतिबिंब दिसते. पुस्तके आपल्या मनात समाजाबद्दलची भावना तयार करतात. समाजाशी जोडून घेतात. ऐतिहासिक पुस्तके वाचली, की आपण नेमके कोण हे समजते. आपल्या स्वातंत्र्याचे मोल समजते. आपली संस्कृती जिवंत का आणि कशी राहिली हे समजते, म्हणूनच पुस्तके मोलाचा ठेवा आहेत,' असे देवेंद्र म्हणाले.

'कोणत्याही देशाकडे किती संपत्ती आहे हे महत्त्वाचे आहे; परंतु त्या देशाकडे विचारांचा ठेवा किती आहे, पुस्तके किती आहेत हे त्याहून महत्त्वाचे आहे,' असेही फडणवीस म्हणाले.

### 'पुणेकरांची ज्ञानवर्धनाची आस अधिक'

'प्रदर्शनासाठी पुण्याइतकी उत्तम जागा असूच शकत नाही. विद्येचे माहेरघर असलेल्या पुण्यातील ज्ञानवर्धनाची आस इतर कोणत्याही शहरांपेक्षा अधिक आहे. पुणेकरांनी या प्रदर्शनाला उदंड प्रतिसाद दिला. मुलांचा 'स्क्रीन टाइम' वाढल्याची तक्रार येत असताना तरुणाई या प्रदर्शनाकडे आकृष्ट होते आहे, ही आनंदाची बाब आहे,' असे फडणवीस म्हणाले.

### महाविकास आघाडीचे फेब्रुवारीत तुकडे : बावनकुळे

येत्या फेब्रुवारीत महाविकास आघाडीचे हजारो तुकडे होतील. काँग्रेस; तसेच उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्याकडील जेवढे लोक भारतीय जनता पक्षामध्ये येतील, त्यांच्यासाठी कमळाचा दुपट्टा तयार असल्याचे भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केले. राष्ट्रीय पुस्तक न्यासातर्फे आयोजित पुणे पुस्तक महोत्सवाला भेट दिल्यानंतर बावनकुळे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. मराठा समाजाला न्यायालयात टिकणारे आणि फायदेशीर ठरणारे आरक्षण देण्यात येईल, याची दक्षता सरकार घेत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

Maharashtra Times 23.12.2023

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

पुढारी

# ग्रंथ महोत्सवांचे राष्ट्रनिर्मितीत योगदान

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

पुस्तके समाजाबद्दलच्या भावना निर्माण करत असतात. आपल्या राष्ट्राच्या खजिन्यात संपत्तीपेक्षा विचारांचा खजिना किती हेदेखील पाहणे महत्त्वाचे असते. यासाठी ग्रंथ महोत्सवाचे आयोजन होणे आवश्यक असून, समाजनिर्मिती व राष्ट्रनिर्मितीत या महोत्सवांचे मोलाचे योगदान आहे, असे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

राष्ट्रीय पुस्तक न्यासच्या वतीने आयोजित पुणे पुस्तक महोत्सवाला फडणवीस यांनी शुक्रवारी (दि. २२) भेट दिली, त्या वेळी ते बोलत होते.

विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, आमदार सुनील कांबळे, राहुल कुल, श्रीकांत भारतीय, युवराज मलिक, कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्रा. संजीव सोनवणे, आयुक्त विक्रम कुमार, विनयकुमार चौबे, विकास ढाकणे, संयोजक राजेश पांडे उपस्थित होते.

फडणवीस म्हणाले, ज्ञान कधी नष्ट होणारे नसते. जेव्हा आपण पुढच्या पिढ्यांना ज्ञान देणे बंद करतो तेव्हाच ज्ञान संपते. हल्ली तरुणाईचा स्क्रीन टाइम वाढल्याचा प्रकार समोर आला असताना पुस्तक महोत्सवाला मिळणारा प्रतिसाद अभिनंदनीय आहे.



**उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुणे पुस्तक महोत्सवात झालेल्या विश्वविक्रमांची प्रमाणपत्रे पाहून आनंद व्यक्त केला.**

Pune Edition
Dec 23, 2023 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

पुढारी

# पुस्तकांपेक्षा माणसे वाचायला आवडतात!

## पुस्तक महोत्सवात राजकीय नेत्यांच्या चर्चेतील सूर

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राजकीय नेते वाचत नाहीत हा चुकीचा समज आहे. मात्र पुस्तकांपेक्षा माणसे जास्त व्यामिश्र आहेत. त्यामुळे पुस्तकांपेक्षा माणसे वाचायला जास्त आवडतात, असा सूर राजकीय नेत्यांच्या चर्चेत व्यक्त झाला.

राष्ट्रीय पुस्तक न्यासतर्फे फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित पुणे पुस्तक महोत्सवात 'माझे वाचन माझा अनुभव' या विषयावरील चर्चेत विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, भाजपचे वरिष्ठ उपाध्यक्ष माधव भांडारी, मनसेचे सरचिटणीस अनिल शिदोरे यांनी सहभाग घेतला. वसुंधरा काशीकर यांनी त्यांच्याशी संवाद साधला.

डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, की वृत्तपत्रांपासून वाचनाची सुरुवात झाली. पंढरपूरला आजोळी खूप पुस्तके होती. जे मिळेल ते वाचायला आवडते.

शिदोरे म्हणाले, की मुख्याध्यापकाचा मुलगा असल्याने महाविद्यालय कायम खुले होते. तिथून वाचन सुरू झाले. घरातही वाचनाचे उत्तम वातावरण होते. सॉल्व्हिंग टफ प्रॉब्लेम्स या पुस्तकाच्या वाचनाने मी राजकारणाकडे आकृष्ट झालो. इंग्रजी भाषेतील साहित्य मराठीत येण्यात मर्यादा आहेत. आर्ट ऑफ वॉर या मूळ चायनीज पुस्तक, अल्केमिस्ट अशा काही पुस्तकांनी प्रभावीत केले. भांडारी म्हणाले, की वडील संस्कृतचे विद्वान, शिक्षक असल्याने घरात खूप पुस्तके होती. लहानपणापासून पुस्तकांशी संबंध आला. बालपणापासूनच सुरू झालेले वाचन आजतागयत सुरू आहे. जुन्या पुस्तकांचे संकलन करायला आवडते.



**पुणे पुस्तक महोत्सवात चंद्रशेखर बावनकुळे यांना विद्यार्थिनींनी गराडा घालून कुतूहलपूर्ण राजकीय प्रश्न विचारले.**

Pune Edition
Dec 23, 2023 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

## News Paper Clippings During December 2023

### Section: Education

पुढारी

# वाचन न करणारे कालबाह्य

## पुणे पुस्तक महोत्सवात डॉ. रघुनाथ माशेलकर यांचे मत

पुणे : पुढारी वृत्तसेवा

**'आधुनिक काळात दोन ते पाच वर्षांमध्ये ज्ञान बदलत असून, त्यात भरपूर वाढ होत आहे. त्यामुळे आपण पुस्तकांच्या माध्यमातून ज्ञानार्जन करायला हवे. त्यातूनच नवसर्जनशीलता निर्माण होणार आहे. अशा पद्धतीने ज्ञानार्जन न करणारे व्यक्ती 'आउट ऑफ डेट' होतील,' असे मत ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी शुक्रवारी व्यक्त केले.**



ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांचा सन्मान करताना पुणे पुस्तक महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे.

राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या (नॅशनल बुक ट्रस्ट) वतीने पुणे पुस्तक महोत्सवाचे आयोजन २४ डिसेंबरपर्यंत करण्यात आले आहे. या महोत्सवात ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांची मुलाखत सागर देशपांडे यांनी घेतली. या वेळी महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे यांनी डॉ. माशेलकर यांचा सत्कार केला.

डॉ. माशेलकर म्हणाले, 'वाचायला लागल्यावर तुमचा शब्दसंग्रह उत्तम होतो. याचा फायदा तुम्हाला लिहायला आणि वक्तृत्वाच्या दृष्टीने उत्तम होतो. विविध दृष्टिकोन समजतात. त्यामुळे आपण वाचन करायला हवे. एखादी गोष्ट तुम्हाला प्रभावीपणे कमी वाक्यात मांडायची असल्यास, तुमच्याकडे प्रभावी शब्दसंग्रह हवा. त्यासाठी पुस्तके वाचनासाठी वेळ काढायला हवा.



मला रहस्यकथा आवडतात. त्याचप्रमाणे आत्मचरित्रावरील पुस्तके वाचायला आवडतात. यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. एपीजे अब्दुल कलाम, सचिन तेंडुलकर अशा व्यक्तिमत्त्वांची पुस्तके खूप भावली.' असेही डॉ. माशेलकर यांनी सांगितले.

डॉ. माशेलकर म्हणाले की, 'मी महापालिकेच्या शाळेत मराठी माध्यमात शिकलो. शाळा महापालिकेची होती, तरी माझ्या जडणघडणीवर परिणाम झाला नाही. शाळेत असल्यापासूनच, मला वाचनाची भरपूर आवड होती. एखादे पुस्तक हाती पडले, की ते पूर्ण वाचूनच सोडायचो. नव्या पुस्तकांचा सुगंध मला फार आवडतो. लहानपणी माझ्या प्रवासात साधारण दररोज २० मिनिटांचा वेळ जायचा. या वेळी पुस्तक वाचायचो. लहानपणी संजय, बालमित्र, मंथन अशी अनेक मासिके वाचायचो आणि त्यात लिहायचो. त्या वेळी माझ्या अनेक लेखांना पारितोषिकेही मिळायची.' 'पुणे शहर हे अनेक महोत्सवांचे शहर आहे. या महोत्सवात आता पुणे पुस्तक महोत्सवाची भर पडली आहे. या पुस्तक महोत्सवाच्या निमित्ताने नागरिकांना विविध विषयांवरील पुस्तके वाचण्याची संधी मिळत आहे. वाचन संस्कृती वाढविण्यासाठी ही चांगली बाब आहे,' असेदेखील माशेलकर यांनी स्पष्ट केले.

Pune Edition
Dec 23, 2023 Page No. 2
newspaper.pudhari.co.in

पुढारी



# वाचनसंस्कृतीसाठी व्यासपीठ उभारण्याची गरज

## संपादकांच्या परिसंवादातील चर्चेचा सूर

पुणे : पुढारी वृत्तसेवा

वाचनसंस्कृतीसाठी सर्वांनी एकत्र येऊन जाणीवपूर्वक यंत्रणा विकसित केली पाहिजे. संभाव्य वाचकांपर्यंत पोहचण्यासाठीचे व्यासपीठ तयार करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. वृत्तपत्रांचे वाचन केल्यास पुस्तकांच्या वाचनाकडे वळता येईल. पुस्तकांचे मार्केटिंग झाले पाहिजे. पुस्तके वाचकांपर्यंत जातील, यासाठी प्रयत्न केले पाहिजेत, असा सूर वृत्तपत्र संपादकांच्या चर्चेत उमटला.

राष्ट्रीय पुस्तक न्यासतर्फे फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित पुणे पुस्तक महोत्सवात गुरुवारी 'वाचनसंस्कृतीतील माध्यमांचे योगदान' या विषयावर वृत्तपत्रांच्या संपादकांचे चर्चासत्र झाले. यामध्ये 'पुढारी'चे निवासी संपादक सुनील माळी, मुकुंद संगोराम, श्रीधर लोणी, सम्राट फडणीस, किरण शेलार यांनी सहभाग घेतला.

माळी म्हणाले की, सर्वसामान्य लोकांना भाषा कळली पाहिजे इतकी ती सोपी असायला हवी. वाचकांना कलासंस्कृतीबाबतच्या घडामोडी पाहिजे असतात म्हणून वृत्तपत्र वाचले जाते. अवांतर वाचण्याची गोडी लावण्यासाठी वृत्तपत्र ही पहिली पायरी असते. लेखनाचा केंद्रबिंदूही आता महानगरातून मराठवाडा, विदर्भाकडे सरकला आहे. तंत्रज्ञान आणि प्रत्यक्ष पुस्तकाचे वाचन, यात समन्वय साधला पाहिजे. पुस्तकाच्या दर्जाबरोबरच त्याची प्रसिद्धी झाली पाहिजे. अपेक्षित वाचकांपर्यंत पोहचण्याची व्यवस्था असली की लोक नक्की पुस्तक घेतात.

संगोराम म्हणाले, हल्ली कुणीच वाचत नाही, असे म्हटले जाते. पण, त्यात काहीतरी गडबड, असे वाटते. एकेकाळी साप्ताहिक पुरवण्या ललित साहित्याने भरलेल्या असायच्या, त्याची जागा आता वैचारिक लेखांनी घेतली. लोकांनी वृत्तपत्र वाचली, तर पुस्तके वाचतील. वाचन ही प्रक्रिया आहे. चांगले साहित्य असेल तर लोक नक्की वाचतात, यावर संपादकांनी विश्वास ठेवला पाहिजे.



लोणी म्हणाले, वृत्तपत्र हे वाचनसंस्कृतीचे वाहक आहे. मराठी साहित्य आणि वृत्तपत्र यांनी हातात हात घालून काम केले आहे. वाचनाची सवय असली पाहिजे. वाचन हा लेखनाचा रियाज आहे. मुलांनी वाचवण्यासाठी आईवडिलांनी वाचले पाहिजे. त्यासाठी घरात भरपूर पुस्तके ठेवली पाहिजेत. वाचनसंस्कृती टिकली, तर वृत्तपत्र टिकणार आहे. पुस्तकाची बाजारपेठ अद्याप विकसित झालेली नाही. पुस्तक घेण्याची भूक आहे. प्रकाशक नकारात्मक बोलत आहेत. प्रकाशक व्यवसाय नाही म्हणतात, पण मग ते या व्यवसायात का आहेत?

फडणीस म्हणाले, वाचन चांगले असले पाहिजे. ते प्रयत्नपूर्वक केले पाहिजे. मोबाईल हा वाचनातील सर्वांत मोठा अडथळा आहे, असे म्हटले जाते. पण, मोबाईलवरही चांगले वाचता येते. तंत्रज्ञानाचा वापर चांगल्या वाचनासाठी केला पाहिजे. लहान मुलांसाठी काम करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी पुस्तकांचे कॉमिक्समध्ये रूपांतर केले पाहिजे. लेखनाचा घाट बदलण्याची गरज आहे. मराठी, बंगाली भाषेतील पुस्तकांना चांगले दिवस आहेत.

शेलार म्हणाले, आपल्या देशात पुस्तकाचा दर्जा महत्त्वाचा आहे. दर्जेदार साहित्य असेल तर वाचन चळवळीला मदत होईल. तसेच आपल्याकडे संदर्भ साहित्याला खूप मोठी मागणी दिसत आहे. मोठ्या प्रमाणात संदर्भ साहित्याची निर्मिती केली पाहिजे.

Pune Edition
Dec 23, 2023 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

सकाळ

# नवसर्जनशीलतेची वाचनातून निर्मिती

## डॉ. रघुनाथ माशेलकर : पुस्तकांच्या माध्यमातून ज्ञानार्जन करायला हवे

पुणे, ता. २२ : "पूर्वीच्या काळी ज्ञानात हळूहळू वाढ होत असे. ज्ञानातील वाढीचा वेग कमी होता. परंतु आजकाल दर पाच-दोन वर्षांनी ज्ञान बदलत आहे आणि विस्तारत आहे. त्यामुळे आपण पुस्तकांच्या माध्यमातून ज्ञानार्जन करायला हवे. त्यातूनच नवसर्जनशीलता (इनोव्हेशन) निर्माण होणार आहे. या काळात वाचन केले नाही, तर तुम्ही मागे पडाल," असे प्रतिपादन ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी व्यक्त केले.

राष्ट्रीय पुस्तक न्यास आयोजित पुणे पुस्तक महोत्सवात डॉ. माशेलकर यांच्याशी मुलाखत सागर देशपांडे यांनी डॉ. माशेलकर यांच्याशी संवाद साधला. "मी महापालिकेच्या मराठी माध्यमाच्या शाळेत शिक्षण घेतले. मराठीत शिकल्याने काही बिघडले नाही," असे आवर्जून नमूद करीत डॉ. माशेलकर यांनी मातृभाषेतून शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले.

### डॉ. माशेलकर यांचे मुद्दे

- वाचनातून शब्दसंग्रह समृद्ध होतो
- शब्दांचा नेमका वापर समजतो
- वाचनातून ज्ञान समृद्ध होत असल्याने आत्मविश्वास आपोआप वाढतो
- वाचनामुळे निर्णयक्षमता वाढते

तरुणांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले, तरुणांमध्ये प्रचंड सुप्त शक्ती आहेत. अशक्य गोष्टी शक्य करण्याची ताकद तरुणांमध्ये आहे. या सुप्त शक्ती जागृत करण्यासाठी तरूणांनी ज्ञानाने समृद्ध व्हायला हवे आणि त्यासाठी जास्तीत जास्त पुस्तके वाचायला हवीत. एखाद्या पुस्तकात एकाच दिशेने विचार मांडलेले असतात. परंतु वाचक म्हणून आपण सगळ्या बाजूंनी वाचन करायला हवे. जितके जास्त वाचू तितके जास्त ज्ञान मिळेल, त्यातून आत्मविश्वास वाढेल."

"आपल्या मेंदूची क्षमता प्रचंड आहे. आपण त्यातील केवळ १० टक्के क्षमतांचा वापर करतो. परंतु मेंदूच्या क्षमता विस्तार आणि वापर करण्यात ज्ञान आणि वाचनाचे महत्त्व आहे," असे मत डॉ. माशेलकर यांनी व्यक्त केले.

> पुणे शहर हे अनेक महोत्सवांचे शहर आहे. या महोत्सवात आता पुणे पुस्तक महोत्सवाची भर पडली आहे. या पुस्तक महोत्सवाच्या निमित्ताने नागरिकांना विविध विषयांवरील पुस्तके वाचण्याची संधी मिळत आहे. वाचन संस्कृती वाढविण्यासाठी ही चांगली बाब आहे.
>
> **- डॉ. रघुनाथ माशेलकर,**
> ज्येष्ठ शास्त्रज्ञ



फर्ग्युसन महाविद्यालय : पुणे पुस्तक महोत्सवात ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या मुलाखतीचा कार्यक्रम झाल्यानंतर नागरिकांनी डॉ. माशेलकर यांची पुस्तकांवर स्वाक्षरी घेण्यासाठी गर्दी केली.

Pune, Main
23/12/2023 Page No. 5

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

सकाळ

# मुलांची पुस्तके खरेदी कौतुकास्पद

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : इतर शहरांतही महोत्सवाचे आयोजन व्हावे

**पुणे, ता. २२ :** पुणे हे विद्येचे माहेरघर आहेच, पण ज्ञान संपादन करण्याची प्रेरणा पुण्यात पाहायला मिळाली. मोबाईल, संगणकामुळे मुलांचा स्क्रीनटाइम वाढल्याची तक्रार पालक सतत करतात, पण हीच मुले महोत्सवात मोठ्या प्रमाणावर पुस्तके खरेदी करीत आहेत, ही कौतुकाची गोष्ट आहे, असे उद्गार उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.

फडणवीस यांनी शुक्रवारी पुणे पुस्तक महोत्सवाला भेट दिली. या वेळी विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, आमदार सुनील कांबळे, न्यासाचे अध्यक्ष युवराज मलीक, राजेश पांडे, भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटे, प्रदेश सरचिटणीस मुरलीधर मोहोळ, स्थायी समितीचे माजी अध्यक्ष हेमंत रासने, महापालिका आयुक्त विक्रम कुमार, अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे आदी उपस्थित होते.



फर्ग्युसन महाविद्यालय मैदान : पुणे पुस्तक महोत्सवाला भेट दिलेल्या उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आयोजक राजेश पांडे यांनी स्वागत केले. (डावीकडून) युवराज मलिक, पांडे, फडणवीस, चंद्रकांत पाटील, डॉ. नीलम गोऱ्हे आदी.

फडणवीस म्हणाले, "कोणत्याही समाजाचा आरसा लोक कोणती पुस्तके वाचत त्यावरून ठरतो. पुस्तके म्हणजे पाने नाहीत, तर त्यांच्या वाचनातून विचारांच्या कक्षा रुंदावतात. ऐतिहासिक पुस्तकांमधून आपण कोण आहोत, आपली संस्कृती काय आहे, आपल्या स्वातंत्र्याचे मोल काय आहे, हे समजते. देशाच्या तिजोरीत ज्या प्रमाणे पैसा महत्त्वाचा असतो, त्याच प्रमाणे समाजात विचारांचा खजिना किती मोठा हे ही महत्त्वाचे आहे. त्यामुळे अशा प्रकारचे ग्रंथ महोत्सव समाजाच्या आणि राष्ट्राच्या निर्मितीसाठी महत्त्वाचे साधन आहे."

> ज्या वेळी नालंदा विद्यापीठ जाळण्यात आले, तेव्हा २१ दिवस प्रयत्न करूनही तेथील ग्रंथसंपदा नष्ट होऊ शकली नव्हती. तेथील ज्ञान नष्ट करण्याचा प्रयत्न झाला. पण ज्ञान नष्ट झाले नाही. संकुचित विचार करून हे ज्ञान इतरांपर्यंत पोहोचू दिले नाही तर ते ज्ञान संपते. ज्ञान पुढच्या पिढीकडे पोचविण्यासाठी ग्रंथ हा सर्वोत्तम मार्ग आहे.
>
> **- देवेंद्र फडणवीस,** उपमुख्यमंत्री

पुण्यातील पुस्तक महोत्सव यशस्वी झाला आहे. यापुढे असा महोत्सव नाशिक, नागपूरसह इतर शहरांतही आयोजित करावा, असेही त्यांनी सांगितले.

या उत्सवासाठी जी 'टीम' तयार झाली त्यातून हा महोत्सव यशस्वी झाला आहे. महोत्सवात राजेश पांडे यांनी सात विक्रम केले. त्यामुळे त्यांना विक्रमवीर पांडे असे म्हणायला हरकत नाही, अशी टिपणीही त्यांनी केली.

Pune, Main
23/12/2023 Page No. 5

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

**लोकमत**

# रिक्त प्राध्यापकांची पदे भरा अन्यथा एनईपी अंमलबजावणीवर बहिष्कार!

### उच्च शिक्षणमंत्रीसोबत नेट-सेट, पीएच.डी. धारकांची बैठक निष्फळ

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** प्राध्यापक पदभरती संदर्भात नेट-सेट, पीएच.डी. धारक संघर्ष समितीच्या पदाधिकारी आणि उच्च व तंत्र शिक्षणमंत्री तसेच शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांसमवेत नागपूर येथे झालेली बैठक निष्फळ ठरली आहे. एनईपी अंमलबजावणीमुळे प्राध्यापकांच्या कार्यभार निश्चित करण्याबाबत शासन स्तरावर संदिग्धता निर्माण झाली आहे. त्यामुळे प्राध्यापकांची पदे भरण्यास विलंब होण्याची शक्यता असल्याचे निदर्शनास आले. बैठकीमध्ये विविध मागण्यांसदर्भात सकारात्मक तोडगा न निघाल्याने समितीतील पदाधिकारी आक्रमक झाले आहेत. राज्यातील रिक्त प्राध्यापकांची पदे भरा, अन्यथा एनईपी अंमलबजावणीवर बहिष्कार टाकणार असल्याचे जाहीर केले.

> एनईपीमुळे प्राध्यापकांचा कमी होणारा कार्यभार आणि रिक्त असणारी प्राध्यापकांची पदे याबाबत गोंधळ उडाल्याचे चित्र आजच्या बैठकीत दिसून आले. एनईपी अंमलबजावणीबाबत असहकार पुकारण्यात येईल. राज्यशासनाविरोधात न्यायालयीन लढाई लढणार आहोत.
>
> **- डॉ. प्रमोद तांबे समन्वयक, नेट-सेट, पीएच.डी धारक संघर्ष समिती**

नेट-सेट, पीएच.डी. धारक संघर्ष समितीच्यावतीने ऐन दिवाळीत उच्च शिक्षण संचालक कार्यालयासमोर अन्नत्याग आंदोलन छेडले होते. त्यावेळी उच्च शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी मध्यस्थी करीत समितीला बैठकीचे आश्वासन दिल्याने आंदोलन तात्पुरत्या स्वरूपात स्थगित केले होते. दरम्यान, उच्च शिक्षणमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली सहायक प्राध्यापक पदभरती व इतर प्रश्नासंदर्भात दि. १८ रोजी नागपूर येथील विधान भवन येथे नेट-सेट, पीएच.डी. धारक संघर्ष समितीची बैठक पार पडली झाली. बैठकीला डॉ. प्रमोद तांबे, डॉ. परमेश्वर पौळ व प्रा. सुरेश देवढे पाटील आदी उपस्थित होते.

Pune Main
Page No. 2 Dec 23, 2023
Powered by: erelego.com

**प्रभात**

# एमबीए अभ्यासक्रमाचा पेपर फुटला

### एक पेपर रद्द करण्याची पुणे विद्यापीठावर नामुष्की

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २२** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या हिवाळी सत्र परीक्षेत शुक्रवारी एमबीए अभ्यासक्रमातील लीगल ॲस्पेक्ट ऑफ ऑफ बिझनेस या विषयाचा पेपर फुटल्याचे उघडकीस आले आहे. एका परीक्षा केंद्रातून प्रश्नपत्रिका प्रसारित झाल्याचे समाजमाध्यमाद्वारे दिसून आले आहे. त्या पार्श्वभूमीवर या विषयाची परीक्षा रद्द करण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे.

आता या विषयाची परीक्षा २६ डिसेंबरला होणार आहे, अशी माहिती विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी माहिती दिली. विद्यापीठाच्या ऑक्टोबर



२०२३ सत्राच्या परीक्षा २१ नोव्हेंबरपासून सुरू आहेत. काही अभ्यासक्रमांच्या परीक्षा या त्यांच्या सत्रपूर्तता कालावधीनुसार आयोजित केलेल्या आहेत. त्यात एमबीए अभ्यासक्रमाची परीक्षा ११ डिसेंबरपासून सुरु झालेल्या आहेत. आज (२२ डिसेंबर) प्रथम वर्ष एमबीए २०१९ रिव्हाईज, प्रथम सत्रातील १११- लीगल ॲस्पेक्ट ऑफ ऑफ बिझनेस या विषयाची प्रश्नपत्रिका एका परीक्षा केंद्रामधून प्रसारित झाल्याचे काही समाजमाध्यमांव्दारे दिसून आलेले आहे, असे परीक्षा विभागाकडून स्पष्ट करण्यात आले.

PuneCity, 23 Dec 2023, Page:005
https://epaper.dainikprabhat.com

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

**प्रभात**

# पुस्तकांच्या खरेदीची पुणेकरांना अखेरची संधी

### पुणे पुस्तक महोत्सवाचा आज समारोप

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २३** - पुणेकरांनी अलोट प्रतिसाद दिलेला, उत्तमोत्तम कार्यक्रमांची मेजवानी दिलेला, चार विश्वविक्रमांची नोंद झालेल्या पुणे पुस्तक महोत्सवाचा रविवारी (दि.२४) समारोप होणार आहे. त्यामुळे मनपसंत पुस्तकांची सवलतीच्या खरेदी करण्यासाठी रविवारी अखेरची संधी आहे.

राष्ट्रीय पुस्तक न्यासतर्फे (एनबीटी) फर्गसन महाविद्यालयाच्या मैदानावर पुणे पुस्तक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. १६ डिसेंबरपासून सुरू झालेल्या या महोत्सवात वीस भाषांतील पुस्तकांचे दोनशेहून अधिक स्टॉल आहेत. त्याशिवाय डॉ. कुमार विश्वास, लेखक विक्रम संपत, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्यासारख्या दिग्गजांच्या मुलाखती, तुकाराम दर्शन, श्रीमंत योगी, लोकरंग, फैजल काश्मिरी बँड, असे उत्तमोत्तम कार्यक्रम या महोत्सवात झाले. या महोत्सवात पुणेकरांना शहीद भगतसिंह यांची डायरी, देशाच्या घटनेची मूळ प्रत पाहण्यासाठी उपलब्ध होती. पुस्तकांसह इतर आकर्षणे असल्याने पुणेकरांनी गेले आठ दिवस पुणे पुस्तक महोत्सवाला तुडुंब प्रतिसाद दिला. जवळपास अडीच लाखांपेक्षा जास्त पुणेकरांनी महोत्सवाला भेट दिली. त्यात तरुण, शालेय विद्यार्थ्यांची संख्या लक्षणीय होती. त्यामुळेच पुस्तकांची मोठ्या प्रमाणात विक्री झाली.

**अभूतपूर्व प्रतिसाद...**

पुणे पुस्तक महोत्सवाला मिळालेला प्रतिसाद अभूतपूर्व आहे. या महोत्सवातील कार्यक्रम, पुस्तक खरेदीचा आनंद पुणेकरांनी मनसोक्त घेतला याचे मनस्वी समाधान आहे. पुस्तक प्रदर्शनातील पुस्तकांच्या विक्रीमुळे प्रकाशक, विक्रेतेही आनंदात आहेत. महोत्सवाला दिलेल्या भरभरून प्रतिसादासाठी पुणेकरांचे मनापासून आभार व्यक्त करावेसे वाटतात. पुणेकरांनी महोत्सवाला दिलेल्या प्रतिसादामुळे प्रोत्साहन मिळाले व जबाबदारीही वाढली आहे, असे मत महोत्सवाचे मुख्य संयोजक राजेश पांडे यांनी व्यक्त केले आहे.

PuneCity, 24 Dec 2023, Page:005
https://epaper.dainikprabhat.com

**लोकमत**

# दिव्यांगांच्या पुस्तक स्टॉलला प्रतिसाद

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या वतीने फर्ग्युसन महाविद्यालयात भरविलेल्या पुस्तक महोत्सवात दिव्यांगांचा स्टॉल आहे. त्यात देशभरातील दिव्यांगांच्या विविध संस्था, संघटना यांनी प्रकाशित केलेल्या पुस्तकांचा समावेश आहे.



दरम्यान, दिव्यांग कल्याण आयुक्त प्रवीण पुरी यांनी या स्टॉलला भेट दिली. तसेच दिव्यांगांच्या परिश्रमांचे त्यांनी कौतुक केले. याबद्दल संयोजकांना धन्यवाद दिले.

पुणे जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे प्रकल्प संचालक विजय कान्हेकर, समन्वयक अशोक सोळंके, समुपदेशक हरिदास शिंदे, दिव्यांग वित्त व विकास महामंडळाचे निवृत्त महाव्यवस्थापक नंदकुमार फुले तसेच विविध प्रवर्गातील दिव्यांग विद्यार्थी उपस्थित होते.

यात दिव्यांगांच्या देहराडून, दिल्ली, चेन्नई व सिकंदराबाद येथील राष्ट्रीय स्तरावरील संस्थांनी प्रसिद्ध केलेली अंधांसाठीची ब्रेल पुस्तके, कर्णबधिर व मूकबधिरांसाठी सांकेतिक भाषेची पुस्तकांचा समावेश आहे, अशी माहिती केंद्र प्रमुख हरिदास शिंदे यांनी दिली.

Hello Pune
Page No. 8 Dec 24, 2023
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

सकाळ

# भाषेच्या रक्षण-संवर्धनासाठी विद्यापीठ



मुखपृष्ठ कथा



**डॉ. सदानंद मोरे**
saptrang@esakal.com

अमरावती जिल्ह्यातील ऋधिपूर या नगरीत मराठी भाषा विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय राज्यसरकारनं घेतला. या निर्णयाच्या अंमलबजावणीचा शेवटचा टप्पा म्हणजे विद्यापीठनिर्मितीचा कायदा विधानमंडळात संमत करून घेणं. विधिमंडळात हा ठराव मांडला व तो अर्थातच संमत झाला. राज्याच्या इतिहासातील ही महत्त्वाची घटना मानावी लागेल.

पहिल्यांदा हे विद्यापीठ ऋधिपूर इथंच का, याचा खुलासा करायला हवा. महानुभाव संप्रदाय हा महाराष्ट्रातील एक महत्त्वाचा पंथ होय. त्याचे प्रवर्तक श्री चक्रधर स्वामी यांना मराठी भाषेचा उत्कट अभिमान होता. महाराष्ट्राविषयी विलक्षण आस्था होती. 'महाराष्ट्री असावी' हा त्यांचा पंथीयांना आदेशच होता. त्याचप्रमाणं धर्माच्या उपदेशाची भाषाही मराठी असली पाहिजे, असा त्यांचा कटाक्ष होता. त्यांच्या पश्चात पंथीयांनी या आदेशाचं पालन केलं हे वेगळं सांगायला नकोच. श्री चक्रधरांनी 'उत्तरापंथे गमन' केल्यानंतर आपल्या शिष्यांना ऋधिपूर इथं, त्यांना स्वतःला गुरुस्थानी असलेल्या श्रीगोविंदप्रभूंच्या आश्रयानं वास्तव्य करण्यास सांगितलं. त्यांची ही आज्ञाही शिष्यांनी पाळली. या वास्तव्याच्या काळात मराठीतील आद्य गद्य ग्रंथ लिळाचरित्राची निर्मिती झाली आणि त्यानंतरही तिथं ग्रंथनिर्मिती होतच राहिली. महानुभावांचे हे ग्रंथ मराठी भाषेसाठी भूषणावह आहेत; म्हणजेच ऋधिपूर हे मराठी ग्रंथलेखनाचं पहिलं केंद्र ठरतं. त्यामुळं मराठी भाषेचं स्वतंत्र विद्यापीठ तिथं उभारलं जाणं ही अत्यंत स्वाभाविक बाब होय. विशेष म्हणजे हे वर्ष श्रीचक्रधरांच्या जयंतीची अष्टशताब्दी आहे.

**वस्तुतः मराठीचं स्वतंत्र विद्यापीठ हवं ही मागणी फार जुनी आहे. ब्रिटिश अमदानीत एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस राजारामशास्त्री भागवत यांनी स्वतंत्र मराठी विद्यापीठाची केवळ कल्पनाच मांडली असं नाही, तर त्याचा एक प्रारूपवजा आराखडाही तयार केला होता. तेव्हा ब्रिटिशांचे राज्य असल्यामुळं बडोदा, ग्वाल्हेर आणि या मराठी संस्थानांच्या अधिपतींना त्यांनी हे महाविद्यापीठ उभारून त्या-त्या संस्थानांमध्ये त्याची केंद्र असावीत, तसंच संस्थानाचे राजे हे स्वतःच कुलगुरू असावेत, असेही त्यांनी सुचविलं होतं.**

त्यानंतर इतिहासाचार्य वि. वा. राजवाडे यांनीही मराठ्यांच्या इतिहासाचं संशोधन होण्यासाठी मराठी विद्यापीठ स्थापन करायची गरज प्रतिपादन केली. पुढील काळात जेव्हा पुणे येथे विद्यापीठ स्थापन होईल, तेव्हा तेच मराठीचे विद्यापीठ असेल अशी अनेकांची कल्पना व अपेक्षा होती. तथापि, वरीलपैकी कोणतीही कल्पना प्रत्यक्षात उतरली नाही. दरम्यानच्या काळात अनेक मान्यवरांनी त्यासाठी आग्रह धरला, संस्थांनी, संमेलनांनी तसे ठरावही केले. महानुभाव सांप्रदायिकांचीही तशी मागणी होतीच. या सर्व खटपटींना यश मिळण्याचा योग याच महिन्यात जुळून आला. राज्य सरकारनं तसा निर्णय घेऊन त्यासाठी एका समितीचं गठन केले. योगायोगानं मला त्या समितीचा अध्यक्ष म्हणून काम करण्याची संधी मिळाली व मुख्य म्हणजे कार्यक्षम सहकारीही लाभले. त्यांच्या सहकार्याने समितीनं विद्यापीठाचा अहवाल सादर करण्याचे काम युद्धपातळीवरील म्हणता येईल अशा गतीनं दोन महिन्यांमध्ये पार पाडलं. शासनाच्या उच्च शिक्षण विभागानं त्याचप्रमाणे पुणे विद्यापीठाने त्यासाठी वेळोवेळी अपेक्षित मदतही केली. या सर्वांचे मनापासून आभार.

अठराव्या शतकात मराठ्यांनी स्वपराक्रमानं संपूर्ण भारत व्यापला होता. त्यामुळं मराठी भाषेचा फैलावही भारतभर होऊ लागला होता. इतकंच काय परंतु मराठ्यांचं राज्य सर्व भारतभर होईल असा रंगही दिसत होता. तथापि, कालचक्र अशा प्रकारे फिरले, की संपूर्ण भारतच इंग्रजांच्या सत्तेखाली गेला. स्वाभाविकपणे मराठी भाषेच्या विकास व विस्तारावरही त्याचा परिणाम झाला. १९४७ मध्ये भारत देश इंग्रजांच्या जोखडातून मुक्त झाला. भाषावार प्रांतरचनेच्या सूत्रानुसार, चळवळ करून का होईना १९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. यानंतर मराठीला योग्य ती प्रतिष्ठा मिळावी, तिची अभिव्यक्तिक्षमता वाढावी, ती राजभाषा, ज्ञानभाषा व कर्मभाषा व्हावी अशी सर्वांचीच अपेक्षा होती. त्यासाठी काही प्रयत्नही झाले. तथापि, त्यांना पाहिजे तेवढे यश मिळाले नाही.

वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. इतकेच नव्हे,

पान ८ वर »

Pune, Saptarang
24/12/2023 Page No. 1

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

**प्रभात**

# दिव्यांग विद्यापीठ स्थापनेसाठी पुढचे पाऊल

### तज्ज्ञांची समिती गठित

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २३ -** राज्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याच्या हालचाली सुरू करण्यात आल्या आहेत. यासंबंधी अधिक अभ्यास करण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाने १५ तज्ज्ञांची समिती गठीत केली आहे.

माजी कुलगुरू मुरलीधर चांदेकर यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती कार्यरत असेल. यामध्ये साहस डिसॉबिलिटी रीसर्च अँण्ड केअर फाउंडेशनच्या अध्यक्ष नसीम हुरजुक, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलसचिव तुषार देशमुख, वर्षा गट्टू, कर्नल बिजूर, रुबीना पाल, डॉ. दीपक खरात, विजय कान्हेकर, दीपक घोटे, यजुर्वेंद्र महाजन, मुरलीधर कचरे, भारतीय पुनर्वसन परिषदेचा प्रतिनिधी, तंत्र शिक्षण सहसंचालक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विधी अधिकारी आदींचा सदस्य तर उच्च शिक्षण सहसंचालकांचा सदस्य सचिव म्हणून समावेश करण्यात आला आहे. ही समिती दोन महिन्यांत शासनास अहवाल सादर करणार आहे.

सध्या राज्यभरातील विद्यापीठात विविध अभ्यासक्रमांमध्ये दिव्यांग विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. पण, त्यांच्यासाठी स्वतंत्र विद्यापीठाची आवश्यकता आहे किंवा कसे याबाबत सविस्तर तपशीलासह शासनास शिफारस केली जाणार आहे. सोबतच दिव्यांग विद्यापीठ स्थापन करावयाचे झाल्यास याचे स्थान, आवश्यक जमीन, बांधकाम, जागेची आवश्यकता, विद्यापीठ स्थापनेच्या अनुषंगाने खर्चाचा अंदाज, अध्यापक, अध्यापकेत्तर कर्मचारी किती असावेत आदी शिफारशी केल्या जाणार आहेत.

PuneCity, 24 Dec 2023, Page:011
https://epaper.dainikprabhat.com

# विद्यापीठ स्तरावर निवडणूक साक्षरता

### अभ्यासक्रम तयार करण्याचा 'यूजीसी'चा आदेश



**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

देशातील निवडणूक प्रक्रियेबाबत विद्यार्थ्यांना शालेय स्तरापासूनच जागरूक करण्यासाठी केंद्रीय शिक्षण मंत्रालय आणि केंद्रीय निवडणूक आयोग यांच्यात करार करण्यात आला आहे. या करारानुसार, उच्च शिक्षणातील विद्यापीठ, महाविद्यालय स्तरावर मतदार शिक्षण आणि निवडणूक साक्षरता याविषयी अभ्यासक्रम तयार करण्याच्या सूचना विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) दिल्या आहेत.

**■ विद्यापीठांना सूचना**

विद्यार्थ्यांना लोकशाही, मतदान आदी प्रक्रिया समजावून सांगण्यासाठी अभ्यासक्रमाची निर्मिती करणे, त्यासाठीचे श्रेयांक निश्चित करणे, वयाची १७ वर्षे पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांचा मतदार नोंदणीसाठी संस्था स्तरावरील आराखडा तयार करण्याबाबत सांगितले आहे. 'एआयएसएसई', 'यूडायस'ला जोडणे, संबंधित विद्यार्थ्यांची मतदार नोंदणी करणे, अध्यापनासाठी शिक्षक-प्राध्यापकांना ऑनलाइन किंवा ऑफलाइन पद्धतीने प्रशिक्षित करणे, विद्यार्थ्यांमध्ये मतदान आणि त्याबाबतच्या प्रक्रियेबाबत जागरूक करण्यासाठी अभियान राबवण्याच्या सूचना 'यूजीसी'चे सचिव प्रा. मनीष जोशी यांनी परिपत्रकाद्वारे विद्यापीठे, महाविद्यालयांना दिल्या आहेत.

**■ काय माहिती देणार?**

निवडणूक प्रक्रियेमध्ये, विद्यार्थ्यांना इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र, भारतीय निवडणूक आयोगाचे मोबाइल उपयोजन, बॅलेट युनिट, मतदान विभाग, नियंत्रण विभाग, पीठासीन अधिकारी, दोन मतदान अधिकारी, पोलिंग एजंट, मतदान कप्पे आदींबाबतची माहिती दिली जाईल, असे प्रा. जोशी यांनी सांगितले आहे.

**■ शैक्षणिक संस्थांत 'मॉक पोल'**

निवडणूक प्रक्रियेबाबत विद्यार्थ्यांना जागरूक करण्याचा उद्देश आहे. शैक्षणिक संस्थांमध्ये अभिरूप निवडणूक (मॉक पोल) घेतली जाईल. २५ जानेवारीला 'राष्ट्रीय मतदार दिन' साजरा केला जाईल, असे प्रा. जोशी यांनी स्पष्ट केले

Maharashtra Times 24.12.2023

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

लोकमत

# बायफोकल अभ्यासक्रम, विषयांच्या नावांवर आक्षेप

## शिक्षक कृती समितीची कौशल्यविकास मंत्र्यांकडे धाव

प्रशांत बिडवे
लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : एनईपीतील नॅशनल स्किल क्वॉलिफिकेशन फ्रेमवर्क (एनएसक्यूएफ) नुसार राज्यातील बायफोकल द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमांच्या विविध विषयांची नावे तसेच अभ्यासक्रमाचे स्वरूप यावर बायफोकल अभ्यासक्रम कृती समितीने आक्षेप घेतला आहे.

या बदलामुळे अकरावीला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा गोंधळ उडण्याची शक्यता आहे. त्यामुळे अभ्यासक्रमात बदल करून विषयांची नावे पूर्ववत ठेवावीत, अशी मागणी कृती समितीतर्फे करण्यात आली आहे. तसेच यासंदर्भात कौशल्य विकास व रोजगारमंत्री मंगलप्रभात लोढा यांना निवेदन दिले आहे.

कोठारी आयोगाच्या शिफारसीनुसार राज्यात १९७८-७९ पासून अधिक दोन स्तरावर (इयत्ता ११ वी १२ वी साठी) द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम आजवर सुरळीतपणे सुरू आहे. राज्यात सुमारे १९०० कॉलेजमध्ये हा अभ्यासक्रम सुरू आहे. विशेषत: अभियांत्रिकी क्षेत्रात करिअर करणाऱ्या विद्यार्थ्यांकडून अभ्यासक्रमांना चांगला प्रतिसाद मिळतो. मात्र, राज्य शासनाने नवीन शैक्षणिक धोरणानुसार व्यवसाय अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून नॅशनल स्किल क्वॉलिफिकेशन फ्रेमवर्कच्या (एनएसक्यूएफ) अभ्यासक्रमासोबत सुसंगत करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, विद्यार्थ्यांसह शिक्षक व शिक्षण संस्था या सर्व घटकांचा विचार करता त्यात अनेक त्रुटी दिसून येत असल्याचे समितीच्या वतीने सांगण्यात आले.

### काय आहेत समितीचे आक्षेप ?

- एनएसक्यूएफनुसार विषयांचे बदललेले नाव व अभ्यासक्रमाच्या स्वरूपामुळे अकरावीला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा गोंधळ उडण्याची शक्यता आहे. जुनीच नावे कायम ठेवावीत.
- नवीन अभ्यासक्रमात एका पेपरसाठी तीनशे तास दिले आहेत आणि प्रत्येक विद्यार्थ्याला २ पेपर शिकायचे आहेत म्हणजे सहाशे तास लागतील. त्यामुळे पीसीएम ग्रुपसोबत इतके तास देणे महाविद्यालयासह विद्यार्थ्यांना कठीण जाऊ शकते.

### काय आहेत मागण्या ?

- अभ्यासक्रम आणि परीक्षा पद्धती निश्चित करणाऱ्या समितीत बायफोकल अभ्यासक्रम शिकवणाऱ्या तज्ज्ञ व अनुभवी शिक्षकांचा समावेश करावा. यासह इंग्रजी विषय आणि कम्युनिकेशन स्किल्स पेपर १ आणि पेपर २ च्या अभ्यासक्रमातील पुनरावृत्ती दूर करावी.
- राज्यातील ९५ टक्के संस्थांमध्ये बायफोकल अभ्यासक्रम विनाअनुदानित तत्त्वावर सुरु आहेत, नवीन आराखड्यानुसार द्विलक्षी अभ्यासक्रम राबवण्यासाठी जी मानके निश्चित केली आहेत, त्यामुळे संस्थांवरील आर्थिक बोजा वाढू शकतो.

बायफोकल अभ्यासक्रमात केलेल्या बदलांबाबत कृती समितीतर्फे वेळोवेळी राज्य शासनाला मागण्यांचे निवेदन दिले आहे. विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने राज्य शासनाने अभ्यासक्रमातील त्रुटी दूर करून त्याची अंमलबजावणी करावी.

**- प्रा. व्ही. बी. शाळू, मुख्य समन्वयक, द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम कृती समिती**

### विषयांची जुनी आणि बदललेली नावे :

इलेक्ट्रॉनिक्स या विषयाला वॉशिंग मशीन रिपेरिंग असे नाव दिले आहे, तसेच मॅकेनिकल मेंटेनन्सला प्लंबर, तर जनरल सिव्हिल इंजिनिअरिंग विषयाला सर्वसाधारण गवंडी आणि रंगारी अशी नावे दिली आहेत.

Pune Main
Page No. 2 Dec 26, 2023
Powered by: erelego.com

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# उच्च शिक्षण संस्थांमध्ये २७ क्षेत्रांतील अल्पमुदतीचे कौशल्य प्रशिक्षण अभ्यासक्रम

लोकसत्ता प्रतिनिधी

### २० जानेवारीपर्यंत मुदत

यूजीसीने अल्प मुदतीचे कौशल्य अभ्यासक्रम राबवण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचनांचा मसुदा संकेतस्थळावर प्रसिद्ध केला आहे. या मसुद्यावर २० जानेवारीपर्यंत हरकती-सूचना नोंदवता येणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

पुणे : विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) उच्च शैक्षणिक संस्थांमध्ये कौशल्याधारित शिक्षणासाठी अल्प मुदतीचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत. त्यानुसार अल्प मुदतीचे अभ्यासक्रम राबवण्यासाठी उच्च शिक्षण संस्थांनी कौशल्य विकास केंद्र, तज्ज्ञांची सल्लागार समिती स्थापन करणे आवश्यक असून, कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक्स, योग विज्ञान, डिजिटल विपणन असे एकूण २७ क्षेत्रांशी संबंधित अभ्यासक्रम राबवता येणार आहेत.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये शिक्षण प्रक्रिया सर्वसमावेशक करण्यावर भर देण्यात आला आहे. त्यामुळे उच्च शिक्षण संस्थांमध्ये प्रात्यक्षिकावर आधारित अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना शिकता येण्यासाठी अल्प मुदतीच्या अभ्यासक्रमांची व्यवस्था करून कौशल्य प्रशिक्षण, कौशल्य अद्ययावतीकरण करण्याची कल्पना आहे. कार्यप्रशिक्षणाद्वारे शिक्षण संस्था आणि उद्योग यांच्यात सेतू निर्माण करण्यात येणार आहे. बारावी उत्तीर्ण असलेल्यांना या अभ्यासक्रमाला प्रवेश घेता येणार आहे.

अल्प मुदतीच्या अभ्यासक्रमांचा कालावधी तीन ते सहा महिन्यांच्या दरम्यान असेल. त्यात प्रामुख्याने व्यावहारिक शिक्षणावर लक्ष केंद्रित केले जाईल.

कौशल्य घटकामध्ये प्रयोगशाळा, कार्यशाळा आणि उद्योग परिसरात व्यावहारिक प्रशिक्षण समाविष्ट असेल. अल्प मुदतीच्या अभ्यासक्रमासाठी प्रत्येक गटात जास्तीत जास्त ६० विद्यार्थ्यांना प्रवेश देता येईल. अभ्यासक्रमाची मागणी आणि योग्य पायाभूत सुविधा, शिक्षकांच्या उपलब्धतेनुसार उच्च शिक्षण संस्था कोणत्याही अभ्यासक्रमाचे अनेक गट सुरू करू शकतात. तसेच स्थानिक गरजा, मागणीनुसार अभ्यासक्रम वाढवू शकतात. अभ्यासक्रमासाठी उच्च शिक्षण संस्था नजीकच्या उद्योगांच्या सुविधांचा वापर करू शकतात. त्यासाठी सामंजस्य करार करणे आवश्यक आहे. अभ्यासक्रमांसाठी उच्च शिक्षण संस्था शिक्षक, प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिक्स, उद्योगातील तज्ज्ञांची नियुक्ती करू शकतात. अल्प मुदत अभ्यासक्रमांमध्ये किमान १२ श्रेयांक, तर जास्तीत जास्त ३० श्रेयांकांचे अभ्यासक्रम राबवता येतील. त्यात वर्गकार्याच्या १५ तासांसाठी एक श्रेयांक, तर प्रात्यक्षिकांच्या तीस तासांसाठी एक श्रेयांक अशी रचना असेल. या अभ्यासक्रमांमध्ये ३० विद्यार्थ्यांमध्ये एक शिक्षक असणे आवश्यक आहे. विद्या परिषद आणि सक्षम प्राधिकरणामार्फत अभ्यासक्रमाची मान्यता प्रक्रिया पूर्ण करणे गरजेचे आहे. अभ्यासक्रमांचे शुल्क आणि शुल्क परतावा धोरण उच्च शिक्षण संस्थांनी स्वत:च्या संकेतस्थळावर जाहीर करणे आवश्यक आहे, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

26/12/2023 | Pune | Page : 05
Source : https://epaper.loksatta.com

## *News Paper Clippings During December 2023*

### *Section: Education*

लोकमत

# पीएच.डी. करून 'दिवे' लावायला 'तेल' हवे!

**उच्च शिक्षणाचे उद्दिष्ट केवळ विद्यार्थ्याला वैज्ञानिक ज्ञान देणे नाही, ज्ञानाची निर्मिती करणेदेखील आहे. पीएच.डी. शिष्यवृत्तींची संख्या वाढली पाहिजे!**



डॉ. सुखदेव थोरात
माजी अध्यक्ष,
विद्यापीठ अनुदान आयोग

**मागासवर्गीय** विद्यार्थ्यांकरिता पीएच.डी. शिष्यवृत्तीच्या मागणीला उत्तर देताना काही दिवसांपूर्वी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री म्हणाले, 'शिष्यवृत्ती घेऊन काय करणार? पीएच.डी. करून काय दिवे लावणार आहेत ही मुले?' - हे विधान बोलण्याच्या ओघात केले गेले असे म्हटले, तरी उपमुख्यमंत्र्यांनी महत्त्वाचा प्रश्न उपस्थित केला. त्यावर चर्चा गरजेची आहे. शिक्षक/विद्यार्थ्यांनी संशोधन करणे का आवश्यक आहे? पीएच.डी.च्या माध्यमातून संशोधनासाठी शिष्यवृत्तीची का गरज आहे?

उच्च शिक्षणाचे उद्दिष्ट केवळ विद्यार्थ्याला वैज्ञानिक ज्ञान देणे नाही तर नवीन ज्ञानाची निर्मिती करणेदेखील आहे. जगात बहुतांश संशोधन हे विद्यापीठ आणि महाविद्यालयातील शिक्षकांकडून केले जाते. शिक्षकांनी केलेल्या संशोधनामुळे अध्यापनाच्या गुणवत्तेत व शिकवण्यामध्ये सुधारणा होते. म्हणूनच केंद्र सरकारप्रमाणेच महाराष्ट्र सरकारनेसुद्धा विद्यार्थ्यांना संशोधन / शिक्षणाला प्रवृत्त करण्यासाठी पीएच.डी. शिष्यवृत्ती देण्याचे धोरण स्वीकारले आहे. अनुसूचित जाती / जमाती/ मागास जातीसाठी वेगळी शिष्यवृत्ती देण्याची सुविधा आहे.

तथापि, मागच्या ६० वर्षांपासून महाराष्ट्रात पीएच.डी. शिष्यवृत्तीच्या संबंधात दोन समस्या जाणवतात. एकूण पीएच.डी. शिष्यवृत्तींची संख्या अपुरी, विद्यार्थ्यांचे प्रमाण कमी झाले आहे. अनुसूचित जाती/ जमातीमध्ये इतरांच्या तुलनेमध्ये पीएच.डी.धारकांचे प्रमाण कमी आहे.

अलीकडील आकडेवारीवरून असे स्पष्ट दिसते की, २०२० मध्ये महाराष्ट्रातील उच्च शिक्षण संस्थांमध्ये नोंदणी केलेल्या एकूण विद्यार्थ्यांपैकी केवळ फक्त ०.२८ टक्के विद्यार्थीच पीएच.डी.साठी नोंदणीकृत होते. हे प्रमाण इतर राज्यांच्या तुलनेत खूपच कमी आहे. याबाबतीत महाराष्ट्र देशात १९ व्या क्रमांकावर आहे. यामध्ये उत्तराखंड (१.१%), मिझोराम (२.६%), नागालँड (१.३३%), मेघालय (१.०३%), केरळ व कर्नाटक (०.६९%), जम्मू- काश्मीर (१.०१%), दिल्ली (१.३०%), अरुणाचल प्रदेश (१.९०%) आणि आसाम (०.९४%) यांचे प्रमाण पाहा! पीएच.डी.धारकांची संख्या कमी असल्यामुळे व प्राध्यापकाच्या नियुक्तीकरिता पीएच.डी. अनिवार्य असल्यामुळे विद्यापीठातील सहायक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व प्राध्यापक यांची संख्या कमी आहे.

२०१८ मध्ये राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांमध्ये एकूण मंजूर पदांपैकी सुमारे ३७ टक्के शिक्षकांच्या जागा रिक्त होत्या, ही टक्केवारी सहायक प्राध्यापकासाठी ३७%, असोसिएट प्राध्यापकासाठी ५०% आहे, तर




प्राध्यापकासाठी १४% आहे. म्हणून पीएच.डी. शिष्यवृत्तीची संख्या वाढविणे आवश्यक आहे. त्याचबरोबर अनुसूचित जाती / जमातींच्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्तीसुद्धा अधिक वाढवण्याची आवश्यकता आहे. २०१८ मध्ये पदव्युत्तर व पीएच.डी. असलेल्या अनुसूचित जाती/जमातीत विद्यार्थ्यांची टक्केवारी ०.६९% आहे. जी ओबीसी (१.३३%), उच्च जाती (२.२%) आणि राज्य सरासरी (२%) च्या तुलनेत कमीच आहे. याचा परिणाम, विद्यापीठामधील अनुसूचित जाती/जमातींच्या नियुक्तीवर झाला आहे.

अलीकडील आदेशात महाराष्ट्र सरकारने ज्याची उत्पन्न मर्यादा प्रतिवर्ष ८ लाख रु. आहे अशा अनुसूचित जातीसाठी २०० आणि अनुसूचित जमातींसाठी ४५ पीएच.डी. शिष्यवृत्तींची मर्यादा निश्चित केली आहे. या धोरणामुळे अनुसूचित जाती / जमातींमध्ये पीएच.डी.धारक विद्यार्थ्यांचे प्रमाण फारसे वाढणार नाही. अनुसूचित जाती/जमातीबाबत प्रश्न उत्पन्नाचा नसून प्रतिनिधित्वाचा मुद्दा आहे. त्यांना उत्पन्नाची अट लावणे बरोबर होणार नाही. उत्पन्नाची अट जी मराठा/ओबीसी ह्यांना लावली आहे ती योग्य आहे. कारण, ह्या दोन वर्गांमध्ये उच्च उत्पन्न गटाचे प्रमाण (क्रिमिलेअर) हे जास्त आहे. २०१८-१९ मध्ये महाराष्ट्रातील ग्रामीण भागामध्ये उच्च जाती व ओबीसी शेतकऱ्यांचे प्रमाण अनुक्रमे ५५% व ४३.५% होते. तसेच, शहरामध्ये उद्योगधंदा करणाऱ्यांचे प्रमाण ओबीसी व उच्च जातीमध्ये ३२ ते ३५ % होते. ह्याउलट अनुसूचित जाती/जमातीमध्ये ग्रामीण भागात अनुसूचित जातीमध्ये शेतकऱ्यांचे प्रमाण फक्त १९ % होते व शहरामध्ये उद्योगधंदा करणाऱ्या अनुसूचित जातीचे प्रमाण १७ % होते. उत्पन्नाच्या साधनांच्या अभावामुळे मजुरी करणाऱ्यांचे प्रमाण अनुसूचित जातीमध्ये ४२ % व अनुसूचित जमातीमध्ये ४८% होते. , आर्थिकदृष्ट्या सक्षम (क्रिमिलेअर) असणाऱ्यांचे प्रमाण मराठा/ओबीसीच्या तुलनेत अनुसूचित जातीमध्ये खूपच कमी आहे. कमकुवत आर्थिक स्थिती व जातीय भेदभाव ह्यामुळे गळतीचे प्रमाण उच्च जाती/ ओबीसीच्या (११ते १६%) तुलनेमध्ये दलित व आदिवासी (२० ते २५%) जास्त आहे.

कमी उत्पन्न व जातीभेद याचा प्रभावी व चौफेर परिणाम लक्षात घेता अनुसूचित जाती / जमातीतील सर्व 'गुणवंत' विद्यार्थ्यांना उत्पन्न मर्यादेशिवाय शिष्यवृत्ती देणे योग्य होईल.

८ लाख उत्पन्नाची अट घातल्यामुळे अनुसूचित जाती/जमातींना केंद्र सरकारकडून दिल्या जाणाऱ्या परदेशी शिष्यवृत्तीसाठी पुरेसे विद्यार्थी मिळतच नाहीत. त्या अनुभवाची येथे पुनरावृत्ती होऊ नये शिक्षण ही मूलभूत गरज आहे आणि सरकारच्या पुढे असलेल्या आर्थिक अडचणींचा आधार घेऊन त्याकडे दुर्लक्ष करणे उचित नव्हे!

thorat1949@gmail.com

Pune Main
Page No. 6 Dec 26, 2023
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

# मूल्यांकनात आघाडी

## ९० टक्के महाविद्यालयांचे 'नॅक'कडे अर्ज दाखल

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी सलंग्न ९० टक्क्यांपेक्षा अधिक महाविद्यालयांनी राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्विकृती परिषदेच्या (नॅक) मूल्यांकनासाठी अर्ज दाखल केले आहेत. काही तांत्रिक कारणांमुळे मोजक्या महाविद्यालयांना अर्ज दाखल करता आलेले नाही, अशी माहिती विद्यापीठाकडून देण्यात आली आहे. याचा फायदा विद्यापीठाला स्वतःच्या मूल्यांकनासाठी होणार आहे.

राज्यातील महाविद्यालयांनी 'नॅक'चे मूल्यांकन करण्याबाबत उच्च शिक्षण संचालनालयाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी सूचना दिल्या होत्या. त्याचप्रमाणे मूल्यांकन न करणाऱ्या महाविद्यालयांना, नव्या विद्यार्थ्यांना प्रवेश देता येणार नाही, अशी भूमिका घेतली होती. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनीही मूल्यांकन करण्याच्या सूचना महाविद्यालयांना दिल्या होत्या. त्यामुळे स्थापना होऊन पाच वर्षे पूर्ण झालेल्या महाविद्यालयांनी 'नॅक' मूल्यांकन करण्यासाठी धाव घेतली आहे. या मूल्यांकनानंतर महाविद्यालयांना त्यांची शैक्षणिक गुणवत्ता आणि पायाभूत सुविधांच्या आधारे श्रेणी ठरवल्या जातात. पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये आणि संशोधन केंद्रांची संख्या साधारण ८१४ आहेत. त्यापैकी पाच वर्षे पूर्ण झालेल्या ७५०पेक्षा अधिक महाविद्यालयांनी मूल्यांकनासाठी ऑनलाइन अर्ज भरले आहेत. यातील काही महाविद्यालयांची अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. या महाविद्यालयांचे प्रत्यक्ष मूल्यांकन जानेवारी किंवा फेब्रुवारी महिन्यांत समितीकडून केले जाणार आहे.

**"मूल्यांकनासाठी पात्र महाविद्यालयांपैकी साधारण ७५०पेक्षा अधिक महाविद्यालये आणि संशोधन केंद्रांनी नॅक मूल्यांकनासाठी अर्ज दाखल केले आहेत. काही महाविद्यालये नॅक प्रक्रियेत अर्ज दाखल करण्याच्या प्रक्रियेत असू शकतात.**

– डॉ. पराग काळकर,
प्र-कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

### 'आम्हाला वेठीला धरू नका'

दर वेळी नॅक मूल्यांकनाची प्रक्रिया पार पाडण्यासाठी महाविद्यालय प्रशासन विद्यार्थी आणि प्राध्यापकांना वेठीस धरते, अशी तक्रार आहे. मात्र, तसे यंदा होऊ नये, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

### तंबीमुळे मूल्यांकनाला गती

पुणे विद्यापीठाच्या प्रणालीत नॅक मूल्यांकनाची माहिती महाविद्यालयांना भरावी लागले. मात्र, साधारण सप्टेंबर महिन्यात ४० ते ४२ महाविद्यालयांनी एकदाही नॅक मूल्यांकन केलेले नव्हते, तर ५० हून अधिक महाविद्यालयांनी पुनर्मूल्यांकनाची प्रक्रिया पूर्ण केलेली नव्हती. त्यामुळे संबंधित महाविद्यालयांना कारणे नोटीस बजावण्यात आली होती. त्याचप्रमाणे अशा महाविद्यालयांची यादी वेबसाइटवर प्रसिद्ध करण्याची तंबी दिली होती. त्यानंतर महाविद्यालयांच्या मूल्यांकनाला गती मिळाली.



**८१४**
पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये व संशोधन केंद्र

**७५०**
'नॅक' मूल्यांकनासाठी अर्ज केलेली महाविद्यालये

### राज्यात मूल्यांनाची स्थिती गंभीर

राज्यातील खासगी विनाअनुदानित महाविद्यालयांपैकी अनेक महाविद्यालयांनी मूल्यांकन करण्याकडे दुर्लक्ष केले आहे. राज्यात विनाअनुदानित महाविद्यालयांची संख्या २१४१ आहे. त्यापैकी केवळ २५७ महाविद्यालयांचे मूल्यांकन झाले असून, आणखी काही महाविद्यालये प्रक्रियेत आहेत. मात्र, ही संख्या फारच तोकडी आहे.

Maharashtra Times 27.12.2023

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

# विद्यापीठात कार्यक्रम घेण्यासाठी परवानगी हवी

## विद्यार्थी संघटनांसाठी 'एसओपी' तयार

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात काही दिवसांपूर्वी विविध संघटनांच्या वादातून तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. त्यानंतर आता विद्यापीठाने विद्यार्थी संघटनांसाठी कार्यक्रम, उपक्रम, आंदोलनांसाठीची कार्यपद्धती निश्चित केली असून, विद्यार्थी संघटनांना उपक्रम, कार्यक्रमांसाठी किमान पाच दिवस आधी पूर्वपरवानगी, निश्चित केलेल्या जागेतच कार्यक्रम, उपक्रम आयोजित करण्याचे बंधन घालण्यात आले असून, विद्यापीठाचे नुकसान न होण्याबाबतचे लेखी हमीपत्रही द्यावे लागणार आहे. त्यामुळे पूर्वपरवानगीशिवाय संघटनांना आता विद्यापीठात काहीही करता येणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

गेल्या महिन्यात विद्यापीठात विविध संघटनांमध्ये वाद होऊन हाणामारीची घटना घडली होती. त्यानंतर विद्यापीठात परस्परांच्या विरोधात मोर्चे काढण्यात आले. त्यामुळे तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. विद्यापीठाच्या विनंतीनंतर पोलिसांनी विद्यापीठाच्या परिसरात जमावबंदी लागू केली होती. तसेच विद्यापीठ, पोलिसांनी संघटनांबरोबर बैठक घेऊन चर्चा केली. त्यात संघटनांसाठी कार्यपद्धती तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला. या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने कार्यपद्धती तयार करून त्याचा मसुदा जाहीर केला आहे.

विद्यापीठाने तयार केलेल्या कार्यपद्धतीच्या मसुद्यानुसार विद्यापीठाच्या आवारात कोणतेही उपक्रम, आंदोलन, कार्यक्रम आयोजित करण्यासाठी विद्यापीठ प्रशासन आणि पोलिसांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. पूर्वपरवानगीचा अर्ज किमान पाच दिवस आधी द्यावा लागणार आहे. पूर्वपरवानगीचा अर्ज दिला आणि त्याची पोहोच घेतली म्हणजे परवानगी दिली असे ग्राह्य धरले जाणार नाही. परवानगीसाठीचा अर्ज ऐनवेळी किंवा उशिरा दिल्यास परवानगी दिली जाणार नाही, तरीही कार्यक्रम, उपक्रम, आंदोलन केल्यास व त्यावेळी काही अनुचित प्रकार घडल्यास त्याची जबाबदारी संबंधित संयोजकांची असेल.

कोणत्याही कार्यक्रम, उपक्रमासाठी विद्यापीठातील संविधान स्मारकाशेजारील मोकळी जागा निश्चित करून देण्याचा निर्णय विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतला आहे. पोलिस प्रशासनाकडून परवानगी मिळाल्यानंतर त्याची प्रत विद्यापीठाच्या सुरक्षा विभागाला देणे बंधनकारक आहे. परवानगीशिवाय कार्यक्रम, उपक्रम केल्यास, नियमांचे उल्लंघन केल्यास कायदेशीर कारवाई केली जाणार आहे. कार्यक्रम, उपक्रमावेळी विद्यापीठाच्या स्थावर आणि जंगम मालमत्तेचे नुकसान होणार नाही याबाबतचे लेखी हमीपत्रही द्यावे लागणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

### संघटनांबरोबर ८ जानेवारीला बैठक...

विद्यापीठाने जाहीर केल्याप्रमाणे विद्यार्थी संघटनांसाठीची कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. संघटनांचे अध्यक्ष व सचिव यांच्याशी चर्चा करून त्यास अंतिम स्वरूप दिले जाणार आहे. त्यासाठीची बैठक ८ जानेवारी रोजी दुपारी चार वाजता विद्यापीठात होणार असल्याचे विद्यापीठ प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

Pune Edition
Dec 27, 2023 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# विद्यापीठाच्या तंबीनंतर नॅक मूल्यांकनाला गती

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न ९० टक्क्यांपेक्षा अधिक महाविद्यालयांनी राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्विकृती परिषदेच्या (नॅक) मूल्यांकनासाठी अर्ज दाखल केले आहे. काही महाविद्यालयांनी तांत्रिक कारणास्तव अर्ज दाखल केलेले नाहीत. मात्र, विद्यापीठाने तंबी दिल्यानंतर नॅक मूल्यांकनाला गती मिळाल्याचे दिसून येत आहे.

उच्च शिक्षण संचालनालयाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी राज्यातील महाविद्यालयांना नॅक मूल्यांकन प्रक्रिया करण्याच्या सूचना दिल्या होत्या. तसेच नॅक मूल्यांकन न केल्यास प्रवेश प्रक्रिया रोखण्याचा, विद्यापीठ संलग्नता रद्द करण्याचा इशारा देण्यात आला होता. तसेच कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे आदेश विद्यापीठांना देण्यात आले होते. त्यानुसार सप्टेंबरमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांपैकी ४० ते ४२ महाविद्यालयांनी एकदाही नॅक मूल्यांकन केलेले नव्हते, तर ५०पेक्षा जास्त महाविद्यालयांनी पुनर्मूल्यांकन केलेले नव्हते. त्यामुळे संबंधित महाविद्यालयांना नोटीस बजावण्यात आली.

या पार्श्वभूमीवर स्थापना होऊन पाच वर्षे पूर्ण झालेल्या महाविद्यालयांनी नॅक मूल्यांकनासाठीची प्रक्रिया सुरू केली आहे.

या मूल्यांकनानंतर महाविद्यालयांची शैक्षणिक गुणवत्ता आणि पायाभूत सुविधांच्या आधारे श्रेणी ठरवली जाते. विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये आणि संशोधन केंद्रे सुमारे ८१४ आहेत. त्यापैकी पाच वर्षे पूर्ण झालेल्या ७५० पेक्षा अधिक महाविद्यालयांनी नॅक प्रक्रियेसाठी ऑनलाइन अर्ज दाखल केले.

> "सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न होऊन पाच वर्षांपेक्षा अधिक कालावधी झालेली महाविद्यालये ही नॅक मूल्यांकनासाठी पात्र होतात. पात्र महाविद्यालयांपैकी साधारण ७५० पेक्षा अधिक महाविद्यालये आणि संशोधन केंद्रांनी नॅक मूल्यांकनासाठी अर्ज दाखल केले आहेत. काही महाविद्यालये नॅक प्रक्रियेत अर्ज दाखल करण्याच्या प्रक्रियेत असू शकतात.
>
> - **डॉ. पराग काळकर**, प्र-कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

27/12/2023 | Pune | Page : 03
Source : https://epaper.loksatta.com

# *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

**प्रभात**

# एम.फिल.चे प्रवेश बंदचा निर्णय

### प्रक्रिया झालेल्या विद्यापीठांसमोर अडचण

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २७ -** देशात एम.फिल. (मास्टर्स ऑफ फिलॉसॉफी) पदवीला मान्यता नसल्याचे नमूद करत विद्यापीठांनी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी या अभ्यासक्रमाचे प्रवेश थांबवण्याचे आदेश विद्यापीठ अनुदान आयोगाने (युजीसी) दिले. यूजीसीच्या आदेशामुळे आतापर्यंत प्रवेश प्रक्रिया राबवलेल्या विद्यापीठांसमोर मोठी अडचण निर्माण होणार आहे.

यूजीसीचे सचिव मनीष जोशी यांनी या संदर्भातील परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिद्ध केले आहे. युजीसीने एमफिल ही पदवी बंद केली असली तरी काही विद्यापीठे अजूनही एम.फिलसाठी नवीन अर्ज मागवत आहेत,.परंतु, ही पदवी बंद करण्यात आली आहे. त्यामुळे या अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ शकते. त्यामुळे २०२३-२४ या शैक्षणिक वर्षासाठी एम.फिल अभ्यासक्रमाचे प्रवेश बंद करण्यासाठी तातडीने पावले उचलावीत,असे निर्देशही विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

**एम.फिल.चे प्रवेश थांबवावेत...**

एम.फिल. या पदवीला देशात मान्यता नाही. यूजीसी (किमान मानके आणि पीएच. डी. देण्यासाठीची प्रक्रिया) अधिनियम २०२२ तील नियम १४ मध्ये उच्च शिक्षण संस्थांनी एम.फिल. अभ्यासक्रम न राबवण्याबाबत स्पष्टपणे नमूद केलेले आहे. यूजीसी अधिनियम २०२२ बाबतचे राजपत्रही प्रसिद्ध करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर विद्यापीठांनी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी एम. फिल. अभ्यासक्रमाचे प्रवेश तातडीने थांबवावे, असे परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांनीही एम.फिल. अभ्यासक्रमाला प्रवेश न घेण्याचे आवाहन यूजीसीकडून करण्यात आले आहे.

PuneCity, 28 Dec 2023, Page:005
https://epaper.dainikprabhat.com

---

**लोकमत**

# एम.फिल पदवी मान्यताप्राप्त नाही, कोणीही प्रवेश घेऊ नका : यूजीसी

### विद्यार्थ्यांना केले सावध, विद्यापीठांना दिला इशारा; २०२२ पर्यंतचे प्रवेश वैध

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** मास्टर ऑफ फिलॉसॉफी (एम.फिल.) ही मान्यताप्राप्त पदवी नाही. त्यामुळे एम.फिल अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यापासून विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) विद्यार्थ्यांना सावध केले आहे. तसेच हा अभ्यासक्रम सुरू करणाऱ्या व त्याला प्रवेश देणाऱ्या विद्यापीठांना यूजीसीने कडक इशारा दिला आहे.

एम.फिल. अभ्यासक्रमासाठी काही विद्यापीठांनी प्रवेश प्रक्रिया सुरू केल्याचे निदर्शनास आले आहे. एम.फिल. ही मान्यताप्राप्त पदवी नाही. यूजीसीचा पीएच.डी. पदवीसाठी किमान मानके आणि प्रक्रिया विनियम, २०२२च्या नियम क्रमांक १४मध्ये म्हटले आहे की, उच्च शिक्षणसंस्थांना एम.फिल. अभ्यासक्रम सुरू करण्यास मनाई करण्यात आली आहे. ही माहिती यूजीसीचे सचिव मनीष जोशी यांनी दिली.

२०२३-२४ या शैक्षणिक वर्षात एम.फिल. अभ्यासक्रमासाठी सुरू केलेली प्रवेशप्रक्रिया तत्काळ बंद करावी, असे आदेश यूजीसीने विद्यापीठांना दिले आहेत. मात्र २०२२ पर्यंतचे प्रवेश वैध असणार आहेत.

### एम.फिल हरवून बसला स्वत:ची शान

किमान मानक आणि पीएच.डी. पदवी पुरस्कार प्रक्रिया नियम, २०२२चा मसुदा यूजीसीच्या वेबसाइटवर प्रकाशित करण्यात आला होता. पुढील शैक्षणिक वर्षापासून एम.फिल बंद केले जाईल, असे त्यात सूचित करण्यात आले होते. तरीही काही विद्यापीठांनी एम.फिल अभ्यासक्रम सुरु ठेवला असून, त्यामुळे त्यांना यूजीसीने इशारा दिला आहे. एम.फिल अभ्यासक्रम स्वत:ची शान हरवून बसला आहे. महाविद्यालये, विद्यापीठात प्राध्यापक होण्यासाठी एम.फिल अभ्यासक्रम पूर्ण करणे आवश्यक असल्याची अट १९९०च्या दशकापासून होती.




एम.फिल हा पदव्युत्तर अभ्यासक्रम म्हणून ओळखला जात असला, तरी तो डॉक्टरेटशी जास्त नाते सांगणारा आहे. पदव्युत्तर शिक्षण घेतलेले विद्यार्थी एम.फिल अभ्यासक्रम बंद झाल्यानंतर पीएच.डी.ला प्रवेश घेऊ शकतात. त्याद्वारे त्यांना शिक्षण क्षेत्रात किंवा संशोधन क्षेत्रात करिअर करता येऊ शकते.

### एम.फिल व पीएच.डी.मध्ये फरक काय?

- मास्टर ऑफ फिलॉसॉफी म्हणजे एम.फिल हा प्रगत पदव्युत्तर अभ्यासक्रम गणला गेला होता. त्यात विद्यार्थ्याने संशोधन करण्याला महत्त्व आहे. एम.फिल केलेला विद्यार्थी पीएच.डी. करण्यास योग्य असल्याचे मानले जात होते. पदवी किंवा पदविका अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर एम.फिल करता येते.
- एम.फीलचा अभ्यासक्रम एक ते दोन वर्षे कालावधीत पूर्ण करता येत असे, तर पीएच.डीला ३ ते ५ वर्षे किंवा त्याहून अधिक कालावधी लागतो. एम.फीलसाठी सादर करावयाचा शोधनिबंध पीएच.डी.च्या शोधनिबंधापेक्षा तुलनेने कमी असतो.

### शिक्षण धोरणात काय म्हटले आहे?

१. उच्चशिक्षण देणाऱ्या संस्था विविध पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी लवचिक धोरण ठेवू शकतात. ज्यांनी दोन वर्षांचा पदवी अभ्यासक्रम पूर्ण केला असेल, त्यांना दोन वर्षे कालावधीच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमामध्ये दुसरे वर्ष हे पूर्णपणे संशोधनासाठीच असायला हवे.

२. **ज्यांनी चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम पूर्ण केला असेल, त्यांना एक वर्षाचा पदव्युत्तर अभ्यासक्रम असणे आवश्यक आहे.**

३. शक्य झाल्यास पाच वर्षे कालावधीचा पदवी/पदविका अभ्यासक्रम सुरु करता येईल. पीएच.डी. करायची असल्यास त्यासाठी विद्यार्थ्याने पदव्युत्तर अभ्यासक्रम किंवा संशोधनासहित चार वर्षे पदवी अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा. असे झाल्यास एम.फिल अभ्यासक्रम रद्द करावा.

Pune Main
Page No. 3 Dec 28, 2023
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

पुढारी

# एम.फिल. रद्द

## 'यूजीसी'चा निर्णय; अभ्यासक्रम बंद करण्याचे निर्देश

**नवी दिल्ली/पुणे : पुढारी वृत्तसेवा**

विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) मास्टर ऑफ फिलॉसॉफी अर्थात एम.फिल. पदवी रद्द करण्याचा निर्णय बुधवारी घेतला. एम.फिल.साठी आगामी वर्षापासून विद्यार्थ्यांना प्रवेश न देण्याचे निर्देशही महाविद्यालयांना आयोगाने दिले आहेत.

'यूजीसी'चे सचिव मनीष जोशी यांनी एम.फिल. बंद करण्यासंदर्भात परिपत्रक जारी केले. देशभरातील महाविद्यालयांनाही यासंदर्भात नोटीस जारी केली. परिपत्रकात म्हटले आहे की, एम.फिल. ही मान्यताप्राप्त पदवी नाही. पीएच.डी.साठी तयारी म्हणून काही विद्यापीठांत एक-दोन वर्षांचा एम.फिल.चा अभ्यासक्रम शिकविला जात असल्याचे प्रकार निदर्शनास आले आहेत. एम.फिल.ची मान्यताच रद्द करण्यात आल्याने महाविद्यालयांनी यापुढे प्रवेश देऊ नये. विद्यार्थ्यांनीही एम.फिल.साठी प्रवेश घेऊ नये.

मानव्य शाखा, विज्ञान, वाणिज्य, मानसशास्त्र, व्यवस्थापन आदी शाखांमध्ये एम.फिल.साठी प्रवेश दिला जात आहे. २०२० मध्येच एम.फिल.चे प्रवेश थांबविण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यामुळे महाविद्यालयांनी पूर्वलक्षी प्रभावानेही एम.फिल.चे प्रवेश बंद करावेत, असेही निर्देश परिपत्रकाद्वारे देण्यात आले आहेत.

- **पूर्वलक्षी प्रभावाने महाविद्यालयांनी त्वरित अंमलबजावणी करावी**
- **विद्यार्थ्यांनी प्रवेश घेऊ नये**
- **आयोगाकडून परिपत्रक जारी**

### पीएच.डी.च्या पोटनियमानुसार निर्णय

'यूजीसी'च्या पोटनियमातील कलम १४ (अधिनियम, २०२२) नुसार एम.फिल.च्या प्रवेशावर बंदी घालण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पीएच.डी.ची गुणवत्ता आणि पीएच.डी. पदवी प्रदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. संशोधनासाठी फक्त पीएच.डी. पदवीला मान्यता असणार आहे, असेही परिपत्रकात म्हटले आहे.

Pune Edition
Dec 28, 2023 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

लोकमत

# एम.फिल मान्यताप्राप्त नाही, प्रवेश घेऊ नका : यूजीसी

## विद्यार्थ्यांना केले सावध, २०२२ पर्यंतचे प्रवेश वैध

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली** : मास्टर ऑफ फिलॉसॉफी (एम.फिल.) ही मान्यताप्राप्त पदवी नाही. त्यामुळे एम.फिल अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यापासून विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) विद्यार्थ्यांना सावध केले आहे. तसेच हा अभ्यासक्रम सुरू करणाऱ्या व त्याला प्रवेश देणाऱ्या विद्यापीठांना यूजीसीने कडक इशारा दिला आहे. तसेच हे प्रवेश तातडीने थांबवावे, असा आदेशही दिला आहे.

एम.फिल. अभ्यासक्रमासाठी काही विद्यापीठांनी प्रवेश प्रक्रिया सुरू केल्याचे निदर्शनास आले आहे. एम.फिल. ही मान्यताप्राप्त पदवी नाही. यूजीसीचा पीएच.डी. पदवीसाठी किमान मानके आणि प्रक्रिया विनियम, २०२२च्या नियम क्रमांक १४मध्ये म्हटले आहे की, उच्च शिक्षणसंस्थांना एम.फिल. अभ्यासक्रम सुरू करण्यास मनाई करण्यात आली आहे. ही माहिती यूजीसीचे सचिव मनीष जोशी यांनी दिली.

२०२३-२४ या शैक्षणिक वर्षात एम.फिल. अभ्यासक्रमासाठी सुरू केलेली प्रवेशप्रक्रिया तत्काळ बंद करावी, असे आदेश यूजीसीने विद्यापीठांना दिले आहेत. मात्र २०२२ पर्यंतचे प्रवेश वैध असणार आहेत.




**एम.फिल हा पदव्युत्तर अभ्यासक्रम म्हणून ओळखला जात असला, तरी तो डॉक्टरेटशी जास्त नाते सांगणारा आहे. पदव्युत्तर शिक्षण घेतलेले विद्यार्थी एम.फिल अभ्यासक्रम बंद झाल्यानंतर पीएच.डी.ला प्रवेश घेऊ शकतात. त्याद्वारे त्यांना शिक्षण क्षेत्रात किंवा संशोधन क्षेत्रात करिअर करता येऊ शकते.**

### एम.फिल हरवून बसला स्वत:ची शान

- किमान मानक आणि पीएच.डी. पदवी पुरस्कार प्रक्रिया नियम, २०२२चा मसुदा यूजीसीच्या वेबसाइटवर प्रकाशित करण्यात आला होता. पुढील शैक्षणिक वर्षापासून एम.फिल बंद केले जाईल, असे त्यात सूचित करण्यात आले होते.
- तरीही काही विद्यापीठांनी एम.फिल अभ्यासक्रम सुरू ठेवला असून, त्यामुळे त्यांना यूजीसीने इशारा दिला आहे. एम.फिल अभ्यासक्रम स्वत:ची शान हरवून बसला आहे.
- महाविद्यालये, विद्यापीठात प्राध्यापक होण्यासाठी एम.फिल अभ्यासक्रम पूर्ण करणे आवश्यक असल्याची अट १९९०च्या दशकापासून होती.

### एम.फिल व पीएच.डी.मध्ये फरक काय?

- मास्टर ऑफ फिलॉसॉफी म्हणजे एम.फिल हा प्रगत पदव्युत्तर अभ्यासक्रम गणला गेला होता. त्यात विद्यार्थ्याने संशोधन करण्याला महत्त्व आहे. एम.फिल केलेला विद्यार्थी पीएच.डी. करण्यास योग्य असल्याचे मानले जात होते. पदवी किंवा पदविका अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर एम.फिल करता येते.
- एम.फीलचा अभ्यासक्रम एक ते दोन वर्षे कालावधीत पूर्ण करता येत असे, तर पीएच.डीला ३ ते ५ वर्षे किंवा त्याहून अधिक कालावधी लागतो. एम. फीलसाठी सादर करावयाचा शोधनिबंध पीएच. डी. पेक्षा तुलनेने कमी असतो.

### शिक्षण धोरणात काय म्हटले आहे?

१ उच्चशिक्षण देणाऱ्या संस्था विविध पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी लवचिक धोरण ठेवू शकतात. ज्यांनी दोन वर्षांचा पदवी अभ्यासक्रम पूर्ण केला असेल, त्यांना दोन वर्षे कालावधीच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमामध्ये दुसरे वर्ष हे पूर्णपणे संशोधनासाठीच असायला हवे.

२ **ज्यांनी चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम पूर्ण केला असेल, त्यांना एक वर्षाचा पदव्युत्तर अभ्यासक्रम असणे आवश्यक आहे.**

३ शक्य झाल्यास पाच वर्षे कालावधीचा पदवी/पदविका अभ्यासक्रम सुरू करता येईल. पीएच.डी. करायची असल्यास विद्यार्थ्याने पदव्युत्तर अभ्यासक्रम किंवा संशोधनासहित चार वर्षे पदवी अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा. असे झाल्यास एम.फिल अभ्यासक्रम रद्द करावा.

Mumbai Main
Page No. 1 Dec 28, 2023
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

लोकमत

# बायफोकल अभ्यासक्रमाबाबत लवकरच तज्ज्ञांची समिती

## 'लोकमत'मध्ये वृत्त प्रसिद्ध होताच मंत्र्यांनी तातडीने घेतली बैठक

**लोकमत इम्पॅक्ट**

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** बायफोकल अभ्यासक्रमाबाबत शिक्षकांनी घेतलेला आक्षेप आणि पाठपुराव्याबाबतचे वृत्त 'लोकमत'ने प्रसिद्ध करताच तातडीने सूत्रे हलली. समितीने उपस्थित केलेल्या प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी लवकरच एक तज्ज्ञांची समिती स्थापन केली जाईल आणि त्यांनी दिलेल्या अहवालानुसार पुढील निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिले, अशी माहिती समितीतील सदस्यांनी दिली.

महाराष्ट्र राज्य द्विलक्ष्यी व्यवसाय अभ्यासक्रम समितीतील सदस्यांना तातडीने बैठकीसाठी मुंबईत पाचारण करण्यात आले होते. दरम्यान, नॅशनल स्किल क्वॉलिफिकेशन फ्रेमवर्क (एनएसक्यूएफ) नुसार बायफोकल द्विलक्ष्यी व्यवसाय अभ्यासक्रम बदलण्यात येणार आहे. मात्र, त्यातील विषयांची नावे, अभ्यासक्रमाचे स्वरूप याविषयी शिक्षकांनी आक्षेप घेतला होता. त्याबाबत मागील सहा महिन्यांपासून अनेकदा निवेदने देऊनही शासन दरबारी दखल घेतली जात नव्हती. याबाबत मंगळवारी (दि. २६) 'लोकमत'मध्ये वृत्त प्रसिद्ध झाले होते. त्याची दखल घेत तातडीने बैठक घेण्यात आली. समितीतील सदस्यांनी कौशल्य, रोजगार व उद्योजकता मंत्री मंगलप्रभात लोढा यांची बुधवारी (दि. २७) भेट घेत अभ्यासक्रम आणि प्रश्नांसंदर्भात सविस्तर चर्चा केली.



महाराष्ट्र राज्य द्विलक्ष्यी व्यवसाय अभ्यासक्रम समितीच्या शिष्टमंडळाने मंत्री मंगलप्रभात लोढा यांची भेट घेतली.

### संभाव्य दुष्परिणामांवर चर्चा

समितीचे सदस्य प्रा. डॉ. ए. पी. कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली प्रा. आर. डी. सुपेकर, प्रा. सुधीर गाडे, प्रा. आकाराम चौधरी, प्रा. धनंजय भिडे, प्रा. रुपाली काळे, प्रा. पद्मजा तांबोळी यांच्या शिष्टमंडळाने बायफोकल जुना अभ्यासक्रम एनएसक्यूएफमध्ये रुपांतरित केल्यानंतर इयत्ता अकरावीला प्रवेश घेताना विद्यार्थ्यांचा गोंधळ होऊ शकतो, असे सांगितले. अभ्यासक्रमामुळे विद्यार्थी, शिक्षक आणि संस्थाचालक यांच्यावर होणारे संभाव्य दुष्परिणाम यावर चर्चा केली. यावेळी विविध मागण्यांचे निवेदनही देण्यात आले.

Pune Main
Page No. 8 Dec 28, 2023
Powered by: erelego.com

## News Paper Clippings During December 2023

## Section: Education

सकाळ

# जगातील पहिला 'एआय' नियमन कायदा

**कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) वापराला नियमनाच्या आणि कायद्याच्या चौकटीचे कुंपण घालून सामाजिक स्वास्थ्य आणि संकेत जपण्याच्या दृष्टीने युरोपीय महासंघाने पावले उचलली आहेत. त्यासाठीच्या कायद्याचा मसुदा तयार केला आहे. त्यावर पुढील वर्षाच्या सुरवातीला शिक्कामोर्तब होणार आहे. त्याविषयी.**

**डॉ. अमेय पांगारकर**

युरोपीय महासंघाने ९ डिसेंबर रोजी तब्बल ३७ तासांच्या वाटाघाटीनंतर जगातील पहिला कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर आणि नियमनाबाबत कायदा येत असल्याची माहिती दिली. कृत्रिम प्रज्ञेवर आधारित अनेक साधने व त्यांच्या सर्रास होणारा वापर याबाबतचा हा कायदा ऐतिहासिक मानला जातो. युरोपीय महासंघाचे कमिशनर थियरी ब्रेटन आणि महासंघाच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डर लेयन यांनी याबाबत 'एक्स' (ट्विटर) पोस्टद्वारे माहिती दिली. सध्या या कायद्याबाबत युरोपीय महासंघामधील सर्व देशांमध्ये हा करार झाला आहे. २०२४च्या सुरुवातीला युरोपीय संसदेत या प्रस्तावावर मतदान होणार आहे. साधारण २०२५ पर्यंत हा कायदा लागू होण्याची शक्यता वर्तवली जाते. जगभरात 'एआय'च्या सुरक्षित वापराबद्दल चर्चा चालू असताना युरोपीय महासंघाने असा कायदा प्रस्तावित करून समस्त जगासमोर आदर्श निर्माण केला आहे. अमेरिका, चीन, ऑस्ट्रेलिया इ. अशा अनेक देशांमध्ये 'एआय'च्या वापराबद्दल कायदा आणण्याच्या चर्चा चालू आहेत. युरोपीय महासंघाच्या या निर्णयामुळे जगभरातील इतर देशांना प्रेरणा मिळेल, हे नक्कीच! 'एआय'चे संभाव्य धोके लक्षात घेता या पावलाचे स्वागत होताना दिसत आहे. यामुळे 'एआय'च्या गतीवर परिणाम होईल, हे देखील बोलले जाते.

**या कायद्याच्या मसुद्यातील ठळक मुद्दे :** युरोपीय महासंघाच्या नव्या 'एआय' कायद्यानुसार 'एआय'च्या वापरावर अनेक प्रकारे निर्बंध येणार आहेत. लोकांच्या सुरक्षिततेला, अधिकाराला ठेच न पोचवता 'एआय'चा वापर तंत्रज्ञानाचा विकास करण्यासाठी व्हावा, हे या कायद्यामागचे प्रमुख कारण आहे, असे युरोपीय महासंघातर्फे स्पष्ट करण्यात आले आहे.

- फेशियल रेकग्निशनचा वापर असलेल्या बऱ्याच 'एआय' ॲप्सवर आता निर्बंध घालण्यात येणार आहेत. मानवी वर्तनावर ताबा मिळवण्यासाठी 'एआय'चा वापर आटोक्यात राहावा, यासाठी नियम करण्यात येतील.
- जनरेटिव्ह 'एआय'च्या वापरावर निर्बंध नसणार आहेत. पण ही अशी ॲप्लिकेशन बनवणाऱ्या कंपन्यांना वैधानिक इशारा देणं गरजेचं असणार आहे. त्याचबरोबर या अशा 'एआय' साधनांनी डेटा (विदा) कुठून संग्रहित केला किंवा कुठला डेटा वापरून ते ॲप्लिकेशनचे प्रशिक्षण झाले, हे प्रामुख्याने सांगणे बंधनकारक असणार आहे.
- काही 'एआय' ॲप्लिकेशनवर सरळसोट बंदी घालण्यात येणार असून, काही ॲप्सवरील डेटा साठवणीकडेही काटेकोरपणे लक्ष देण्यात येणार आहे.



## उल्लंघन करणाऱ्यांना दंड

उच्चतम जोखमीच्या क्षेत्रांमध्ये 'एआय'चा वापर प्रतिबंधित प्रमाणात होईल. पण स्वयंचलित वाहनांमधील तसेच ऑटोमोबाईल क्षेत्रातील 'एआय'च्या वापराबद्दल काहीच वाच्यता न झाल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. सुरक्षिततेच्या कारणास्तव दहशतवादी हल्ला, दंगल, धार्मिक अथवा सामाजिक ताणतणावाच्या प्रसंगी संशयीत गुन्हेगारांवर नजर ठेवण्यासाठी किंवा हरवलेल्या व्यक्तींचा शोध घेण्याकरिता 'एआय'प्रणित 'रियल टाईम बायोमेट्रिक सर्व्हिलन्स'चा वापर करण्यात येणार आहे. सीसीटीव्ही कॅमेरा, इमेज रेकग्निशन, डीपलर्निंगमार्फत हे काम केले जाणार आहे.

नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कंपन्यांना कठोर दंड आकारले जाणार आहेत. वार्षिक उलाढालीच्या २% ते ७% रक्कम दंड म्हणून आकारण्यात येणार आहे. तंत्रज्ञान क्षेत्रात ठोस पावले उचलण्यात युरोपीय महासंघ नेहमीच अग्रस्थानी असतो. लोकांच्या गोपनीय माहितीची तडजोड न होऊ देता विकसनशील तंत्रज्ञानाची सांगड घालणे याकडे युरोपीय महासंघाचे लक्ष असणार आहे. नागरिकांची गोपनियता प्रामुख्याने जपण्यासाठी खंबीर पावले उचलली जात आहेत.

नुकतीच ब्रिटनमध्ये 'एआय' सुरक्षितता या विषयावर जागतिक परिषद भरवण्यात आली होती. भारतासह अनेक देशांनी या परिषदेत उपस्थिती नोंदवली. वाढत्या प्रमाणात होणाऱ्या 'एआय'च्या वापरामुळे निर्माण होणाऱ्या धोक्यांचा विचार करण्यात आला आणि चिंता देखील व्यक्त केली. पण दुर्दैवाने या चर्चेत फलित असे काही मिळाले नाही. मागच्या आठवड्यात नवी दिल्ली येथे 'ग्लोबल पार्टनरशिप ऑन आर्टिफिशियल इंटेलिजन्स'ची शिखर परिषद पार पडली. त्यात 'एआय' निगडित अनेक विषयांवर सखोल चर्चा झाली, पण युरोपिय महासंघासारखा कायदा किंवा त्याबाबतची तरतूद असे परिषदेच्या दरम्यान फार काही झाले नाही. कायदे हवेत याबाबत सर्वांचं एकमत होते, पण नक्की काय; असे ठोस काही चर्चेअंती गवसले नाही.

## 'एआय फोर ऑल' उपक्रम

आजमितीला 'एआय'च्या बुद्धीवर, वेगावर अंकुश ठेवण्याची गरज आहे. त्याकरता कायद्यांशिवाय गत्यंतर नाही, याची जाणीव देखील आहे. विविध देश, त्यांची सरकारे या विषयाचा सखोल अभ्यास करीत आहेत. पण 'एआय'च्या वापराबाबत कायद्याची चौकट निर्माण करण्यासाठी मसुदा बनवणारे युरोपीय महासंघ एकमेवच.

भारताची 'एआय' नियमनाबद्दलची भूमिका ही सुरुवातीपासून सावधगिरीची आहे. तंत्रज्ञानाचा वापर सर्वदूर व्हावा या विचाराने 'एआय फोर ऑल'सारख्या उपक्रमांची नांदी आपल्या इथे झाली. शिक्षण, उद्योग, आरोग्य, समाजव्यवस्था, वाहतूक नियंत्रण इ. अनेक विषयांमध्ये 'एआय'चा वापर आपण स्वीकारला आहेच. अनेक सरकारी डिजिटल प्लॅटफॉर्मवर देखील 'एआय'चा वाढता वापर आपल्याला दिसून येतो. पण याबरोबरच संभाव्य धोके लक्षात घेता 'डीपफेक'सारख्या तंत्रज्ञानावर ताबा ठेवण्यासाठी उपाययोजना करण्याची पावलेही आपल्या सरकारने उचलली आहेत. नव्या युगात तंत्रज्ञानाचे बोट धरून विकासाच्या रस्त्यावर सुसाट वेगाने पाऊल टाकताना ''नजर हटी दुर्घटना घटी''ची पाटी चुकवून चालणार नाही, हेच खरे.

Pune, Main
28/12/2023 Page No. 7

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

लोकमत

# पीएच.डी. फेलोशिपसाठी पुन्हा परीक्षा

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने सीईटी चाळणी परीक्षा १० जानेवारीला

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : बार्टी, सारथी, महाज्योती संस्थांतर्फे देण्यात येणाऱ्या पीएच.डी. अधिछात्रवृत्तीसाठी सीईटी चाळणी परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेत जुन्या सेट परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेतील प्रश्न कॉपी झाल्याचा प्रकार उघडकीस आल्याच्या पार्श्वभूमीवर रविवारी घेण्यात आलेली सीईटी परीक्षा रद्द करण्यात आली आहे. तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, सेट विभागाच्या वतीने पुन्हा दि. १० जानेवारी रोजी चाळणी परीक्षेचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सेट विभागाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सेट विभागाच्या वतीने रविवारी, दि. २४ डिसेंबर रोजी राज्यातील पुणे, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर आणि नागपूर या शहरात चाळणी परीक्षेचे आयोजन केले होते. फेलोशिप चाळणी परीक्षेतील प्रश्नपत्रिकेत २०१९ मधील सेट परीक्षेतील प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची पुनरावृत्ती झाल्याबाबत उमेदवारांच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्या पार्श्वभूमीवर पुणे विद्यापीठात मंगळवारी, दि. २६ रोजी आढावा बैठक घेण्यात आली.

या बैठकीस विद्यापीठातील वरिष्ठ अधिकारी तसेच बार्टी, महाज्योती व सारथी संस्थेने वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. विद्यार्थ्यांची मागणी लक्षात घेत चाळणी परीक्षेचे पुन्हा आयोजन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

त्यानुसार बुधवार, दि. १० जानेवारी रोजी परीक्षेचे आयोजन केले जाणार आहे. या चाळणी परीक्षेबाबत सविस्तर माहिती व वेळापत्रक बार्टी, सारथी, महाज्योती संस्थांच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल, अशी माहिती विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने देण्यात आली.



### चाळणी परीक्षा, सेट दोन्ही परीक्षा भिन्न

- राज्यशासनाने पीएच.डी. अधिछात्रवृत्तीसाठी चाळणी परीक्षा तत्काळ आयोजित करावी, अशी सूचना केली होती. पीएच.डी. फेलोशिप चाळणी परीक्षा व सेट या दोन्ही परीक्षा भिन्न कारणांसाठी आयोजित केल्या जातात.
- त्यामुळे प्रश्नांची पुनरावृत्ती झाल्याने कोणत्याही विद्यार्थ्यास फायदा अथवा नुकसान संभवत नाही.
- तसेच चाळणी परीक्षा अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पार पडली आहे व त्यामध्ये कोणताही अनुचित प्रकार घडलेला नसल्याचे सेट विभागाच्या वतीने सांगण्यात आले.

Hello Pune
Page No. 4 Dec 28, 2023
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

***News Paper Clippings During December 2023***

***Section: Education***

सकाळ

शिक्षण विभागाचा पुण्यात पुढाकार : कायदे, कागदपत्रे आदींचा संग्रह

# संदर्भ ग्रंथालय साकारणार



मीनाक्षी गुरव : सकाळ वृत्तसेवा

"राज्य सरकारला धोरण आखताना, आराखडे तयार करताना अनेक विषयांवरील संदर्भ हवे असतात. त्या दृष्टिकोनातून राज्य सरकारचे 'थिंक टँक' बनेल, असे संदर्भ ग्रंथालय विकसित करण्यात येत आहे. पुण्यातील नव्या उच्च शिक्षण संचालनालयाच्या कार्यालयात हे ग्रंथालय उभारले जात आहे. त्यासाठी जवळपास १० लाख रुपयांची पुस्तके खरेदी करण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे. या संदर्भ ग्रंथालयासाठी निवडक पुस्तके, संदर्भ ग्रंथ याची यादी तयार केली असून, लवकरच पुस्तकांची खरेदी केली जाईल.

— **डॉ. शैलेंद्र देवळाणकर,** उच्च शिक्षण संचालक

**पुणे, ता. २८ :** उच्च शिक्षणातील कोणताही संदर्भ किंवा सरकारी निर्णय असो, अथवा काही कायदेविषयक माहिती हवी असेल, तर आता यासंदर्भातील सर्व माहिती एकाच छताखाली मिळण्याची सोय लवकरच उपलब्ध होणार आहे. होय, राज्याच्या उच्च शिक्षण संचालनालयातर्फे पुण्यातील नव्या कार्यालयात 'संदर्भ ग्रंथालय' उभारण्यात येत आहे. या ग्रंथालयामुळे उच्च शिक्षणातील संदर्भ, माहिती मिळू शकणार आहे.

उच्च शिक्षण संचालनालय मॉडेल कॉलनी येथील नवीन इमारतीत ऑक्टोबरमध्ये स्थलांतरित करण्यात आले. आता या नव्या इमारतीतील कॉन्फरन्स रूमचे संदर्भ ग्रंथालयात रूपांतर करण्यात येणार आहे. त्यासाठी आवश्यक असणारी प्रक्रिया सध्या सुरू आहे. या संदर्भ ग्रंथालयात उच्च शिक्षणविषयक सर्व कायदे, सरकारी परवानगी संदर्भातील कागदपत्रे, अध्यादेश, विविध टप्प्यांवर आखण्यात आलेले धोरणे, विविध विषयातील आराखडे याचा संग्रह करण्यात येणार आहे. जेणेकरून आगामी काळात राज्य सरकारला उच्च शिक्षणासंदर्भात नियोजन करताना, धोरण आखताना या संदर्भाचा 'थिंक टँक' म्हणून वापर करता येईल, अशी माहिती राज्याचे उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी दिली आहे.

हे संदर्भ ग्रंथालय नियोजनकर्त्यांसह, प्रशासकीय अधिकारी, संशोधक यांच्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. आगामी काळात या ग्रंथालयाला संशोधन केंद्र म्हणून परवानगी मिळू शकेल का, यासाठी प्रयत्न सुरू आहेत, असेही डॉ. देवळाणकर यांनी स्पष्ट केले.

Sakal 29.12.2023

## *News Paper Clippings During December 2023*

## *Section: Education*

# पुस्तकांमध्ये रमायला हवे

**सोनाली कुलकर्णी**

माझ्या आई-बाबांना वाचनाची आवड होती. त्यामुळे मलाही वैविध्यपूर्ण पुस्तके वाचायची गोडी लागली. माझे दोन्ही भाऊ संदीपदादा आणि संदेश हे इंग्रजी माध्यमात शिकायचे. त्यांच्या मराठीच्या पुस्तकांबद्दल मला कुतूहल असायचे. संदीपदादामुळे पु. ल. देशपांडे वाचून काढले. तो इंजिनीअर असल्यामुळे त्याने आणलेल्या गोडेल बाख आणि इशरचे इंजिनीअरिंग डायनॅमिक्सचे पुस्तक वाचले. दादामुळेच 'जोनॅथन लिव्हिंगस्टन सीगल' हे इंग्रजी पुस्तक प्रथम वाचले. त्याच्यामुळे मी 'मृत्युंजय'ही वाचले. कॉलेजच्या सुरुवातीला मित्रमैत्रिणींमुळे लिंडा गुडमनचे जन्मतारीख आणि त्यावरून स्वभाव असे १२ राशींचे पुस्तक वाचले. संदेशमुळे 'राजा शिवछत्रपती', 'दुर्दम्य', 'एक होता कार्व्हर' अशी पुस्तके वाचली.

बाबांमुळे मला कविता, गाणी वाचायची सवय लागली. माझ्या मराठीच्या प्राध्यापिका डॉ. माधवी वैद्य यांच्यामुळे आरती प्रभू, कुसुमाग्रज, संत तुकाराम, बा. भ. बोरकर अशा कितीतरी कवींपर्यंत मी पोहोचले. माझा नवरा नचिकेतमुळे किरण नगरकर यांचे 'ककल्ड' हे पुस्तक वाचले. या पुस्तकाचा रेखा सबनीस यांनी केलेला 'प्रतिस्पर्धी' हा अनुवादही सुंदर आहे. आल्हाद गोडबोलेंमुळे मी अनेक पुस्तके वाचली; त्यापैकी महत्त्वाचे पुस्तक म्हणजे 'पाडस'! 'बारोमास', 'नदीष्ट' या कादंबऱ्यासुद्धा मला अतिशय प्रिय आहेत.

माझे सर पंडित सत्यदेव दुबे आणि मित्र अभिनेता मकरंद देशपांडे यांच्यामुळे हिंदी पुस्तकांमध्ये रस वाटू लागला. अमृता पटवर्धन या माझ्या कॉलेजच्या मैत्रिणीने मला शांता शेळके यांचे 'चौघीजणी' हे अनुवादित पुस्तक दिले होते. अमृतामुळेच मी पु. शि. रेगे यांचे 'सावित्री' वाचले. सिद्धी देशपांडे, मंदार-शिल्पा पटवर्धन, समीर जोशी, सचिन कुंडलकर, आमिर खान अशा अनेक मित्रमैत्रिणींनी कितीतरी वाचनीय पुस्तके भेट दिली आहेत.

विजय तेंडुलकर, मिलिंद बोकील, महेश एलकुंचवार, आशा बगे, दिलीप प्रभावळकर, गौरी देशपांडे, सानिया, प्रिया तेंडुलकर, मेघना पेठे, मोनिका गजेंद्रगडकर, वृंदा भार्गवे, मुकुंद टाकसाळे, मंगला गोडबोले, प्रणव सखदेव, किशोर कदम, हृषिकेश गुप्ते या मंडळींचे लेखन मला आवडते. विजय तेंडुलकर यांनी मला निर्भीडपणे वाचायला शिकवले. लहान मुलांना रस वाटेल अशी सुंदर पुस्तके लिहिणाऱ्या माधुरी पुरंदरे यांचे नाव घेतल्याशिवाय वाचनाचा विषयच पूर्ण होणार नाही.

पुस्तकांनी मला तरलपणा शिकवला. पुस्तकांसोबत मी मोठी होत गेले. कधी कधी एखादा अवघड सिनेमा, भूमिका करायची असेल त्या वेळी मी माझ्यासोबत एखादे ओळखीचे पुस्तक नेते; म्हणजे मी त्या पुस्तकात रमू शकते हा मला दिलासा मिळतो. मी खूप वर्षे एकटी राहिले आहे. या काळात पुस्तकांनी माझी चांगली सोबत केली. 'वाचा' असे फक्त सांगण्यापेक्षा प्रत्यक्ष कृती करणे महत्त्वाचे आहे. एखाद्या कुटुंबात रात्री जेवण झाल्यावर एकमेकांना पुस्तक वाचण्याबाबत सुचवणे आणि प्रत्यक्षात तसे घडणे हे आवश्यक आहे. वाचत असलेल्या पुस्तकांवरून होणारी चर्चा खूप काही देऊन जाते. आपल्या सर्वांवर असलेला ताण कमी करण्यासाठी, निःश्वास टाकण्यासाठी आणि नवा श्वास घेण्यासाठी पुस्तकांमध्ये रमायला हवे. कारण पुस्तकात आपल्या कल्पनाशक्तीला वाव असतो. त्यातला अवकाश, विश्वाची निर्मिती आपण आपल्या मनानुसार करू शकतो. आपल्या मनाला वाटणारा जो विरंगुळा आहे ते विश्व निर्माण करण्याची ताकद त्या पुस्तकांमध्ये असते. तेवढा अवसर आपण आपल्या मनाला दिलाच पाहिजे.

(लेखिका प्रख्यात अभिनेत्री आहेत.)



**#वाचालतरचवाचाल**

**#Thepowerofreading**

**नवीन पिढी वाचनाकडे आकृष्ट व्हावी यासाठी 'महाराष्ट्र टाइम्स'तर्फे आगळा उपक्रम.**



# छापलेला कागद होतो शहाणा

**प्रतिमा इंगोले**

छापलेला कागद शहाणा होतो, असे म्हटले जायचे. अगदी प्राचीन काळापासून वाचनाचे महत्त्व आपण ऐकत आलो आहोत. ही परंपरा समजून घ्यायला हवी. 'वाचाल तर वाचाल' म्हटले तरी आपण सारे जण वाचतोच असे नाही. अन्नाइतकेच वाचन आवश्यक आहे.

लहान मुलाची याविषयीची कथा सर्वांना माहिती आहे. ती प्रेरणादायी देखील आहे. पुस्तकामुळे मस्तक सशक्त होते, हे ब्रीदवाक्यही ऐकले असेलच. वाचनाचे महत्त्व आजच रुढ झाले असे नाही. प्राचीनकाळी लोक प्रचलित ग्रंथाची पारायणे करीत असत. व्रतवैकल्ये करीत तेव्हा कथा ऐकत होते. ज्यांना वाचता येत नाही ते भक्तिभावाने ऐकत होते. समारंभात लोकगीते गात होते. लोककलावंत कथा सांगत होते. जात्यावर दळताना स्त्रिया ओव्या गात होत्या. यातून वाचनाची भूक भागवली जात होती.

लोक गाण्यातून गुरुजींचा जयजयकार करीत होते. 'गुरुजी आले घरा, हाती नारेल पान, गुरुजी शिकवते ग्यान..' अशी गाण्यातील बाई आवर्जून म्हणत होती. जुन्या काळी भूजपत्रावर लेखन करीत. ते गुरुजी वाचायला शिकवीत. स्त्रियांना वाचनाची आवड होती. म्हणूनच त्या सुखदुःखाचे वार झेलत होत्या. वाचनाचा पुरस्कार करीत होत्या. आपला दीर वाचतो हे मोठ्या अभिमानाने सांगत होत्या. 'पोथी पुस्तकाचा छंद मले भारी, आपल्या यठी पोथी लावा ज्ञानेश्वरी' असे म्हणत होत्या.

'पोथी पुस्तकानं भरली वसरी, शायनी देर वाचते ज्ञानेश्वरी' असा लौकिक सांगत त्या वाचायच्या. पुस्तक वाचायला हवे. वाचणारा शहाणा असतो हेच त्या सांगत होत्या आणि ते खरे होते. वाचणारा खरेच शहाणा असतो. कारण त्यातून तो विचार करायला शिकतो. बहिणाबाईंची कविताही हेच सांगते. त्या म्हणतात. जे छापून आले तेच ज्ञान महत्त्वाचे, बाकी शून्य. 'अरे छापीसनी आलं, मानसाले समजलं। छापीसनी जे राहिलं, देवालेच उमजलं'. म्हणजे पुस्तकात आहे ते महत्त्वाचे. इतर सर्व व्यर्थ. म्हणजे पुस्तक वाचणे गरजेचे असते. छापलेला कागद शहाणा होतो. याचाच अर्थ हा कागद वाचणारा पण शहाणा होतो. ही आपली परंपरा आहे. पण आता तिचाच विसर पडला आहे. वाचणारा माणूस समृद्ध होतो.

तो स्वतःला तर बदलवून टाकतो, पण समाजालाही बदलवून टाकतो. याचे महत्त्वाचे उदाहरण डॉ. बाबासाहेबांचे आहे. आमच्या विदर्भातील गाडगेबाबा वाचनाचा पुरस्कार करीत. 'ताट मोडा पण लेकराले शिकवा' असे म्हणत. आता उलटे झाले आहे. लोक दहा रुपयांचे पान खाऊन थुंकतील; पण आपल्या लेकराले पाच रुपयाचं पुस्तक घेऊन देणार नाहीत. याचा अनुभव मी घेतला आहे. एका बालमेळाव्यात पालक आपल्या मुलांना पाच वा दहा रुपयांचे पुस्तक मुलाने मागितले तरीही घेऊन देत नव्हते; पण चाळीस रुपये खर्चून मुलींच्या हातावर मेंदी काढून देत होते. मुलांना पन्नास रुपये खर्चून गाडीत बसवत होते. पुस्तकं तुमचे मित्र बनतात. ती माणुसकी शिकवतात. दुसऱ्याकडे माणूस म्हणून बघण्याची दृष्टी देतात. ती तुमच्या मनातलं बोलू लागतात. तुमचा मेंदू सक्रिय करतात. म्हणूनच वाचायला हवे. खरेतर आमच्या महाराष्ट्रात समृद्ध वाचन परंपरा आहे. लोकसाहित्याचे वैभव सर्वांपर्यंत पोहोचवायचे असेल तर वाचन चळवळीखेरीज पर्याय नाही. ही जाणीव, शहाणीव दृढ व्हावी ही अपेक्षा.

(लेखिका ज्येष्ठ वऱ्हाडी साहित्यिक आणि लोकसाहित्याच्या अभ्यासक आहेत.)

Maharashtra Times 31.12.2023

## *News Paper Clippings During December 2023*

### *Section: Career*

लोकमत

लोकमत
पुणे, गुरुवार, दि. ७ डिसेंबर २०२३ ७

# एज्यु कनेक्ट

epaper.lokmat.com

सीए अर्थात चार्टर्ड अकाउंटंट हा करिअरचा एक उत्तम पर्याय मानला जातो. पदवीनंतर इतर पोस्ट ग्रॅज्युएशन कोर्सेसच्या तुलनेत हा सगळ्यात कमी खर्चिक आणि फक्त गुणवत्तेवर आधारित अभ्यासक्रमांपैकी एक आहे. जागतिक स्तरावर बदलता अभ्यासक्रम लक्षात घेता सीए कोर्समध्येसुद्धा मागील काही वर्षांपासून नवनवीन बदल झाले आहेत, जेणेकरून चार्टर्ड अकाउंटंट हा मार्केटमधील घडामोडींबद्दल नेहमी अपडेट राहू शकतो. सीए कोर्स म्हणजे काय? तयारी कशी करावी? याबाबत माहिती देणारा लेख.



## सीए : अर्थात चार्टर्ड अकाउंटंट

# करिअरचा एक उत्तम पर्याय

सीए कोर्स हा फक्त अकाउंटिंग आणि टॅक्सेशनसाठी मर्यादित नसून त्याची व्यापकता ही शेअर मार्केट आणि फायनान्स क्षेत्रामध्येदेखील पसरलेली आहे. सीए परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर सीएची नोकरी आणि प्रॅक्टिस सोडून इतर फायनान्शिअल कन्सल्टन्सी, शेअर मार्केट, ऑडिटिंग, फोरकास्टिंग आदी विविध क्षेत्रांमध्ये करिअर करून पैसा आणि नाव दोन्ही कमावता येते. विद्यार्थ्यांना काही कारणास्तव सीए कोर्स पूर्ण करता आला नाही म्हणजेच फायनल परीक्षा पास होऊन सीएची पदवी मिळविता आली नाही तरी जे शिक्षण आणि प्रॅक्टिकल ट्रेनिंग मिळाले आहे त्याच्या आधारावर करिअरच्या अनेक संधी त्याला मिळू शकतात.

## कोर्ससाठी किती कालावधी लागतो?

- सीए कोर्स हा साधारण पाच वर्षांमध्ये पूर्ण करता येतो. सीएचा अभ्यासक्रम तीन टप्प्यांमध्ये विभागला गेला आहे. फाउंडेशन, इंटरमिजिएट आणि फायनल. या तीन टप्प्यांमधला सर्वात महत्त्वाचा टप्पा म्हणजे आर्टिकलशिप- प्रॅक्टिकल ट्रेनिंग हा आहे, ज्यामध्ये सीए विद्यार्थ्याला दोन वर्षे प्रॅक्टिस करीत असलेल्या चार्टर्ड अकाउंटंटकडे काम करावे लागते.
- आर्टिकलशिप हा सीए कोर्स मधला आधारस्तंभ मानला जातो, जो विद्यार्थ्याला पुस्तकी ज्ञानाव्यतिरिक्त व्यावसायिक ज्ञान पण शिकवतो ज्याला आपण प्रॅक्टिकल नॉलेज असे म्हणतो.

## सीए कोर्सचे तीन टप्पे आणि अभ्यासक्रम

**१ फाउंडेशन कोर्स :** दहावी उत्तीर्ण झाल्यानंतर सीए फाउंडेशन कोर्सला रजिस्ट्रेशन करता येते व फाउंडेशनची पहिली परीक्षा बारावी पास झाल्यानंतर चार महिन्यांनी देता येते. फाउंडेशन कोर्सला चार विषय असतात अकाउंटिंग , बिझनेस लॉ, कॉन्टिटेटीव्ह ॲप्टीट्यूड आणि बिझनेस इकॉनॉमिक्स.



**२ इंटरमिजिएट :** या अभ्यासक्रमाला दोन प्रकारे प्रवेश घेता येतो. पहिला म्हणजे फाउंडेशनची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर किंवा पदवी उत्तीर्ण झाल्यानंतर. इंटरमिजिएटच्या अभ्यासक्रमात तीन- तीन विषयांचे दोन ग्रुप आहेत.

**पहिल्या ग्रुपमध्ये** १. ॲडव्हान्स अकाउंटिंग, २. कॉर्पोरेट लॉ ॲंड अदर लॉ ३. टॅक्सेशन हे तीन विषय आहे.

**दुसऱ्या ग्रुपमध्ये** १. कॉस्ट ॲंड मॅनेजमेंट अकाउंटिंग, २. ऑडिटिंग ॲंड एथिक्स ३. फायनान्शिअल ॲंड स्ट्रॅटेजिक मॅनेजमेंट.

इंटरमिजिएटची परीक्षा उत्तीर्ण करण्यासाठी प्रत्येक विषयामध्ये किमान ४० टक्के व प्रत्येक ग्रुपमध्ये ॲग्रीगेट ५० टक्के असे गुण मिळवावे लागतात.

**३ फायनल एक्झाम :** या टप्प्यात सहा विषय असतात जे दोन ग्रुप मध्ये विभागलेले आहेत.

- **पहिल्या ग्रुपमध्ये** १. फायनान्शिअल रिपोर्टिंग, २. ॲडव्हान्स फायनान्शियल मॅनेजमेंट आणि ॲडव्हान्स ऑडिटिंग ३. प्रोफेशनल एथिक्स अशा तीन विषयांच्या समावेश आहे.
- **दुसऱ्या ग्रुपमध्ये** डायरेक्ट टॅक्स ॲंड इंटरनॅशनल टॅक्स लॉ, इन-डायरेक्ट टॅक्सेस आणि इंटिग्रेटेड बिझनेस सोल्युशन या तीन विषयांचा समावेश आहे.
- इंटिग्रेटेड बिझनेस सोल्युशन हा विषय केस स्टडीवरती आधारित आहे. ज्यामध्ये विद्यार्थ्यांचे अकाउंट्स, फायनान्शिअल मॅनेजमेंट, टॅक्सेशन, कॉर्पोरेट ॲंड इकॉनॉमिक लॉ या विषयांवर टेस्ट केले जाते. फायनल परीक्षेसाठी प्रत्येक विषयामध्ये ४० गुण प्राप्त करणे गरजेचे असते व ग्रुपचे ॲग्रीकेट टोटल ५० टक्के असावे लागते.

## आर्टिकलशिप एक अविभाज्य घटक

सीए कोर्सचा सर्वात महत्त्वाचा टप्पा हा इंटरमिजिएटची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर चालू होतो. प्रॅक्टिकल ट्रेनिंग म्हणजेच आर्टिकलशिप चालू होते. या प्रॅक्टिकल ट्रेनिंगचा कालावधी दोन वर्षांचा असतो. आर्टिकलशिप हा सीए कोर्समधला एक अविभाज्य भाग आहे. दोन वर्षांची आर्टिकलशिप करता करता विद्यार्थ्याला ॲडव्हान्स आयटी कोर्स आणि सेल्फ बेस्ड ऑनलाइन मॉड्युल्स या परीक्षादेखील द्यायला लागतात.

## विद्यार्थ्यांनी अभ्यास कसा करावा?

- सर्वप्रथम वेळापत्रक बनवणे आणि अंमलबजावणी करणे ही यशाची पहिली पायरी आहे.
- अभ्यास करताना सकारात्मक मानसिकता असणे गरजेचे आहे.
- विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमाची दोन भागांत विभागणी करावी. प्रॅक्टिकल आणि थेरॉटिकल. दिवसभरात किमान दोन विषयांचा तरी समावेश (एक प्रॅक्टिकल आणि एक थेरॉटिकल) त्याच्या वेळापत्रकामध्ये करावा.
- दिवसातून आठ तास अभ्यास करणे गरजेचे आहे.
- मानसिक, शारीरिक आरोग्यासाठी मेडिटेशन किंवा योगा, हलका व्यायाम करावा.
- परीक्षेच्या कालावधीत तीन महिने समाजमाध्यमांपासून अलिप्त राहावे.
- नियमित सराव, रिविजन हा परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी गरजेचा आहे.
- परीक्षेच्या एक महिना अगोदर, मॉक टेस्ट सिरीज द्यावी. त्यामुळे परीक्षेसाठी तयारी लक्षात येईल.
- एखादा पेपर अवघड गेला म्हणून त्याचा प्रभाव येणाऱ्या दुसऱ्या पेपरवर पडू नये, याची काळजी घ्यावी.



अलोक गडकरी,
सीए, पुणे.

Hello Pune
Page No. 7 Dec 07, 2023
Powered by: erelego.com

## News Paper Clippings During December 2023

## Section: Miscellaneous

लोकसत्ता

लोकमान्य लोकशक्ती

### प्रकल्पामध्ये समाविष्ट दुर्मीळ हस्तलिखिते



- चिकित्सासारसंग्रह (इ. स. १३२० मधील सर्वात जुनी पोथी, आणि इतर पोथ्या) – हा आयुर्वेदीय संग्रहग्रंथ आहे.
- पत्रप्रशस्तिकाशिका, प्रशस्तिकाशिका, पत्रप्रशस्ति – प्राचीन आणि मध्ययुगीन काळात विविध पातळ्यांवर चालणारा पत्रव्यवहार, संदेशलेखन या विषयांवर प्रकाश टाकणाऱ्या ग्रंथांचा समूह.
- पृथ्वीदर्शन – पृथ्वीसंबंधात पुराणांमध्ये येणाऱ्या वर्णनाप्रमाणे काढलेले नकाशे, जैन आणि बौद्ध परंपरेतील नकाशांचाही समावेश
- मल्लविद्यापुराण – कुस्ती आणि व्यायाम या विषयावरचा ग्रंथ.
- वास्तुविद्या (वास्तुशास्त्र नव्हे) – स्थापत्यशास्त्रावरचा एक छोटा ग्रंथ. यामध्येही इतर तत्सम ग्रंथांचा परामर्श घेण्यात येईल.

"दुर्मीळ हस्तलिखितांचा हिंदी आणि इंग्रजी अनुवाद करण्याच्या प्रकल्पासाठी संस्थेला केंद्रीय संस्कृत विश्वविद्यालयाकडून ८० लाख रुपयांचे अनुदान मंजूर झाले आहे. त्यापैकी ४० लाख रुपयांचा पहिला हप्ता प्राप्त झाला असून प्रकल्पाच्या कामाची सुरुवात झाली आहे. या प्रकल्पामध्ये १ जानेवारीपासून पाच अभ्यासक रुजू होणार आहेत.

– भूपाल पटवर्धन,
अध्यक्ष, कार्यकारी मंडळ, भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था

22/12/2023 | Pune | Page : 02
Source : https://epaper.loksatta.com

# *Upcoming Events*

## JANUARY 2024

| MON | TUE | WED | THU | FRI | SAT | SUN |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 ***Savitribai Phule Jayanti***  | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 ***Jijau Masaheb Jayanti & Swami Vivekanand Jayanti***   | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 ***Netaji Subhash Chandra Bose Jayanti & Balasaheb Thackeray Jayanti***   | 24 | 25 | 26 | 27 | 28 |
| 29 | 30 | 31 | | | | |




*Other than the Photos of Modern College Pune-5 and Event Photos, Newspaper clipping images, all other images in this Bulletin Issue are downloaded from Google Images., Pinterest, Freepik.Com.*